# लोकमान्य टिळक-चरित्र

★ ★ ★

लेखक

त्र्यं. ग. बापट

★

मूल्य २ रुपये

# प्रस्तावना

★

आज लो. टिळकांचा जन्म होऊन एक शतक लोटलें व मृत्यु होऊन तीन तपें लोटलीं. या जन्ममृत्यूच्या कालान्तरांत भरतखंडांत बरीच उलथापालथ झाली. इंग्रजांचें अधिराज्य चांगलें स्थिरस्थावर होऊन त्यांना हिंदी प्रजेच्या शांतताप्रिय मनाची घडण बरोबर कळली. जीवित आणि वित्त यांची शाश्वति असली कीं पुरें, मग देश कोणाच्या का ताब्यांत राहीना ! अठराशें सत्तावनची सशस्त्र उठावणी कांहीं विवक्षित असंतोषी पुढाऱ्यांच्या व त्यांच्या जुन्या सैनिकपेषाच्या अनुयायांच्या महत्त्वाकांक्षेतून निर्माण झाली होती; तिला सार्वत्रिक पाठबळ न मिळाल्यामुळें ती 'बंड' या सदरांत जमा झाली. वासुदेव बळवंत या, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं हातावर शिर घेऊन एकाकी बंड पुकारणाऱ्या ज्वलन्त देशभक्ताची वाट लावण्यास सरकारला फारसे श्रम पडले नाहींत. पण महाराष्ट्रांत फडक्यांनीं चालविलेली क्रांतीची चळवळ वायां गेली नव्हती. याच वेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे 'निबंधमालें'तील स्फूर्तिदायक व स्वाभिमान जागृत करणारे लेख प्रसिद्ध होत होते. टिळक आणि आगरकर यांनीं आमरण लोकसेवेचें व्रत सतीच्या वाणाप्रमाणें आपण होऊन अंगिकारलें व राष्ट्रीय शिक्षणाच्या उद्योगास लागलीच उद्युक्त झाले.

त्यावेळीं महाराष्ट्रांत न्या. मू. रानडे यांचें नांव त्यांच्या विद्वत्तेमुळें व कर्तृत्वामुळें जिकडे तिकडे गाजलें होतें व तें बरोबरहि होतें. पण रावबहादुरांना सरकारी नोकरीमुळें जें करतां येत नव्हतें पण त्यांची तीव्र मनीषा होती तें टिळक–आगरकरांनीं करून दाखविलें. दोघेहि एकाच गुरूचे चेले व सिद्धसाधक ! एकाच स्वराज्यध्येयासाठीं; पण वेगवेगळया शस्त्रानें लढणारे

वीराग्रणी ! इंग्रजी शिक्षणाबरोबर व इंग्रजांच्या अनुकरणानें देशांत सामाजिक सुधारणा बरीवाईट होतच होती. तेव्हां ती लढविणारा पक्ष साहजिकच नेटानें उभा राहूं शकला नाहीं. पण राजकीय सुधारणेसाठीं मात्र राष्ट्रीय सभेसारखे पक्ष चांगले रूजून फलपुष्पांनीं बहरूं लागले. राजकीय सुधारणेचें अंतिम ध्येय स्वराज्य होतें व तें मिळविण्यासाठीं ज्यांनीं आपल्या जिवाचें रान केलें त्यांचे त्या काळांतील मुकुटमणि म्हणजे लो. टिळक होत व म्हणूनच आज त्यांची जन्मशताब्दी देशांत व देशाबाहेरहि सर्वत्र मोठ्या हिरीरीनें सर्व पक्षोपपक्षांकडून साजरी होत आहे.

लोकमान्यांच्या ठिकाणीं गाढ विद्वत्ता, विचारशक्ति, कार्यप्रवणता, निस्पृहता व आत्यंतिक निःस्वार्थता हे एके जागीं बहुधा न आढळणारे दुर्मिळ गुण असल्यानें, अतिरेकी व तापट स्वभावहि उपकारकच ठरला. ते सनातन्यांचे कैवारी व पुराणप्रिय-वृत्तीचे कां दिसत याचें कारण त्यांना बहुजनसमजाला चुचकारूनच हळूहळू पुढें न्यावयाचें होतें. आपल्या पावलांनीं सरसर पुढें जाणारा सुधारणाहितैषी एकांडाच ठरतो; व त्याला फारसें कार्य करतां येत नसतें. टिळकांप्रमाणें पुढें म. गांधींनाहि हाच अनुभव आला व राजकारणांतील त्यांचा अध्यात्मवाद अभ्यासल्यास याचें प्रत्यंतर येईल.

बहुजनसमाजाला देश-स्वातंत्र्याची तृषा लावण्यासाठीं व ती भागविण्याचीं साधनें त्यांना उपलब्ध करून देण्यासाठीं लोकमान्यांनीं आपलें तनमनधन अर्पण केलें व तोच कित्ता म. गांधींनीं उचलला. एकानें आगाऊ तयार करून ठेवलेल्या भूमींत दुसऱ्यानें बीं पेरलें. दोघांचेंहि कार्य देशहिताला अत्यंत उपयुक्त व पोषकच. एकाचा अस्त व लगेच दुसऱ्याचा उदय हा चंद्र-सूर्यांच्या अस्तोदयाप्रमाणें जनतेला स्थित्यंतरांतील घटनांशीं समरस व्हावयास लावतो. याला अनुरूप अशी कविकुलगुरु कालिदासाची एक उक्ति आठवते.

यात्येकतोऽस्तशिखरं पतिरोषधीना—
माविष्कृतोऽरुणपुरःसर एकतोऽर्कः ।
तेजोद्वयस्य युगपद्व्यसनोदयाभ्यां
लोको नियम्यत इवात्मदशान्तरेषु ।।
(–शाकुंतल, अं. ४, २).

येथें ती किती बरोबर लागू पडते ! दोघेहि युगपुरुषच व यांचें अतोनात झालेलें ऋण भारत कधीं विसरूं शकणार नाहीं.

महाराष्ट्रांत शिवाजी आणि टिळक हे दोन महात्मे असे होऊन गेले कीं, यांच्या त्रिखंड कीर्तिपरीमलामुळें महाराष्ट्राला मानवंदना मिळते. महाराष्ट्राबाहेर आमचा मान, यांच्या नांवांशीं आम्ही संबद्ध आहों म्हणून राखला जातो. एरवीं आम्हांला कोण विचारतो ! आजच याची प्रचीति येत आहे. असो.

प्रस्तुत टिळक–चरित्र श्रीधरादि पुराणकवीप्रमाणें कसलेल्या लेखकानें मोठ्या भाविकतेनें लिहिलें आहे. त्यांचे मागचे रामायण–महाभारत कथाग्रंथ महाराष्ट्रांतील बाल–स्त्रीवर्ग मोठ्या आदरानें व आवडीनें वाचतो, हें आम्हांप्रमाणें अनेकांनीं पाहिलें असेल. श्री. बापट यांची लेखणी ललितकथांना वाहिलेली नाहीं, तरी तींत लालित्य आहे. वर्णनशैली तर आमच्या संतकवींची हुबेहुब वाटते व त्यामुळें वाचकांची वृत्ति सहज सुश्रद्ध बनते. एकाद्या कथेप्रमाणेंच ग्रंथाचा आरंभ व समाप्ति भावना उंच-बळविणारीं तर आहेच; पण त्यांतून खोल अर्थ जो निघतो तो मनाला चटका लावतो. उदाहरणार्थ, चरित्राचा प्रारंभ 'स्वप्नांतील प्रवासा'नें जो केला आहे ता हृदयंगम वाटेल. तळकोंकण डोळ्यांपुढें उभें केलें आहे. वृक्षवनश्रीचें वर्णन तर बहारीचें आहे. "बेहड्यावर राघूकरितां विरही मैना झुरत होती......कांहीं भक्त रुईच्या पानाच्या माळा अंजनीच्या नंदनाला अर्पण करीत होते; याच रुईनें तिजवराच्या गळयांत

माळ घालून कांहीं तरुणींच्या वैधव्याच्या यातना चुकविल्या..... लज्जारंजित युवतींच्या कोमल कपोलाप्रमाणें दिसणारे काजू दुर्गम गिरीवर शोभत होते. त्या वृक्षांच्या पायथ्याशीं मंडलाकार नर्तन करीत घुमणारा पारवा रुसलेल्या सखीची समजावणी करीत होता..." शेंवट करतांना, ता. २३ जुलै १९५६ रोजीं दिल्लीच्या रेडिओवरून झालें (असें भासलेलें) तें (माजी) केन्द्रमंत्र्याचें भाषण (काल्पनिकच) दिलें आहे त्यांत त्यांनीं टिळकांचें चारित्रच थोडक्यांत वर्णिलें आहे. या मंत्र्यांचें नांव न देतां त्यांचें–पोषाख, ठेवण, लकब इ०चें०-जें शब्दचरित्र रेखाटलें आहे त्यावरून हा भूतपूर्व महाराष्ट्रीय केंद्रमंत्री कोण हें सहज ओळखावें. अगदीं अखेरीस शाहीर गोविंद–कवीनें रचलेली टिळकांची आरती बालगंधर्वांच्या कंठांतून रेडिओवरून स्रवतें आहे असें दाखविलें आहे—

टिळक नव्हे ही आत्मश्रद्धा शिवरायाची असे ।
खरोखर शिवरायाची असे ।
निश्चयरूपें भगवा ध्वज हा स्वकरें उभवीतसे ।।
विद्वत्तेच्या अंकावरती राष्ट्रभक्ति खेळते ।
टिळक ही राष्ट्रभक्ति खेळते ।

◆ ◆ ◆

असंख्य तरवारींचे मुजरे झडावेच तुजपुढें ।।

◆ ◆ ◆

एका स्तंभावरी उभी ही महाराष्ट्रद्वारका ।।
मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे ।
तुजपुढें शब्दांचे बुडबुडे ।
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ।।

किती हृदयस्पर्शी व समर्पक उपमा या ! पुस्तक मिटल्यावर मन टिळक-भक्तिभावानें अगदीं भारावून जातें व असा जगद्वंद्य पुरुष आपल्या महाराष्ट्रांत होऊन गेला याची केवढी धन्यता वाटते !

चरित्रांतूनहि असेच प्रसंग वर्णिले आहेत कीं, ते वाचून मन तल्लीन व्हावें. आगरकरांची मोठी योग्यता व त्यांचें निष्कांचन त्यागी जीवन व त्यांतच हंसत-खेळत राहणें आजच्या तरुणांना किती अनुकरणीय आहे ! 'सुरतेच्या समरांगणांत' टिळकांची वीरश्री पणाला लागलेली दिसेल. या प्रसंगाचें दोन पानें सुंदर वर्णन केलें आहे. तसेंच पण त्याहून विस्तृत वर्णन १९०८ सालच्या टिळकांवरील खटल्याचें दिलें आहे.

"आपण इंग्रजी इतिहासांत मोठमोठाल्या देशभक्तांच्या खटल्यांचीं वर्णनें आणि त्यांचीं भाषणें वाचतों. लोकमान्यांचा खटला चालू असतां तीं वर्णनें आम्हांस कःपदार्थ वाटूं लागलीं." हे टिळकांचे जिवाभावाचे स्नेही दादासाहेब खापर्डे यांचे सहजस्फूर्त उद्गार सार्थ व सत्य वाटतात.

घराचा, राजकारणाचा व स्वदेशाचा संबंध अगदीं तुटला तरी या स्थितप्रज्ञ तत्त्वज्ञान्यानें श्रीमत् शंकराचार्य किंवा श्रीज्ञानेश्वर या गीताभाष्यकारांची जागा घेतली व राष्ट्राला नवें कर्मयोगाचें ज्ञान करून दिलें. तुरुंगांतून बाहेर आल्यावर पुन्हां राजकारणांत धडाडीनें उडी ! केवढें हें अमोघ सव्यसाचित्व व विलक्षण व्यक्तिमत्व !

'लोकमान्य टिळक देवमान्य झाले' हा परिच्छेद वाचकाला गहिंवर आणतो, त्याचे डोळे नकळत अश्रु ढाळूं लागतात.

याप्रमाणें श्री. बापट यांनीं थोडक्यांत टिळकभारताची टिळकगीता बनवून ती नुसती वाचनीयच नव्हे तर विद्यार्थ्यांना

अवश्य अभ्यसनीय व्हावीं अशी रचिली आहे. त्यांच्या या सत्कृत्याविषयीं ज्ञानेश्वरांच्याच शब्दांत असें यथार्थ म्हणतां येईल कीं,

> मग वाचेचा तो दिवटा ।
> दावी ( टिळक ) कृत्यजातांचिया वाटा ।
> तेव्हां कर्ता रिगे कामठा ।
> कर्तृत्वाचा ॥

हा कर्तृत्वाचा कामठा त्यांनीं जो दीर्घ लेखनतपस्येनें संपादिला आहे तो त्यांना यापुढें काय स्वस्थ बसूं देतो ? दरसाल वर्षाऋतूंत नवीन कोंब फुटणारच. असो.

शेवटीं ही प्रस्तावना पुरी करतांना आमचे 'प्रसादप्रकाशना'चे अभिमानी व सहकारी लेखक त्र्यंबकराव बापट यांचे संस्थेतर्फे मनःपूर्वक आभार मानतों.

प्रसाद-प्रकाशन
कार्यालय, पुणें.
१ आगष्ट १९५६

चिंतामण गणेश कर्वे

# लोकमान्य टिळक-चरित्र

★

## ( १ ) स्वप्नांतील प्रवास—

यावर्षी लोकमान्य टिळक-चरित्र लिहावयाचें ठरविलें. चरित्र-विषयक सर्व साधनसामुग्री वाचून काढिली. त्या संबंधीचेच विचार डोक्यांत घोळत होते. त्या रात्रीं शांत झोंप लागली.

एक सुंदर स्वप्न पडलें 'काळाच्या गाडींत' बसून जुन्या काळांत आमचा प्रवास सुरू झाला.

पहांटेचा कोंबडा आरवला. आम्ही बैलगाडींत बसलों. आमचा प्रवास सुरू झाला. १९५६, १९४०, १९२०, १९०८, १८८०, १८६०, याप्रमाणें मागें जातां जातां आम्हीं १८५७ चें बंड पाहिलें. यानंतर आम्ही १८५६ सालांत प्रवेश केला ! गाडीवानानें गाडी हांकलली. तळ कोंकणांतील एकेक गांव पाहात आमची बैलगाडी रत्नागिरीकडे निघाली. पहांटेची शांत वेळ होती. कृत्तिकांचा पुंजाकार आकाशांत दिसत होता. बैलांच्या गळ्यांतील घंटा वाजत होत्या. वाटलें कीं, सृष्टिमंदिरांतील गोड घंटा वाजत आहेत. वारे मंद वाहात होते. पांखरें गाऊं लागलीं. सृष्टिमंदिरांत काकड—आरती सुरू झाली.

आम्ही घाटांतून निघालों. मंजुळवाणें गाणें गात झरे झुळझुळ वाहात होते. खालीं एक नदी वाहात होती. ती नदी खेळत खेळत आणि खिदळत गुणगंभीर अशा सागराकडे निघाली.

कुडा आणि तेरडा माणिकमोत्याप्रमाणें शोभत होते. आकाशांत ढग जमत होते. कडेपठारी सोनुली सोनावळ मारुतासह खेळूं लागली. पुढें गेल्यावर एक तळें दिसलें. कमलवनाच्या तरत्या शय्येवर मदालसा जलदेवी स्वच्छंद लोळत होती. बकुळीच्या मंजिरीनें आमोद उधळला. मृदुल दलाच्या रम्य गालिच्यावर गोकर्णीचीं निळीं फुलें स्वप्नसंगीत ऐकत होतीं. वृक्षांच्या राईतून आम्ही पुढें गेलों. केतकीच्या वनांत नाग डोलत होते. फुलपांखरांच्या पंखांवर पुष्पवनांतील परी जादूची पावरी वाजवीत होत्या. सीताबाईनें भावाला गोड पोहे दिले; पण कवडा बादूल वेडा होता. त्यानें ते पोहे रागानें भिरकावून दिले. त्यांतून पोह्यासारखीं पानें असलेलीं रोपें उगवलीं. कोंकणांतील डोंगरपठार त्या पोह्यांनीं मंडित झाले होते.

कांहीं ठिकाणीं आंवळी आणि जांभळी फळभारानें लवल्या होत्या. वडाच्या एका पारम्बीवर वानर झोके घेत होता. बेहेड्यावर राघूकरितां विरही मैना झुरत होती. सात्विणावर मधमाशांची पोवळीं दिसलीं. पोटीं गरे, पण ओठीं कंटक असलेला असा फणस डोलत होता. शेवरी, पांगारे, रातम्बी आणि चिंच यांवर आंब्यानें शीतल सांवली केली होती. कळकीच्या वनांत दर्यापुराहून आलेला छन्दी मुशाफिर पुंगी वाजवीत होता. सुरंगी, नादवटी, कोरांटी, नेवाळी यांच्या फुलांनीं बागा शृंगारल्या. करवन्दें आणि तोरणें रानोरानीं पिकलीं होतीं. अवधूताच्या औदुंबरानें आमच्या बैलगाडीला शीतल छाया दिली. शिवयोग्याचा वेल पाहून आमच्या मनांतील भक्तीचें बळ वाढलें. आयीन, किंजळ आणि पांढरी या झाडांनीं मांत्रिकांच्या मंत्रबाळाला दुर्बळ ठरविलें. पुढें गेल्यावर एक खेडेगांव दिसलें. तेथें अनेक रुईचीं

झाडें होतीं. कांहीं भक्त रुईच्या पानांच्या माळा अन्जनीच्या नंदनाला अर्पण करीत होते. याच रुईनें तिजवराच्या गळ्यांत माळ घालून कांहीं तरुणींच्या वैधव्याच्या यातना चुकविल्या. भेंडी आणि उंडिणी या वृक्षांवर खार भराभर पळत होती. लज्जारंजित युवतीच्या कोमल कपोलाप्रमाणें दिसणारे काजू दुर्गम गिरीवर शोभत होते. त्या वृक्षांच्या पायथ्याशीं मंडलाकार नर्तन करीत घुमणारा पारवा रुसलेल्या सखीची समजावणी करीत होता. रत्नागिरी नगर जवळ दिसूं लागलें. प्राजक्ताच्या कळ्यांना बहर आला होता. भगवान् सूर्यनारायण वर आला. बागेमध्यें बैलरहाट सुरू होते. रहाटांचा कुऊं कुऊं आवाज ऐकूं आला. पाण्याचे पाट बागेंतून वाहात होते.

पोफळी, नारळी, केळीं, अननस यांच्याकडे पाणी जात होतें. काल-रहाट चालू होता. आम्ही बैलगाडींतून उतरलों आणि शोध करीत करीत सदाशिव गोरे यांच्या घराजवळ आलों. आम्ही दारांतून डोकावून आंत पाहिलें—

## ( २ ) तपस्विनी पार्वती—

मध्यमवयाची एक सांवळ्या वर्णाची स्त्री पुढें आली. तिनें वेणीचा खोपा घातला होता. लांब आडवें कुंकू; नाकांत नथ यांनीं तिची मुद्रा गंभीर दिसत होती; पण त्या गांभीर्यांत थोडी औदासीन्याची छटा मिसळली होती. त्या सुवासिनीचें नांव पार्वती. ही पार्वती सडा घातल्यावर रांगोळी काढूं लागली, पण तिला भराभरा काढतां येईना; कारण ती गर्भवती होती. पण ती उदासीन कां दिसत होती ?

मधून मधून ती उगवत्या सूर्यनारायणाला नमस्कार करीत होती. ती तीन मुलींची माता होती. हेंच तिच्या दुःखाचें

कारण ! चौथ्या खेपेला आपल्याला तेजस्वी मुलगा व्हावा म्हणून ती हिरण्यगर्भाची उपासना करीत होती. तिनें आदित्य, चन्द्रमा आणि नक्षत्रमाला रेखिल्या; स्वस्तिक व गोष्पदें काढलीं; पद्में, बिल्वदलें, फुलें आणि चक्रें आलेखिलीं. पार्वतीनें रांगोळीनें काढलेल्या चित्रांमध्यें स्वर्ग आणि भूमि यांचा संगम दिसत होता. तेथील आदित्यादिक आकृतींनीं दिव्यत्व सुचविलें; स्वस्तिकानें चार पुरुषार्थांतील सफलता सांगितली, गोष्पदानें पावित्र्य दर्शविलें, आणि सुदर्शन चक्रामध्यें ईश्वराचें सान्निध्य दिसून आलें. पार्वती आपल्याच विचारांत तन्मय होऊन रांगोळी काढीत होती. तिच्या मनांत एक चित्र उभें राहिलें. तिची मुद्रा प्रसन्न झाली. तिनें उखळीला बांधलेल्या बाळकृष्णाचें चित्र काढलें. यानंतर उपास-तापासांनीं कृश झालेली ती पार्वती उठून उभी राहिली. तिनें विश्वाला प्रकाश देणाऱ्या सूर्याला नमस्कार केला आणि मंद मंद पावलें टाकीत ती घरांत गेली. तिचे पति गंगाधरपंत यांना तिच्या सुखप्रसूतीची काळजी वाटत होती.

हळूहळू दिवस वाढत गेले, नवमास पूर्ण झाले आणि आषाढ कृ. ६ शके १७७८ ( ता. २३ जुलई १८५६ ) या दिवशीं सूर्योदयानंतर पार्वतीनें एका अशक्त मुलाला जन्म दिला. जन्म झाल्यावर तो मुलगा कांहीं वेळ बेशुद्ध अवस्थेंत होता. परकीयांच्या दास्यत्वांत काळ कन्ठीत असलेला भारतहि त्यावेळीं एक प्रकारच्या बेशुद्ध अवस्थेंतच नव्हता काय ?

## ( ३ ) गृहस्थाश्रमी गंगाधरशास्त्री —

बारशाच्या दिवशीं त्या अशक्त मुलाचें केशव असें नांव ठेवण्यांत आलें; पण पार्वतीबाई त्याला प्रेमानें बाळ असें म्हणत. बाळाच्या पणजाचें नांव केशव. हा केशव पेशवाईच्या काळांत

घोड्यावर बसण्यांत वस्ताद, निशाण मारण्यांत पटाईत आणि पोहोण्यांत सराईत म्हणून गाजला होता. पेशवाई बुडाल्यावर हा चिखलगांव येथें येऊन राहिला. केशवाचा मुलगा रामचंद्र, आणि नातू गंगाधर. रामचंद्रानें संन्यास घेतला. प्रपंचाचा भार गंगाधररावावर येऊन पडला. या कर्त्या मुलाला लोक गंगाधरपंत म्हणूं लागले. या गंगाधरपंतांनीं संस्कृतमधील व्याकरण आणि उपनिषदें यांचा सखोल अभ्यास केला. लोक त्यांना 'गंगाधरशास्त्री' या नांवानें संबोधूं लागले. यांनीं शिक्षकाचा पेशा स्वीकारला. आरंभीं महिना पांच रुपये पगार होता. गंगाधरपंतांची मालवणास बदली झाली. पगारांत पांच रुपये वाढले. पुढें चिपळुणास गेल्यावर पंधरा रुपये मिळूं लागले आणि रत्नागिरीला नेमणूक झाल्यावर दरमहा पंचवीस रुपये पगार मिळूं लागला. पुढें कांहीं वर्षांनीं गंगाधरपंतांची रत्नागिरीहून पुण्यास बदली झाली. तेव्हां त्यांना शाळेतर्फें निरोप देण्यांत आला. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांनीं त्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें. आपल्या भाषणाच्या ओघांत डॉ. भांडारकर म्हणाले कीं, "गंगाधरपंतांची विद्वत्ता, सदयता, कल्पकता, निस्पृहता व निरलस वागणूक हे गुण वाखाणण्यासारखे आहेत. आज आपल्या हातांतला ठेवा, व्याकरणाचा सांठा, गुरुशिष्यभक्तीचें दुर्मिळ होत चाललेलें भांडार आपण सोडीत आहोंत, असें मला वाटतें."

गंगाधरपंत थोर शिक्षक होते, त्याचप्रमाणें थोर गृहस्थ होते. त्यांच्या घरीं अनेक गरीब विद्यार्थ्यांना भोजन मिळे. "आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहूं नको," या शाहीराच्या उक्तीप्रमाणें त्यांची वागणूक असे. त्यांनीं आपला संसार टापटिपीनें केला; पण टापटीप म्हणजे चिक्कूपणा नव्हे. त्यांनीं क्रमिक

पुस्तकें लिहिलीं, धनसंचय केला. त्यांच्या घरांत लक्ष्मी नांदूं लागली; पण लक्ष्मी ज्याचे पाय चेपीत आहे त्या विष्णूचें विस्मरण त्यांना कधींहि झालें नाहीं. गंगाधरपंतांनीं कांहीं दिवस भोजन-दक्षणा देण्याचा परिपाठ ठेवला होता. दीड वर्षांत त्यांचें घरीं एक सहस्र ब्राह्मणांनीं भोजनदक्षणा घेतली. गंगाधरपंत असे उदार होते. त्यांची सहधर्मचारिणी तपस्विनी होती. अतिथिसत्कार करणाऱ्या अशा दांपत्याच्या पोटीं बाळाचा जन्म झाला. " शुद्ध बीजापोटीं, फळें रसाळ गोमटीं. "

## ( ४ ) बाळाला शाळेंत घातलें —

१८६१ साल उजाडलें. बाळाला पांचवें वर्ष लागलें. वडिलांनीं दसऱ्याचे मुहूर्तावर त्याचें नांव शाळेंत दाखल केलें. शाळेपेक्षां गृहशिक्षणानें बाळाच्या बुद्धीचा विकास झाला. वडिलांनीं बाळाकडून कित्ते गिरवून घेतले. बाळ पाटीचा उप-योग न करतां तोंडानेंच उदाहरणें सोडवूं लागला. वडिलांनीं संस्कृत श्लोक पाठ करवून घेण्यास आरंभ केला. एक दिवस हा बालबटू हटून बसला. तेव्हां वडील म्हणाले, " बाळ ! मी तुला एक श्लोक पाठ करण्याबद्दल एक पैसा देईन. पाहूं तूं किती पैसे मिळवतोस तें. " हें बोलणें ऐकून बाळाचा उत्साह वाढला. यानें रोज एक याप्रमाणें चौसष्ट श्लोक पाठ केले. वडिलांनीं बाळाला एक रुपया बक्षीस दिला.

एकदां बाळाच्या अभ्यासापेक्षां त्याच्या स्वभावाची परीक्षा करणारा एक प्रसंग निर्माण झाला. बाळ शाळेंत गेला. चार तासांनी मधली सुटी झाली. बालगोपाल हुतुतू, लंगडी इत्यादि खेळ खेळूं लागले. कांहींनीं आपले डबे उघडले आणि खाण्यास प्रारंभ केला. एका मुलानें शेंगा विकत घेतल्या, त्या सोलून

दाणे खाऊन टाकले आणि फोलकटें वर्गांत टाकून दिलीं. मधली सुटी संपली आणि गुरुजी वर्गांत आले. शेंगांच्या सालीं पाहून ते संतापले. त्यांनीं उग्र आवाजांत विचारलें, "शेंगा कोणी खाल्ल्या?" कोणीहि उत्तर देईना. तेव्हां मास्तरांनीं गोमटी वेताटी हातांत घेतली आणि प्रत्येकाला प्रसाद देण्यास प्रारंभ केला. बाळ टिळकांची पाळी आली. मास्तर म्हणाले, "टिळक! हात पुढें कर." टिळक म्हणाला, "मी छडी घेणार नाहीं. मी शेंगा खाल्ल्या नाहींत." हें ऐकून मास्तर म्हणाले, "बाळ, वर्गाच्या बाहेर चालता हो. उद्यां वडिलांची चिठ्ठी घेऊन ये." आख्यायिकेंत असें सांगितलें आहे कीं, दुसरे दिवशीं गंगाधरपंत शाळेंत आले व त्यांनीं सांगितलें कीं, "माझ्या मुलावर माझा विश्वास आहे. तो कधींहि खोटें बोलणार नाहीं!"

## (५) बाळाचा व्रतबंध—

१८६४ साल सुरू झालें. वडिलांनीं मुलाचा व्रतबंध करण्याचें ठरविलें. उपाध्यायांनीं विचारलें, "आज बाळाचा अभ्यास कुठपर्यंत झाला आहे?" वडील म्हणाले, "बाळानें आठव्या वर्षांत पदार्पण केलें आहे. अपूर्णांकापर्यंत गणित तयार आहे. रूपावलि, समासचक्र, निम्मा अमरकोश आणि ब्रह्मकर्माचा बहुतेक भाग, यांचें पाठांतर झालें आहे." हें ऐकून उपाध्याय आश्चर्यचकित झाले, सन्तुष्ट झाले. यानंतर एका शुभमुहूर्तावर बाळाचें उपनयन झालें!

बाळाच्या कमरेला मेखला बांधला. त्यानें कौपीन धारण केलें, यज्ञोपवीत घातलें, हातांत दंड घेतला. बटूनें धारण केलेलें यज्ञोपवीत तीन पदरांचें होतें. हा प्रत्येक पदर तीन तंतूंचा वळलेला होता. यज्ञोपवीताच्या नऊ तंतूंवर ॐ, अग्नि, नाग,

सोम, पितर, प्रजापति, वायु, सूर्य आणि विश्वदेव अशा नऊ देवता अधिष्ठित झालेल्या होत्या. व्रतबंधांतील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे गायत्रीमंत्राचा उपदेश. गंगाधरपंतांनीं बाळाला तो मंत्र सांगितला, याचवेळीं त्याचा मराठींत अर्थहि सांगितला. या मंत्राचा अर्थ असा आहे कीं, "त्या सवितृ देवतेच्या, उपासना करण्याला योग्य अशा तेजाचें आम्ही ध्यान करतों. तो आमच्या बुद्धीला प्रेरणा देवो!"

शेवटीं गुरुजींनीं तैत्तिरीय उपनिषदांतील आचारधर्म बाळाला उपदेशिला. "हे बालबटू! खरें बोल. धर्माप्रमाणें वाग. स्वाध्यायापासून च्युत होऊं नकोस. गुरुजींना प्रिय असलेलें धन त्यांना अर्पण कर. स्वतःचा वंशच्छेद होणार नाहीं याबद्दल काळजी घे योग्य वेळीं विवाह कर. कितीहि संकटें आलीं तरी सत्यनिष्ठा सोडूं नकोस. देवकार्य आणि पितृकार्य श्रौतस्मार्तरीत्या पार पाडावें. मातेला देवासमान पूज्य मान. पित्यालाहि देवाप्रमाणें पूज्य मान. विद्या देणाऱ्या आचार्यांना मान दे. अतिथींचा सत्कार कर. निर्दोष अशा कर्मांचेंच आचरण कर. अन्तःकरणांत श्रद्धा ठेवून दान कर. दान देतांना नम्रता असावी. जर तुला धार्मिक किंवा व्यावहारिक आचरणाविषयीं शंका वाटूं लागली तर सभोंवार पाहा आणि जे समदर्शी, सदाचरणी, धर्मशील असतील त्यांचें अनुकरण कर. याप्रमाणें वागलास तर तुझें ऐहिक आणि पारलौकिक कल्याण होईल."

## ( ६ ) पुण्यनगरींत प्रवेश—

१८६६ साल सुरू झालें. बाळाला दहावें वर्ष लागलें. वडिलांची बदली पुण्याला झाली. त्यांच्याबरोबर बाळ पुण्याला आला. शाळा सकाळची होती. बाळानें स्नानसंध्या केली. पायांत

जोडा, कमरेला पंचा, अंगांत बाराबंदी, डोक्याला गोंड्याची पांढऱ्या रंगाची दुहेरी टोपी, अशा पोषाखांत कुमार बाळ गंगाधर टिळक दोन नंबरच्या शाळेंत गेला. " तुझें गांव कोणतें ?" असें गणेश गद्रे या मुलानें विचारलें. " कोंकणांतील चिखलगांव " असें अभिमानानें उत्तर दिलें. पुढें आठवड्याच्या परीक्षा सुरू झाल्या. महिन्याच्या शेवटीं मार्कांच्या बेरजा झाल्या. बाळाचा नंबर पहिला आला. बाळाजवळ नकाशाचें छापील पुस्तक होतें. गणेश गद्रे त्या पुस्तकावरून नकाशे काढी, पण बाळ मात्र स्वतंत्र रीतीनें अक्षांश-रेखांशांच्या आधारानें नकाशा करी. त्यावेळीं मॉरिसकृत इतिहास नेमलेला होता. तो वाचून झाल्यावर बाल बृहस्पति म्हणाला कीं, " हा इतिहास एकतर्फी लिहिलेला आहे. "

बाळाची गणिताची आवड याच वयांत दिसून आली. एके दिवशीं जोशी मास्तर आणि बाळ टिळक या उभयतांमध्यें एका उदाहरणावरून मतभेद झाला. बाळ म्हणाला, " मी प्रो. केरूनाना छत्रे यांचेकडे जातों." बाळ तडक केरूनानांच्या घरीं गेला. त्यानें आपली शंका विचारली. केरूनानांनीं कौतुकानें बाळाच्या कलानें घेऊन त्याच्या शंकेचें समाधान केलें. बाळाचें धैर्य आणि उत्कंठा पाहून वर्गांतील मुलें त्याच्याकडे आदरानें पाहूं लागलीं.

वर्गांत संस्कृतचा तास सुरू झाला. शिक्षकांनीं नैषध-काव्यांतील श्लोक समजावून सांगितले. त्यानंतर त्या श्लोकांचें भाषांतर लिहून घेण्यास सांगितलें. इतर मुलांनीं लिहून घेतलें. बाळानें भाषांतर लक्ष देऊन ऐकलें; पण लिहून घेतलें नाहीं. शिक्षक रागानें म्हणाले, "काय रे बाळ टिळक! तूं भाषांतर कां लिहून घेत नाहींस ?" तो प्रश्न ऐकून बाळ शांतपणानें म्हणाला कीं, " स्वतः भाषांतर

करण्यानें जितका फायदा होतो तितका दुसऱ्याचें पाठ केल्यानें होत नाहीं."

हायस्कूलमध्यें हॅथॉर्नटवेट या नांवाचे शिक्षक गणित शिकवीत असत. बीजगणितांतील कठीण उदाहरणें बाळानें लीलेनें सोडविलीं. तें पाहून साहेब वर्गांत म्हणाले, "बाळ टिळकाची गणित विषयांतील तयारी हा माझ्या शिक्षणाचा परिणाम आहे." तें ऐकून बाळ निर्भयपणें उभा राहिला आणि म्हणाला, "सर! मी केरूनाना छत्र्यांचा शिष्य आहे."

बाळ टिळक हा अभ्यासांत स्वच्छंदी नव्हता, तर स्वतंत्र बुद्धीचा होता. शिक्षकानें गणित सांगितलें म्हणजे बाळानें तें तोंडानें करावें. त्यानें पाटीवर करा म्हटल्यास, 'पाटी कशाला पाहिजे?' म्हणून याचा प्रश्न आहेच. त्यानें स्मरणवही आणावयास सांगितली तरी 'ती कशाला हवी!' हा याचा प्रश्न! त्यानें फळ्यावर उदाहरण करावयास सांगितलें म्हणजे 'खडूनें हात कोण खराब करतो,' असें म्हणून तोंडानेंच सांगण्यास प्रारंभ करावा असें कांहीं ना कांहीं प्रत्येक वेळेस तेढें असावयाचेंच!........एकदां सहामाही परीक्षा आली. गणिताचा पेपर होता. आठ उदाहरणें होतीं. त्यांतील तीन उदाहरणें कठीण होतीं. बाळानें कठीण उदाहरणें तेवढीं सोडविलीं. उत्तरपत्रिका टेबलावर ठेवली आणि तो स्वयंसिद्ध विद्यार्थी वर्गाच्या बाहेर निघून गेला.

## (७) शुद्धलेखनांतील 'संत' :—

शाळा सुरू झाली. शिक्षक वर्गांत आले. तो तास शुद्ध-लेखनाचा होता. शिक्षक म्हणाले, 'तोंडें फिरवा, पाट्या घ्या आणि मी सांगतों तें शुद्ध लिहा," वर्ग शांत होता. पेन्सिलींचा टक्‌टक् असा आवाज ऐकूं आला.. शिक्षक म्हणाले, "महाराष्ट्रावर

संतजनांचे उपकार आहेत. शिवाजीच्या काळांत प्रत्येक जातीमध्यें एक सन्त निर्माण झाला. या संतांनीं महाराष्ट्राच्या महोदयाचा पाया घातला. यांच्या कार्यामुळें महाराष्ट्रामध्यें सर्व जातींत ऐक्य निर्माण झालें." उतारा संपल्यावर शिक्षकानीं मुलांना आज्ञा केली कीं, "आपापल्या पाट्या बदला. मी प्रत्येक शब्दांतील ऱ्हस्व, दीर्घ आणि अनुस्वार हें समजावून सांगतों. यानंतर चुका मांडा आणि पाट्या परत द्या." शिक्षक ऱ्हस्वदीर्घ सांगत असतांना चुकलेल्या शब्दांवर मुलें उभ्या रेघा ओढीत होतीं. इतक्यांत एक मुलगा उभा राहिला आणि म्हणाला, "सऽऽर! या बाळ टिळकानें संत हा शब्द तीन प्रकारांनीं लिहिला आहे. मग याची चूक धरूं का नको?" शिक्षक म्हणाले, "बाळ टिळक शिष्ट आहे. त्यानें काय लिहिलें आहे सांग पाहूं." बाळाचें शुद्धलेखन तपासणारा मुलगा म्हणाला, "एकदां 'स'वर अनुस्वार दिला आहे दुसऱ्या वेळीं 'न्'ला 'त' जोडला आहे आणि तिसऱ्या वेळीं न् हें व्यंजन निराळें काढलें आहे." शिक्षक म्हणाले, "पहिला शब्द बरोबर आहे. संत शब्द लिहिण्याचा दुसरा आणि तिसरा प्रकार चुकीचा आहे." हा निर्णय ऐकल्याबरोबर बाळ टिळक ताडकन् उभा राहिला. तो म्हणाला, "माझें काय चुकलें?" शिक्षक म्हणाले, "तूं नेहमींच हुज्जत घालतोस." या प्रमाणें शुद्धलेखनाचा वाद निर्माण झाला. बाळानें मुख्याध्यापकाकडे तक्रार केली. त्यांनीं या हट्टी मुलाची कशीतरी समजूत घातली.

## (८) स्वयंसिद्ध पुढारी—

संस्कृत आणि गणित हे बाळ टिळकाचे आवडते विषय होते. वर्गांतील मुलें याच्याभोंवतीं जमत आणि शंका विचारीत—बाळ त्या शंकांचें निवारण करी. यामुळें बाळ टिळक हा

निवडणुकीशिवाय निवडला गेलेला पुढारी होता. तें पुढारीपण एका प्रसंगानें प्रत्ययास आलें. एकदां एका मुलानें कांहीं खोडी केली. मुख्याध्यापकांनीं चवकशी केली, पण खोडी करणाऱ्या मुलाचा पत्ता लागेना. यामुळें ते संतापले. त्यांनीं वर्गांतील पहिल्या मुलापासून दोनदोन छड्या मारण्यास प्रारंभ केला. सप् सप् असे आवाज ऐकूं आले. बाळावर पाळी आली. बाळ म्हणाला, "मी खोडी केली नाहीं, मी हात पुढें करणार नाहीं." मुख्याध्यापक गरजले, "टिळक ! तूं वर्गाबाहेर जा." हें ऐकून बाळ टिळकानें आपलें पाटीदप्तर घेतलें. तो संथ पावलें टाकीत वर्गाबाहेर गेला. त्याचें अंतःकरण तापलें होतें, तरी डोकें शांत होतें. मुख्याध्यापकांच्या संतापाचा पारा वाढत गेला, कारण हळू हळू सर्व मुलें वर्गाच्या बाहेर आलीं. स्वच्छंदी नव्हे पण स्वतंत्र बुद्धीचा, हुषार पण तंटेखोर, बुद्धिमान् पण हट्टी, अशा स्वभावाचा हा विद्यार्थी होता.

## (९) दानशूर घराण्याशीं संबंध—

बाळाला दहा वर्षांपेक्षां अधिक मातृसुख मिळालें नाहीं. १८७१ साल उजाडलें. बाळाला पंधरावें वर्ष लागलें. कोंकणांत लाडघर नांवाचें एक गांव आहे. तेथील श्रीयुत बाळ यांची मुलगी कु. तापी ही या पंधरा वर्षांच्या मुलाला सांगून आली. गंगाधरपंतांनीं इतर मुली पाहिल्या नाहींत, आलेली लक्ष्मी दवडली नाहीं. त्यांनीं असें पाहिलें कीं, मुलीचें घराणें कुलीन आणि दातृत्वसंपन्न आहे. बाळांच्या दातृत्वाबद्दल पुढील गोष्ट गंगाधरपंतांनीं ऐकली. एकदां लाडघर या गांवीं चोरट्यांचा उपद्रव सुरू झाला. चोरांपासून संरक्षण करण्याकरितां श्रीयुत बाळ यांनीं कांहीं दागिने निरनिराळ्या ठिकाणीं धान्याच्या

डब्यांत लपवून ठेवले. रात्र संपली. दिवस उजाडला. सकाळच्या वेळीं श्री. बाळ ओसरीवर बसले, त्यावेळीं एक भिकारी दाराशीं आला आणि म्हणाला, "महाराज कांहीं भिक्षा वाढा." त्याची विनवणी ऐकून गृहस्थाश्रमी बाळ म्हणाले, "अरे! कोणी-तरी तांदूळ घेऊन या आणि या भिकाऱ्याला वाढा." या आज्ञेनंतर एक सूनबाई ओंजळीमध्यें तांदूळ घेऊन आली, ते वाढतांना तिनें आपल्या ओंजळीकडे पाहिलें. ती चमकली आणि थांबली. बाळ म्हणाले, 'काय झालें?' सून म्हणाली, "धान्यांत लपवून ठेवलेला एक दागिना चुकून ओंजळींत आला आहे. तो काढून ठेवतें व भिकाऱ्याला तांदूळ वाढतें." बाळ सूनबाईला म्हणाले, "पुढें केलेलें दान मागें घेऊं नकोस. दागिन्यासकट ते तांदूळ भिक्षे-कऱ्याला वाढ." सुनेनें आज्ञेप्रमाणें तें सुवर्णांकित धान्य भिक्षेकऱ्याला घातलें. सासऱ्याच्या दानशूरतेनें भारावलेली ती सून घरांत गेली.

सन १८७१ च्या वैशाखांत बाळ टिळकाचें लग्न झालें. कु. तापी सौ. सत्यभामा म्हणून घरांत आली. नवरा मुलगा लग्नाच्या वेळीं रुसला नाहीं. सासऱ्यांनीं विचारलें, "तुम्हांला काय पाहिजे तें सांगा." नवरदेव म्हणाला, "तुम्हाला जी वस्तु द्यावयाची असेल त्या वस्तूच्या किंमतीमध्यें विकत घेतां येतील इतकीं उपयुक्त पुस्तकें द्या."

## (१०) डेक्कन कॉलेजांतील जीवनक्रम—

१८७२ सालीं बाळ टिळकाचे वडील वारले. तें दुःख बाजूला करून बाळ मॅट्रिकच्या परीक्षेला बसला, पास झाला. आतां तो कॉलेजमध्यें जाणार, म्हणून सभोंवतालचीं मंडळी बाळाला बळवंतराव म्हणूं लागलीं. १८७३ साल सुरू झालें.

धोतर, सदरा, लांब कोट, दक्षिणी जोडा, तुरा नसलेली मोठी पगडी आणि उपरणें अशा पोषाखांत बळवंतराव गांवापासून स्टेशनकडे निघाले. दूरवर नदीकांठाच्या माळावर असलेली कॉलेजची भव्य इमारत त्यांनीं पाहिली. इमारतीवरील एकशें सहा फूट उंचीच्या मनोऱ्यानें त्यांचें मन मोहून गेलें; पण टिळकांचे मनोरथ त्याहीपेक्षां उंच होते. महाविद्यालयाच्या प्रवेश-द्वारांतून ते आंत गेले. इमारतीजवळील आऊट हाऊसच्या शेजारींच तालीम होती. तालमीला जोडून पांचसहा क्लब होते. एका क्लबचें नांव सोंवळा क्लब; कारण त्यांतील विद्यार्थी शेंडी राखीत आणि सोंवळें नेसून जेवावयास बसत. टिळकांनीं कॉलेजमध्यें नांव घातलें, तसेंच या सोंवळ्या क्लबांत नांव घातलें. टिळक पोर्चवर असलेल्या उंच टॉवरवर चढले. त्यांनीं सभोंवार पाहिलें. छावणी, जेल, खडकी रिसाला आणि पर्वती हीं दृश्यें पाहून त्यांच्या मनाला समाधान वाटलें!

त्या वेळच्या मुलांच्या पोषाखांत धरबंध नव्हता. क्वचित् उघड्या बोडक्यानें क्लबांतून जेवून परत येतांना वर्गाच्या खिडकी-बाहेर उभे राहून नुसते 'हिअर सर' अशी हजेरीवाल्यास आरोळी देऊन आपल्या खोलींत जावें व मग अंगांत घालून वर्गांत येऊन बसावें, असें पुष्कळ विद्यार्थी करीत. टिळकांना जेवल्यावर सुपारी खाण्याची संवय होती. तेहि वरीलप्रमाणेंच करीत." प्रीव्हि-यसच्या वर्गांत बळवंतराव अनेक वेळां तास चुकवीत. ते हजेरी लावीत आणि आपल्या खोलींत निघून जात!

सकाळचा वेळ जोर, जोडी व मल्लखांब करण्यांत तालमीमध्यें घालवीत. कांहीं वेळां त्यांचे वर्गबंधु खरे यांच्याबरोबर संगमावर पोहावयास जात. एकदां पाण्यांत सुरकांडी मारल्यावर तासभर

पोहत असत. कांहीं वेळीं हे दोघे मित्र हातांत दशमी घेऊन खात-खात संगमाच्या या तीरावरून पलीकडच्या तीरावर पोहत जात. ते मित्र रोज एक लोटाभर दूध पिऊन टाकीत आणि पचवीत. संध्याकाळीं सिंगलबार आणि डबलबार यांवर कसरत करीत. या व्यायामामुळें बाळ टिळक 'बलवंत' झाले. त्यांचे दंड गुटगुटीत दिसूं लागले, छाती भरदार झाली, पिंडऱ्या बळकट दिसूं लागल्या. या व्यायामामुळें त्यांनीं प्रकृति कमावली, पण प्रीव्हिअसची परीक्षा गमावली. सोंगट्याच्या खेळांत पहिला डाव आपण देव गजाननला देतों, त्याप्रमाणें टिळकांनीं कॉलेजांतील पहिलें वर्ष तालमीला दिलें. एक दिवस वर्गामध्यें हजेरी लावून तास चुकवून टिळक आपल्या खोलीकडे निघाले. तेव्हां एका मित्रानें विचारलें, "काय हो! परीक्षा जवळ आली आणि तुम्ही तर तासाला बसत नाहीं. याचें कारण काय?" त्या वेळीं टिळकांनीं विनोदानें उत्तर दिलें कीं, "यंदा मला कर्तव्य नाहीं."

जोर, जोडी आणि बोटिंग यांमुळें अंगांत रक्त सळसळूं लागलें. टिळक आणि त्यांचे मित्र क्लबाच्या भिंतींना धडका देऊं लागले. त्या भिंती कुरकुरूं लागल्या. त्याचप्रमाणें भाजलेल्या पोळ्या संपल्यामुळें क्लबांतील आचारी कुरकुरूं लागला. हा स्वभावांतील हूडपणा कांहीं मित्रांना त्रासदायक वाटे. त्यांचा एक मित्र आपल्या शरीरप्रकृतीला फार नाजुकपणानें जपत होता. टिळकांनीं त्याचा नाजुकपणा नाहींसा होईपर्यंत त्याचे हाल केले. एक मित्र प्रकृति सुदृढ होण्याकरितां पेटंट औषधें घेत होता. टिळकांनीं त्याच्या औषधांच्या बाटल्या खिडकींतून बाहेर फेकून दिल्या. त्यांचा एक मित्र विशेष गुलहौशी होता. त्यानें उन्हाळ्याच्या दिवसांत पुष्पशय्या केली. टिळकांनीं ती पुष्पशय्या

विस्कटून टकाली. टिळकांचा हा हूडपणा पाहून त्यांचे मित्र म्हणूं लागले कीं, 'हा सैतान आहे !'

मित्रांनीं थट्टा केली तर त्याबद्दल टिळकांना राग येत नसे. एके दिवशीं टिळक संगमावरून पोहून आले आणि आपल्या सोंवळ्या क्लबांत जेवावयास गेले. भोजनगृहांत प्रवेश केल्यावर त्यांना सोंवळें सांपडेना. कारण एका वर्गबंधूनें तें लपवून ठेवलें होतें. टिळक चटकन् ओलें धोतर नेसले आणि जेवावयास बसले. शांतपणानें भोजन करीत असतांना त्यांच्या मनामध्यें ही थट्टा कशी उलटवून लावायची याचा विचार चालला होता. जेवण झालें. कॉलेजचे तास संपले. संध्याकाळ झाली, मित्रमंडळी बाहेर फिरावयास गेली. टिळक बाहेर गेले नाहींत. प्रत्येकाच्या खोलींत पार्टिशनच्या फळ्यावरून उड्या मारून टिळकांनीं मित्रांच्या खोल्यांना आंतून कड्या लावून घेतल्या व टिळक आपल्या खोलींत येऊन गणिताचा अभ्यास करीत बसले. मित्रांचा घोळका हंसतखेळत परत आला. त्यांनीं बाहेरून कुलुपें काढलीं. दार उघडूं लागले, तों आंतून कड्या ! कुणाला गूढ कांहीं उकलेना. बरीच गडबड उडून दार फोडण्यापर्यंत पाळी आली; इतक्यांत हंसत हंसत टिळक खोलीच्या बाहेर आले आणि त्यांनीं खोल्या उघडल्या. त्यावेळीं मित्रांचे डोळे उघडले. त्यांच्या ध्यानांत आलें कीं, लपवून ठेवलेल्या सोंवळ्याचा कडकपणा आपल्याला भोंवला आहे.

## (११) व्हिक्टोरिया राणीचें चित्र :—

एका राजनिष्ठ वर्गबंधूनें व्हिक्टोरिया राणीचें उत्कृष्ट रंगीत चित्र आपल्या खोलींत आदरानें लावलें. दुसरा मित्र तेथें आला. तो राष्ट्रभक्त असल्यानें तें चित्र पाहून त्याच्या कपाळाला आंठ्या पडल्या. त्यानें तिटकाऱ्यानें तें चित्र फाडून टाकलें आणि पाया-

खालीं तुडवलें. तें पाहून जवळच बसलेले टिळक थोडें हंसत पण गंभीरपणानें म्हणाले, "अरे, त्या बिचाऱ्या निरुपद्रवी रंगीत कागदानें तुमचें काय केलें आहे ! दारें लावून बंडखोरी करणें म्हणजे आपल्या मनाचें क्लैब्य दर्शविणें आहे. हिंमत असेल तर सदाशिवरावभाऊ पेशव्याप्रमाणें घण घालून लंडनचें तक्त फोडून पायाखालीं तुडविण्याची महत्त्वाकांक्षा धरा; निदान याच दिशेनें यावज्जन्म आपल्या यत्नांची शिकस्त करण्याची आज मनानें तरी शपथ घ्या, तरच हें चित्र फाडण्याचा तुमचा आवेश मी खरा समजेन."

## ( १२ ) बलवंताचा 'मातृविलाप' :—

जिनसीवाले, वर्डस्वर्थ, कीलहॉर्न, केरूनाना छत्रे या प्रोफेसरांची नांवें त्यावेळीं ऐकूं येत होतीं. प्रो. जिनसीवाले यांची विद्वत्ता मोठी, वाचन दांडगें, पण व्याख्यानांत मुद्देसूतपणा कमी. दोरा नसलेल्या वावडीप्रमाणें ते भरकटत जात. शिवाय त्यांना असें वाटे कीं, विद्यार्थ्यांनीं आपल्या पल्लेदार व्याख्यानांचीं टिपणें करून घ्यावींत. भोळेभाबडे विद्यार्थी आपल्या वह्या भरून काढीत आणि त्या वजनदार वह्या पाहून आपण पुष्कळ अभ्यास केला असें समाधान मानीत; पण टिळक मात्र जिनसीवाल्यांच्या पुराणांचीं टिपणें घेत नसत. मूळ ग्रंथावरून स्वतः अभ्यास करावयाचा, स्वतंत्र विवेचन करावयाचें, स्वतःचीं टिपणें तयार करावयाचीं ही टिळकांची अभ्यासाची पद्धत होती. टिळकांनीं प्रोफेसरांचीं मतें दत्तक घेण्याचें नाकारलें. या त्यांच्या स्वतंत्र वृत्तीमुळें प्रो. जिनसीवाले रागावत; पण एका प्रसंगानें टिळकांच्या बुद्धिमत्तेची चमक दिसून आली. एकदां वर्ग चालू होता. वामन शिवराम

आपटे यांच्यासारखे संस्कृतचे महान् पंडित सहाध्यायी होते. त्या वेळीं प्रो. जिनसीवाले म्हणाले, "उद्यां तुमच्यापैकीं ज्यांना शक्य असेल त्यांनीं 'मातृविलाप' या विषयावर कांहीं कविता संस्कृतमध्यें तयार करा." व्याख्यान संपलें, टिळक आपल्या खोलींत गेले. त्यांची प्रतिभा पल्लवित झाली. त्यांनीं 'मातृविलाप' या विषयावर कांहीं श्लोकांची रचना केली. वामन शिवराम आपटे यांनींहि या स्पर्धेत भाग घेतला. दुसऱ्या दिवशीं आपटे, टिळक आणि इतर कांहीं विद्यार्थी यांनीं आपापले 'मातृविलाप' प्रो. जिनसीवाले यांच्या हातीं दिले. त्यांनीं त्या कविता वाचून पाहिल्या आणि दुसरे दिवशीं असा निकाल दिला कीं, 'बळवंतराव टिळक यांच्या कवितांना मी पहिला अनुक्रम देतों.'

टिळकांनीं संस्कृतचा पायाशुद्ध अभ्यास केला. भडभडे, शारंगपाणी या मित्रांच्याबरोबर 'मिताक्षरा', 'व्यवहारमयूख', 'मनुस्मृति' या ग्रंथांचा अभ्यास रात्रीं एक वाजेपर्यंत चाले. अभ्यास झाल्यावर टिळक नळाखालीं डोकें धरीत. कित्येकदां गहन प्रश्नांचा विचार करीत करीत ते झोंपी जात. त्यांच्या अप्रगट मनांतून ते प्रश्न वरती येत. सकाळीं उठल्यावर टिळक ते प्रश्न सोडवून दाखवीत. मेरी व इलिझाबेथच्या कारकीर्दीवर त्यांनीं उत्कृष्ट टिपणें तयार केलीं. राष्ट्राची निकृष्ट स्थिति पाहून त्यांचें डोकें भणाणून जाई. खोल विचारानंतर त्यांना असें वाटे कीं, शिक्षणानेंच या राष्ट्राचा उद्धार होणार आहे!

प्रो. केरूनाना छत्रे हे गणित शिकवीत. त्या विषयाचा सखोल अभ्यास, निरलस आणि निगर्वी वृत्ति, गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्याची तयारी आणि विषय शिकविण्याची अभिजात कला, या गुणांमुळें प्रो. केरूनाना छत्रे हें नांव ऐकतांच विद्यार्थ्यांचीं मस्तकें

आदरानें विनम्र होत. बळवंतराव टिळक हे केरूनानांचे आवडते शिष्य होते. केरूनाना स्वतः ग्रहांचे वेध घेत. टिळकांचा आवडता विषय बीजभूमिति ( Analytacal Geometry ) हा होता. टिळक केरूनानांबरोबर दुर्बिणींतून वेध घेत. पुढें केरूनाना आजारी असतांना एका मित्रानें विचारलें कीं, 'नाना, पुढें तुमच्या गणिताचें कसें होणार ?' तेव्हां नानांनीं कोपऱ्यांत बसलेल्या टिळकांकडे बोट दाखविलें. ते म्हणाले, "हा विद्यार्थी, हें सूर्याचें पिल्लूं, नांव काढील असें वाटतें. या सूर्याच्या पिल्लाचा प्रभाव तुम्हांला आतां कळणार नाहीं, पण माध्यान्हकाळीं याचा प्रखर प्रकाश कोणालाहि सहन होणार नाहीं."

१८७६ सालीं टिळक बी. ए. च्या परीक्षेला गणित हा विशेष विषय घेऊन बसले आणि पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. पुढल्यावर्षीं ते एम्. ए. च्या परीक्षेला बसले; पण नापास झाले. याच वेळीं महाराष्ट्रांतील वातावरण प्रक्षुब्ध झालें होतें. वासुदेव बळवंत फडके यांनीं इंग्रजी सत्तेविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न केला, पण समाजाच्या तळापर्यंत त्यांचे विचार पोचलेले नसल्यामुळें तो प्रयत्न फसला. टिळकांनीं या क्रांतिकारकाच्या विफल झालेल्या साहसापासून कांहीं बोध घेतला. टिळकांनीं एम्. ए. होण्याचा नाद सोडून दिला आणि वकिलीचा अभ्यास सुरू केला. १८७९ सालीं बाळ गंगाधर टिळक LL. B. ची परीक्षा पास झाले.

## (१३) बाळाचा मित्र गोपाळ—

बाळ गंगाधर टिळक बी. ए. चा अभ्यास करीत होते. त्याच वेळीं गोपाळ गणेश आगरकर या नांवाच्या एका विद्यार्थ्यानें डेक्कन कॉलेजांत नांव दाखल केलें. उंच, सडपातळ व काटक

अशी अंगयष्टि, पाणीदार डोळे, लहान घेऱ्यावरील मोठी शेंडी, आत्मप्रत्ययानें मुसमुसलेले आणि खालच्या ओंठापर्यंत येणाऱ्या मिशांतून बाहेर पडणारें ठसकेदार भाषण, हें सर्व पाहून व ऐकून बळवंतरावांना हा विद्यार्थी आपल्या स्नेहीमंडळांत असावा असें वाटूं लागलें. बाल-गोपाळांची मैत्री झाली. दोघांचाहि जन्म १८५६ याच सालीं झालेला. म्हणून गोपाळाचें चरित्र थोडक्यांत पाहूं :

१८५६सालीं सातार जिल्ह्यांत टेंभू या गांवीं गोपाळाचा जन्म झाला. आईचें नांव सरस्वती, वडिलांचें नांव गणेश. गणेशपंतामध्यें कोणताच वकूब नव्हता. धर्मशील सरस्वतीला कविता करण्याचा नाद होता. टेंभूला शाळा नव्हती. मुलगा सात वर्षांचा झाल्यावर याच्या शिक्षणाचें कसें होईल, हा प्रश्न सरस्वतीपुढें उभा राहिला. लक्ष्मीनें आगरकरांच्या पर्णकुटीकडे पाठ फिरविली होती. सरस्वतीनें गोपाळाला कऱ्हाडास, त्याच्या आजोळीं शिक्षणाकरितां पाठविलें. गोपाळ मातेपासून दूर गेला. त्याचें नांव गोपाळ, पण त्याला गाईचें दूध कधींहि मिळालें नाहीं. मराठी चार यत्ता झाल्यावर गोपाळ इंग्रजी शाळेंत जाऊं लागला. त्या शाळेंत इंग्रजी तीन यत्तांपर्यंत शिक्षणाची सोय होती. गोपाळ तिसरींत असतांना चमकदार निबंध लिहूं लागला.

## ( १४ ) निबंधाची परीक्षा—

कऱ्हाडांत नागपूरकर या नांवाचे एक मुनसफ होते. ते शाळेंत आले व म्हणाले कीं, "मुलांनो ! तुम्ही शिक्षकांनीं दिलेल्या विषयावर दर रविवारीं निबंध लिहून आणा. ते निबंध मी वाचीन आणि पहिल्या क्रमांकाला दोन रुपये बक्षीस देईन." हें भाषण ऐकून मुलें चढाओढीनें निबंध लिहूं लागलीं. एका

रविवारीं नागपूरकरांबरोबर मामलेदार जोशी हे सुद्धां निबंध ऐकण्याकरितां आले. निबंधांचें वाचन झालें. सर्व निबंध ऐकल्यावर नागपूरकर म्हणाले, " आजच्या सर्व निबंधांत गोपाळ आगरकर या मुलाचा निबंध सरस आहे. म्हणून या हुषार विद्यार्थ्याला मी पहिलें बक्षीस देतों. " या भाषणानंतर बक्षीस घेण्याकरितां गोपाळ उभा राहिला. इतक्यांत मामलेदार जोशी छद्मी आवाजांत म्हणाले, " असला निबंध लिहिण्याचें मुलांच्या अंगीं सामर्थ्य असणें शक्य नाहीं. हीं मुलें दुसऱ्या कोणाकडून तरी लिहून आणतात. अशानें कशाचें ज्ञान वाढणार? ही निबंधवाचनाची सभा म्हणजे निव्वळ पोरखेळ आहे. " हें भाषण ऐकल्याबरोबर गोपाळ ताडकन् पुढें आला. तो म्हणाला, " मामलेदारसाहेब ! हा निबंध कोणाचीहि मदत न घेतां मी लिहिला आहे. प्रचीति पाहावयाची असल्यास या ठिकाणीं बसल्या बैठकीला तुम्ही सांगाल त्या विषयावर निबंध लिहून दाखवतों. " या भाषणानंतर नागपूरकरांनीं टाळ्यांच्या गजरांत गोपाळाला पहिलें बक्षीस दिलें.

## ( १५ ) विद्येसाठीं पायीं प्रवास—

गोपाळ इंग्रजी तिसरी यत्ता पास झाला. कऱ्हाडला पुढें शाळा नव्हती. बरोबरचे सवंगडी दूरच्या गांवीं गेले. गोपाळ एकटा राहिला. त्याच्या सभोंवतीं अन्धार पसरला; पण हृदयांत आशेची समई तेवत होती. कोठेंच मार्ग दिसेना, म्हणून गोपाळानें कोर्टांत कारकुनाची नोकरी धरली. वादी, प्रतिवादी, दरखास्त, हुकूमनामा हे शब्द त्याच्या कानावर पडूं लागले; पण त्याच्या मनश्चक्षूंसमोर हायस्कूल दिसत होतें. निरनिराळ्या शहरांतील हायस्कुलांतून तो भ्रमण करीत होता. सरस्वतीच्या वीणेचा मधुर

झंकार त्याला ऐकूं येत होता; त्यामुळें त्याचें मन कारकुनी लेखणीच्या कुरकुरीनें त्रासून गेलें. आपली कोठें सोय लागल याचा विचार करतां करतां त्याला रत्नागिरी आठवली. त्या ठिकाणीं गोपाळाचे चुलते एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून काम करीत होते. ते काका आपल्याला मदत करतील असें गोपाळाला वाटलें. त्यानें आपली कल्पना नागपूरकर मुनसफांना सांगितली. त्यांनीं ७५ रुपये देऊन गोपाळाला आशीर्वाद दिला.

कनवटीला पैसे, खाद्यांवर पडशी, हृदयांत महत्त्वाकांक्षा, पायांत दम अशी सामग्री घेऊन हा विद्येचा यात्रेकरू रत्नागिरीला निघाला. समोर दीडशें मैलांचें अंतर उभें होतें. पण न घाबरतां एकेक मैल मागें टाकीत, अनेक संकटें सोसून विद्यार्थी गोपाळ रत्नागिरीला पोंचला. तो मोठ्या आशेनें तपास करीत करीत काकांच्या घरीं गेला. कपाळाला आठ्यांचें जाळें बांधून काकांनीं त्याचें स्वागत केलें. गोपाळानें खालीं मान घालून काकांच्या घरीं पडशी ठेवली. त्यानें शाळेंत नांव घातलें, श्रीमंतांचीं शागीर्दी केली, धोत्रें धुतलीं, मधुकरी मागितली, वार लावले. हे सर्व उरीं फुटणारे परिश्रम करीत गोपाळानें अभ्यास केला. त्याच्याजवळचे पैसे संपले. दोन वर्षें निभावलीं. गोपाळ इंग्रजी सहावींत गेला; पण कोणाचीहि मदत न मिळाल्यामुळें गोपाळ खालीं मान घालून, अश्रु ओघळत असतांना पायीं रखडत कऱ्हाडला परत आला. त्यानें एका डॉक्टरकडे कम्पाउंडरची नोकरी पत्करली. इतक्यांत मामींच्या बरोबर सोबत म्हणून अकोल्याला जायची संधि गोपाळाला मिळाली. त्यानें अकोल्याच्या हायस्कुलांत सहाव्या यत्तेंत नांव दाखल केलें. घरचीं कामें संभाळून सरस्वतीची आराधना केली. एक दिवस घरच्या कामामुळें गोपाळाला शाळेंत जाण्यास

उशीर झाला. तेव्हां मुख्याध्यापक वि. मो. महाजनी म्हणाले कीं, "शाळेंत असें उशीरां येऊन तूं काय ध्वज लावणार आहेस तें दिसतेंच आहे." हा वाक्प्रहार ऐकून अभिमानी गोपाळ ताडकन उद्गारला कीं, "तुमच्यासारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर!"

गोपाळ सहावी यत्ता पास झाला. अकोल्यास जम बसेना म्हणून श्री. महाजनींचें पत्र घेऊन पुण्यास गेला. तेथेंहि मदत मिळेना म्हणून पुन्हां अकोल्यास आला. त्यानें सातवींत नांव घातलें. त्यावेळीं श्री.महाजनी यांनीं उपदेश केला कीं, "गोपाळ, मामांची मर्जी संभाळून रहा, मामी ज्यावेळीं माहेरीं जातील त्या काळांत स्वैंपाकसुद्धां कर, तरच तुझा निभाव लागेल." गोपाळानें हा उपदेश आचरणांत आणला. १८७५ सालीं गोपाळ गणेश आगरकर प्रवेश परीक्षेंत यशस्वी झाला. त्याच्या मातेचा आनंद गगनांत मावेना.

## (१६) गोपाळराव कॉलेजमध्यें जातात—

महाजनी गुरुजींनीं ६० रुपये जमवून दिले. हिंमत धरून आगरकर पुण्याला आले. त्यांनीं डेक्कन कॉलेजमध्यें नांव घातलें. 'वऱ्हाड समाचार' या नांवाचें एक साप्ताहिक होतें. त्याच्या संपादकांनीं सांगितलें कीं, "गोपाळराव! तुम्ही आम्हांला लेख द्या; त्याबद्दल मोबदला म्हणून दरमहा पांच रुपये पाठवूं." आगरकरांनीं लेख लिहिले; पण सहा महिन्यांनीं हा मदतीचा झरा आटला. आतां कसें निभणार? गोपाळरावांना चिंतेची चिता जाळूं लागली. याच वेळीं वक्तृत्वोत्तेजक सभेनें एक विषय नेमला व बक्षीस जाहीर केलें. आगरकरांनीं अभ्यास करून त्या चढाओढींत भाग घेतला आणि ४० रुपयांचें पहिलें

बक्षीस मिळविलें. त्या पैशावर कांहीं काळ निभावून गेला. पुढें कॉलेजचें संमेलन आलें. ' एकत्र हिंदु कुटुंबपद्धतीपासून फायदे व तोटे, ' या विषयावर संमेलन–मंडळानें निबंध मागविले. आगरकरांनीं आपल्या पल्लेदार शैलीनें परिश्रमपूर्वक निबंध लिहिला; पन्नास रुपयांचें पहिलें बक्षीस मिळविलें. याच वेळीं ज्यूनियर स्कॉलरशिप मिळाली. हळूहळू एफ्. वाय्. चें वर्ष संपत आलें. जवळचे पैसेहि संपत आले. अंगांत घालायला एकच सदरा शिल्लक राहिला. गोपाळराव तो सदरा रात्रींच्या वेळीं धुवीत आणि वाळत घालीत. सकाळीं तो स्वच्छ सदरा घालून परीक्षेचा अभ्यास करीत. पुन्हां एक संकट उभें राहिलें. परीक्षेची फी भरावयाची होती, पण पैसे नव्हते. त्या फीपुरते पैसे मिळावेत म्हणून त्यांनीं नाटक लिहिण्यास घेतलें. छात्रालयांतील इतर विद्यार्थी शांत झोंप घेत असतांना आगरकर नाटक लिहूं लागले. ही वार्ता प्रो. छत्रे यांना कळली. त्या दयाघनाचें अंत:करण विरघळलें. त्यांनीं फीचे पैसे भरले. आगरकर चिंतामुक्त झाले, परीक्षेला बसले आणि पास झाले. पहिल्या वर्षाच्या परीक्षेपर्यंत गोपाळरावांनीं जे हाल सोसले त्यामुळें त्यांच्या अर्ध्या आयुष्याचा बळी पडला.

## ( १७ ) पत्रांतील पराहित—

१८७७ सालीं गोपाळरावांचें लग्न झालें. १८७८ सालीं ते बी. ए. झाले. १८८१ सालीं एम. ए झाले. कॉलेजांतील बालगोपालांच्या वादविवादांत असें ठरलें कीं, आपलें आयुष्य शिक्षणाला वहावयाचें. पुढें इतिहास व तत्त्वज्ञान हा विषय घेऊन आगरकरांनीं एम. ए. चा अभ्यास करण्यास प्रारंभ केला. या वेळीं इतर विद्यार्थी लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या पटकावण्याच्या

विचारांत होते. अशा वेळीं आगरकरांनीं आपल्या आईस पत्र लिहिलें कीं;

श्री

पुणें १८७८ डेक्कन कॉलेज

मातोश्रीस सा. न. वि. वि.

आपला मुलगा मोठाल्या परीक्षा देत आहे, त्याला आतां मोठाल्या पगाराच्या नोकऱ्या मिळतील आणि आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ, आई, तूं करीत असशील; पण मी आतांच सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची हाव न धरतां फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व काळ परहितार्थच घालविण्याचें मी ठरवीत आहे. कळावें हें वि.

तुझा

**गोपाळ**

आगरकरांचें हायस्कुलांतील शिक्षक श्री. महाजनी यांना आपल्या या मानधन विद्यार्थ्याबद्दल अभिमान वाटे. गुरुवर्य महाजनी लिहितात कीं, "विद्यार्थीदशेंत गरिबीशीं सतत झुंज घेऊन, अलौकिक यश संपादून आमरण गरिबींत आयुष्य कंठण्याचें ठरवून अध्यापनवृत्तीनें पुराण-ऋषींचें अनुकरण करून तीस उज्ज्वल करण्याचें व्रतच या निश्चयानें गोपाळराव घेत होते."

## (१८) बाल-गोपाल 'शिवाजी'ला भेटले—

विष्णुशास्त्री चिपळूणकर (१८५०-१८८२) बी. ए. झाल्यावर सरकारी हायस्कुलांत शिक्षक झाले. १८७४ सालीं त्यांनीं निबंधमाला सुरू केली. स्वधर्म, स्वदेश आणि स्वभाषा या विषयांवर निबंधमालेंत तेजस्वी लेखन सुरू झालें. ते विचार

खाविंदाच्या चरणारविंदी मिलिंदायमान झालेल्या राजसेवकांना रुचले नाहींत. त्यांनीं चिपळूणकरांची रत्नागिरीला बदली केली. हा अपमान सहन न होऊन चिपळूणकरांनीं सरकारी सेवेची शृंखला तोडून टाकली. ते पुण्याला आले. त्यांच्या मातृभाषेच्या अभिमानामुळें त्यांना 'मराठी भाषेचा शिवाजी' असें म्हणत. त्यांनीं राष्ट्रीय शिक्षण देण्याची शाळा काढण्याचें ठरविलें. टिळक आणि आगरकर यांना ही शुभवार्ता समजली. त्याच दिवशीं रात्रीं ते दोघे कॉलेजांतून पुण्याला आले. त्यांनीं विष्णुशास्त्र्यांची भेट घेतली.

त्या तीन तरुणांचे संवाद ऐकण्यासाठीं महाराष्ट्राची भवितव्यता सर्वांगाचे कान करून उभी होती. टिळक उद्गारले कीं, "तुम्ही शाळा काढीत असाल तर आम्हींहि तुम्हाला येऊन मिळतों." हें ऐकून चिपळूणकरांना आनंद झाला. त्रिमूर्तीच्या संयोगानें राष्ट्रीय शाळेची मुहूर्तमेढ रोवली गेली. नोकरशाहीला तोंड देणारे धीट पुढारी तयार करणें हें या नवीन शाळेचें, न्यू इंग्लिश स्कूलचें, ध्येय होतें. शाळा सुरू होण्यापूर्वी चिपळूणकरांनीं आपल्या भावाला एक पत्र पाठविलें.

श्री

पुणें १७ सप्टेंबर १८७९

लक्ष्मणराव यांस,

ता. १ आक्टोबरचा संस्मरणीय दिवस जवळ येत चालला आहे. गुलामगिरीच्या शृंखला लत्ताप्रहारानें तोडून टाकून स्वतंत्र होण्याचें सौख्य मला त्या दिवशीं मिळणार आहे. टिळक, आगरकर यांनीं आपण होऊन शाळा काढण्याच्या या

धाडसाच्या कामीं मला येऊन मिळण्याचें कबूल केलें आहे. ता. १ जानेवारी १८८० रोजीं आम्ही आपलें निशाण उभारणार आहोंत. आमच्या तोफखान्यापुढें सरकारी हायस्कूल जमीनदोस्त झालेंच म्हणून समजा.

आपला,

**वि. कृ. चिपळूणकर**

### (१९) टिळकांचे विरोधक—

टिळकांनीं शाळा सुरू झाल्यावर सबजज्जाच्या जागेकरितां अर्ज केला होता आणि वकिलीची सनदहि घेतली होती, असें त्यांच्या विरोधकांचें म्हणणें आहे. या कृतीमुळें टिळकांच्या स्वार्थत्यागाला कमीपणा येतो, असा विरोधकांनीं निष्कर्ष काढला आहे. चरित्रकार मराठे लिहितात कीं, 'टिळकांच्या चुलत्यांचा व इतर आप्तेष्टांचा त्यांच्यामागें नामदार मंडलिकांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून वागण्याचा लकडा व त्यांच्या घरगुती बाबतींत दिसून येणारा भिडस्त स्वभाव, या गोष्टी लक्षांत घेतल्या असतां नोकरी किंवा वकिली करण्याचें मनांत नसूनसुद्धां त्यांनीं या बाबतींत अर्ज केले असल्याचें असंभवनीय मानतां यावयाचें नाहीं." प्रो. न. र. फाटक म्हणतात कीं, 'थोर पुरुष हे जसे परिस्थितीचे जनक असतात, तसेच पूर्वपरिस्थितीचें अपत्यहि असतात. आयुष्याच्या मर्यादेपर्यंत, विशेषतः परिस्थितीवर टोले मारून तिला वेसण घालण्याची धमक कर्तबगारींत उद्भवण्यापूर्वीं, ते परिस्थितीच्या छायेंत असतात.'

### ( २० ) २ जानेवारी १८८०—

न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झालें. प्रारंभीं १५० मुलें पटावर होतीं. ही संख्या वाढत चालली. १८८४ सालीं १००० मुलें

या शाळेंत शिक्षण घेऊं लागलीं. वामन शिवराम आपटे, माधवराव गोळे, वासुदेवराव केळकर, खरेशास्त्री इत्यादि विद्वान शाळेला येऊन मिळाले. आपटे यांनीं मुख्य अध्यापकाचें काम कांटेकोर शिस्तीनें पार पाडलें, शाळेबद्दल दरारा निर्माण केला आणि संस्कृतमध्यें दरवर्षीं शंकरशेट शिष्यवृत्ति मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची परंपरा निर्माण केली. टिळकांचे शिकवणें विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून जाई, पण त्यांनीं राष्ट्रसेवा करण्याची अनेकांना स्फूर्ति दिली. गोपाळराव गोखले म्हणाले कीं, 'टिळकांच्याच उदाहरणानें मी ऐहिक लाभाचे अन्य मार्ग सोडून न्यू इंग्लिश स्कूलला मिळालों.'

महिना तीस रुपये वेतन घेऊन हे ध्येयवादी तरुण राष्ट्रांतील अज्ञानाचा अंधार नाहींसा करण्याचा प्रयत्न करीत होते. रावसाहेब मंडलिक, प्रि. वर्डस्वर्थ यांनीं शाळा पाहून धन्यवाद दिले. सर वुइल्यम हंटर शाळा पाहाण्यास आले. ते एज्युकेशन कमेटीचे अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या रिपोर्टांत लिहिलें कीं, 'या शाळेचा उत्कर्ष पाहातां मी असें खात्रीनें सांगूं शकतों कीं, हिच्या तोडीची एकहि शाळा मला सर्व हिंदुस्थानांत दिसून आली नाहीं. इतर देशांतील शाळांशीं तुलना केली तरी देखील हीच शाळा सरस ठरेल.'

## (२१) केसरीची गर्जना—

शाळेचा व्याप या राष्ट्रभक्त शिक्षकांना अपुरा वाटूं लागला. वर्गांतील ३० मुलांना शिकविणें महत्त्वाचें आहे; पण भरतखंडांतील ३० कोटी प्रजाजनांना आवाहन करून एका विचारानें भारून टाकणें अधिक महत्त्वाचें आहे असें या शिक्षकांना वाटूं लागलें. सभोंवतालचें अज्ञान, दारिद्र्य, दंभ आणि लाचारी पाहून या आजीवसेवकांचीं अंतःकरणें तळमळूं लागलीं. हें मित्रमंडळ

आपटे यांच्या घरीं एकत्र जमलें असतां चर्चा झाली. त्या विचार-मंथनांतून अशी कल्पना निर्माण झाली कीं, 'केसरी' नांवाचें साप्ताहिक मराठींत काढावें आणि 'मराठा' नांवाचें साप्ताहिक इंग्रजींत काढावें. ४ जानेवारी १८८१ या दिवशीं केसरीचा पहिला अंक बाहेर पडला. चिपळूणकरांच्या नांवामुळें केसरीला गर्भश्रीमंताच्या मुलाप्रमाणें जन्मतःच महत्त्व प्राप्त झालें. विष्णु-शास्त्र्यांनीं स्वत्वाचा कैवार घेतला, आगरकरांनीं अन्यायाची चीड प्रगट केली, टिळकांनीं जनतेची निर्भय वकिली केली.

## (२२) बालगोपालांचा कारागृहवास—

सरकारनें जर संस्थानांवर अन्याय केला तर केसरीनें संस्थानिकांचाहि कैवार घेतला. कोल्हापूर संस्थानांत बर्वे नांवाचे दिवाण होते. तेथील राजे शिवाजीराव यांना वेड लागलें अशी वार्ता पसरली. महाराजांना वेड लागण्याला दिवाण कारणीभूत आहेत अशी लोकांची समजूत झाली. कोल्हापुरांतील राज-पक्षपाती लोकांनीं केसरीकडे पत्रें पाठविलीं. हीं पत्रें वाचल्यावर केसरीनें लिहिलें कीं, "कोल्हापूरकर छत्रपति महाराजांची सध्यांची स्थिति अशी आहे कीं, ती ऐकून काळजाला घरें पडतील. महाराजांचे प्राण जाऊन शव हातीं आल्यावर आमचे लॉर्ड साहेब जागृत होणार काय? चाबकाचा मार काय, रंगमहालांतील लज्जास्पद प्रकार काय, हें सर्व चालावें, ही आमच्या सरकारास कालिमा आणणारी गोष्ट आहे."

हे लेख वाचून दिवाण बर्वे यांच्याविरुद्ध काहूर निर्माण झालें. त्यांनीं टिळक आणि आगरकर यांच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद केली. ज्या लोकांनीं पत्रें पाठविलीं होतीं त्यांनीं ऐनवेळीं दगा दिला. पुरावा नाहीं असें पाहून टिळक आणि आगरकर

यांनीं माफी लिहून दिली; पण दिवाण बर्वे यांनीं फिर्याद काढून घेतली नाहीं ता. १७-८-८२ रोजीं न्यायाधिशांनीं दोघांना चार महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा सांगितली. त्यांना डोंगरी-च्या तुरुंगांत नेण्यांत आलें. तेथील अन्न आणि ढेकणांचा त्रास यामुळें टिळकांचें वजन २४ पौंड कमी झालें. आगरकरांचें १६ पौंड कमी झालें. या कारागृहवासाबद्दल आगरकर लिहितात कीं, " सगळ्या तीन महिन्यांत आम्हीं चांदोबास दोनदां मोठ्या खटपटीनें गजांतून पाहिलें. आठदहा दिवस सुरवंटांमुळें फार बेजार झालों. कित्येकदां तर आम्हीं रात्रींच्या रात्रीं बोलत घालविल्याचें मला आठवतें. आम्ही अभ्यास करण्यासाठीं कॉलेजांत राहिलों असतां सरकारी नौकरी न पतकरतां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला, त्या दिवसापासून आम्हीं जें जें बोललों होतों त्याची अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे. अमूक गृहस्थाला कँपमध्यें भेटायला गेलों असतां परत येतांना काळोखांत वाट चुकून बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरतां फिरतां बंडावर कसें येऊन ठेपलों; शाळेच्या संबंधानें विष्णुशास्त्र्यांशीं बोलणें लावण्यास गांवांत गेलों असतां कॉलेजला परत येतांना थंडीनें किती कुडकुडलों, वचन दिलें असतां शाळा आणि छापखाना काढला त्या वेळेस कोणकोणत्या लोकांनीं मागें घेतलें, आपले मूळचे हेतू कोणते आणि ते कितपत सिद्धीस गेले आहेत, या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्याचें कोणकोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे, लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल, कोल्हापूर-प्रकरणांत आपली चुकी किती आणि आपणास भोगावी लागत

असलेली शिक्षा किती न्याय्य आहे वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ एवढ्या जोरानें वाद चाले कीं, आसपासचे शिपाई 'हळू बोला, हळू बोला' असा इशारा करीत व बोलतां बोलतां रात्र निघून जाई. "तुरुंगांतून" सुटका झाल्यावर भरतखंडांतील या आघाडीच्या राजबंद्यांचा जनतेनें सत्कार केला, करागृहांतील शृंखला दूर झाल्यानंतर सत्काराच्या माला गळ्यांत पडल्या. टिळक—आगरकर पुण्यांत आले. क्षणाचीहि उसंत न घेतां दुसऱ्याच दिवशीं या झुंजार वीरांनीं शांतपणानें शाळेंतील अध्यापनास प्रारंभ केला. एकदिलानें शाळेंत प्रवेश करणाऱ्या या बाल-गोपालास ज्या विद्यार्थ्यांनीं आदरानें पाहिलें आणि अभिवादन केलें ते विद्यार्थी भाग्यवान् होत !

## ( २३ ) चिपळूणकरांचें जीवितकार्य—

ता. १७–३–८२ रोजीं विष्णुशास्त्री चिपळूणकर अकालीं निधन पावले. त्यांच्यावरील मृत्युलेखांत आगरकर लिहितात कीं, "शास्त्रीबोवांच्या अकालिन मृत्यूनें केसरीचा एक पाय लंगडा झाला ! महाराष्ट्रीयांनीं अद्वितीय रत्न गमावलें, अशी आमची समजूत आहे. प्रख्यात फ्रेन्च ग्रंथकर्ता व्होल्टर यानें एकदां कोरडा उचलला म्हणजे रोम, लिस्बन यांच्या दरम्यान, चटसारी मंडळी चळचळ कांपत असे, त्याप्रमाणें, शास्त्रीबोवांनीं लेखणी उचलली, कीं रावसाहेब, रावबहादुरें, रेवरंडें यांची पांचावर धारण बसे. कोणी एकदां शास्त्रीबोवांना असा प्रश्न केला कीं, 'असे कडक लेख लिहिण्यास तुम्ही कसे धजतां ?' त्यावर त्यांनीं असें उत्तर केलें कीं, 'अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून मग आम्हीं देशोन्नतीसाठीं आपली लेखणी हातीं घेतली.' एखाद्या

वेळेस त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला, म्हणजे त्याला हिंदुस्थानदेश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसें."

चिपळूणकरांनीं स्वाभिमान-दीपज्योति अशी निबंधमाला गुंफून राष्ट्रांत जागृति उत्पन्न केली. लोकहितवादी विद्वान् होते, पण त्यांच्या शतपत्रांनीं राष्ट्राचा तेजोभंग केला, म्हणून चिपळूणकरांनीं त्यांच्यावर हल्ला केला. निबंधमालेमुळें भाषांतरांचें युग संपून स्वतंत्र लेखनास प्रारंभ झाला. उपरोध हा त्यांच्या लेखनाचा आत्मा आहे. त्यांनीं केलेला उपहास जिव्हारीं लागतो. टीकाकाराचा समतोलपणा त्यांच्यांत नाहीं. मेकॉलेच्या भाषेतील गुणदोष चिपळूणकरांच्या भाषेंत दिसतात. ते प्रतिपक्षांशीं जोरकस वाग् युद्ध करतात. त्यांची भाषाशैली जिवंत, नटवेपणाची, सरस आणि स्फुरण देणारी आहे. नुसत्या विवरणापेक्षा प्रत्युत्तरात्मक भागांत त्यांची प्रतिपादनशैली चमकते. त्यांच्या भाषेची घाटणी वकिलाची आहे, तत्त्वज्ञाची नाहीं, संशोधकाची नाहीं !

## ( २४ ) फर्ग्युसन कॉलेजांतील प्रोफेसर्स—

शाळेचा व्याप वाढूं लागला. उत्साहाला भरतें आलें, म्हणून न्यू इंग्लिश स्कूलच्या ध्येयवादी आजीव सेवकांनीं कॉलेज काढण्याचें ठरविलें. सरकारची परवानगी मिळाली. २ जानेवारी १८८५ रोजीं फर्ग्युसन कॉलेज सुरूं झालें. त्या वेळचे प्रोफेसर कसे शिकवीत ? प्रो. महादेव मल्हार जोशी म्हणतात कीं, "टिळकांच्या अंगांत शिष्यांमध्यें उत्साह उत्पन्न करण्यासारखा विशेष गुण नव्हता; पण उत्तम गणिती जो विद्यार्थी असेल त्याच्याच मनांत त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न व्हायचा. या

कामांत वामनराव आपटे व नामदार गोखले हे टिळकांहून श्रेष्ठ होते. टिळक एम्. ए. चे शिक्षक उत्तम होते. त्यांचें ज्ञान अगाध असे. परंतु शिस्त, करमणूक व उत्साह यांविषयीं ते, फारशी काळजी करीत नसत."

भक्तिमार्गी ल. रा. पांगारकर आपल्या आत्मचरित्रांत लिहितात कीं, " विष्णुशास्त्री, टिळक व आगरकर या त्रिमूर्तींनीं महाराष्ट्रास नवी स्फूर्ति दिली. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना म्हणजे अर्वाचीन महाराष्ट्राच्या उत्कर्षाची मुहूर्तमेढच ! वामन शिवराम आपटे हे कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. त्यांच्यासारखा टापटिपीचा, नियमितपणानें वागणारा व शिस्तीचा शिक्षक दुसरा नव्हता. आदर्शसंस्था प्रमुख होण्यास ते सर्वतोपरी योग्य होते. दुसरी घंटा होत असतांनाच ते वर्गांत येत व तास संपल्याची घंटा होतांच ठरलेला विषय संपवून दुसऱ्या वर्गांत जात. आपटे अभिजात रसिक होते. त्यांच्या दीड वर्षाच्या संगतीनें मला संस्कृत वाङ्मयाची गोडी लागली.

"अंतरीं निर्मळ व वाचेचा रसाळ हें साधूचें लक्षण गोपाळराव आगरकरांना लागूं पडतें. जिना चढून ते वर्गांत येऊन बसले, कीं खोकल्याची उबळ येऊन चारपांच मिनिटें व्यर्थ जात; तेव्हां त्यांच्या देहदु:खाबद्दल आम्हांला वाईट वाटे. मॅट्रिकच्या वर्गांत ते निबंध लिहायला सांगत, पण कधीं तपासीत नसत. एखाद्या विद्यार्थ्यानें तक्रार केलीच तर ते विनोदानें म्हणत, ' दरसाल विद्यार्थी नवे नवे येतात, मी या खुर्चीवर कायमच आहे. तुमचा उत्साह नवा. ताज्या दमाचे तुम्ही, मी सगळ्यांचे निबंध कोठें तपाशीत बसूं ! प्रत्येक मन्वन्तराला ताज्या दमाचा नवा इन्द्र यायचा.



२०४३०

इन्द्राणी बिचारी एकच आणि कायमची ! तिच्यासारखी माझी अवस्था आहे !' हे त्यांचे शब्दहि हंसत हंसत बाहेर पडावयाचे.

"दम्याखोकल्याच्या त्रासामुळें त्यांना अखंड झोंप लागत नसे. ते एकदां वर्गांत म्हणाले, 'रात्रीं झोप येईनाशीं झाली म्हणजे समोरच्या बोर्डावर पांच, नऊ असा एखादा आंकडा लिहावा व त्याकडे पहात रहावें म्हणजे चित्ताची एकाग्रता होऊन चटकन झोंप येते ! "

## ( २५ ) मोठ्या लोकांचीं भांडणें—

शाळा आणि कॉलेज यांची भरभराट झाली. डेक्कन एजुकेशन सोसायटीचा लौकिक वाढला. आतां डेक्कन कॉलेजची जरूर नाहीं, असें लॉर्ड रे साहेबांच्या सरकारला पटलें. " डेक्कन कॉलेज तुमच्या हवालीं करतों." अशी सूचना सरकारनें डे. ए. सोसायटीच्या कौन्सिलपुढें ठेवली.

परंतु दुधाच्या भांड्यांत मिठाचा खडा पडला. लाईफ मेंबरांत द्वैताची उत्पत्ति झाली. संस्थेच्या कीर्तिरूप भव्य इमारतीला तडा गेला, एकतेला दृष्ट लागली. चालकांत भांडणें सुरू झालीं. आधीं समाजसुधारणा कीं आधीं राजकीय स्वातंत्र्य असा वाद टिळक व आगरकर यांच्यांत निर्माण झाला. केसरींत मोकळेपणानें लिहितां येईना म्हणून आगरकरांनीं ' सुधारक ' पत्र काढलें. प्रो. भानु लिहितात कीं, " सुट्टीच्या तासांत आम्ही दहा लाईफ मेंबर्स एकाच खोलींत बसत असूं. यावेळीं चहापान आणि गप्पागोष्टी चालत. टिळक-पक्ष आणि आगरकर-पक्ष यांतील द्वैताची ऊर्मि बरेच वेळां प्रगट होई आणि मग वादविवादाची उष्णता वाढे. पंचम स्वरांत हे वाद चालत.

"आमच्या मंडळींत परस्परांबद्दलचें प्रेम व अगत्य जास्त वाढावें म्हणून दर शनिवारीं आळीपाळीं सहभोजनें सुरू झालीं होतीं. ही योजना उपकारक होईल असें प्रथम वाटलें. तिसऱ्या भोजनसमारंभाला माझ्या दृष्टीनें भीषण स्वरूप आलें. प्रो. आगरकर फार हिशोबी असत. अवश्य गरज भागण्यासाठींसुद्धां त्यांनीं आमरण उसनवार म्हणून घेतलेंच नाहीं. लाईफ मेंबरला त्यावेळीं ४० रुपये दरमहा मिळत व साल अखेरीला ४०० रुपये ग्रँट प्रत्येकास मिळे. प्रो. आगरकरांस दम्याची व्यथा असल्यामुळें दरमहा ५ रुपये औषधाला लागत; म्हणून आगरकरांची संसार भागवितांना तारंबळ उडे. ही अडचण कमी व्हावी म्हणून त्यांनीं मंडळापुढें सूचना आणली कीं, 'लाईफ मेंबरचा पगार ४५ रुपये करावा व वर्षअखेरीस अवश्यच वाटल्यास अधिक आलेले ६० रुपये ग्रँटमधून वजा करावे.' या सूचनेंत वावगें असें कांहीं नव्हतें. परंतु मंडळींत द्वैतानें संचार केलेला. जुंपलें भांडण. आगरकरांस पैशाचा लोभ सुटला आहे, असें टिळक-पक्ष म्हणे व टिळकांस आगरकरांच्या प्रकृतीची काळजी नाहीं असें आगकर-पक्ष म्हणे. यांतच घरच्या व बाहेरच्या उखाळ्यापाखाळ्यांची भर पडली. राष्ट्राचें महत्कार्य हातीं घेतलेल्या बुद्धिवीरांचें अद्वातद्वा पद्धतीचें भांडण प्रत्यक्ष पाहून व ऐकून मला अत्यंत वाईट वाटलें. महाराष्ट्रांतील भोसले आणि घोरपडे यांमधील प्राण घेण्याच्या कलागतीची मला आठवण झाली. मी खिन्न झालों, गांगरलों, महाराष्ट्राचें नष्टचर्य अद्यापीही संपलें नाहीं व संपण्याची आशा नाहीं असें मला वाटूं लागलें.

" डेक्कन कॉलेज, डेक्कन ए. सोसायटीनें घ्यावें ही मसलत लोकांस आवडली नाहीं. टिळकांची भिस्त लोकमतावर फार. तेव्हां प्रो. टिळकांनीं बुद्धिचातुर्यानें कांहीं तरी खुसपट काढून

माघार घेण्याचें ठरविलें. आगरकरपक्षालाहि फारशी उत्सुकता नव्हतीच 'आम्हांला सरकारचें म्हणणें पसंत नाहीं.' असें पत्र सरकारकडे लाइफ मेंबरांनीं पाठविलें. लॉर्ड रे संतापले. पुढें फर्ग्युसन कॉलेजला अधिक मदत करावयाची नाहीं, असा लॉर्ड रेनें हुकूम सोडला. वरील दहशतीला कोणीच भीक घातली नाहीं. प्रो. टिळक अद्वितीय मोहोरा खरा. त्यांची कुशाग्र बुद्धि, त्यांची ग्राहकता, प्रसंगीं काम करण्याची राक्षसी कर्तृत्वशक्ति, साधेपणा, त्यांची बहुश्रुतता, चैनीची निष्ठुर अनासक्ति वगैरे डे. ए. सोसायटींत दिसून आलेले गुण व केसरी, मराठा पत्रें चालवींत असतां वादकुशलता, परपक्षाचा उपहास करण्याची हातोटी, सरकारी अधिकाऱ्याशीं धिटाईचें वर्तन, कोणतेंहि विधान आपण केलें असतां तेंच कायतें खरें आहे, हें सिद्ध करण्याची, निदान भासविण्याची चतुराई, लोकांस आपल्या इष्ट मताकडे ओढून आणण्याची व त्यांस न दुखवितां व प्रसंगीं त्यांस आवडेल असेंच बोलून व वागून लोकमत आपल्या बाजूनें करण्याची त्यांची अजब कर्तृत्वशक्ति इत्यादि प्रकट झालेले गुण लोकोत्तर होते. त्यांचा विलक्षण हट्टी स्वभाव हा अति उत्तम सद्गुण म्हणावा अथवा कींव करण्यासारखा दोष समजावा, हें त्यांच्या मित्रांतील एका विद्वानाला तरी सांगतां आलें नाहीं, हें मला प्रत्यक्ष ठाऊक आहे."

## ( २६ ) प्रो. टिळकांचा राजीनामा—

आजीव सेवकांतील भांडणें विकोपाला गेलीं. टिळक व आगरकर यांचीं भांडणें म्हणजे आकाशांतील ताऱ्यांचे वादसंवाद. त्यांत दोष कोणाचा हें सांगणें कठीण. शेवटीं कामें करणें अशक्य

झाल्यामुळें प्रो. टिळकांनीं संस्थेकडे राजीनामा पाठविला. त्यांतील कांहीं वाक्यें आपण श्रवण करूं :

पुणें, ता. १५ डिसेंबर १८९०

माझ्या प्रिय सहकाऱ्यांनो,

पुढील मजकूर आपल्यापुढें ठेवतांना मला अत्यंत दुःख होत आहे. आपण एकत्र आलों या गोष्टीला अकरा वर्षें झालीं. समोर निश्चित कार्य ठेवून आपण सर्वांनीं संकटांशीं टक्कर दिली, उद्योग केला आणि हालअपेष्टा सोसल्या. ध्येयासाठीं आपण स्वार्थत्याग केला आणि कितीतरी वेळां आपली उपासमार करून घेतली; पण परिस्थितीच्या दुर्विलासामुळें तुमच्याशीं वियोगाची भाषा बोलण्याचा प्रसंग मजवर आला आहे. संस्था सोडतांना मला ज्या वेदना होत आहेत त्यांची कल्पना तसा प्रसंग ज्यावर ओढवला असेल त्यांनाच होईल.

ज्या तत्त्वांना अनुसरून वागावयाचें असें आपण ठरविलें होतें, त्या तत्त्वांसंबंधीं धरसोडीची स्पष्ट प्रवृत्ति संस्थेंत अलीकडे दिसूं लागली आहे. विचारांतील विरोध आणि त्यामुळें उत्पन्न झालेला मनोवृत्तीचा निष्ठुरपणा यांचा परिणाम प्रस्तुत तंट्याच्या रूपानें झाला आहे असें स्थूलमानानें म्हणतां येईल. ज्या मर्यादांना अनुसरून वागण्याचें आम्ही ठरविलें होतें, त्याचा आम्हांपैकीं कित्येकांना कंटाळा येऊं लागला. एकाग्रता मागें पडून निरनिराळे उद्योग व हितसंबंध यांनीं त्यांची जागा घेतली. विचार आणि हेतु यांची भिन्नता उत्पन्न झाली. खडाजंगी वाद होऊं लागले आणि आपल्यांत तट पडले.

आम्ही हिंदी जेसुईट आहोंत असें म्हणवून घेण्याचा आम्हांला अभिमान वाटतो. अमेरिकन मिशनची मंडळी आपल्या संस्थेंत जेवढया एकनिष्ठेनें व कळकळीनें काम करतात, तसें काम आमच्या सभासदांनीं केलें पाहिजे. आमची स्थिति मात्र याच्या अगदीं उलट आहे. निर्वाहापुरत्या वेतनावर संतुष्ट रहावयाचें आणि आपलें बाकीचें सर्व उत्पन्न व शक्ति ही संस्थेच्या हितासाठीं खर्चावयाची असा आपण निश्चय केला. त्या निश्चयापासून आपण भ्रष्ट झालों आहोंत.

मला माझ्या दोषांची पूर्ण जाणीव आहे. माझ्यांतील मुख्य दोष म्हणजे कडक आणि लागणाऱ्या भाषेंत विचार प्रदर्शित करण्याची माझी खोड हा होय. आपण काढलेल्या संस्थांचें कल्याण आणि शाश्वतता यांचें मला फार मोल वाटतें. मी जर तुमच्यांत राहिलों तर एकोपा कधींहि होणार नाहीं. उलटपक्षीं, जर मी संस्था सोडून गेलों तर संस्थेच्या मूळ तत्त्वांना धक्का बसेल; परंतु निदान एकोपा अधिक होईल. खरोखर माझ्या जीविताचें ध्येय आज मी टाकून देत आहे. आतांपर्यंत तुमच्यांत राहून मी जशी संस्थेची सेवा केली त्याप्रमाणें आतां तुमच्यापासून वेगळा होऊन मी तिची सेवा करीन. आपल्या संस्थेच्या कल्याणाला एकोपा फार अवश्य आहे. या एकोप्यासाठीं मी हा आत्मयज्ञ करीत आहे. दुःखाच्या भारानें जड झालेल्या अंतःकरणानें मी तुमचा निरोप घेतों.

माझ्या प्रिय सहकाऱ्यांनो,

आपला,

बाळ गंगाधर टिळक

प्रो. टिळक संस्थेतून बाहेर पडले. त्यांनी कर्जासहित केसरी आपल्या ताब्यांत घेतला. घरचा प्रपंच चालविण्याकरितां लॉ क्लास सुरू केला. भरतखंडांतील इंग्रजांच्या कारभाराकडे ते चौकसपणानें पाहूं लागले. विश्वचैतन्याची अशी इच्छा होती कीं, प्रो. टिळकांनीं लहान प्रवाह सोडून राजकारणाच्या सागरांत प्रवेश करावा. शाळेंतील राजकारण सोडून राजकारणाची शाळा स्थापन करण्यास प्रो. टिळक मोकळे झाले, ही घटना राष्ट्रकल्याणाच्या दृष्टीनें भाग्याची नव्हे काय?

## (२७) सुधारक काढण्याचा हेतु—

१८८८ सालीं सुधारकाचा जन्म झाला. या पत्रांतील तळमळ आणि तत्त्वनिष्ठा पाहून हरिभाऊ आपटे म्हणाले कीं, 'हें महात्म्याला शोभणारें कार्य आहे.' 'सुधारक काढण्याचा हेतु' या अग्रलेखांत आगरकर म्हणतात कीं, "हिंदुस्थान आधिभौतिक संपत्तींत कोण्याहि देशास हार जाणार नाहीं; पण इंग्रजी–राज्य होईपर्यंत आमचें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड श्रृंखलाबद्ध बंदिवानासारखें होतें. ही आमची शिलावस्था पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्या-पासून बदलूं लागली आहे. त्या शिक्षणांत मनुष्य– सुधारणेच्या अत्यवश्य तत्त्वांचा समावेश झाला आहे. समाजाचें कुशल राहून त्यास उन्नतावस्था येण्यास जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून, बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास, पुरुषास व स्त्रीस जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका घ्यावयाचा, हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे; व हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल त्यांना आमच्या समाज-व्यवस्थेंत अनेक दोषस्थळें दिसणार आहेत. हीं दोषस्थळें वारंवार

लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावें, आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे, तें पुनः पुन्हां दाखवावें, यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे."

आगरकरांचा मार्ग कठीण होता. लोकप्रियतेच्या लक्ष्मीनें त्यांच्याकडे पाठ फिरविली. दमा आणि दारिद्र्य यांनीं त्यांचें शरीर पोखरलें. अक्षरशत्रु, विचारशून्य, आचरट, स्वार्थपरायण आणि उदरंभरू अशा टवाळांनीं आगरकरांवर शिव्यांचा वर्षाव केला, हेकट लोकांनीं नाकें मुरडलीं, आगरकरांच्या डोळ्यादेखत त्यांची प्रेतयात्रा काढल्याचा देखावा केला, तरी आगरकरांनीं उपहासाचें हालाहल पिऊन टाकलें आणि निरक्षरांच्या झुंडीझुंडीच्या तुटून पडल्या तरी इष्ट असेल तें स्पष्टपणें बोलण्याचा प्रयत्न केला. प्रो. टिळक म्हणाले कीं, "आगरकरांसारखा योद्धा आगरकरच! लंगडा पाय रणांगणावरून कसा नाचवावा ही विद्या आगरकरांसारखी दुसऱ्यास साधावयाची नाहीं."

केसरी आणि सुधारक यांच्या स्तंभांमधून हल्ले आणि प्रतिहल्ले होऊं लागले. सामाजिक दृष्ट्या आवश्यक असा हा विचारकलह होता. त्यांत द्वेषाला जागा नव्हती. अपशब्दांना वाव नव्हता. तें वाग्बाणांचें युद्ध असलें तरी त्यांत वैयक्तिक कुचेष्टेला वाव नव्हता. वि. स. खांडेकर म्हणतात, "प्रत्येक युद्ध, आरंभीं धर्मयुद्ध असलें तरी लढतां लढतां त्यांत अधर्माचा प्रवेश होऊं लागतो. टिळक-आगरकरांच्या वाग्युद्धांतहि हेंच घडलें. 'असलें विसंगत वर्तन कायद्याचा हिशोब चोख-रीतीनें करतां येणाऱ्या गणित्याला साधण्यासारखें आहे व त्याच्या या शास्त्रांतील पांडित्याला जर कायद्याची थोडीशी फोडणी दिलेली असेल, तर त्याला त्या वर्तनाची कुरूपता सामान्य लोक

चकतील अशा रीतीनें छपवितां येणार आहे हें आम्ही कबूल करतो. '—असा आगरकरांनीं टिळकांना टोमणा मारला. टिळकांनी 'गंजीवरला कुत्रा' असा अहेर करून या टोमण्याची परतफेड केली."

निबंधमाला १८७४ मध्यें निघाली. आगरकर १८७५ मध्यें मॅट्रिक झाले. त्यांची प्रतिभा आत्मविकासाची धडपड करीत होती; तिला निबंधमालेनें मार्ग दाखविला. निबंधकार या दृष्टीनें या दोघांची तुलना करून पाहूं : "विष्णुशास्त्री पांडित्यांत रमून जातात; आगरकर विषयाचें तर्कशुद्ध व मूलगामी विवेचन करण्याचें साधन म्हणून पांडित्याचा उपयोग करतात. विष्णुशास्त्र्यांनीं हीनगंडानें पछाडलेल्या समाजाचा राष्ट्राभिमान जागृत केला. आगरकरांनीं आपली संस्कृति श्रेष्ठ आहे, या खोट्या अभिमानाच्या धुंदींत कुंभकर्णाप्रमाणें झोंपलेल्या समाजाच्या डोळ्यांत अन्जन घालून त्याला विचारप्रवृत्त केलें. आत्मविश्वासाशिवाय कुठलाहि समाज जगूं शकत नाहीं; पण आत्मपरीक्षणाशिवाय त्याची कधींहि प्रगति होऊं शकत नाहीं. महाराष्ट्रीय समाजाचीं हीं दोन अंगें विकल झालीं होतीं. विष्णुशास्त्र्यांनीं पहिल्याला संजीवनी दिली, दुसऱ्या बाबतींत आगरकर धन्वन्तरी ठरले."

आगरकरांच्या लिखाणांत बुद्धिवादाचें व व्यक्तिवादाचें आधुनिक तत्त्वज्ञान शुद्ध, सुसंबद्ध व संपूर्ण स्वरूपांत पाहावयास सांपडतें. शास्त्रांच्या किंवा रूढीच्या पाठिंब्याची पर्वा न करतां प्रत्येक आचारविचाराला स्वतःच्या विचारशक्तीची कसोटी लावून पाहण्याचा त्यांनीं आग्रह धरला. स्वतःची विचारशक्ति न वापरतां पूर्वजांच्या शहाणपणाचें कौतुक करीत बसणाऱ्या लोकांना त्यांनीं एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवेची उपमा

दिलेली आहे. व्यक्ति हें एक स्वतंत्र मूल्य आहे. व्यक्तीसाठीं समाज आहे; समाजासाठीं व्यक्ति नाहीं. ' महाराष्ट्रांतील राष्ट्रवादाचा विकास ' या ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, " टिळकांसारखा सामर्थ्यवान व संघटनाचतुर प्रतिस्पर्धी समोर असतांना लोकमताला एकाकी विरोध करून समाजाची जुनी चौकट खिळखिळी करण्याचें हें कार्य शिरावर घेण्यांत आगरकरांनीं जी तत्त्वनिष्ठा व नीतिधैर्य दाखविलें त्याला महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासांत तोड नाहीं. " आगरकर निष्ठावंत सुधारक होते; पण प्रतिष्ठित वर्गावरच त्यांनी सुधारणेसाठीं भिस्त ठेवली. " सोवळेंओवळें, पेहराव, प्रियाराधन, केशवपन आणि पुनर्विवाह असल्या गोष्टींना त्यांनीं अवास्तव महत्त्व दिलें; आणि समाजसुधारणेपेक्षां कुटुंबसुधारणेचाच पाठपुरावा केला. समाजांतील कोणत्याच वर्गाचे हितसंबंध त्यांच्या विचारास पोषक नव्हते. त्याच सुमारास ज्योतिबा फुल्यांनींहि बहुजन समाजाला बुद्धिवादी विचार सांगितले. पण धार्मिक व सामाजिक गुलामगिरीचे संस्कार नाहींसे करण्याच्या त्यांच्या भूमिकेचें कुणी स्वागत केलें नाहीं. त्यांच्या विचारांतील ब्राह्मणविरोध तेवढा त्यांच्या अनुयायांनीं आत्मसात केला. ज्योतिबाच्या संप्रदायास याप्रमाणें विकृत वळण लागलें आणि आगरकरांना तर वारसदारच मिळाले नाहींत. "

## ( २९ ) 'मी मरणाला तयार आहें'—

२७ मार्च १८९५ रोजीं फर्ग्युसन कॉलेजची इमारत तयार झाली. गव्हर्नर आले. धोतर, सदरा, पांढरा अंगरखा, तांबडी पगडी, शुभ्रकाठाचें उपरणें, चढाऊ जोडा अशा पोषाखांत प्रिन्सिपॉल आगरकर त्यांना सामोरे गेले. इमारत उघडण्याचा

समारंभ थाटानें पार पडला. आगरकरांनीं सुधारकांत लिहिलें कीं, "हा स्पृहणीय समारंभ पाहाण्यास वामनराव आपटे जिवंत असते तर त्यांस पराकाष्ठेचा आनन्द झाला असता. दुर्दैवानें या संस्थेच्या चालकांत थोड्या वर्षांपूर्वीं जो तीव्र मतभेद झाला व जी फाटाफूट झाली, ती झाली नसती तर रा. वा. गं. टिळक यांना या समारंभापासून रा. आपटे यांच्याइतकेंच समाधान वाटलें असतें."

या समारंभानंतर उन्हाळ्याची सुटी सुरू झाली. आगरकरांची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली. प्रकृति बिघडली तरी स्वभावांतील आनन्दांत बिघाड झाला नाहीं. एक दिवस दम्यानें जिवाची अस्वस्थता वाढली. सभोंवतालचे लोक घाबरले. तेव्हां आगरकरांची विनोदीवृत्ति जागृत झाली आणि आगरकर असें म्हणाले,

"मित्रा दम्या रे वससी शरीरीं
माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी
परंतु वाटे मज दुःख मोठें
मेल्यास मी जाशील सांग कोठें ॥ १ ॥"

हा विनोद ऐकून मित्रांच्या मुखांवर हास्य विलसलें नाहीं. कांहीं वेळानें मृत्यूबद्दल बोलणें सुरू झालें. तेव्हां प्रसन्नचित्त आगरकर म्हणाले, "आतां मी मरणाला तयार आहें. मला लोकांना जें सांगावयाचें होतें तें मी सांगून टाकलें आहे." हे उद्गार ऐकून सहकारी गहिंवरले. या राष्ट्रसन्तानें आपल्या मरणाचा सोहळा आपल्या डोळ्यांनीं पाहिला. "आपला अन्तकाळ जवळ आला असें वाटतांच केवळ कर्तव्यासाठीं टिळकांना करावा लागलेला विरोध विसरून जाऊन डेक्कन कॉलेजांत किंवा डोंग-

रींच्या तुरुंगांत ज्या जिव्हाळ्यानें आपण आपल्या या जिवलग मित्राशीं तासनतास बोलत होतों, तो जिव्हाळा पुन्हां अनुभवाला यावा अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली." ही हृदयस्पर्शी हकीगत सांगतांना यशोदाबाई म्हणतात कीं, "मरणसमयीं सुखानें मरण यावें यासाठीं त्यांनीं एकच इच्छा ठेवली होती आणि ती म्हणजे टिळकांशीं झालेलें वितुष्ट नाहींसें करणें. ते सारखे म्हणत, टिळकांशीं वाकुडपणा ठेवून मला शांतपणें मरण यायचें नाहीं."

यानंतर कांहीं दिवसांनीं टिळक आगरकरांकडे आले. भेटले. बसले, दोघांचें कितीतरी बोलणें झालें. टिळकांनीं आपल्या बालमित्राचा निरोप घेतला. याच सुमारास पुढील घटना घडली असावी. आगरकरांनीं १० रुपये एका पुडींत ठेवले आणि त्या पुडीवर लिहिलें कीं, "माझ्या प्रेतदहनार्थ." ती पुडी आगरकरांनीं ठेवली, पेटीचें झांकण लावलें. त्या वेळीं जणूं कांहीं अदृश्य काळ त्यांच्या शवपेटिकेचें झांकण लावीत होता. ता. १७ जून १८९५ या दिवशीं आगरकरांचें शरीर पंचत्वांत विलीन झालें.

आगरकरांचें शील एवढें मोठें होतें कीं, एका कालखंडाला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. त्यांच्या ठिकाणीं अनेक गुण असे एकवटले होते कीं, सृष्टिदेवतेनें उभे राहून सर्व दुनियेला जाहीर करावें कीं, हा एक महापुरुष होऊन गेला. पुढें २१ वर्षांनीं मुंबईला कांहीं सुधारक जमले आणि त्यांनीं प्रि. र. पु. परांजपे यांच्या अध्यक्षतेखालीं आगरकरांची श्राद्धतिथि साजरी केली. त्या वेळीं बा. गं. टिळक यांनीं केसरींत लिहिलें कीं, "आगरकरांची योग्यता एम्. ए. होण्यांत नाहीं, ग्रंथवाचनांत नाहीं, लेखनपटुत्वांत नाहीं आणि आमच्या मतें त्यांनीं सुधारक पत्र काढलें

व चालविलें यांतहि नाहीं. परिस्थितीचा गुलाम न बनतां, परिस्थितीला यथाशक्ति आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागतें, तें ज्याच्या अंगांत आहे आणि दुःखाची अगर संकटांची पर्वा न बाळगतां जो आपल्या ठायीं असणाऱ्या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे या कोटींतले होते. हल्लीं प्रसिद्ध झालेलीं आगरकरांचीं चरित्रें प्रायः सुधारणेच्या एकाच गोष्टीला महत्त्व देऊन लिहिलेलीं आहेत. आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते. टिळक आणि आगरकर यांचा जो मतभेद झाला तो राजकीय बाबतींत नाहीं. मतभेद धार्मिक आणि सामाजिक बाबतींत उत्पन्न झालेला होता. धर्मदृष्ट्या आगरकर केवळ बौद्धिकवादी होते आणि तोच पंथ सामाजिक बाबतींतहि त्यांनीं स्वीकारलेला होता. आगरकरांची ही वृत्ति टिळकांस पसंत नव्हती. सुधारणा नको असें केसरीचें म्हणणें केव्हांहि नव्हतें, पण केवळ बौद्धिकदृष्ट्या किंवा तर्कदृष्ट्या सुधारणेचा विचार करण्यास केसरी तयार नव्हता. आगरकरांचें तर्कचक्र राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक बाबतींत ज्याप्रमाणें एकसारखेंच अप्रतिहत चालत होतें; तसें त्यांच्या सन्मानार्थ जमलेल्या सभेंतील फारच थोड्या लोकांचें चालत असेल. ज्यांना बाकीच्या बाबती पहावयाच्या नव्हत्या, त्यांस सगळा आगरकर नको होता, किंबहुना तो त्यांच्या पचनींहीं पडला नसता. असो. आज नाहीं तर उद्यां हाच उत्सव अधिक व्यापक होवो व त्यामुळें पुढील पिढीस स्वार्थत्यागाचें, मानसिक धैर्याचें व चारित्र्याचें इष्ट वळण लागून हा उत्सव देशोन्नतीस कारण होवो, अशी आमची मनापासून इच्छा आहे."

## ( २९ ) क्रॉफर्ड मामलेदाराचा कबार—

क्रॉफर्ड नांवाचा एक कमिशनर होता. तो हुषार होता, पण आळशी आणि खुशालचेंडू. रात्रीच्या वेळीं मदिरेचे घुटके घेत, सिगारेटचीं धूम्रवलयें निर्माण करीत तो ऑफिसचें काम करी. सूर्योदयापर्यंत काम संपे. मग माध्यान्हीची मध्यरात्र होई. त्याच्या-भोंवतीं सुखावलेल्या युरोपियन स्त्रियांचा अड्डा पडलेला असे. त्यांना रंगढंगाप्रमाणें मोत्यांच्या हारांचीं बक्षिसें मिळत. अशा चैनीला पगार पुरणें शक्य नव्हतें. म्हणून क्रॉफर्डचे हस्तक लांच आणि कर्जें यांचा स्वीकार करीत. कांहीं मामलेदार या लांच देण्यामध्यें सहभागी झाले. क्रॉफर्डच्या अनीतिमान् वर्तनामुळें इंग्रज लोकहि नाराज झाले. आपल्या घरांतील बायकांस यानें मौल्यवान देणग्या दिल्या, म्हणून ते क्रुद्ध झाले. शेवटीं सरकारनें २४ जून १८८८ रोजीं हें प्रकरण पोलीसाकडे दिलें. ज्या मामलेदारांच्या मार्फत लांचाच्या रकमा क्रॉफर्डकडे येत, त्यांचे कबुली-जबाब घेण्यांत आले. त्या मामलेदारांना सरकारनें असें सांगितलें कीं, "तुम्ही लांच दिलीत या गुन्ह्याची तुम्हाला माफी मिळेल. आम्हांला क्रॉफर्डला पकडण्याकरितां तुमच्या जबान्या पाहिजेत."

क्रॉफर्ड कामावरून तात्पुरता दूर झाला. तो बेपत्ता झाला. याच्या सहीचें एक पत्र पोलिसांना सांपडलें. त्यांत लिहिलें होतें कीं, "अपमान दुःसह झाल्यामुळें मी मुठा नदींत जीव देणार आहे. माझें प्रेत होळकर पुलाजवळ सांपडेल." या पत्रानें पोलिसांना झुकांडी देण्याचा प्रयत्न करून क्रॉफर्ड पुणें स्टेशनवर आला. पांढरी दाढी, पायघोळ आणि मळकट असा अंगरखा, डोळ्यावर ओढलेली टोपी, गळ्याभोंवतीं हातरुमाल—अशा वेषांत तो मेलमध्यें चढला. आगगाडी भायखळ्याला थांबली. क्रॉफर्ड

गाडींतून उतरला. तो बोटीचें तिकीट घेण्याकरितां गेला. त्या वेळीं पोलिसांनीं त्याला अटक केली.

इंग्रजांना वाटलें कीं, क्रॉफर्ड तुरुंगांत गेला तर आपली बेअब्रू होईल; म्हणून त्यांनीं क्रॉफर्डवर खटला भरला नाहीं. त्याची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें. 'क्रॉफर्डनें आपल्या नोकरांकडून कर्जें काढलीं,' इतकाच आरोप कमिशननें मान्य केला. क्रॉफर्डची नोकरी गेली. त्याच्या बायकोला पेन्शन मिळालें.

पण ज्यांनीं कबुलीजबाब लिहून दिला होता ते मामलेदार सरकारी जाळ्यांत सांपडले. २१ मे १८८९ रोजीं केसरीनें लिहिलें कीं, " खरी साक्ष देण्याच्या अटीवर मामलेदारांना माफी दिली गेली आहे व त्यांनींहि खरी साक्ष दिली आहे. तेव्हां आतां त्यांची माफी त्यांच्या पदरांत पुरी पडली पाहिजे. मामलेदारांच्या एका केंसालाहि धक्का लावण्यास सरकारला अधिकार पोंचत नाहीं. तसें केल्यास मोठा विश्वासघात होईल." टिळकांनीं संकटग्रस्त मामलेदारांचा कैवार घेतला. त्यांची बाजू केसरींतून मांडली, सभा घेतली, मामलेदारांना अर्ज लिहून दिले, पार्लमेंटपर्यंत हें प्रकरण पोंचविण्याचा प्रयत्न केला. आठ मामलेदारांच्या नोकऱ्या गेल्या, बाकीच्यांना पेन्शनें मिळालीं. या मामलेदारांनीं आपली कृतज्ञता दर्शविण्यासाठीं टिळकांना एक घड्याळ व उपरणें नजर केलें.

## (३०) ख्रिस्ती झालेली रमाबाई—

डोंगरे नांवाचे एक संस्कृत पंडित होते. त्यांच्या मुलीचें नांव रमा. ही मुलगी कलकत्त्याला गेली. तिच्या संस्कृतमधील पांडित्यामुळें तिचा गौरव झाला. पुढें ती विलायतेला गेली. तिनें ख्रिस्ती

धर्म स्वीकारला. ती हिंदुस्थानांत परत आली. लोक तिला पंडिता रमाबाई असें म्हणूं लागले. तिनें १८८९ मध्यें मुंबई येथें 'शारदासदन' या नांवाची शिक्षणसंस्था स्थापन केली. न्या. रानडे आणि डॉ. भांडारकर यांना तिनें आपल्या सल्लागार मंडळांत घेतलें. जागरूक असलेल्या टिळकांनीं भविष्य वर्तविलें कीं, 'ही पंडिता शिक्षणाच्या बुरख्याखालीं ख्रिस्तीधर्माचा प्रचार करीत आहे.' केसरींतील लेखांनीं समाजाचे डोळे उघडले. रानडे आणि भांडारकर यांनीं सल्लागार मंडळांतून नांव काढून घेतलें. पुढें शारदासदन मुंबईहून पुण्याला आलें, पुण्याहून केडगांवला गेलें. सध्यां 'शारदासदन' मिशनरी संस्था म्हणून काम करीत आहे. त्या वेळीं टिळकांच्या केसरीनें बजावलें कीं, "स्त्रीशिक्षणाचें पांघरूण घेऊन आमच्यांत घुसूं पाहाणाऱ्या ख्रिस्ती बाया व त्यांस साहाय्य करणारे व्यवस्थापक, यांस आम्ही आपल्या समाजाचे, हिंदुत्वाचे आणि स्त्रीशिक्षणाचे सुद्धां शत्रूच समजतों."

## ( ३१ ) पुरोगामी सुधारक टिळक—

बालविवाह म्हणजे कालविवाह असें सुधारकांना वाटे. मुंबईच्या मलबारी नांवाच्या शेटजींनीं अशी मागणी केली कीं, बालविवाहाला कायद्यानें बंदी करावी. तशा स्वरूपाचें बील कायदेमंडळापुढें मांडलें गेलें. न्या. रानडे, डॉ. भांडारकर हे भीष्म आणि द्रोण प्रतिपक्षी म्हणून उभे होते. तरीसुद्धां टिळकांनीं त्यांच्यावर अचुक शरसंधान केलें. टिळकांनीं पुढील सुधारणा सुचविल्या–( १ ) मुलींचें लग्न सोळा वर्षांचे आंत करूं नये. ( २ ) वीस वर्षांचे आंत मुलाचें लग्न करूं नये. ( ३ ) पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढें होऊं नये. ( ४ ) चाळीस वर्षांपुढें लग्न

करणें झाल्यास विधवेशीं करावें. ( ५ ) दारू पिणें बंद असावें. ( ६ ) हुंडा घेण्याची चाल अजिबात बंद करावी. ( ७ ) प्राप्तीचा दहावा भाग सार्वजानिक कामाकडे द्यावा. ( ८ ) विधवेनें वपन करू नये.

टिळकांना सुधारणा मान्य होती; पण कायद्याची सक्ति मान्य नव्हती. मतपरिवर्तन करून सुधारणा व्हावी, इंग्रज सरकारचा हात तेथें नसावा असें टिळकांना वाटे. याकरितां पुणें, मुंबई, सोलापूर इ० ठिकाणीं प्रचंड सभा झाल्या; पण संमतिवयाचें बील १६ मार्च १८९१ रोजीं मंजूर झालें.

## ( ३२ ) मुसलमान आणि हिंदु यांतील अद्वैत—

या प्रश्नाकडे टिळकांना लक्ष द्यावें लागलें. १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धामध्यें हिंदूंबरोबर मुसलमानांनीं भाग घेतला. १० कोटि मुसलमानांपैकीं शेंकडा ९० मुसलमान पूर्वींचे हिंदू; पण हिंदु समाजानें या बाटलेल्या मुसलमानांना दूर ठेवलें. इंग्रजांनीं १८५७ च्या अनुभवानें शहाणे होऊन हिंदु आणि मुसलमान शिपायांच्या निरनिराळ्या पलटणी उभारल्या. १८८५ सालीं राष्ट्रसभेची स्थापना झाली. तेव्हां लॉर्ड डफरिन यांनीं द्विराष्ट्र-कल्पनेचें विष पेरून मुसलमान समाजाला राष्ट्रसभेपासून अलग करण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड मिंटो आणि मोर्ले यांनीं मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघाचें अभिवचन देऊन मुस्लीम लीगच्या संस्थापनेस प्रोत्साहन दिलें.

टिळकांचें मुसलमानांशीं वागण्यांत कोणतें धोरण होतें ? त्यांचे केसरींतील कांहीं उद्गार पाहा. टिळकांनीं लिहिलें कीं, “ मुसलमानी लोकांची मनधरणी करण्यापासून भस्मासुरी प्रकार होतो.

हिंदू व मुसलमान या दोघांत जर सलोखा व ऐक्य राहावयाचें असेल तर दोन्ही जाती एकमेकांचा प्रतिकार करण्यास समर्थ आहेत अशी त्यांची समजूत होणें अगदीं अवश्य आहे. ”

टिळक या प्रश्नाच्या आहारीं गेले नाहींत. हा प्रश्न क्षुल्लक म्हणून त्यांनीं टाळला नाहीं; त्याचा नसता बडेजाव करून मुसलमानांना शेफारून जाण्याला संधि दिली नाहीं. हा वाद न मिटला तर आपलें राजकारण अडून राहील अशी अधीर वृत्तीची भाषा वापरली नाहीं. १८९० सालीं मुसलमानांनीं बेळगांवांत दंगा केला. पोलिसांनीं वरिष्ठाकडे रिपोर्ट केला कीं, हिंदूंनीं दंगा केला. मुसलमानांच्या चढेल वृत्तीचा तो प्रारंभ होता. १८९३ सालीं प्रभासपट्टण येथें दंग्याच्या ज्वाळा जोरानें भडकल्या. मुंबईला १८९३ सालीं मोठा दंगा झाला. टिळकांनीं या प्रश्नाबद्दल आपलें धोरण ठरविलें. त्यांनीं हिंदूंच्या संघटनेच्या कार्याला प्रारंभ केला. गणपतीचा सार्वजानिक उत्सव सुरू केला. हिंदूंना मुसलमानांच्या ताबुतापासून परावृत्त केलें. हिंदूंच्या मिरवणुकी व त्या मिरवणुकीबरोबरचीं वाद्यें यांना अधिकाऱ्यांनीं बंदी घातली. हिंदूंच्या हक्कावर गदा आली. टिळकांनीं हिंदूंना आपल्या आत्मघातकी दुबळेपणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

टिळकांनीं हिंदुत्वरक्षणाचा प्रयत्न केला, तरी हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती या जातींची भरतखंडाच्या राष्ट्रीय ऐक्यास जरुरी आहे याचा त्यांना विसर पडला नाहीं; कारण टिळक हे वेदान्ती होते. वेदान्ती धर्मदृष्टीला हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती हे निरानिराळे धर्म नसून एकाच विश्वधर्माचे पंथ दिसतात. आचार्य जावडेकर लिहितात कीं, “ टिळकांनीं याच व्यापक धर्मभावनेचा आपल्या

राष्ट्रीयत्वाला आधार घेतला होता म्हणून त्यांची हिंदुमुसलमानांच्या ऐक्यावर शेवटपर्यंत श्रद्धा होती. हिंदु-मुसलमानांचे दंगे होतात याच्या पाठीमागें साम्राज्यशाहीचें राजकारण आहे, ही गोष्ट त्यांनीं १८९४ सालीं महाराष्ट्रांत दंगे झाले त्यावेळीं लोकनिदर्शनास आणिली, " 'दंगा कोण करतो?' या मथळ्याच्या अग्रलेखांत टिळक लिहितात कीं, "बहुतेक दंग्यांचा इतिहास पाहिला तर तीन अवस्था दिसतात. प्रथम हिंदु आपल्या हक्काला चिकटून बसतात; मग मुसलमान उघड मारामारी सुरू करतात; नंतर ती चालवून शेवटास लावण्याचें काम पोलीस मोठ्या नेटानें करतात. मुसलमान प्रथम मारामारी करतात; पण त्याला त्यांचें अज्ञान व आडदांडपणा हींच कारणें असल्यामुळें त्यांनाहि फारसा दोष देतां येत नाहीं. पडद्यामागें सूत्रधार आहे तोंपर्यंत त्याला बाहुल्या हव्या तितक्या मिळूं शकतात. लोकांत फाटाफूट करणारा घरभेद्या पाहिजे तसा मिळतो; एका दंग्यानें कार्य साधेनासें झालें, तर तो दुसरें हुडकून काढतो."

**( ३३ ) गणपतीचा उत्सव—**

१८९४ सालीं टिळकांच्या प्रेरणेनें महाराष्ट्रांत ठिक-ठिकाणीं सार्वजनिक गणपति-उत्सव सुरू झाला. साळी, माळी, रंगारी, सुतार, कुंभार, सोनार, वाणी, उदमी इत्यादि लोकांतहि सार्वजनिक स्फुरण निर्माण झालें. हिंदूंची बहिर्मुख दृष्टि अंतर्मुख झाली. ठिकठिकाणीं मेळे दिसूं लागले. मेळ्यांतील प्रत्येक स्वयंसेवकाचा तो उज्ज्वल पोषाख, ताल धरण्यासाठीं हातांत घेतलेली ती काठी, सर्वांचें एकाच ठेक्यानें पडणारें तें पाऊल, पद्यें म्हणणारांचा तो मर्दानी आवाज, भक्तिरसानें ओथंबलेलीं तीं गाणीं, स्वधर्माच्या स्तुतीनें भारलेले ते कर्णमधुर आलाप,

मराठ्यांचा तो वीरश्रीपूर्ण उत्साह, त्यांचीं तीं भव्य निशाणें--यांचें कौतुक करावें तितकें थोडेंच ! १८ सप्टेंबर १८९४ या तारखेच्या केसरींत टिळकांनीं वर्णन केलें कीं, "कांहीं हिंदुधर्म-द्वेष्ट्या लोकांनीं उत्सवांत विघ्नें आणण्याचा प्रयत्न केला; परंतु निःपक्षपाती कलेक्टरसाहेबांचा पाठिंबा मिळाल्यामुळें गणेशविसर्जनाचा समारंभ सुखरूपपणें पार पडला. दोन वाजले. आळोआळीचे गणपति येऊं लागले. चोहींकडून 'गणपति बाप्पा मोरया' असा ध्वनि गगनमंडळ भेदून जात आहे, सर्वांच्या मस्तकीं मंगलसूचक गुलाल शोभतो आहे, टिपऱ्यांचे, लेजिमांचे, घुंगरांचे, चौघड्यांचे व सनयांचे स्वरसंमेलनानें मनावर परिणाम होत आहेत, रस्त्यावरील माड्याछपरें कौलारें गजबजून सजीव झालेलीं दिसत आहेत, असा देखावा पाहिल्यानंतर धन्यता वाटावी यांत काय आश्चर्य आहे ?

दोनतीनशें वर्षांपासून आम्हांपैकीं कांहीं मोहोरम सणाच्या वेळेस त्यांच्या देवास नवससायास करीत होते. परंतु कलहप्रिय मुसलमानांचे पीर पूजण्यानेंसुद्धां त्यांच्या हृदयास पाझर फुटत नाहींत व ते हिंदूंची कत्तल करण्यास कमी करीत नाहींत, असें दृष्टीस पडलें. तेव्हां 'डोल्यापुढें हिंदूंनीं नाचावें किंवा कसें' हा प्रश्न पुढें येऊं लागला. "प्रभासपट्टण, मुंबई, येवलें वगैरे ठिकाणचें मुसलमानांचें वर्तन पाहून लोकांस उपरति होऊन त्यांनीं भजन-पूजनाचा थाट पूर्वींप्रमाणें सुरू केला. यांत मुसलमानांस चीड येण्यासारखें त्यांनीं काय केलें हें कोणी आम्हांस सांगेल काय ?" बिपिनचंद्र पाल आठवणीच्या पहिल्या भागांत लिहितात कीं, 'गणपतीच्या उत्सवामध्यें प्रतीकोपासनेच्या पुनरुज्जीवनाची कल्पना टिळकांच्या मनांत नाहीं. भारताच्या नवीन जनशक्तीच्या

साहाय्यानें हा एक स्वदेशसेवेचा यज्ञच टिळकांनीं प्रस्थापित केला आहे. टिळकांनीं गणपति शब्दाचा वास्तविक अर्थ ओळखला होता. इंग्रजींत ज्याला डेमॉस म्हणतात, त्यालाच प्राचीन काळीं गण ही संज्ञा होती. लोकसमुदायाच्या समष्टीचेंच नांव गण. डेमॉसचीच अधिष्ठात्री देवता गणपति. भारतीय गणशक्तीला जागृत करणें हाच गणपत्युत्सवाचा उद्देश होता.''

## ( ३४ ) शिवरायाचा आठवावा प्रताप ( १८९५ )—

टिळक पुणें म्युनिसिपालिटींत निवडून आले, मुंबई युनिव्हर्सिटीच्या सीनेटचे सभासद झाले. त्याचप्रमाणें ते कायदेमंडळांतहि निवडून आले, नामदार झाले. २९–१२–१८९५ रोजीं पुण्यामध्यें टिळकांनीं एक मोठी सभा भरविली. शिवाजीचें स्मारक करावें असा ठराव त्या सभेंत पास झाला. सुरेंद्रनाथ बानर्जी आणि पंडित मालवीय यांचींहि त्या ठरावाला अनुमोदन देणारीं भाषणें झालीं.

रायगड येथें शिवाजीचें स्मारक करावें अशी कल्पना पुढें आली. ११ हजार रुपयांचा निधि जमला. महाराष्ट्रांतील वातावरण शिवाजीच्या पुण्यस्मरणानें भरून गेलें. टिळकांनीं केसरींत लिहिलें कीं, 'महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींचें प्रेम एकाच ठिकाणीं बसण्यासारखें जर कोणतें स्थळ असेल तर तें शिवछत्रपतींचें चरित्र हेंच होय. राष्ट्रांतील महापुरुषांचें स्मरण हें राष्ट्रीयत्व कायम राहाण्यास एक चांगलें साधन आहे. जगाच्या अर्वाचीन इतिहासांत मराठे लोकांचें, महाराष्ट्र देशाचें, किंबहुना सर्व हिंदुस्थानचें नांव, ज्यानें अजरामर केलें, त्या श्री शिवाजी महाराजांच्या कृतीबद्दल सर्व खऱ्या महाराष्ट्रीयांस अभिमान वाटणें अगदीं साहजिक आहे.'

१५ एप्रिल १८९६ रोजीं रायगडावर शिवाजीउत्सव करण्याचें ठरलें. कलेक्टरनें परवानगी नाकारली. नामदार टिळकांनीं प्रयत्न करून गव्हर्नरकडून परवानगी मिळवली. या उत्सवाकरितां टिळक आपल्या सहकाऱ्यांसह रायगडाच्या पायथ्याशीं आले. टिळक छावणीमध्यें विश्रांति घेतील आणि पहांटेस गड चढून जातील असें पुष्कळांना वाटलें; पण टिळकांनीं संध्याकाळचा फराळ केला, विश्रांति घेतली आणि गड चढून जाण्याचा निश्चय जाहीर केला. शेंकडों लोक इतक्या रात्रीं रायगडावर चढून जाण्याचें धाडस करण्याला टिळकांच्या उद्दीपक उदाहरणानें उद्युक्त झाले. काळकर्ते परांजपे वर्णन करतात कीं, "शेंकडों मार्गदर्शक मजुरांनीं आपल्या चुडी पेटविल्या. चारपांच लोकांच्या दरम्यान एकेक चूडवाला मनुष्य, अशा रीतीनें जवळ जवळ पांचशें लोक एका मागोमाग रांगेनें चालूं लागले. पाऊलवाट अगदीं अरुंद होती. शेंकडों चुडी पेटलेल्या असून त्यांची लांबच लांब अशी एक रांग डोंगरांतील वळणें घेत घेत वर चढत होती. हा डोंगरांतील देखावा फारच मनोवेधक भासला. खुद्द शिवाजी महाराजांच्या वेळीं शिवाजी महाराज आणि त्यांचे मावळे किल्ला सर करण्याच्या वेळीं असेंच रात्रींचे वर चढून जात असले पाहिजेत, हें प्राचीन काळचें ऐतिहासिक चित्र, त्यांच्या डोळ्यांपुढें उभें राहून प्रस्तुतच्या पडत्या काळा-मध्येंहि सर्वांच्या अंगांत वीरश्री संचरण्याचा संभव दिसूं लागला. त्यांतच "शिवाजी महाराज कीं जय!" "लोकमान्य टिळक महाराज कीं जय!" अशा रणगर्जना त्या गडावर होऊं लागल्या आणि त्यांचे प्रतिध्वनि त्या गडाच्या दऱ्याखोऱ्यांतून उत्पन्न होऊं लागले. त्यावेळीं तर हा सगळा रायगड किल्लाच त्या चुडींच्या

उजेडामध्यें स्वदेशभक्तीनें प्रज्वलित होऊन स्वराज्यसंस्थापनेचो भाषा बोलूं लागला आहे कीं काय, असा भास झाला. अशा रीतीनें रातोरात लोकमान्य रायगड चढून वर गेले." भाषणें, पोवाडे, कीर्तनें, छबिनें, मानकऱ्यांना अहेर इत्यादि प्रकारांनीं हा उत्सव साजरा झाला.

आचार्य जावडेकर लिहितात कीं, "शिवाजीकडे पाहाण्याचा लो. टिळकांचा दृष्टिकोन हिंदुपदपातशाहीचा संस्थापक एवढाच नसून, स्वकालीन जुलमी राजसत्तेविरुद्ध लढणारा जगाच्या इतिहासांतील एक असामान्य स्वातंत्र्यवीर असा व्यापक होता, असें त्यांनीं अनेक वेळां बोलून दाखविलें आहे." कलकत्त्यास शिवचरित्रावर बोलतांना लो. टिळक म्हणाले कीं, "Shivaji did not fight against the Mohamedans, but against tyrannical power that existed at that time," एका परकीय आणि जुलमी राजसत्तेविरुद्ध क्रांतीचा झेंडा उभारणारा एक स्वातंत्र्यवीर या दृष्टीनें लो. टिळक शिवाजीकडे आणि शिवाजी-उत्सवाकडे पाहात होते.

## ( ३५ ) म्हातारचळ—

१८८५ सालीं राष्ट्रसभा स्थापन झाली. १८८९ सालचें अधिवेशन मुंबईस भरलें. त्यावेळीं टिळक उपस्थित राहिले. १८९५ सालीं राष्ट्रसभेचें अधिवेशन पुण्यास भरलें. त्यांनीं ही सभा यशस्वी व्हावी म्हणून आस्थेनें काम केलें. सभेचे अध्यक्ष सुरेन्द्रनाथ बानर्जी यांचा हडपसरला जाऊन सत्कार केला. सुरेन्द्रनाथांच्या भाषणांत Surrender not—परकीयांना शरण जाऊं नका, असे सूर श्रोत्यांना ऐकूं आले. सामाजिक परिषद् राष्ट्रीय सभेच्या मंडपांतच भरवावी असा सुधारकांचा विचार

20X30 मारि

होता; पण त्या विचाराला जोराचा विरोध झाला. टिळकांचे निष्ठावंत स्नेही श्री. वि. दाते यांनीं दांडगाईची अशी धमकी दिली कीं, ‘ सामाजिक परिषदेला जागा दिलीत तर मी राष्ट्रीय सभेचा मंडप जाळून टाकीन. ’ हें पाहून न्या. रानडे यांनीं सांगितलें कीं, “ सामाजिक परिषदेकरितां राष्ट्रीय सभेचा मंडप आम्हांला नको. ”

या वादांतून दोन पक्ष निघाले. लोक त्या पक्षांच्या अनुयायांना जहाल आणि मवाळ असें म्हणूं लागले. या वेळीं सार्वजनिक सभेमध्यें हे दोन्ही पक्ष जमत, झगडत पण एकत्र काम करीत. यापुढें असें दिसून आलें कीं, सार्वजनिक सभेमध्यें टिळकपक्षाचें बहुमत आहे. हें पाहून १८९६ सालीं न्या. रानडे यांच्यासारख्या त्रिकालज्ञ महर्षीनें उदारमतवादाच्या अभिवृद्धीकरितां ‘ डेक्कन सभा ’ स्थापन केली. हा सवता सुभा स्थापण करणें राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीनें चुकीचें होतें. अखंड भरतखंडाच्या ऐक्यासाठीं झटणारे टिळक या डेक्कन सभेच्या स्थापनेनें चिडले, संतापले, भडकले. त्यांनीं केसरींत लिहिलें कीं, “ हा म्हातारचळ कीं पोरखेळ ! ईश्वराला कमी दर्जाचा जोडीदारहि खपत नाहीं, तसेंच रानड्यांना टिळक खपले नाहींत. म्हणून त्यांनीं सार्वजनिक सभेच्या छातीवर पाय देण्याकरितां डेक्कन सभा काढली. रानड्यांनीं अविचार केला. त्यांनीं सार्वजनिक सभेला सवत निर्माण करून कौटिल्य, अनुदारता व क्षुद्रबुद्धि जगजाहीर केली. टिळक किंवा बाबू हे इंग्रज सरकारचें राज्य बुडविणार आणि न्यायमूर्ति किंवा गोखले तें तारणार, असे प्रत्यक्ष किंवा परंपरेनें उद्गार काढणें म्हणजेच आपला नीचपणा किंवा मूर्खपणा व्यक्त करण्यासारखें आहे. सुधारणेंत ज्याप्रमाणें गरम

नरमाचा भेद आहे, तसा राजकीय कामांत नाहीं व गरम सुधारकांनीं आपणांस थंड मुत्सद्दी म्हणवून घेऊन इतर लोकांवर पर्यायानें आरोप करणें हा निव्वळ पाजीपणा आहे. ”

‘ आधुनिक भारत ’ या ग्रंथांत आचार्य जावडेकर लिहितात कीं, “ टिळकांनीं यावेळीं रानड्यांच्यावर जी टीका केली, तिच्या बुडाशीं एक अत्यंत महत्त्वाचें तत्त्व होतें. मागील पिढीनें स्थापन केलेली राजकीय संस्था पुढील पिढीनें बहुमताच्या जोरावर आपल्या हातीं घेतली असतां जुन्या पिढीनें जर बहुमताच्या निर्णयाला झुगारून आपलें राजकारण चिरंतन करण्यासाठीं स्वतंत्र राजकीय संस्था काढल्या तर राष्ट्रांत एकी राहावी कशी आणि राष्ट्राची शक्ति संघटित होऊन तिचा प्रभाव परकीय सत्तेवर पडावा कसा ? न्यायमूर्तींचें त्यावेळचें कृत्य राष्ट्रीयत्वाच्या विकासास आणि लोकसत्तेच्या तत्त्वास पूर्णपणें हरताळ फासणारें आणि वाढत्या राष्ट्रवृक्षावर दुहीच्या विषरसाचें सिंचन करणारें होतें. ”

## ( ३६ ) दुष्काळांतील मार्गदर्शन—

“ लो. टिळकांना राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या सिद्धीच्या दृष्टीनें धार्मिक व सामाजिक क्रांतीवर राष्ट्रांतील तरुणांची इतकी शक्ति घालविणें योग्य वाटत नव्हतें. म्हणून त्यांनीं आपल्या संस्कृतीच्या अभिमानाच्याच परंपरागत पायावर जहाल राजकारणाचा पाया घातला. ” त्यांच्या स्वतंत्र राजकीय कार्याचा प्रारंभ १८९५ पासून झाला. पांच वर्षांत त्यांची कीर्ति हिंदुस्थानभर पसरली आणि महाराष्ट्रांत टिळकांचा पक्ष राजकीय क्रांतिवादाचा जनक आहे असा ओरडा ब्रिटिश अधिकारी करूं लागले. १९०५ सालच्या सुमारास अखिल हिंदुस्थानांतील तरुण देशभक्त लो.

टिळकांच्या नेतृत्वाखालीं एकत्र आले. त्यांनीं आपल्या क्रांतिवादी तत्त्वज्ञानाचा राष्ट्रसभेनें स्वीकार करावा असें आवाहन केलें. धार्मिक व ऐतिहासिक उत्सवांना राजकीय स्वरूप देण्याचें कार्य चालू असतांनाच, लो. टिळक सामान्य रयतेपर्यंत पोंचण्याचा प्रयत्न करीत होते. १८९६ त साताऱ्यास भरणाऱ्या प्रांतिक परिषदेबद्दल टिळक लिहितात कीं, " जमिनीचा सारा, जंगल, मीठ, अबकारी वगैरे बाबतींत गरीब रयतेचे काय हक्क आहेत हें त्या रयतेस समजून देण्याच्या उद्योगास आम्हीं आतां लागलें पाहिजे. रयतेचीं दुःखें रयतेनेंच येऊन सभेंत सांगितलीं पाहिजेत, किंवा निदान त्यांच्या दुःखाबद्दल सरकारपाशीं आम्ही दाद मागतों ते लोक असल्या सभेंत हजर तरी असले पाहिजेत. "

१८९६ सालीं महाराष्ट्रांत दुष्काळानें आपलें भीषण स्वरूप प्रगट केलें. शेतकरी हैराण झाले. वैरणीच्या काड्या दिसेनात. गाई आणि बैल कवड्यांच्या किंमतीनें विकली जाऊन कसायाच्या कोयत्यांना बळी जाऊं लागलीं. १८७७, १८८८, १८८९, १८९२, १८९७ आणि १९०० या सर्व दुष्काळांत मिळून दोन कोटी साठ लक्ष लोक मृत्युमुखीं पडले. राजकीय दास्यामुळेंच अशा आपत्तींचें निवारण करतां आलें नाहीं. १८९६ सालच्या दुष्काळांत टिळकांनीं काय केलें? त्यांनीं सार्वजनिक सभेमार्फत काम करण्यास सुरुवात केली. फॅमीन रिलीफ कोडमधील महत्त्वाचे विचार मराठींत लिहून एक पुस्तक तयार केलें. तें पुस्तक प्रचारकांतर्फे खेड्यापाड्यांत पोंचविलें. तें वाचून दाखविण्याची व्यवस्था केली. या प्रचारामुळें त्रस्त रयतेला धीर आला आणि आपल्या अधिकाराची जाणीव झाली. टिळकांनी केसरींत लिहिलें कीं, ''सरकारनें शेतकऱ्यांचीं गुरें अथवा जमीन विकून सारा वसूल

करूं नये असें फॅमीन कोडांत स्पष्ट कलम आहे, पण हें कोणास माहीत नाहीं. ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं लोकांस जें काय समजून द्यावयाचें तें हेंच ! करितां ज्यांस आपले अगर आपल्या गुरांचे प्राण वांचवावयाचे असतील त्यांनीं सरकारकडे जावें. दाता आहे पण मागणारेच नाहींत, अशी स्थिति येऊं नये. मग दाता खरा असल्यास टिकेल, नाहींतर त्याचा कच्चेपणा तरी अनुभवास येईल." सार्वजनिक सभेचे सभासद दामाजीपंताच्या तळमळीनें गांवोगांव पाहाणी करीत प्रचार करीत होते. हें कार्य पाहून सरकारचें माथें भडकलें. उंबरगांव पेट्यांत खत्तलवाड येथें प्रो. साठे प्रचार करण्यास गेले. कोळी, वारली आणि पांढरपेशे मिळून दोन हजार लोक जमले. सभा सुरू झाली. या सभेला फौजदार आणि मि. दुबोले असिस्टन्ट कलेक्टर हे उपस्थित राहिले. भरलेल्या बंदुका घेऊन पोलिसांनीं सभेला गराडा दिला. दुष्काळ कमेटीचे सेक्रेटरी प्रो. साठे यांनीं तीन तास अस्खलित भाषण केलें. पोलिसांच्या बंदुका समोर दिसत असतांना त्यांनीं असिस्टंट कलेक्टरसमोर लोकांस समजावून सांगितलें कीं, "तुमचीं पिकें बुडालीं असलीं तर तुम्ही सरकारास सारा देऊं नका." या प्रसंगाला उद्देशून केसरीनें अग्रलेखाला शीर्षक दिलें कीं, "पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्यांत भरलेली रयतेची जंगी सभा." सार्वजनिक सभेच्या प्रचारकांचें खेड्यांत स्वागत होऊं लागलें. शेतकऱ्यास हक्कांची जाणीव झाली. या चळवळीच्या चढत्या आणि वाढत्या लाटा पाहून एका अँग्लो इंडियन पत्रानें लिहिलें कीं, "टिळकांनीं आयरिश राष्ट्रांतील पार्नेलप्रमाणें हिंदी शेतकऱ्यांत खंडबंदीची चळवळ सुरू केली आहे."

## ( ३७ ) जुलमी गव्हर्नराचें स्मारक—

१८९० ते १८९५ पर्यंत लॉर्ड हॅरीस हे मुंबईचे गव्हर्नर होते. त्यांना खेळाची, आलस्याची आणि बेमुर्वत वर्तनाची आवड होती. नामदार गोखले यांच्यासारख्या उदारमतवादी नेमस्तानेंहि लॉर्ड हॅरीस यांच्याविषयीं असे उद्गार काढले कीं, "ज्याची आठवण झाली असतां परोपरीनें मनाला उद्वेगच वाटावा, अशी लॉर्ड हॅरीस यांच्यासारखी दुसरी कारकीर्द आजवर झाली नाहीं. लोकमताला ज्यानें अधिक धिःकारलें किंवा सरकार व प्रजा यांमध्यें अधिक बेबनाव उत्पन्न केला असा दुसरा गव्हर्नर आजवर झाला नाहीं."

अशा तऱ्हेचा गव्हर्नर असूनसुद्धां कांहीं भक्तगणांनीं, जी-हुजूरांनीं आणि इंग्रज रिंगमास्तरच्या चाबकाच्या इषाऱ्यावर नाचणाऱ्या संस्थानिकांनीं २५ हजार रुपये जमविले आणि स्मारक करण्याचें योजिलें. स्मारक गुणांचें करतात, दुर्गुणांचें करीत नाहींत; पण हॅरीस साहेबापुढें रीसाप्रमाणें म्हणजे अस्वलाप्रमाणें नाचणाऱ्या या सेवकांना कसें उमगणार ? टिळकांनीं या स्मारकाला जोराचा विरोध केला. बाप चांगला असो वा वाईट असो, त्याचें श्राद्ध जसें दरवर्षीं मुलानें केलेंच पाहिजे, तसेंच दर पांच वर्षांनीं गव्हर्नर विलायतेस जाऊं लागला म्हणजे त्याचें स्मारक लोकांनीं केलेंच पाहिजे, अशी जी दास्यवृत्ति वाढत चालली होती तिचा टिळकांनीं निषेध केला. साहेबांचा पुतळा उभारण्याची कल्पना निघाली तेव्हां टिळकांनीं सुचविलें कीं, "हॅरीस साहेबांचें बरोबर ध्यान पुतळ्यांत साधण्यास त्यांचे खालील गुण पुतळा करणारानें मनांत ठेवावें—( १ ) लोकमताचा तिरस्कार, ( २ ) खेळण्याची हौस, ( ३ ) योग्य असें काम करण्याचा

कंटाळा, ( ४ ) स्पष्टोक्तीची प्रीति, ( ५ ) आपल्या भाषणानें लोकांस कसें काय वाटेल, याची बेफिकिरी, ( ६ ) हाताखालील कामगारांचा बोज ठेवण्याची युक्ति, ( ७ ) वैमनस्यवर्धनाची हातोटी, ( ८ ) राष्ट्रीय गुणांचा ऱ्हास करण्याची शैली, ( ९ ) स्वजातिबांधवांचें प्रेम. ”

इतका विरोध केला तरी तोंडपुजे लोकांनीं स्मारक-सभेचें काम कसेंतरी तडीस नेलें. तें पाहून टिळकांनीं केसरींत हॅरीससाहेबांची आरती केली आणि असें म्हटलें कीं, “ पूर्वी एखाद्या आच्याऱ्याचें कसब पाहून त्यास मामलतदारी देत असें म्हणतात, त्याचप्रमाणें लॉर्ड हॅरीस हे चेंडुफळी चांगली खेळतात म्हणून त्यांना गव्हर्नरी दिली !” शेवटीं या अवगुण-स्मारकाचा निषेध करतांना टिळक स्वकीयांना उद्देशून म्हणाले कीं, “कोणाचें अंतःकरण जर हल्लींच्या स्थितीमुळें आमच्यासारखें उद्विग्न अथवा संतप्त झालें नसलें तर त्या व्यक्तीला योगी अथवा पशु यांपैकीं कोणत्याहि एका वर्गांत घालावें लागेल. ”

## ( ३८ ) प्लेगमुळें सरकारी जुलमाची साथ पसरली—

१८९६ सालीं प्लेगनें मुंबईच्या बंदरावर पाय ठेवला. टिळकांनीं प्लेगविषयीं शास्त्रीय माहिती केसरींत सांगितली. १८९७ सालीं प्लेगनें पुणें शहरांत प्रवेश केला. लोक घाबरले व घरेंदारें सोडून जाऊं लागले. केसरीनें त्यांना धीर दिला. यावेळीं असिस्टंट कलेक्टर रॅन्ड याची साताऱ्याहून पुण्यास बदली झाली. त्यांच्या कडक आणि कडवट वागणुकीच्या वार्ता साताऱ्याहून पुण्याला पोंचल्या. त्यांना प्लेग–प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठीं विशेष अधिकार दिले होते. त्यांना लष्कराची मदतहि मिळाली. त्यांचें कार्य सुरू झालें.

सोजीर घरांची तपासणी करूं लागले. पाहिजे त्यांचीं घरें फोड, पाहिजे त्या जिनगीची अफरातफर कर, पाहिजे त्या ठिकाणीं धिंगाणा घाल, हवें त्याला ओढीत ने-असा प्रकार सुरू झाला. सुधारक पत्रांत असें लिहिलें होतें कीं, 'अर्जाची दाद नाहीं, फिर्यादीची फिकीर नाहीं, तक्रारीची किंमत नाहीं आणि कायद्याची पर्वा नाहीं, अशीच रॅन्ड साहेबांच्या यमदूतांपैकीं कित्येकांची वागणूक आहे. या आडदांड रानटी सोजिरांस कशा-चीच दाद नाहीं! घरांत बाळंतीण आहे! ओढा तिला बाहेर; डोळे दुखरे आहेत, घाला गाडींत, असा तडाखा सुरू आहे. हें आहे काय? हा बंदोबस्त कां घुमाकूळ? कां रॅन्डशाही?' १९-४-९७ या दिवशीं सुधारकानें लिहिलें कीं, "आतां बायकांच्या अंगावर हात टाकण्यापर्यंत मजल येऊन ठेपली आहे. आमच्या देवांतले सोजिरांनीं टांक चोरले, आमच्या पैशाची पेटी फोडून रुपये उधळले, आमचे पापड विटाळले, आमच्या कुटुंबाला पांचवीचेंच बाहेर काढलें, असे उद्गार निघत आहेत. हें रडणें ऐकून आम्हांला संताप येतो. माणसासारखे स्वतःच्या पायावर उभे रहा आणि दाखवा या ब्रिटिश खोंडांना कीं, त्यांची बेताल अंदाधुंदी जोंपर्यंत कायदा आमच्या बाजूस आहे तोंपर्यंत आम्ही निमूटपणें चालूं देणार नाहीं."

"प्लेग-कमेटीनेंच काढलेले कायदे बाजूला ठेवून बेदिक्कत-पणें तुमच्या घरांत धिंगाणा घालणारे विलायती खोंड तुम्हांला खिजविण्याची पराकाष्ठा करीत असूनहि तुम्ही खिजत नाहीं! हें कशाचें दर्शक आहे? पेटींतला पैसा गेला, फडताळांतले पापड विटाळले, दुभत्यांतलें दहीं फस्त झालें; आजापणज्यापासून तुमच्या देव्हाऱ्यांत नित्य पूजा घेणारे तुमचे देव फुटून चूर झाले,

किंवा भडबुंजाच्या दुकानीं छटाकाचें काम करूं लागले! तुमच्या काकामामास दहा जणांनीं मिळून नागवें केलें आणि नाचायला लावलें! इतकें सगळें झालें तरी एकानेंहि याचा प्रतिकार जागच्या जागीं केला नाहीं. या खोंडांनीं तुम्हांला डवचलें, तुमच्या आयाबहिणी, आणि लग्नाच्या बायका यांची विटंबना केली. त्यांच्या अंगावर फुळें टाकलीं, त्यांच्याशीं पाठशिवाशिवी केली तरी देखील तुम्ही आपले संथच! धिःकार असो असल्या समाजाला!"

प्लेगच्या साथीबरोबर सोजिरांच्या त्रासाची साथ शहरांत पसरली. या वेळीं केसरीनें सरकारला असा इषारा दिला कीं, "हल्लीं जी मोंगलाई किंवा रँडशाही सुरू आहे, ती केव्हांहि फार दिवस टिकणें शक्य नाहीं. लोक कितीहि गरीब असले तरी हा त्रास ते एकसारखा सोसून घेतील असें आम्हांस वाटत नाहीं. करितां प्लेगनें मलों तर मेलों, पण या त्रासांतून आपली सुटका करून घेऊं, असें लोकांस वाटूं देण्यापर्यंत लॉर्ड सँढर्स्ट यांनीं त्यांचा अंत पाहूं नये, अशी त्यास आमची विनंति आहे." हे लेख लिहितांना टिळकांना तारेवरची, नव्हे धारेवरची कसरत करावी लागे. त्यांनीं सरकारवर टीका केली, त्याचप्रमाणें विधायक कामहि केलें. चरित्रकार न. चिं. केळकर लिहितात कीं, "या प्रसंगीं त्यांच्या प्रतिपक्षीयाहून अधिक विधायक कामगिरी टिळकांनीं केली, हें कोणाहि निःपक्षपाती मनुष्याला कबूल करावें लागेल."

## (३९) तीन आठवणी—

प्लेगच्या दिवसांतील कार्याची एक आठवण ब्रह्मगिरीबुवा यांनीं दिली आहे. "विधायक कार्याचें लोकमान्यांस वावडें होतें,

असा मवाळांचा त्यांच्यावर आक्षेप आहे; पण पुण्यास प्लेगमुळें कहर गुदरला, त्या वेळीं टिळकांनीं हिंदु-हॉस्पिटल स्थापन केलें. तेथें व्यवस्था पाहाण्यास टिळक सांजसकाळ जात असत. एके दिवशीं एक विधवा बाई प्लेगच्या दुखण्यांतून बरी होऊन आमच्या त्या दवाखान्यांतून गांवांत परत जावयाची होती. तिचें तेथील बील सुमारें ३० रुपये झालें होतें; पण तिचेजवळ मुळींच पैसे नव्हते. हॉस्पिटलमधील अधिकारी, तेथील नियमाप्रमाणें, तिचे-कडून पैसे घेतल्याशिवाय तिला सोडीनात. इतक्यांत लांबून गाडींतून श्रीमंत बाळासाहेब नातू यांचेसह येत असलेल्या लोक-मान्यांस तिनें पाहिलें. संकटसमयीं अचानक रीतीनें अवतीर्ण होऊन द्रौपदीस सहाय्य करणाऱ्या श्रीकृष्णाची तिला आठवण झाली. आपणांसहि तोच अनुभव आतां येत असल्याचें तेथील सर्व मंडळीदेखत तिनें सद्गदित कंठानें बोलूनहि दाखविलें ! इत-क्यांत लोकमान्य तेथें आले. त्यांनीं सर्व प्रकार ऐकून घेतला. बाळासाहेब नातू एवढे श्रीमंत, पण तोंड चुकवून ते मागें सरले. लोकमान्यांनीं तेथील अधिकाऱ्यास असें सांगितलें कीं, "या बाईच्या बिलाचे सर्व पैसे माझे खात्यावर टाकून यांना येथून जाण्यांचा पास द्या व त्या अशक्त झाल्यामुळें गाडींतून त्यांस त्यांचे घरीं पोंचते करा."

वि. गं. केतकर १९०२ सालच्या प्लेगांतील एक आठवण सांगतांना लिहितात कीं, "प्लेग असल्यानें लो. टिळक फर्ग्युसन कॉलेजजवळील एका झोपडींत राहात होते. त्या ठिकाणींहि प्लेगचा प्रादुर्भाव झाला आणि लोकमान्यांवर कौटुंबिक आपत्ति आली. टिळकांचे ज्येष्ठ चिरंजीव विश्वनाथपंत हे त्यावेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिकत होते. त्यांना प्लेग झाला, उप-

चाराचा उपयोग झाला नाहीं. त्या आजारांतच विश्वनाथपन्तांचा अन्त झाला. विश्वनाथपन्त वारले त्याच दिवशीं मी लोकमान्यांना भेटावयास गेलों. झोंपडीकडे जाण्यापूर्वी ही दुःखद वार्ता समजली. त्यांचें सांत्वन कसें करावें, काय बोलावें हें समजेना; इतक्यांत लोकमान्यांनीं आंत बोलावलें. ते म्हणाले, " अहो! गांवची होळी पेटल्यावर, प्रत्येक घरच्या गोंवऱ्या द्याव्या लागतात. त्याप्रमाणेंच झालें."

टिळकांचे घरचे लेखक अ. वि. कुलकर्णी लिहितात कीं, " विश्वनाथपंत वारल्यावर दुसरे दिवशीं सोमवार होता. प्लेगचा संसर्ग होऊं नये म्हणून पंतांचे कपडे बाहेर उन्हांत टाकले होते. ज्या झोंपडींत विश्वनाथपंत वारले त्या झोंपडीपासून दहाबारा पावलांवर टिळकांची झोपडी होती. सामान अस्ताव्यस्त पडलें होतें. जिकडे तिकडे औदासीन्य पसरलें होतें. अशा स्थितींत कोणासहि काम सुचणें शक्य नव्हतें; पण त्या दिवशीं टिळकांनीं तहनाम्याचीं आणि करारांचीं पुस्तकें आणून वाचलीं आणि "महाराज होळकर यांचा राजीनामा मंजूर झाला." हा अग्रलेख मला तोंडानें सांगितला! मला लिहितांना पंतांची वारंवार आठवण होई; परंतु टिळकांनीं नेहमींप्रमाणेंच शांतपणानें मजकूर सांगितला. लिहिण्याचें काम चाललें होतें. तिकडे झोंपडींत बापूला ताप आला आहे अशी कुजबूज सुरू झाली. रामभाऊ म्हणाला, " मी दादांना सांगतों." आमचे लिहिणें चालू असल्यामुळें " आतां नको सांगू." असें टिळकांच्या कुटुंबानें सांगितलें. हें सर्व भाषण मला ऐकूं येत होतें आणि टिळकांनींहि ऐकलें असेल. मजकूर संपल्यावर रामभाऊनें " बापूस ताप आला

आहे." असें येऊन सांगितलें. झोंपडींत प्लेग झालेला, वडील मुलगा दोन दिवसांपूर्वी गेलेला, अशा स्थितींत रामभाऊचे शब्द कानीं पडतांच ते बापूला पहाण्यास जातील असें मला वाटलें; पण यत्किंचितहि न घाबरतां व घाई न करतां, मीं लिहिलेला सर्व मजकूर त्यांनीं वाचला व त्यांत दुरुस्ती करून मग तो छापावयास पाठविला. याप्रमाणें स्वस्थचित्तानें केसरीचें काम संपविल्यावर ते बापूची प्रकृति पाहाण्यास गेले.

## ( ४० ) टिळक 'लोकमान्य' झाले—

मुंबई युनिव्हर्सिटीची एल्एल्. बी. ही पदवी टिळकांनीं मिळविली. लेखक, प्रचारक, संपादक या पदव्याहि त्यांनीं संपादन केल्या. वक्ता ही पदवी त्यांनीं मिळाली नाहीं. कॉलेजमध्यें ते प्रोफेसर झाले. ओरायन हा ग्रंथ लिहिल्यावर पंडितांच्या सभेंत त्यांना संशोधक ही पदवी प्राप्त झाली. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे लिहितात कीं, 'टिळक हे लोकशाहीचे आद्य प्रणेते आहेत.' चिरोलसारख्या शत्रूनें त्यांना अशी पदवी बहाल केली कीं, "टिळक हे हिंदुस्थानांतील अस्वस्थतेचे जनक आहेत." टिळकांनीं जनशक्ति जागृत केली. त्या जनतेनें न कळत असे उद्गार काढले कीं, "लोकमान्य टिळक महाराज कीं जय!"

ही पदवी टिळकांना कोणी अर्पण केली हें निश्चित सांगतां येत नाहीं. आपण आठवणींना वाट पुसत मार्ग काढण्याचा प्रयत्न करूं. कोणी सांगतात कीं, लोकमान्य या पदवीचा जाहीर आहेर करण्याचा पहिला मान संस्कृत शिक्षक महादेवशास्त्री ओक यांचा आहे. कोणी सांगतात कीं, महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांनीं ही पदवी टिळकांच्या गुणवर्णनपर भाषण करीत असतांना, त्यांना स्वयंस्फूर्तीनें अर्पण केली. 'लोकमान्य ही पदवी

प्रथम माझेच लेखणींतून निर्माण झाली' असें भालाकार भोपटकर सांगतात. बळवंतराव दाभोळकर म्हणतात कीं, " १८९३ मध्यें नैसर्गिक धर्म व भौतिक धर्म हें पुस्तक मी टिळकांना अर्पण केलें त्यावेळीं अर्पणपत्रिकेंत 'लोकमान्य' हें उपपद लिहिलेलें आहे." या पदवीबद्दल ज. स. करंदीकर यांनीं स्वतः टिळकांनाच प्रश्न केला. त्यांनीं पुढील अर्थाचें उत्तर दिलें. टिळक म्हणाले, " १९०० सालीं शिवरामपंत परांजपे यांनीं आपल्या 'काळ'-पत्रांत 'लोकमान्य आणि राजमान्य' या विषयावर अग्रलेख लिहिला. तो लेख वाचून कित्येकांनीं मला पत्र लिहितांना 'राजमान्य राजश्री' हा नेहमींचा मायना न लिहितां 'लोकमान्य' म्हणून लिहिण्याचा संकल्प केला असावा असें दिसतें. कारण त्या वेळेपासून मला 'लोकमान्य' या मायन्याचीं पत्रें येऊं लागलीं; आणि तो शब्द पूर्ण रूढ होण्याला पांच वर्षें लागलीं. 'राष्ट्रमत' पत्रानें तो शब्द कायमचा रूढ केला." आचार्य जावडेकर म्हणतात कीं, "टिळक क्रांतिवादी होते म्हणून लोकनायक झाले आणि ते लोकांना घेऊन चालले म्हणून लोकमान्य झाले. त्यांचे प्रतिपक्षी किंवा त्यांचेच अनुयायी मानतात त्याप्रमाणें त्यांना मिळालेली 'लोकमान्यता' लोकानुरंजनाच्या सवंग मोलानें पदरांत पडलेली भिकारडी वस्तु नसून निर्वाणीच्या निश्चयानें, अलौकिक धिटाईनें आणि असामान्य स्वार्थत्यागानें विकत घेतलेली बहुमोल वस्तु होती."

## ( ४१ ) चाफेकर आणि रॅन्ड साहेब—

शिवराज्याभिषेकाचा उत्सव पुण्यांत साजरा झाला. या उत्सवांत काळकर्ते परांजपे यांनीं महाभारतांतील राजसूय यज्ञ आणि शकुनि—धृतराष्ट्राचा संवाद हा विषय घेऊन प्रवचन केलें.

प्रो. भानू यांनीं शिवाजीनें अफझुलखानाचा वध केला, खून केला नाहीं असें सिद्ध केलें. हा उत्सव पाहून टाइम्स पत्राचा संताप झाला. त्या पत्रानें असें ध्वनित केलें कीं, शिवाजी–उत्सवामुळें राजद्रोहाचा फैलाव होत आहे.

याच वेळीं व्हिक्टोरिया राणीच्या कारभाराला ६० वर्षें पूर्ण झालीं. हिंदुस्थानांत सुवर्णमहोत्सव करण्याचें ठरलें. केसरीनें व्हिक्टोरिया राणी व तिचें चारित्र्य यांचें वर्णन केलें. याच वेळीं पुण्यामध्यें चाफेकर बंधूंच्या मनांत निराळेच विचार चालले होते. प्लेगमध्यें रॅन्डसाहेबानें केलेल्या जुलमाचीं वर्णनें ऐकून त्यांचीं मस्तकें भडकून गेलीं. या कृत्याचा प्रतिशोध घेतला पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. वास्तविक त्यामधील एखादा अधिकारी नाहींसा करून राज्यक्रांति होत नाहीं; पण आत्यंतिक भावनेनें उसळणाऱ्या या तरुणांच्या मनांत हा संथ विचार आला नाहीं. दामोदर चाफेकर हे एक राष्ट्रीय कीर्तनकार होते, त्यांनीं मुंबईतील राणीच्या पुतळ्यावर डांबर ओतलें. पुण्यांत प्लेगच्या अमदानींत सोजिर लोकांनीं केलेले अत्याचार पाहून त्यांना त्वेष आला. त्यांनीं रॅन्ड साहेबाला मारून सूड उगवण्याचा निश्चय केला. त्यांनीं पिस्तुलें व काडतुसें मिळविलीं.

ता. २२ जून १८९७ रोजीं गणेशखिंडीवर गव्हर्नर-साहेबाचे बंगल्यांत मोठा समारंभ झाला. विस्तीर्ण आवारांत रोषणाई केली होती. लो. टिळक या समारंभाला हजर राहिले. मध्यरात्रींपर्यंत समारंभ चालू होता. यानंतर निमंत्रित मंडळी घरीं निघालीं. रॅन्ड साहेबांची गाडी रस्त्यावर आली. मागच्या गाडींत ले. आयर्स्ट सपत्नीक बसला होता. गाड्या संथपणानें चालू होत्या. दामोदर चाफेकर व बाळकृष्ण चाफेकर देवाची प्रार्थना

करीत झाडींत लपून बसले होते. ते पुढें आले. दामोदर पुढच्या गाडीवर चढला. त्यानें रँड साहेबावर गोळी झाडली. साहेब बेशुद्ध पडला. बाळकृष्णानें मागच्या गाडीवर आक्रमण केलें आणि आयर्स्टच्या डोक्यावर गोळी मारली. आयर्स्ट गतप्राण झाला. चाफेकर बंधु कालव्याचे रस्त्यानें परतले. त्यांनीं आपलीं हत्यारें विहिरींत टाकून दिलीं. दामोदर मुंबईला गेला व शांत-पणानें कीर्तनें करूं लागला.

## ( ४२ ) राजद्रोहाचा आरोप—

दुसरे दिवशीं रँन्डच्या खुनाची बातमी गांवांत पसरली. सरकारनें पुण्यावर जादा पोलीस बसविले. नगरपालिकेजवळ ४५ हजार रुपयांची मागणी केली. लॅम्ब नांवाच्या कलेक्टरांनीं पुण्यांतील लोकांची सभा घेतली. सरकारी अधिकारी म्हणूं लागले कीं, तोफा डागून सबंध पुणेंच उडवून द्या. सरकार याप्रमाणें धुमाकूळ घालीत असतांना टिळकांनीं निर्भयपणानें लिहिलें कीं, “ सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय? राज्य करणें म्हणजे सूड उगविणें नव्हें. ”

केसरीची गर्जना पार्लमेंटपर्यंत जाऊन पोचली. विलायतेंतील टाइम्सनें लिहिलें कीं, “ खून होणार हें पुण्यांतील लोकांना आधीं कळलें होतें. खुनाची बातमी लागतांच सर्वांच्या तोंडावर आनंदाची टवटवी दिसत होती. १८५७ साल पुन्हां येणार!” प्रो. गोखले यावेळीं विलायतेंत होते. त्यांना जी चुकीची माहिती पत्रद्वारें मिळाली, त्या माहितीवर त्यांनीं अशी मुलाखत दिली कीं, ‘ प्लेग कामेटीनें पुण्यांत अतिशय जुल्म केला म्हणून हे खून झाले असावेत. सोजीर व प्लेगचे अधिकारी, बायकांना रस्त्यावर आणून तपाशीत. एकदोन बायकांवर जुल्म झाला व एकीनें

जीव दिला. ' ही मुलाखत प्रसिद्ध झाल्याबरोबर भडका उडाला. लंडन आणि हिंदुस्थान यांच्यांत तारेनें बोलणें झालें. चवकशी झाली आणि भारतमंत्र्यांनीं जाहीर केलें कीं, प्रो. गोखले यांनीं केलेले सर्व आरोप निराधार आहेत.

प्रो. गोखले यांना पुरावा मिळावा म्हणून टिळकांनीं केसरींत जाहीर केलें कीं, प्लेगसंबंधाच्या ज्या कोणाच्या तक्रारी असतील त्या पत्त्यामुद्यासह केसरीकडे कळवाव्या. वादळ सुरू झालें. टिळकांना १२४ अ या कलमाखालीं २७-७-९७ रोजीं पकडलें. त्यावेळीं टिळक मुंबईला होते. अधिकाऱ्यांनीं कमिशनचे ऑफिसांत टिळकांना कोंडून ठेवलें. टिळकांची जामिनावर मुक्तता व्हावी, म्हणून दाजीसाहेब खरे यांनीं प्रयत्न केले. टिळकांची भेट घेण्याकरितां दाजीसाहेब कमिशनच्या खोलीपाशीं गेले. रात्रीचे साडेअकरा वाजले होते. काळजीनें व्यग्र झाल्यामुळें टिळकांना झोंप आली नसेल असें खरे यांना वाटलें. दाजीसाहेब खऱ्यांनीं खोलींत प्रवेश केला. तेव्हां त्यांना असें दिसलें कीं, मनाच्या ब्राह्मी अवस्थेमध्यें कार्य करणारे टिळक शांतपणें झोंप घेत आहेत.

' टिळकांना जामिनावर सोडा ' असा अर्ज करण्यांत आला. न्या. रानडे यांनीं जामिनावर सोडण्याचें नाकारलें. खटला हायकोर्टांत गेला. तेव्हां न्या. तय्यबजी यांनीं, २५।२५ हजारांचे दोन जामीन व स्वतः टिळकांचा ५० हजारांचा जातमुचलका घेऊन, त्यांना मोकळें करावें असा हुकूम केला. मुंबईचे मुसलमान लोक म्हणूं लागले कीं, " बघा, टिळकांचा जातभाई बामण कसा आणि आमचा खंबीर गडी मुसलमान कसा ! शेवटीं मुसलमानानेंच बामणाला सोडविलें ! " अण्णासाहेब नेने

आणि द्वारकादास धरमसी हे जामीन राहिले. टिळक कोठडींतून बाहेर आले आणि खटल्याची तयारी करण्यासाठीं पुण्याला परतले.

वकिलाकरितां लागणारा खर्च कोठून आणावयाचा? टिळकांची सांपत्तिक स्थिति बिकट होती; पण महाराष्ट्रानें या खटल्याकडे आपल्या नेत्यावरील खटला या दृष्टीनें पाहिलें. डिफेन्स फंडाची वर्गणी जमा होऊं लागली. बंगाल प्रांतांतील मित्रांनीं मदत केली. त्यांनीं आपल्या खर्चानें बॅरिस्टर पाठविण्याचें ठरविलें. वासूकाका जोशी यांनीं कांहीं रक्कम जमविली. ही तयारी झाल्यावर टिळकांनीं मृत्युपत्र लिहिण्याचा विचार केला. या खटल्यांत शिक्षा होणार हें स्पष्ट दिसत होतें; म्हणून टिळकांनीं धोंडोपंतांना मृत्युपत्र लिहून घेण्यास सांगितलें. हें मृत्युपत्र सांगण्यास टिळक व लिहिण्यास त्यांचे भाचे धोंडोपंत विद्वांस हे बसले, तेव्हां आपल्या तुरुंगवासापेक्षां सांपत्तिक स्थितीच्या कल्पनेचाच प्रकाश एकदम मनावर पडल्यामुळें, सांगणाराच्या व लिहिणाराच्या, दोघांच्याहि डोळ्यांना पाणी आलें; पण ही स्थिति अर्धाएक क्षणभरच टिकली व तो क्षण जातांच टिळकांनीं मृत्युपत्र लिहून पुरें केलें.

ता. ८ सप्टेंबर रोजीं खटल्याचें काम सुरू झालें. ५ इंग्रज, १ ज्यू, १ पार्शी, २ दक्षिणी अशा ९ व्यक्तींची एक ज्यूरी नेमली गेली. न्या. स्ट्रॅची न्यायाधिशाच्या आसनावर आपल्या सर्व वैभवानिशीं उपस्थित झाले. ज्या लेखाबद्दल फिर्याद झाली ते लेख मराठींत लिहिलेले होते. या लेखांतून राजद्रोह निर्माण होतो कीं नाहीं याचा विचार करणारे वकील, ज्यूरींतील बहुतेक गृहस्थ आणि न्यायाधीश यांना मराठी भाषा समजत नव्हती. सर्वांच्या हातांत प्रत्येक मराठी शब्दाचें भाषांतर होतें. चर्चा

झाली, शब्दांच्या अर्थाचा कीस निघाला. शेवटीं फिर्यादीतर्फे ॲडव्होकेट जनरल यांनीं भाषण केलें, १२४ अ कलमाची व्याप्ति सांगितली आणि केसरीतील लेखांची भाषा आक्षेपार्ह आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. टिळकांच्या तर्फे बॅ. प्यू यांनीं भाषण केलें आणि 'ज्यूरीनें आरोपीस निरपराधी ठरविण्यासारखा हा खटला आहे' असें सांगितलें. नंतर न्यायमूर्तींनीं ज्यूरीला खटला समजावून दिला. ज्यूरीनें ६ विरुद्ध ३ मतांनीं टिळकांना दोषी ठरविलें. न्या. स्ट्रॅची यांनीं १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा सांगितली. टिळकांनीं शांत व एकाग्र चित्तानें तो निकाल ऐकला. त्यांना डोंगरीच्या तुरूंगांत नेलें. तेथें टिळकांनीं या निकालांतील दोषांचें स्मरणानें टांचण केलें आणि तें बॅ. प्यू यांच्याकडे पाठवून दिलें. अपिलांत कोणते मुद्दे मांडतां येतील याचा बॅ. प्यू विचार करीत होते. टिळकांनीं निकालांतील दोषांची यादी पाठवून दिली, हें पाहून टिळकांची कुशाग्र बुद्धिमत्ता आणि संकटकालीन चित्तस्थैर्य यांचा त्यांना प्रत्यय आला. नंतर प्रीव्ही कौन्सिलकडे विलायतेंत अर्ज पाठविला. बॅ. ॲक्स्विथ यांनीं प्रयत्न केले; पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

कारागृहांत टिळकांचे हाल झाले. दोन महिन्यांत त्यांचें वजन ३० पौंड कमी झालें. विलायतेंत प्रि. मॅक्समुल्लर यांनीं शिक्षा कमी व्हावी म्हणून प्रयत्न केला. १८९७ सालीं अमरावती येथें राष्ट्रसभेचें १३ वें अधिवेशन भरलें. सुरेन्द्रनाथ बानर्जी टिळकांच्या शिक्षेबद्दल बोलले. आपल्या पहाडी आवाजांत ते म्हणाले, "पुण्यावर जादा पोलीस लादण्यांत आले ही चूक आहे, असें आमचें मत आहे. श्री. टिळक व पुण्यांतील इतर संपादक यांना बंदींत घालणें ही त्याहून मोठी चूक आहे. श्री. टिळक यांच्या-

बद्दलच्या सहानुभूतीनें माझें अंतःकरण भरून आलें आहे. सर्व राष्ट्राच्या डोळ्यांतून अश्रू वाहात आहेत.'' १८९८ च्या सप्टेंबर महिन्यांत टिळकांची सुटका झाली.

## ( ४३ ) चाफेकरांनीं क्रांतिकारकांना स्फूर्ति दिली—

रँड साहेबाचा खुनी पकडण्याकरितां सरकारनें २० हजार रुपयांचें बक्षीस जाहीर केलें. या बक्षिसाच्या लोभानें द्रवीड बंधूंनीं माहिती पुरविली. दामोदर चाफेकर यांना अटक करण्यांत आली. बाळकृष्ण चाफेकर मोंगलाईंत गुप्त झाले. धाकटे बंधु वासुदेव आणि त्यांचे मित्र रानडे यांनीं देशद्रोही बंधूंवर पिस्तुल झाडलें आणि त्यांना परलोकीं पाठविलें. १८९७ च्या नोव्हेंबर महिन्यांत दामोदर चाफेकर यांना फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. त्यांना अधिकाऱ्यांनीं अखेरची इच्छा विचारली. चाफेकर म्हणाले, ''मला लो. टिळक यांच्या हातांतून भगवद्गीता पाहिजे.'' ही इच्छा पुरी करण्यांत आली. ती भगवद्गीता हातांत घेऊन मातृभूमीचा जयजयकार करीत राष्ट्रभक्त दामोदरपंत चाफेकर हे फांसाच्या फळीवर चढले. देशभक्ताला बंदिशाला हाच प्रासाद, शृंखला ही पुष्पमाला, शूल हा राजदंड आणि चिता हें सिंहासन!

चाफेकरांच्या धीरोदात्त चारित्र्याचा विद्यार्थी सावरकरांच्या मनावर खोल परिणाम झाला. स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चाफेकर फांसावर चढले. त्यांच्या प्राणज्योतीनें, जातां जातां चेतविलेली शत्रुंजयवृत्ति, यज्ञकुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणें असेल तर त्याचें दायित्व आपल्यावरहि पडत आहे हा विचार सावरकरांच्या मनांत बळावूं लागला. तळमळ वाढत चालली. सावरकर भगूरला गेले, अष्टभुजा देवीपुढें उभे राहिले आणि त्यांनीं अशी शपथ घेतली कीं, ''देशाचें

स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मी मारतां मारतां मरेतों झुंजेन." ह्याच शपथेमधून पुढे 'अभिनव भारता'चा जन्म झाला.

## (४४) क्रांतिकारकांचे मार्ग पसंत नव्हते—

चाफेकरांच्या अन्तःकरणांत लो. टिळक व त्यांचा केसरी यामुळें देशभक्तीची ज्योत प्रज्ज्वलित झाली, हें खरें असलें तरी या क्रांतिकारकांचा मार्ग टिळकांना पसंत होता असें दिसत नाहीं. अभिनव भारताचे एक सभासद वि. म. भट यांनीं टिळक नाशकाला आले असतांना त्यांची भेट घेतली. सभोंवतीं ज्वलज्जहाल क्रांतिकारक तरुण बसले होते. कांहींच्या तेजस्वी डोळ्यांत पोलादाचें पाणी चमकत होतें. टिळकांनीं सर्वांचें म्हणणें ऐकून घेतलें. त्या गुप्तसंस्थेंतील तरुणांमध्यें एक गुप्त पोलीसहि उपस्थित होता. टिळक आपलें उपरणें सांवरीत म्हणाले, "तुमच्या तत्त्वमंडनांत कांहीं कसूर नाहीं. प्रतिकूल तेंच घडेल हें धरून चाला. तुमची तयारी किती आहे तें सांगा. पुरेशी तयारी झाल्यावांचून लढाईला तयार होणारे सेनापती आरंभीं धैर्याचे पुतळे ठरतील, पण लढाईत अपयश आल्यास त्यांना राष्ट्राला मागें खेचण्याच्या पापाचें धनी होऊन बसावें लागेल; म्हणून ताणावें पण तुटणार नाहीं, हें पाहात असावें. प्रतापसिंहापेक्षां शिवाजीचा हाच विशेष होता."

टिळकांना क्रांतिकारकांचे मार्ग पसंत नव्हते, तरी त्यांनीं या राष्ट्रभक्तांची उपेक्षा केली नाहीं. वि. म. भट म्हणतात, "मी नाशिक खटल्याचें पंचवार्षिक प्रायश्चित्त भोगून पुण्यांत आलों. मला कोठेंहि नोकरी मिळेना. ज्या पुढाऱ्यांविषयीं आम्हांला आशा वाटत होती असे आमचे 'मॅझिनी' व 'गॅरिबाल्डी' खचून गेलेले

दिसले. मी लोकमान्यांना भेटण्याचें ठरविलें. पुन्हां शंका आली कीं, मागें त्यांच्याशीं किंचितशा विरोधी असलेल्या जहाल कंपूपैकीं मी असल्यामुळें ते मला थारा देतील कीं नाहीं? निराशेच्या धैर्यानें मी त्यांना भेटलों. माझी स्थिति पाहातांच त्यांनीं हवी असेल तेवढी रक्कम घेऊन जा, तें कर्ज मानूं नका, असें जिव्हाळ्यानें सांगितलें. मी पुन्हां मेडिकल कॉलेजमध्यें शिकून माझा शिक्षणक्रम पुरा करण्याच्या विचारांत होतों. तसें मी त्यांना सुचविलें त्यांचा मुलगा रामभाऊ मेडिकल कॉलेजमध्यें शिकत होता. टिळक म्हणाले, "माझ्या रामभाऊप्रमाणें मी तुम्हांलाहि जरूर तेवढी पैशाची मदत करीन." पोटच्या पोराप्रमाणें मला ते वागवावयास तयार झाले, हें पाहून मला गहिंवर आला."

## (४५) पुनश्च हरिः ॐ!—

१८९८ च्या सप्टेंबरांत टिळक कारागृहांतून सुटले. त्यांनीं सिंहगडावरील ऐतिहासिक वातावरणांत थोडी विश्रांति घेतली. नंतर मद्रास, रामेश्वर, सीलोन या प्रदेशांतून त्यांनीं प्रवास केला. पुढें ते ब्रह्मदेशांत जाऊन आले. लाहोर येथें झालेल्या राष्ट्रसभेंत केसरीचा कांटेरी किरीट घालणारे लो. टिळक व्यासपीठावर चढले. लोकांचीं अन्तःकरणें भक्तिभावानें भरून आलीं. प्रेक्षक स्वयंस्फूर्तीनें उभे राहिले. त्यांनीं टाळ्यांच्या गजरांत या अनभिषिक्त भूपालाचें स्वागत केलें.

टिळकांच्या सुटकेमुळें अँग्लो इंडियन पत्रें जळफळूं लागलीं. मुंबईच्या टाइम्सनें खोडसाळ प्रचार चालविला. याच सुमारास लॉर्ड नॉर्थकोट यांची गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. त्यावेळीं विलायतेंतल्या ग्लोब पत्रानें गव्हर्नरांना असा उपदेश केला कीं,

" मुंबई इलाख्यांत राजद्रोही मंडळ्यांचीं जाळीं माजून राहिलीं आहेत. त्यांचा पुढारी टिळक कैदेंत टाकल्यापासून चळवळ कमी झाली असली तरी ती फक्त दबून आहे. मराठ्यांचें राज्य पुन्हां स्थापण्याची आशा वाटणाऱ्या या ब्राह्मणावर नव्या गव्हर्नरांनीं विश्वास टाकूं नयेच, पण चांगली नजरहि ठेवावी. " मुंबईच्या टाइम्सनें हा उतारा प्रसिद्ध केला. हा लेख वाचल्यावर टिळकांनीं टाइम्स आणि ग्लोब या पत्रांवर बेअब्रूची फिर्याद केली. दोहीं पत्रांनीं टिळकांची माफी मागितली. ता. ४ जुलई १८९९ च्या केसरीमध्यें टिळकांनीं ' पुनश्च हरिः ॐ ! ' असें शीर्षक देऊन एक अग्रलेख लिहिला. या लेखाच्या ललकारीनें असें सूचित केलें कीं, कारागृहांतून सुटून आलेला हा राजकारणांतील मल्ल पुन्हां आखाड्यांत उतरला आहे.

याच सुमारास प्लेगची साथ सुरू झाली. लोकांनीं प्लेग-प्रतिबंधक लस टोंचून घ्यावी असें सरकारचें मत होतें. हा उपाय प्रयोगसिद्ध झालेला नाहीं, म्हणून कोणावरहि सक्ति करूं नका, असें मत टिळकांनीं आग्रहानें मांडलें. १९०० सालीं वेळास येथें नाना फडणवीस यांचा स्मरण दिवस साजरा करण्यांत आला. टिळकांनीं आपलें भाषण लिहिलें आणि या समारंभाकरितां पाठविलें. याचवेळीं शिवाजीच्या जन्मतिथीचा वाद निर्माण झाला. संशोधक टिळकांनीं या चर्चेंत भाग घेतला. त्याच सुमारास शास्त्रीयदृष्ट्या निर्दोष पंचांग तयार करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

१९०० सालीं प्रो. मॅक्समुल्लर मरण पावले. १६-१-१९०१ या दिवशीं न्या. रानडे दिवंगत झाले. सहा दिवसांनीं राणी

व्हिक्टोरिया खिस्तवासी झाल्या. या तिन्ही व्यक्तींवरील मृत्युलेख वाचनीय आहेत.

## ( ४६ ) सर्वज्ञ माधवराव—

न्या. रानडे यांना वाहिलेल्या आदरांजलींत टिळक लिहितात कीं, " न्यायमूर्ति हे मार्मिक लेखक, चांगले वक्ते, उत्तम विद्वान, अलौकिक बुद्धिमान, जबर विद्याव्यासंगी, असाधारण कल्पक, सरळ मनाचे व शांत स्वभावाचे होते. माधवराव पुण्यास आले त्यावेळीं हा महाराष्ट्र देश म्हणजे एक थंड गोळा होऊन पडला होता. त्या थंड गोळ्याला अनेक दिशांनीं आणि अनेक उपायांनीं सजीव करण्याचें दुर्धर कार्य माधवरावांनीं अंगावर घेतलें. सर्व बाजूंनीं राष्ट्राची उन्नति झाली पाहिजे असें त्यांस वाटत होतें. सर्व प्रकारें थंड झालेल्या देशाच्या प्रत्येक गात्रास कसें सजीव करतां येईल, याचा रात्रंदिवस विचार करणारा तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत एकच पुरुष झाला. अशा तऱ्हेचा पुरुष निर्माण होणें हें देशाचें एक भाग्यच आहे. दक्षिणेच्या प्राचीन इतिहासांत प्रसिद्धीस आलेले माधवाचार्य यांची उपमा माधरावास शोभण्यासारखी आहे. त्यांच्या विस्तृत व व्यापक बुद्धिवैभवामुळें 'सर्वज्ञः सहि माधवः' असें म्हणतां येईल."

'आमच्या आयुष्यांतील आठवणी' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत नामदार गोखले म्हणतात कीं, " न्या. रानडे हे एकोणिसाव्या शतकाचीं शेवटचीं तीस वर्षें प्रथम महाराष्ट्रांतील व पुढें हिंदुस्थानांतील राष्ट्रोन्नतीच्या नानाविध चळवळींचे केवळ आधारस्तंभच नव्हेत तर आद्यप्रवर्तक होते. त्यांची विशाल, व्यापक व तेजस्वी बुद्धि, प्रचंड व्यासंग व अलौकिक आकर्षण-शक्ति हीं सर्व त्यांनीं एकनिष्ठपणें देशसेवेस वाहिलीं. ही आपली

आर्यभूमि सर्वांगसुंदर कशानें होईल; सामाजिक, राजकीय, धार्मिक, नैतिक, औद्योगिक, शिक्षणविषयक या सर्व बाबतींत तिचें पाऊल पुढें कसें पडेल; इष्ट प्रकारची प्रगति घडून येण्यास अवश्य असणारे गुण आपल्या समाजांतील स्त्रीपुरुषांचें अंगीं कसे येतील या गोष्टींशिवाय दुसरा विचार त्यांचे मनाला माहीत नव्हता; पण रावसाहेब रानडे यांची गणना या देशांतीलच नव्हें तर सर्व जगांतील अत्यंत श्रेष्ठ विभूतींमध्यें जी करावयाची ती केवळ त्यांच्या बुद्धिवैभवामुळें अगर देशभक्तीमुळें नव्हे. याहिपेक्षां असामान्य अशी चित्तवृत्ति रावसाहेबांचे ठायीं वसत होती. या चित्तवृत्तीमध्यें अनेक सात्विक गुणांचा पूर्ण विकास झाला होता. ही चित्तवृत्ति रावसाहेबांचे अंगीं असलेल्या ईश्वरी अंशाची साक्ष मनास पूर्णपणें पटवीत असे. रावसाहेबांचा जन्म जर कांहीं शतकांपूर्वीं झाला असतां तर त्यांची गणना अवतारी पुरुषांमध्यें खास झाली असती. अशी विभूति ज्या राष्ट्रास हल्लींच्या काळांत लाभली त्या राष्ट्रास आपल्या भावि स्थितीबद्दल निराश होण्याचें कारण नाहीं.''

## (४७) टिळकांचे सहकारी आणि अनुयायी—

१८९५ सालीं न. चिं. केळकर टिळकांना येऊन मिळाले. त्यांनीं टिळकांच्या अनुपस्थितींत केसरी टिकवून धरला. शि. म. परांजपे हें दुसरें नांव सहज नजरेसमोर येतें. यांनीं 'काळ' पत्रांतून शुद्ध स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. कृ. प्र. खाडिलकर यांनीं नाटकाच्या पंख्याला राजकारणाची झालर लावली. डॉ. मुंजे, गंगाधरराव देशपांडे, अ. ब. कोल्हटकर, लोकनायक अणे, ना. खापर्डे अशीं नांवें सहज आठवतील. भरतखंडाचें नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्याला अनेक अनुयायी आणि कांहीं सहकारी

असणार. त्या सर्वांचा टिळकांनीं कसा उपयोग करून घेतला? टिळकांचा स्वभाव आणि कोंकण यांची तुलना करतांना न. चिं. केळकर म्हणतात कीं, " कोंकणांतील तांबूस व स्निग्ध मातीच्या तेजाचें अनुकरण टिळकांच्या डोळ्यांनीं केलें. समुद्रापासून त्यांनीं सर्वसंग्राहकपणा घेतला. सह्याद्रि पर्वतापासून टिळकांनीं आकांक्षांचा उत्तुंगपणा स्वीकारला. कोंकणी खडकाळ कातळापासून त्यांना निश्चयी मनाचा कठोरपणा मिळाला होता. नारळाप्रमाणें त्यांच्या अंतरंगांतील गुणग्राहकतेचें मधुर जल त्यांच्याशीं निष्ठापूर्वक वादाची टक्कर खेळणारासच मिळे. फणसाप्रमाणें त्यांची रीतभात वरून खडबडीत होती. शेवटीं रहाटगाडगें सांगावयाचें राहिलें. त्याचे पोहरे मोघे कधीं धड नसावयाचे! त्यांतल्या निम्याच पाण्याचा उपयोग व्हावयाचा! त्याप्रमाणें लो. टिळकांच्या सर्वसंग्रहांतील मंडळींत रहाटाच्या मडक्यांप्रमाणें कोणांत कांहीं न्यून असे; पण त्यांनीं त्या सर्वांना आपल्या राजकीय वळणाच्या वळलेल्या जोरकस दोरावर बांधून, त्यांच्याकडून ओंजळ ओंजळ पाणी, जें काय मिळेल तें, घेऊन चळवळीचा अखंड जलप्रवाह निर्माण केला व देशकार्याचा मळा शिंपून घेतला. "

टिळक शिक्षा भोगून बाहेर आले. त्याच वेळीं लॉर्ड कर्झन यांची हिंदुस्थानचे व्हाइसरॉय म्हणून नेमणूक झाली. कर्तबगार, अहंकारी व साम्राज्यवादी अशा या सत्ताधीशांनीं बारा महत्कृत्यें करण्याचें ठरविलें. सत्तेचें केन्द्रीकरण हें त्यांचें धोरण. १८९९ सालीं त्यांनीं स्वराज्यसंस्थांच्या स्वातंत्र्याला आळा घातला. त्या वेळीं केसरीनें लिहिलें कीं, " कैलासावरील सर्व कड्याळ फिरून गेलें आहे. त्यामुळें पूर्वी जेथें फुलांची वृष्टि होत होती तेथें गोत्र्यांची वृष्टि होण्याचा प्रसंग आलेला आहे. "

शि. म. परांजपे यांच्या 'काळ' पत्रांतून कर्झनशाहीवर उपरोधिक टीका येऊं लागली. कालकन्या कुरकुरूं लागली, कीं सह्याद्रीच्या मूक पाषाणांतूनसुद्धां स्वातंत्र्याचे निर्झर पाझरूं लागत. यावेळीं अंग्लो-इंडियन पत्रें सरकारला असें सुचवीत होतीं कीं, 'काळ पत्रावर झडप घाला. हें पत्र बुरख्यांतील भाषेनें, कर्झनसाहेबांना या जगांतून नाहींसे करा असं सुचवीत आहे.' हे लेख वाचल्यावर लो. टिळक, शि. म. परांजपे यांचेमागें एकाद्या डोंगरासारखे उभे राहिले. त्यांनीं गर्जून सांगितलें कीं, 'अन्याया-विरुद्ध ओरड करणें म्हणजे खुनास चिथावणी देणें नव्हे.'

## (४८) टिळकांचें मित्रप्रेम--

१८९७ सालीं टिळकांवर खटला झाला. त्या वेळीं जामिनावर खुले होतांच टिळक पुण्यांत आले. तेथें दुर्दैवानें एक दुःखरूपी विषाचा पेला त्यांच्यापुढें भरून ठेविलेला होता. श्रीमंत बाबा-महाराज हे टिळकांचे परम स्नेही होते. बाबामहाराज ठेंगणे होते. रंगीबेरंगी जाकिटें, हिरवें पांगोटें, निळा चष्मा अशा थाटांत ही उत्सवमूर्ति मोठ्या घोड्यांच्या रथांत बसून टिळकांच्या घरीं येई. हे बाबामहाराज महामारीच्या विकारानें आजारी पडले. आपण या दुखण्यांतून वांचत नाहीं असें पाहून त्यांनीं टिळकांच्या सल्ल्यानें मृत्युपत्र तयार केलें. टिळकांनीं चार चांगलीं माणसें ट्रस्टी म्हणून नेमलीं; पण स्वतः बाबामहाराज यांनीं आग्रह करून टिळकांचें नांव ट्रस्टी म्हणून घातलें. टिळकांनीं मृत्युशय्येवर असलेल्या आपल्या मित्राच्या समाधानाकरितां नाइलाजानें ट्रस्टी होण्यास मान्यता दिली. बाबामहाराज मरण पावले. टिळक दोन दिवस उशीरां जामिनावर सुटले असते तर ही मृत्युपत्राची व्यवस्था झाली नसती आणि तसें झालें असतें तर या प्रकरणामुळें

टिळकांवर जीं संकटें आलीं तीं आलीं नसतीं; पण भवितव्यत बलवान् असते हेंच खरें. शेक्सपीअर म्हणतो कीं, " There is a divinity that shapes our ends. " कोणीतरी अज्ञात अशी एक दैवी शक्ति आपलें चरित्र घडवीत असते. या बाबामहाराजांच्या मृत्युपत्राकरितां टिळकांना स्वतःच्या मृत्यूपर्यंत झगडावें लागलें. त्यांनीं मित्रप्रेमाचा आदर्श दाखविला; पण राष्ट्राचें त्यामुळें नुकसान झालें. जी कार्यशक्ति राष्ट्रोद्धाराच्या कारणीं लागावयाची ती कार्यशक्ति दत्तक सिद्ध करण्याकरितां झगडली आणि झिजली ! याच प्रकरणामुळें टिळकांची निस्पृहता, करारीपणा, चिकाटी आणि चारित्र्य हीं सर्व कसाला लागलीं.

बाबामहाराज वारले. मरणसमयीं त्यांची तरुण व रूपसंपन्न पत्नी ताईमहाराज गर्भवती होती. ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तो दोन महिन्यांचा होऊन वारला. इस्टेटीला वारस म्हणून दत्तक घ्यावयाचें ठरलें. कोणता दत्तक घ्यावयाचा याबद्दल ट्रस्टीमध्यें मतभेद झाला. ट्रस्टीपैकीं नागपूरकर यांचा कोल्हापुराशीं ऋणानुबंध होता. तिकडील शाखेचा दत्तक घ्यावा असें त्यांचें मत होतें. तेथील मुलगा निवडणें योग्य नाहीं, असें टिळकांना वाटलें. कोल्हापुरांतील एकदोन मुलांनीं अगोदरच अपकीर्ति कमावून ठेवली होती. अशा वातावरणांत वाढलेल्या मुलांच्या हातीं इस्टेट गेली तर ती शिल्लक राहाणार नाहीं असें टिळकांना वाटलें. म्हणून त्यांनीं निजामशाहींतील एखादा सत्प्रवृत्त मुलगा दत्तक घ्यावा असें ठरविलें.

नागपूरकरांनीं ताईमहाराजांना असें सांगितलें कीं, " कोल्हापूरकडचा मुलगा दत्तक घेतला तर तो अंतस्थरीत्या

करार करून मिळकतीचा कांहीं भाग तुम्हांला तोडून देईल. टिळकांच्या मताप्रमाणें दत्तक घेतला तर हिंदु विधवेचें खडतर आयुष्यच तुमच्या वांट्यास येईल. ” अखेर हो ना करतां करतां निजामशाहींतील जगन्नाथ हा मुलगा २८–६–१९०१ रोजीं ताईमहाराजांनीं दत्तक घेतला. ट्रस्टींचें दप्तर नागपूरकरांच्या हातांत होतें. त्यांनीं १८–६–१९०१ रोजीं झालेला ठराव आपल्याला अमान्य आहे असा शेरा मागाहून लिहून ठेवला. याप्रमाणें पुढच्या भांडणाचा पाया रचला गेला. ताईमहाराज स्वतः कोल्हापुरास गेल्या व छत्रपतींच्या समक्ष त्यांनीं बाळा-महाराज या नांवाचा मुलगा दत्तक घेतला जगन्नाथमहाराज आणि बाळामहाराज यांपैकीं खरा दत्तक कोण ? इस्टेट कोणाला मिळावी ? असा वाद सुरू झाला.

ताई महाराजांनीं ट्रस्टींना अशी नोटीस दिली कीं, “ मला मुलगा होऊन तो वारला; त्यामुळें बाबामहाराजांच्या सर्व इस्टेटीची वारसदार मी झालें आहे. म्हणून बाबामहाराजांचें मृत्युपत्र आतां रद्द ठरलें. मुलगा जिवंत राहातां तर तो मालक असतांहि वयांत येईपर्यंत बापानें मृत्यूपत्राप्रमाणें नेमलेले पालनकर्ते म्हणून त्याच्यातर्फे वहिवाट करण्याचा अधिकार ट्रस्टींना राहिला असता; पण तो मुलगा मेला म्हणून यापुढें तुम्ही इस्टेस्टीच्या व्यवस्थेंत कांहीं एक हात घालूं नये. ” या नोटिशीप्रमाणें इस्टेटीचा प्रोबेट रद्द करण्याचा अर्ज ताईमहाराजांनीं पुणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत मि. ॲस्टन यांच्यापुढें दाखल केला. टिळकांनीं राजद्रोहाच्या खटल्यांत शिक्षा भोगली होती. म्हणून कोर्टांतील वातावरण प्रतिकूल होतें. मि. ॲस्टन यांनीं ताईमहाराजांच्या बाजूनें निकाल दिला. त्यांनीं खोटी साक्ष देणें, बनावट कागद

करणें, ताईमहाराजांना अटकेंत ठेवणें, नागपूरकरांवर खोट्या तोहोमती आणणें इत्यादि आरोप टिळकांवर ठेवले आणि ते कागदपत्र सिटी मॅजिस्ट्रेटकडे पाठवून दिले.

टिळकांनीं ॲस्टन यांच्या निकालावर हायकोर्टांत अपील केलें. तेथील न्यायमूर्तींनीं ॲस्टन यांचा निकाल फिरवला, तरी ॲस्टन यांनीं केलेले आरोप राहिलेच. त्यांची चौकशी झाली. मि. क्लेमन्टस यांनीं टिळकांना दोषी ठरविलें आणि १८ महिने सक्तमजुरी आणि १ हजार रुपये दंड अशी शिक्षा दिली. शेवटीं हायकोर्टांत न्या. जेन्किन्स व बॅरी यांनीं टिळकांना दोषमुक्त ठरविलें. साम्राज्यापेक्षां न्यायाची कदर करणारा जेन्किन्स यांच्यासारखा न्यायाधीश होता म्हणून टिळकांना न्याय मिळाला. ( ३ मार्च १९०४ ).

## ( ४९ ) वादळांतील ग्रंथलेखन—

राजकारण, समाजकारण, मित्राला दिलेल्या शब्दाकरितां चालू असलेलें ताईमहाराज प्रकरण, अशा वादळामध्यें जीवन सांपडलें असतांना लो. टिळकांना संशोधन करून ग्रंथलेखनास वेळ सांपडत होता. साळू-मैनांच्या गोष्टी त्यांनीं कधींच वाचल्या नाहींत. आपद्धर्म म्हणून ते राजकारणांत पडले. गणिताचा प्रोफेसर होऊन संशोधनकार्यांत जीवन सार्थकी लागावें अशी त्यांची इच्छा होती. बुद्धीच्या खरतर नखाग्रांनीं मोठमोठ्या ग्रंथांचे काळे खडक पकडण्याची हौस व उमेद त्यांच्या तारुण्यांत उत्पन्न झाली होती. त्यांची चित्तवृत्ति स्थितप्रज्ञाची असल्यामुळें क्रांतिप्रवाहांत राष्ट्राला मार्गदर्शन करीत असतांना त्यांनीं राष्ट्राची उंची वाढविणारे असे ग्रंथ लिहिले. १८९३ त ' ओरायन ' किंवा वेदांच्या प्राचीनत्वाचें संशोधन हा ग्रंथ लिहिला. १९०३

सालीं 'आर्क्टिक होम इन् दी वेदाज' किंवा 'आर्यांचें मूळ वसतिस्थान' हा ग्रंथ तयार झाला. हे दोन्ही ग्रंथ इंग्रजींत आहेत. पाश्चिमात्य पंडित नेव्हिनसन म्हणतात कीं, "इकडे सरकारकडून छळ चालला आहे; द्रव्य, कीर्ति, मान्यता हीं सर्व सरकारनें बुडविण्याला काढलीं आहेत, अशा वेळीं 'आर्क्टिक होम' हा ग्रंथ लिहिला गेला. असल्या संकटकाळीं पवित्र धर्मग्रंथ किंवा हिममय ध्रुवप्रदेश यांचें चिंतन करणाऱ्या माणसाचें मनोधैर्य कितीशा लोकांत आढळेल?" प्रो. ब्लूमफील्ड यांनीं 'ओरायन' या विषयावर जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटींत एक व्याख्यान दिलें. त्या वेळीं प्रो. ब्लूमफील्ड म्हणाले कीं, "टिळक यांनीं लिहिलेल्या एका नवीन पुस्तकाची प्रत मजकडे आली. पुस्तक लहानसें, ओबडधोबड आणि डोळ्यांत न भरणारें असें होतें. त्याची बांधणी व छपाई सदोष होती. मी तें पुस्तक वामकुक्षी घेतांना सहज चाळावें म्हणून ठेवून दिलें. एके दिवशीं या पुस्तकाची प्रस्तावना पाहिली. वेदकाल चार हजार वर्षांपासून सहा हजार वर्षांपर्यंत मागें नेतां येतो असें त्यांत ढोबळपणानें सांगितलें होतें. हें स्थूल विधान वाचून मी मनांत हंसलों. मी सहज पुढें पानें चाळूं लागलों. लवकरच माझें हें तुच्छतादर्शक हास्य तोंडातल्या तोंडांत जिरलें व हा लेखक म्हणतो त्यांत अपूर्व असें खरोखरीच कांहीं तरी आहे असें वाटून माझी बुद्धि त्यानें गदगदां हालविली, असें मला वाटूं लागलें."

### (५०) न्या. चंदावरकरांना अहेर—

दत्तकाच्या प्रकरणांत अॅस्टननीं टिळकांना दिलेला फौजदारी शह कुचकामी ठरला. पण दिवाणीप्रकरण अद्याप चालावयाचें

होतें. मध्यंतरीं ताईमहाराज निवर्तल्या. त्यांची अविवाहित कन्या शांता हिचें नांव दाखल झालें. १९०५ च्या जून महिन्यांत वादी या नात्यानें टिळकांची साक्ष सुरू झाली. १९०६ सालीं टिळकांना सर्वस्वीं अनुकूल असा निकाल मिळाला.

प्रतिपक्षानें अपील केलें. १९०८ सालीं टिळक मंडालेच्या कारागृहांत गीतारहस्य लिहूं लागले. तेथें त्यांनीं या खटल्याचे कागद तपासले. अपिलांत न्या. चंदावरकर यांनीं टिळकांविरुद्ध निकाल दिला, टिळकांना दोषी ठरविलें. टिळकांनीं तुरुंगांतून सुचविलें, त्याप्रमाणें त्यांच्या सहकाऱ्यांनीं प्रीव्ही कौन्सिलकडे अपील केलें. प्रीव्ही कौन्सिलनें हायकोर्टाचा निकाल फिरविला. प्रीव्ही कौन्सिलमधील न्यायमूर्ति म्हणाले कीं, " टिळकांवर व त्यांच्या साक्षीदारांवर कट करण्याच्या गुन्ह्याचा आरोप चंदावरकरांनीं आणला आहे. तो आरोप भयंकर असून खोटा आहे. ( १९१५ ) "........... ....

...........कोल्हापूर दरबारनें प्रीव्ही कौन्सिलचा निकाल मानण्याचें नाकारलें, कोल्हापूरच्या राज्यांत बाळामहाराजांचेंच दत्तविधान कायदेशीर ठरविलें. जगन्नाथमहाराजांना खालसांतील जहागिरी मिळाली आणि बारा वर्षांनंतर सरदारी परत मिळाली.

अधिकारावर असतांना त्रास दिला; पण पुढें न्या. चंदावरकरांनीं ६–८–२० च्या टाईम्स पत्रामध्यें असें लिहिलें कीं, " टिळकांची निर्भयता, साधेपणावर आसक्ति, जनतेमध्यें त्यांच्याचपैकीं एक होऊन राहण्याची हातोटी, त्यांची अगदीं साधी परंतु जोरदार मराठी भाषा आणि सर्वांपेक्षां त्यांचें अत्यंत पवित्र खाजगी आचरण, यांमुळेंच त्यांची अखिल जनतेवर छाप बसली; जनतेला ते देवस्वरुपी वाटूं लागले. "

लो. टिळक विलायतेला जाण्यास निघाले, त्याचे आदले दिवशीं त्यांचें व जगन्नाथमहाराजांचें पुढील संभाषण सरदार-गृहांत झालें.

**ज. महाराज**—दादा, तुम्ही विलायतेला जाणार. तुम्ही सर्व कामांची व्यवस्था केली; पण माझी व्यवस्था काय ?

**टिळक**—कसली तुमची व्यवस्था ! तुमची व्यवस्था कायमची करून टाकली आहे.

**ज. महाराज**—होय. तें सर्व आपल्या कृपेचें फळ होय. आपणांस माझ्याकरितां ६० हजार रुपये मुदंड भरावा लागला. ती रक्कम आपण माझेकडून घ्यावी अशी विनंति आहे.

**टिळक**—एकूण तुमच्या व आमच्या इस्टेटींत तुम्ही फरक करतां म्हणावयाचा ? ज्या दिवशीं बाबामहाराजांस त्यांच्या अंतकाळीं मी शब्द दिला, त्या दिवसापासून जें जें म्हणून माझें मी समजतों तें तें सर्व तुमचें, असें मी मानीत आलों. इतकेंच काय, पण तुम्हांस मी माझा तिसरा मुलगा असें समजतों.

**ज. महाराज**—दादा, तरीपण हें पितृऋण फेडण्यांत मला सात्त्विक आनंद होणार आहे.

**टिळक**—ठीक आहे. बंगला-बागेची तुमची कांहीं जमीन मला द्या. तिची किंमत ३० हजार येईल. ती जागा राष्ट्रीयत्वाच्या अभिमानानें काम करणाऱ्या न्यू पूना कॉलेजकरितां भाड्यानें देणार आहे. मी तुम्हांस माझा मुलगा समजतों. म्हणून बाकीचे ३० हजार तुम्हांस प्रेमपूर्वक बक्षीस देत आहे.

जगन्नाथमहाराज म्हणतात कीं, "त्यांचे उद्गार ऐकून माझे डोळे भरून आले व माझ्यानें पुढें कांहींच बोलवेना. तेव्हां त्यांनीं

मला पोटाशीं धरून माझ्या पाठीवरून हात फिरवल्यावर मला अल्पकाळ कांहीं अद्भुत संचार झाल्यासारखें वाटलें." याचा सुमारास प्रो. द. वा. पोतदार लो. टिळकांना भेटले. त्यांनीं न्यू पूना कॉलेजला जागा देण्याचें कबूल केलें. पुढें ते कोलंबोहून परत आले. तरी आठवण ठेवून त्यांनीं ती जागा शि. प्र. मंडळीस मिळवून दिली. शब्द दिला, तो पुरा केला.

नामदार खापर्डे लिहितात कीं, "ताईमहाराजांचा खटला म्हणजे लोकमान्यांच्या जीविताचा, वित्ताचा आणि अब्रूचा प्रलय करणारेंच प्रकरण होतें. त्यांच्या स्वभावांत एखादें जरी वैगुण्य असतें किंवा नीतिमत्तेंत अणुइतका जरी पोचट भाग असता, तरी त्यांचा अधःपात झाला असता. परंतु लोकमान्य अंतर्बाह्य आणि ऐनजिनसी तापलेल्या सुवर्णाप्रमाणें लखलखीत होते. त्यांची नीतिमत्ता दोन्ही टोकांना सारखी असलेल्या मंगल अ-क्षतेप्रमाणें होती. ताईमहाराजाशींच प्रसंग असता तर हें प्रकरण इतकें चिघळतें ना; पण सरकारनें हा कज्जा आपला म्हणून भांडा-वयास सुरुवात केली. ज्या अधिकाऱ्यांची योग्यता लोकमान्यांचीं पायतणें सांभाळण्याचीच होती, त्यांनींसुद्धां त्यांना दुरुत्तरें करावीं, त्यांजवर कुत्सित आरोप करावे आणि त्यांच्या लोकप्रियतेला नाजूक ठिकाणीं दंश करावा, असें होऊं लागलें. परंतु लोकमान्य जसे करारी, धैर्यवंत तसेच पराकाष्ठेचे दक्ष असत. अखेर त्यांनीं यश मिळविलें व आपल्या केसरींत आनंदानें सर्व लोकांस कळविलें कीं, 'अखेर खरें तेंच टिकलें.'"

## (५१) र. पु. परांजपे रँगलर झाले—

१९०१ सालीं र. पु. परांजपे केंब्रिज येथील गणिताच्या परीक्षेंत पहिले आले. व्हाइसरॉय लार्ड कर्झन यांनीं गुणग्राहकता

दाखविली, आणि परांजपे यांच्या वडिलांना पत्र पाठवून रँग्लर परांजपे यांचें अभिनंदन केलें. रँग्लर परांजपे पुण्यांत आले. त्यांचा कॉलेजनें सत्कार केला. लो. टिळकांनीं परांजपे यांच्या घरीं जाऊन त्यांचें अभिनंदन केलें. मुंबईच्या युनिव्हर्सिटी-हॉल-मध्यें पदवीधरांतर्फे रँग्लर परांजपे यांना मानपत्र अर्पण करण्यांत आलें. त्यावेळीं टिळकांनीं केसरींत लिहिलें कीं, " विलायतेंतील विद्यार्थ्यांवर विजय संपादन करण्याची संधि परांजपे यांना प्रथम लाभली म्हणून त्यांचें अभिनंदन करावयाचें. परांजपे यांनीं श्रेष्ठ विलायती पदवी मिळविली, तर आतां विलायती प्रोफेसरांच्या रीतीनेंच पुढील आयुष्यक्रमहि इकडे घालवावा. त्यांनीं गणित-शास्त्रांतील नवीन प्रश्नांचा परामर्ष घ्यावा, फ्रेन्च वगैरे इतर युरोपियन भाषा शिकून, त्यांतून गणिताचा अभ्यास करावा, आणि फर्ग्युसन कॉलेजमध्यें गणितशास्त्राचा जिवंत झरा उत्पन्न करण्याचें श्रेय संपादन करून कृतकृत्य व्हावें. "

## ( ५२ ) नामदार गोखले यांचें अभिनंदन—

१९०४ सालीं मुंबईला राष्ट्रसभेचें अधिवेशन झालें. आपण विलायतेंत जाऊन चळवळ केली पाहिजे, असा एक ठराव झाला. त्या ठरावाप्रमाणें १९०५ सालीं शिष्टमंडळाचे प्रमुख म्हणून गोखले विलायतेंत गेले. ना. गोखल्यांनीं कर्झनशाहींतील कुटिल राजनीतीचे प्रकार श्रोत्यांना ऐकविले. इंग्रज लोकांपुढें स्वदेशी पोशाखांत उभे राहून ना. गोखले यांनीं स्वराज्याची मागणी केली. एका सभेंत गोखले म्हणाले, " हिंदी लोक राष्ट्रीय बुद्धीनें एक होणार आहेत. ते सरकारचा समाचार घेण्याची सिद्धता करीत आहेत. न्यायानें स्वराज्य न दिलें तर हिंदी लोक जुलमाला त्रासून आपल्या बलानें राज्य घेऊं पहातील तर त्याला प्रतिकार

करण्यासाठीं विलायती सैन्य पाठविण्यांत येऊं नये इतकी खबरदारी मात्र तुम्ही घ्या म्हणजे झालें."

१९०५ च्या नोव्हेंबर महिन्यांत ना. गोखले हे विलायतेहून परत आले. पुण्यामध्यें गोखल्यांचा सत्कार झाला. त्यावेळीं लो. टिळक म्हणाले कीं, "ना. गोखल्यांच्या हालचालींत विशेष गुण हा आहे कीं, त्या क्रांतिसूचक असतात. १८९७ सालीं ते विलायतेस गेले त्यावेळीं मागें मुंबई इलाख्यांत गडबड उडाली. यंदां ते विलायतेस गेले तर इकडे स्वदेशी चळवळ होऊन बंगाल्यांत धामधूम झाली. ते हिंदुस्थानांत परत आले, तों विलायतेंत प्रधान-मंडळाची उलथापालथ झाली. इकडील अधिकाऱ्यांचें समर्थन करणारे प्रतिष्ठित वाक्पंडित विलायतेंत असतां त्यांचें म्हणणें मोडून काढून विलायती लोकांच्या मनावर चांगला परिणाम होईल अशा रीतीनें गोखल्यांनीं इकडील राज्यपद्धतीचें दोषाविष्करण उत्तमरीतीनें केलें."

ना. गोखल्यांनीं न्या. रानड्यांचें शिष्यत्व श्रद्धापूर्वक पत्करलें. न्या. रानडे हे त्यांचे द्रष्टे गुरु होते. ना. गोखले यांची प्रज्ञा लौकिक होती, पण श्रद्धा अलौकिक होती. त्यांनीं प्रागतिक राजकारणाला स्वार्थत्यागाच्या अध्यात्मिक भूमिकेवर अधिष्ठित केलें आणि 'भारत सेवक समाज' ही अपूर्व संस्था स्थापन केली. आचार्य जावडेकर म्हणतात कीं, "प्रागतिक राजकारण म्हणजे क्रांतिमार्गानें होणाऱ्या प्रगतीचें वैयर्थ्य पाहून क्रमविकासाचा मार्ग चिकाटीनें व नित्यसेवेच्या स्वार्थत्यागी वृत्तीनें अनुसरणारांचा तो एक देशभक्तीचा संप्रदाय आहे हें सिद्ध करण्याचें श्रेय ना. गोखले यांनाच आहे" ना. गोखल्यांना सनदशीर मार्गानें कार्य करणें पसंत होतें. न्याय्य व कायदेशीर मार्गांनीं राज्यकर्त्यांवर लोक-

मताचें दडपण आणून सुधारणा घडवून आणणें, अशी गोखल्यांनीं सनदशीरपणाची व्याख्या केली होती. सशस्त्र बंड, परकीय आक्रमणाला मदत व गुन्हेगारी हे तीन प्रकार सोडून अर्ज-विनंत्या-पासून करबंदीपर्यंत प्रत्येक चळवळीचा या सनदशीरपणांत समावेश करण्यास त्यांची तत्त्वतः तयारी होती. प्रत्यक्षांत मात्र लोकांच्या हुल्लडबाजीचें भय वाटून सरकारचें मत वळविण्याचा मिळमिळींत मार्गच त्यांनीं स्वीकारला. "भारताच्या सर्वांगीण सुधारणेचें ध्येय गोखल्यांनीं आपल्या डोळ्यासमोर ठेवलें होतें; पण प्रत्यक्षांत मात्र त्यांचा भर केवळ राजकारणावरच होता. म्हणून प्रचलित समाजव्यवस्थेमुळें चिरडल्या जाणाऱ्या बहुसंख्य लोकांची सहानुभूति त्यांना संपादन करतां आली नाहीं. त्यामुळें त्यांच्या भारतसेवक समाजाचें ध्येय व्यापक असलें, तरी त्यांना सेवकांचा तुटवडा पडला. त्यांची श्रद्धा सात्त्विक होती; पण लोकसंग्रहाच्या अभावीं त्यांचें कर्तृत्व शेवटीं पोरकेंच ठरलें." (महाराष्ट्रांतील राष्ट्रवादाचा विकास.)

**(५३) बंगालची फाळणी —**

लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द राष्ट्राचा स्वाभिमान पायाखालीं तुडवीत होती. 'या कारकीर्दीची औरंगजेबाच्या कुटिल कारकीर्दीशीं तुलना करतां येईल' असें टिळकांनीं सांगितलें. तीच उपमा ना. गोखले यांनीं १९०५ सालीं राष्ट्रसभेच्या अध्यक्षीय भाषणांत उपयोगांत आणिली. औरंगजेबाची उद्दाम आणि कडवी वृत्ति, मनुष्यस्वभावासंबंधींचें अनुदार धोरण, साम्राज्यशाहीची अनिवार हाव, लष्करी सामर्थ्याचा अमर्याद अहंकार, आणि जित लोकांच्या प्रतिकार सामर्थ्यासंबंधीं अत्यंत तुच्छता हें कर्झनच्या कारकीर्दीचें आसुरी वैभव होतें. १९०५ च्या फेब्रुवारी महिन्यांत कर्झन

साहेबांनीं आपल्या उद्दामपणाचा कळस केला. कलकत्ता युनिव्हर्सिटींत पदवीदानसमारंभ झाला. त्या वेळीं त्यांनीं सांगितलें कीं, " वरिष्ठ नोकऱ्यांत हिंदी लोकांच्या जागा वाढविणें अशक्य आहे. राणीचा जाहिरनामा म्हणजे अशक्य कोटींतील सनद आहे. सारे हिंदी लोक खोटें बोलणारे आहेत, लबाड आहेत." लो. टिळकांनीं केसरींतून कर्झनशाहीवर हल्ला चढविला. त्यांनीं लिहिलें कीं, ' हिंदुस्थानचें नुकसान करणारा यांचेइतका बढाईखोर व्हाइसरॉय आजपर्यंत हिंदुस्थानांत आला नव्हता.'

२० जुलई १९०५ रोजीं कर्झन साहेबांनीं बंगालची फाळणी केल्याचें जाहीर केलें. त्यांनीं बंगाल्याची समाधी लावून सांगितलें कीं, " आम्ही हें राज्यकारभाराच्या सोयीसाठीं करीत आहोंत." वास्तविक या फाळणीमध्यें मुसलमान आणि हिंदू यांत भेद पाडण्याची कुटिल कारवाई होती. बंगाली लोकांनीं फाळणीविरुद्ध तीव्र चळवळ केली. बंगालमध्यें राष्ट्रीय भावनेची एक नवी ज्योत पेटूं लागली आहे, हें पाहून टिळकांना आनंद झाला. याच चळवळींतून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही चतुःसूत्री निर्माण झाली. बहिष्काराची कल्पना निघतांच अमेरिकेंत इंग्रजी मालावर घातलेला बहिष्कार कसा यशस्वी झाला हें केसरीनें सांगितलें. ' वंदे मातरम् ' या गीताला चळवळींत फार महत्त्व मिळालें. कादंबरींतील हें गीत राष्ट्रगीताच्या पदवीला पोंचलें. ' वंदे मातरम् ' या शीर्षकामधून सरकारला ' बांधो, मारो ' असा ध्वनि ऐकूं आला. याच सुमारास कर्झन आणि सर सेनापति किचनेर यांच्यामध्यें वाद उत्पन्न झाला. प्रधानमंडळानें किचनेरच्या बाजूनें निकाल दिला. कर्झन साहेबांनीं राजिनामा

दिला आणि ते निजधामास गेले. या वेळीं प्रजेला वाटलें कीं, परमेश्वरानेंच कर्झन साहेबांना शासन केलें.

विलायतेंत कॉन्झरव्हेटिव्ह पक्षाची सत्ता गेली आणि लिबरल सत्ताधीश झाले. लॉर्ड मिंटो व्हाइसरॉय झाले आणि उदारमतवादी मोर्ले स्टेट सेक्रेटरी झाले. मोर्ले साहेबांनीं ‘ बंगालची फाळणी वज्रलेप झाली ’ असें सांगितलें. त्या वेळीं तत्त्वज्ञानी आणि मुत्सद्दी असा अग्रलेख टिळकांनीं लिहिला, आणि बहिष्काराच्या चळवळीला पाठिंबा दिला. टिळक म्हणाले कीं, “ स्वकीयांना उत्तेजन देणें आणि परकीयांवर बहिष्कार घालणें या गोष्टी इतक्या सरमिसळ आहेत कीं, त्या वेगळ्या करणें शक्य नाहीं. ” “ आजचें सारें राजकारण व्यापाराच्या खुटाभोंवतीं घुटमळत आहे. बहिष्कारानें शत्रूच्या शत्रूस चिथावणें आणि स्वदेशीनें आपलें घर दुरुस्त करणें असा हा दुहेरी डाव आहे. ” महाराष्ट्रांत परदेशी कपड्यांच्या होळ्या पेटूं लागल्या. हें पाहून नेमस्त पक्षाला वाटलें कीं, राष्ट्रीय चळवळीचें तारूं भडकत चाललें. त्यावर उपाय म्हणून १९०६ सालच्या कॉंग्रेसकरितां त्यांनीं दादाभाई नौरोजी यांचें नांव सुचविलें, टिळकांनीं तें मान्य केलें. अध्यक्षपदावरून बोलतांना पितामह दादाभाई म्हणाले, “ मी इंग्रजांना अर्जविनंत्या करून दमलों. माझी निराशा इतकी कडेलोटाला गेली आहे कीं, मी तरुण असतों तर बंड केलें असतें. स्वराज्य हें हिंदुस्थानचें ध्येय आहे. हिंदुस्थानच्या अनेक रोगांवर स्वराज्य हाच उपाय आहे. ” या कॉंग्रेसमध्यें स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, हे ठरावहि पास झाले. टिळकांनीं दादाभाईंच्या सहकार्यानें जहाल पक्षाचें राजकारण कॉंग्रेसमध्यें प्रस्थापित केलें.

## (५४) महाराष्ट्रांत विदेशी कपड्यांची होळी—

ता. १–१०–१९०५ रोजीं पुण्यांत एक सभा झाली. न. चिं. केळकर हे अध्यक्ष होते. विदेशी मालावरील बहिष्काराला उग्र स्वरूप यावें, म्हणून विदेशी कपड्यांची होळी करावी, अशी कल्पना स्वातंत्र्यशाहीर सावरकर यांनीं मांडली. काळकर्ते परांजपे यांनीं त्या कल्पनेला दुजोरा दिला. सभेच्या वेळीं टिळक पुण्यांत नव्हते. ते पुण्यांत आल्यावर सावरकरांनीं त्यांची भेट घेतली; त्यावेळीं सीमोल्लंघनाचा शुभदिवस जवळ आला होता. टिळकांना ही भडक कल्पना पसंत नव्हती. पण तरुणांचा मनोभंग होऊं नये म्हणून ते म्हणाले, "होळीच करावयाची तर गाडीभर परदेशी कपडे जमविले पाहिजेत." विद्यार्थ्यांनीं कपडे जमविले. सीमोल्लंघनाचा दिवस उजाडला. सर्व परदेशी कपडे एका एका गाड्यांत रचण्यांत आले. बळी जाणाऱ्या त्या कपड्यांवर गुलाल फेकण्यांत आला. नागरिकांच्या प्रचंड घोळक्यांत मिरवणूक निघाली. प्रो. परांजपे, भालाकर भोपटकर, लो. टिळक मिरवणुकींत सहभागी झाले. लकडी पुलापलीकडे मिरवणूक थांबली. गाडीवरील कपडे एका शेतांत रचण्यांत आले. कपडे पेटविले, ज्वाळा उंच जाऊं लागल्या. लो. टिळक व विद्यार्थी सावरकर यांचीं तेजस्वी भाषणें झालीं. धगधगणाऱ्या होळीला रसरसणाऱ्या वक्तृत्वाची साथ मिळाली.

सभा संपल्यावर टिळकांनीं त्या भावनावश विद्यार्थ्यांना सांगितलें कीं, "येथें कोणीतरी राहून रात्रभर पहारा करा. जवळ गवताच्या गंजी आहेत. कोणीतरी गुप्त पोलीस त्या पेटवतील, तुमच्यावर खटला करतील आणि आपल्या कार्याची हानि होईल." टिळकांचा हा इशारा मुत्सद्याला शोभेल असा होता.

तत्त्व, तागडी आणि तरवार, किंवा तत्त्वज्ञानी, मुत्सद्दी आणि योद्धा यांच्या सहकार्यानें पराधीन राष्ट्राला स्वतंत्रता मिळते. लो. टिळकांच्या विकास पावणाऱ्या व्यक्तित्वांत आणि व्यक्तिमत्वांत या तिन्ही गुणांचा संयमपूर्वक संगम झालेला होता.

या होळीमुळें अनेक नेमस्तांचे डोळे दिपून गेले. फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिन्सिपॉलनीं विद्यार्थी सावरकरांना दहा रुपये दंड केला व वसतिगृहाबाहेर घालवून दिलें. टिळकांनीं कॉलेजच्या प्राचार्यांना उद्देशून असे अग्रलेख लिहिले कीं, 'हे आमचे गुरुच नव्हत.' या लेखांत टिळक म्हणाले कीं, "शाळेच्या विद्यार्थ्यांनीं विद्यार्थी म्हणून राजकीय चळवळींत पडूं नये, मोठ्यांनीं राजाचे नोकर म्हणून पडूं नये आणि म्हाताऱ्यांनीं पेन्शनर म्हणून पडूं नये. अशा रीतीनें राष्ट्रभक्तिशून्य पुरुषांची सरकारी नोकरीकरितां परंपरा तयार व्हावी, अशी या प्राचार्यांची इच्छा दिसते."

## ( ५५ ) कांहीं आठवणी—

लो. टिळकांच्या राजकीय जीवनाचा विकास आपण पाहिला. अनेकांनीं त्यांच्या आठवणी लिहिल्या. त्यांमध्यें टिळकांच्या स्वभावाचे अनेक पैलू पाहावयास मिळतात. त्यापैकीं कांहीं आठवणी पाहूं :

सिद्धारूढ स्वामी, साईबाबा, गजानन महाराज यांच्या व टिळकांच्या भेटीगांठी झालेल्या होत्या. श्रीमंत बुटी यांचेबरोबर टिळक शिरडीला गेले. त्यांनीं साईबाबांचें दर्शन घेतलें. इतर भक्त उभय जीवन्मुक्तांचा जयजयकार करण्यांत दंग झाले. साईबाबांनीं लोकमान्यांकडे बराच वेळ निरखून पाहिलें.

उभयपक्षीं मौनच होतें. 'अंतरनिष्ठांच्या खुणा । अंतरनिष्ठ जाणती' असें रामदास म्हणतात.

टिळक अकोल्याला शिवचरित्रावर व्याख्यान देण्याकरितां गेले होते. 'अप्रबुद्ध' सांगतात कीं, 'टिळकांच्या शामसुंदर मूर्तीचें दर्शन घेण्याकरितां हजारों लोक जमले. शेवगांवचे श्रीगजानन महाराज हेहि आपला विदेहीपणा बाजूस ठेवून व्याख्यानास आले. चिलमींतील निखारा अंगावर पडला असतां मांस जळूं लागलें. तरीसुद्धां ज्यांनीं तो झाडून टाकला नाहीं, त्यांनींच लोकमान्यांच्या विनंतीस मान देऊन सभेस यावें व मन लावून भाषण ऐकावें ही केवढया भाग्याची गोष्ट आहे.'

एकदां संध्या करण्याबद्दल बोलणें निघालें. टिळक म्हणाले, "मी संध्या करीत नाहीं, म्हणून मला कोणी दोष देतात, पण महाभारताचा एखादा अध्याय वाचल्याशिवाय किंवा एखाद्या श्लोकाचें चिंतन केल्याशिवाय माझा एक दिवसहि जात नाहीं." एकदां नागपूरला श्रीमंत बुटी यांच्याकडे टिळक उतरले होते. त्यांनीं लोकमान्यांचे आगमनानिमित्त रात्रौ बापूजी जोशी या प्रसिद्ध गवयाचें गायन ठरविलें. रात्र झाली. तबले, तम्बोरे, सारंगी यांचे सूर जमले. गवई त्या प्रसंगाला योग्य असा राग आळविण्यांत दंग झाले. गाणें ऐन रंगांत आलें. तज्ज्ञ श्रोते पुढें पुढें सरकूं लागले; समेवर थाप देऊं लागले. शाबास, बहुत अच्छे असे उद्गार काढूं लागले. लोकमान्य सुपारी कातरीत स्वस्थ बसले होते. हें पाहून मजलशींतील एक प्रौढ गृहस्थ टिळकांना म्हणाले, "महाराज! आपल्याला गाण्याची फारशी अभिरुचि दिसत नाहीं." टिळक म्हणाले, "भगवद्गीता किंवा भगवंताच्या मुखानें गाइलेलें गाणें ऐकल्यामुळें मानवगीत सुचेनासें

झालें आहे." हें उत्तर ऐकून ते प्रौढ गृहस्थ आणि प्रत्यक्ष गवईसुद्धां चकित झाले. सुरू असलेली चीज संपतांच गवई जोशी यांनीं तम्बोरा खालीं ठेवला आणि लोकमान्यांच्या चरणांवर आपलें मस्तक ठेवलें.

टिळकांचा वर्ण निमगोरा होता. डोळ्यांत तांबूस पिंगट वर्णाचें तेज होतें. उंची पांच फूट पाच इंच होती. पांढरा अंगरखा व तांबडी पगडी हा त्यांचा पोशाख. त्यांनीं डोक्यावर घेरा ठेवला नाहीं, मिशा कोरल्याकातरल्या नाहींत, न्हाव्याकडून शेंडीला कधीं तेल लावून घेतलें नाहीं. त्यांना मधुमेह होता. पथ्य म्हणून सत्तु या धान्याच्या पुऱ्या ते खात असत. सत्तूला बिलकूल चव नसते; पण टिळक हे जगण्याकरितां जेवत, जेवण्याकरितां जगत नसत. त्यांनीं संन्याशाचा वेष धारण केला नाहीं, तरी त्यांची वृत्ति संन्यस्त होती. धुळ्याला प्रांतिक परिषद भरली होती. एका ठरावाच्या भाषेबद्दल कडाक्याचा वादविवाद चालला होता. यावेळीं जवळच देवळांत उतरलेल्या एका संन्याशाच्या दर्शनाला जाण्याची गोष्ट कांहीं सभासद बोलूं लागले. तेव्हां टिळकांनीं विनोदानें प्रश्न केला, "माझ्या शेंडीचे केस डोक्यावर आहेत, म्हणून तुम्ही मला संन्यासी मानीत नाहीं काय?"

त्यांच्यावर अनेक संकटें आलीं तरी ते घरांत त्रासलेले दिसत नसत. सुरतेच्या कॉंग्रेसच्या आधीं व नंतर नेमस्त व जहाल पत्रांतून बरीच शिवीगाळ चालू होती. एके दिवशीं सकाळीं चहा घेतांना आपली कन्या आक्का हिला ते म्हणाले, "तुम्ही सर्व चहाबरोबर कांहीं खात असता; पण मी काय खातों सांगा पाहूं?" टिळक चहाबरोबर कांहींच खात नसत. तेव्हां आक्का म्हणाल्या, 'तुम्हीतर कांहींच खात नाहीं.' त्यावर टिळक

हंसून म्हणाले, ' मी चहाबरोबर रोज ताज्या शिव्या खातों. ' अशाच तऱ्हेचा दुसरा एक प्रसंग पाहा. समुद्रांतील शंख आणि कवड्या चित्राभोंवतीं बसवून तसबीर तयार करतात, त्याप्रमाणें टिळकांची एक तसबीर मुलींनीं तयार केली. ती तसबीर हातांत घेऊन टिळक म्हणाले, ' भोंवतालीं हे लहानलहान शंख आणि मध्यें हा मोठा शंख म्हणून मला बसविलें आहे असें वाटतें ! '

टिळक, समर्थ विद्यालय पाहाण्याकरितां तळेगांवला गेले होते. परत जातांना गाडीची वेळ झाली म्हणून ते तयारी करूं लागले. या वेळीं राष्ट्रीय शिक्षणाबद्दल वाद रंगांत आला होता, त्यामुळें प्रो. विजापूरकर म्हणाले, ' बळवंतराव ! तुम्ही या गाडीनें जाणार असल्यामुळें तुम्ही स्टेशनवर पोंचेपर्यंत गाडी कांहीं येत नाहीं. गाडी खात्रीनें लेट होईल. ' त्यावर टिळक उद्गारले कीं, ' ऋषींचें आन्हिक चुकूं नये म्हणून चंद्रसूर्यसुद्धां थांबतात असें म्हणतात ! पण माझ्यासाठीं गाडी लेट होऊन दैवानें माझ्यावर उपकार करावा, ही गोष्टच मला मान्य नाहीं. मी प्रयत्नवादी आहे, दैवाचा उपकार मला नको आहे. '

१८९५ सालीं टिळकांची सांपत्तिक स्थिति खालावलेली होती. अशा वेळीं सयाजीराव गायकवाड यांनीं टिळकांना एका इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर करण्यास सुचविलें. त्या निमित्तानें कांहीं हजार रुपये दक्षणा देण्याची महाराजांची इच्छा होती; पण या निःस्पृह, मानी व तेजस्वी ब्राह्मणानें राजाश्रयाची शीतल पण रोगट सांवली मान्य केली नाहीं. टिळकांनीं महाराजांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून त्यास नकार दिला. घरीं आल्यावर टिळक धोंडोपंत

विद्वांस यांस म्हणाले, ' दुसऱ्यानें दिलेला तुकडा खाऊन केवळ भाषांतराचें काम करण्यासाठीं मी जन्माला आलेलों नाहीं. ज्या शतकांत मी जन्म घेतला त्या शतकाचें नांव कायम राहील असें कांहीं कार्य करण्याची माझी इच्छा आहे. '

वरील उद्गारावर प्रकाश पाडणारी अशी एक गोष्ट आहे. एकदां केसरी ऑफिसांतील लायब्ररी लावण्याचें काम चाललें होतें. नाटकें, कादंबऱ्या या पुस्तकांचीं कपाटें तेथेंच होतीं. त्यांकडे पाहून दादासाहेब खापर्डे म्हणाले, ' हीं पुस्तकें कोणी वाचतो का ? ' हा प्रश्न ऐकून आडकित्त्यानें सुपारी फोडीत फोडीत टिळक म्हणाले, ' हे सर्व साळूमैनांच्या गोष्टींचे प्रचंड ग्रंथ आहेत ! बहुतेकांची या कपाटावरच झडप पडते. बाकीच्या पुस्तकांचा मात्र कसर व मूषक रसिकपणें परामर्ष घेतात. ' हें बोलणें चालू असतांना एक वाङ्मयसेवक आपली प्रसिद्ध कादंबरी घेऊन आला. त्यानें ती कादंबरी लोकमान्यांस नजर केली. तो कादंबरीकार निघून गेल्यावर लोकमान्य म्हणाले, ' असल्या ताईमाईच्या गोष्टी लिहिण्यांत काय पौरुष आहे न कळे ! असल्या विद्वानांची बौद्धिक क्षुधा इतकी मंद व्हावी याचें आश्चर्य वाटतें. लहानपणापासून निदान मला तरी असें वाटे कीं, आपण असें लिहावें कीं, ज्याचा या परम गूढ विश्वाच्या अतर्क्य व अपूर्व बांधणीचा बोध होण्यास उपयोग होऊन त्याचा जीवकोटीच्या उन्नतीस अधिक उपयोग होईल ! '

## ( ५६ ) सुरतेच्या समरांगणांत—

कलकत्त्याला कॉंग्रेसनें जे ठराव केले, त्यांत सुरतेच्या भांडणाचें मूळ होतें. नेमस्तपक्षाचे फिरोजशहा मेथा टिळकांना म्हणाले, ' कलकत्त्याला कॉंग्रेस झाली म्हणून तुम्हांला बहिष्काराचे ठराव

20834 क्रमांक ... ९३१ ... ता: दि: 15/8

पास करून घेतां आले. मुंबईस आला असतात म्हणजे तुमच्या हातून काय होतें तें पाहिलें असतें.' टिळक ताडकन् उद्गारले, 'तुमच्या मुंबईत येऊनहि आम्ही हे ठराव पास करून घेतले असते.' पण मेथाजींच्या मनांत कॉंग्रेस राष्ट्रीय पक्षाच्या हातीं जाऊं द्यावयाची नव्हती. याच वर्षांत ९–५–१९०७ रोजीं लाला लजपतराय यांना सरकारनें मंडाले येथील तुरुंगांत नेऊन ठेवलें. लोकांतील अस्वस्थता वाढत चालली. अशा वेळीं कॉंग्रेस सुरतेला भरवावी असें फिरोजशहा मेथा यांनीं सुचविलें. ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीनें तसा ठराव पास केला. लाला लजपतराय यांनाच अध्यक्ष करावें असें टिळक सुचवीत होते. यावेळीं भारतांतील वाता-वरण तापत चाललें होतें. गुप्त संघटना स्थापन करून, जुल्म करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांवर बाम्ब उडविणारे पंथ निर्माण झाले होते. बंगालमधील खुदीराम बोस यांनीं मॅजिस्ट्रेटवर बॉंब टाकण्याचा प्रयत्न केला. गोरे लोक कसा अन्याय करतात आणि राज्यकर्ते त्यांना कसें रक्षण देतात, याचें एक हृदयस्पर्शी उदाहरण १९०७ सालीं घडून आलें. वीरनवाली नांवाची १८ वर्षांची एक तरुणी आगगाडींतून प्रवास करीत होती. ती रावळपिंडीकडे निघाली होती. गाडी मध्यरात्रीं स्टेशनवर आली. ती तरुणी वेटिंगरूममध्यें बसली. मूर नांवाच्या गोऱ्या स्टेशन-मास्तरची विषयांध दृष्टि तिच्याकडे गेली. त्यानें तिच्यावर बलात्कार केला. नंतर मूरच्या मुसलमान नोकरानेंहि तिच्यावर बलात्कार केला. कोर्टांत खटला सुरू झाला. ज्यूरीनें स्टेशन मास्तर मूर निर्दोषी आहे असें मत दिलें. या भरतखंडांत आपल्याला वाली म्हणजे रक्षणकर्ता कोणीहि मिळत नाहीं असें पाहून वीरनवालीनें आत्महत्त्या केली. टिळकांनीं केसरींत लिहिलें

कीं, "हा न्यायदेवतेचा खून आहे. वीरनवाली आपल्या खटल्याचें अपील परमेश्वराच्या न्यायासनापुढें सादर करण्यास गेली आहे! शेंकडो राजद्रोही भाषणांनीं होणार नाहीं इतका संताप व त्वेष, असला एक खटला हिंदी लोकांच्या अंत:करणांत उत्पन्न करीत असतो हें गोऱ्या लोकांनीं लक्षांत ठेवावें. वीरन-वालीच्या आत्मयज्ञांत गलितधैर्य पुरुषांना साहसी व निश्चयी करण्याचें किती सामर्थ्य आहे हें हिंदुस्थान सरकारनें नीट समजून घ्यावें. अशा प्रसंगानें खवळलेलीं मनें शांत होणें शक्य नाहीं."

राष्ट्र अशा मन:स्थितींत असतांना सुरतेची राष्ट्रसभा सुरू झाली. नेमस्तांचे पुढारी कलकत्ता कॉंग्रेसचे ठराव बदलून घेण्याच्या विचारांत होते. याच सुमारास लाला लजपतराय यांची सुटका झाली. त्यांना अध्यक्ष निवडावें असें टिळकांनीं सुचविलें. तसें झाल्यास सरकार रागावेल, या भीतीनें उदारमतवादी पक्षानें डॉ. रासबिहारी घोष यांची अध्यक्षस्थानीं योजना केली. अध्यक्षा-संबंधाचा वाद निर्माण झाला, याचें मूळ कारण व्यक्तीच्या भांडणांत नसून तत्त्वांच्या संघर्षांत होतें. याप्रमाणें विरोधी तत्त्वांच्या अभिमान्यांनीं सुरतेस तळ दिला. परस्परांमध्यें समेट घडवून आणण्याचे प्रयत्न झाले; पण ते सिद्धीस गेले नाहींत. शेवटीं कलुषित वातावरणांत सभेस सुरुवात झाली. स्वागताध्यक्षांच्या भाषणानंतर डॉ. घोष यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना पुढें आली. या सूचनेस दुजोरा देण्याकरितां सुरेन्द्रनाथ बानर्जी उभे राहिले, पण त्यांना कोणी बोलूं दिलें नाहीं. सर्वत्र गोंधळ निर्माण झाला आणि स्वागताध्यक्षांनीं बैठक तहकूब केली.

समेट झाला नाहीं तर अध्यक्षाच्या सूचनेला दुरुस्ती सुचवावी

असें राष्ट्रीयपक्षानें ठरविलें. ती दुरुस्ती सुचविण्याचें महत्कार्य टिळकांनीं स्वतःच करावयाचें ठरविलें. २७ डिसेंबर १९०७ रोजीं तहकूब झालेलें कॉंग्रेसचें अधिवेशन सुरू झालें. नेमस्तांनीं राष्ट्रीय पक्षाची मस्ती नाहींशी करण्याकरितां कांहीं गुंडांना कॉंग्रेसच्या मंडपांत प्रवेश दिला. सभेला सुरुवात झाली. लो. टिळक व्यासपीठाच्या समोर बसले होते. त्यांच्या भरीव आणि पिंगट रंगाच्या डोळ्यांत लोकोत्तर तेज दिसत होतें. त्या रोखलेल्या नजरेंत आक्रमणशीलता दिसत होती. त्यांच्या संयमी वृत्तीमध्यें भवितव्यतेविषयींचा बेफिकीरपणा दिसत होता. त्यांच्या स्वभावांत करूं कां न करूं अशी चलबिचल नव्हती. त्याग किंवा दुःख या बाबतींत ते बेभान झाले होते. रणांगण म्हणजे आनंदभुवन अशा वृत्तीनें लो. टिळक आपल्या आसनावर बसले होते. विक्रमार्जित सत्त्वामुळें त्यांना स्वयमेव मृगेंद्रता प्राप्त झाली होती. त्यांच्या हातांत काठी होती. वंदेमातरम् या राष्ट्रगीताचे निनाद आसमंतांत घुमत होते. पत्रपंडित नेव्हिनसन् म्हणतात कीं. ''त्या जयजयकारापलीकडे मृत्यूचा खोलगंभीर आवाजहि ऐकूं येत होता. कारण डाक्याचे कलेक्टर मि. ॲलन हे एका क्रांतिकारकाच्या गोळीनें आसन्नमरण होऊन पडले होते. यामुळें हिंदी नेमस्तांच्या मनाला धक्का बसला. सगळें वातावरण शंका, कुशंका, अविश्वास, भीति, असूया यांनीं भरून गेलें होतें; पण भारताची भवितव्यता लोकमान्य टिळकांच्या उग्रगंभीर मुद्रेकडे पाहात होती.''

मंडपांत १० हजार लोक होते. १६०० प्रतिनिधींपैकीं ५०० जहालपक्षाचे होते. नियोजित अध्यक्ष आणि त्यांची प्रभावळ आंत आली. सभेच्या कामास सुरुवात झाली.

सुरेंद्रबाबूंनीं भाषण सुरू केलें, त्यांचें भाषण दुर्दैवाच्या भोवऱ्यांत सांपडलेल्या एखाद्या महानुभाव धूर्त गृहस्थाप्रमाणें झालें. त्यावेळीं कोणीहि टाळ्या वाजविल्या नाहींत. राखेच्या ढिगाऱ्यावर चालल्याप्रमाणें जो तो आपल्याकडून अगदीं जपून होता. यानंतर अध्यक्षांच्या सूचनेला अनुमोदन मिळून ती सूचना सभेपुढें मंजुरीला ठेवण्याची वेळ आली, म्हणून आगाऊ कळवून ठेवलेली उपसूचना सभेपुढें मांडण्याकरितां लो. टिळक व्यासपीठावर चढूं लागले. भरतखंडाचें पंजरस्थ चैतन्य स्वतंत्र होण्याकरितां वर चढूं लागलें. कांहीं स्वयंसेवकांनीं त्यांना अडविलें. हाताच्या एका झटक्यानें त्यांना झिडकारून लो. टिळक पुढें गेले. झंझावात सुटल्यावर जलदजाल वितळून गेलें. नेव्हिनसन वर्णन करतात कीं, "आभाळांत काळे ढग येऊन वीज कडाडावी आणि वादळ व्हावें, त्याप्रमाणें लो. टिळक अध्यक्षांच्या खुर्चीपुढें उभे राहिले. ते बोलूं लागले. त्यांचा करारी आवाज ऐकून असें वाटलें कीं, हा वीरपुरुष भवितव्यतेलाहि तुच्छ मानीत आहे." मालवीय म्हणाले, "तुम्हांला तहकुबीची सूचना आणतां येत नाहीं." टिळक म्हणाले, "तुम्ही कोण ? तुम्ही कांहीं अध्यक्ष नाहीं." यावरून अध्यक्ष डॉ. घोष उद्गारले, "मीहि तुम्हांला तेंच सांगतों." त्यावर टिळकांनीं प्रत्युत्तर दिलें कीं, "तुमची निवडणूक मुळीं झालेली नाहीं. मी प्रतिनिधींना उद्देशून बोलत आहे." यापुढें दंगल सुरू झाली. आपल्या छातीवर दोन्ही हात आडवे ठेवून टिळक वज्रनिश्चयानें उभे होते. विरोधकांच्या मुठी वळलेल्या होत्या. कोणी किंकाळत होते. टिळक म्हणाले, "मी येथून हालणार नाहीं, हिंमत असेल तर मला येथून हालवा." सभेंत आणून ठेवलेल्या गुंडांनीं मारामारी सुरू केली. एकानें

छत्री फेकली. एका गुजराथी व्यक्तीनें टिळक उभे होते त्या बाजूला खुर्ची भिरकावली. बॅ. भगत यांनीं ती खुर्ची वरच्यावर झेलली. अस्वस्थ झालेले नेमस्त नामदार गोखले उभे राहिले आणि म्हणाले, " टिळकांच्या केंसाला धक्का लागला तर येथें रक्तपात झाल्याशिवाय रहाणार नाहीं. " ना. गोखले टिळकांचें रक्षण करण्याकरितां त्यांच्याजवळ जाऊन उभे राहिले; पण लो. टिळकांना कोणाच्या संरक्षणाची गरज किंवा पर्वा नव्हती. त्यांचे ते छातीवर दुमडलेले हात आणि बिनदिक्कत मुद्रा पाहून असें वाटलें कीं, हा वीरपुरुष अत्याचाराला व रक्तपाताला आव्हान करून म्हणतो कीं, " ये, तुला माझें काय डोकें मारायचें आहे तें मार पाहूं. कोणी काय वाटेल तें केलें किंवा वाटेल तें दिलें तरी मी पाऊलहि हलवणार नाहीं. "

पांढरा सफेत पोषाख केलेला समोरचा श्रोतृवृंद एखाद्या भरतीच्या समुद्राप्रमाणें गर्जत होता. इतक्यांत एक जोडा हवेंत उडाला आणि तो सुरेंद्रबाबूंच्या गालाला चाटून खालीं पडला. तो पाहातांच इशारा मिळाल्याप्रमाणें पांढऱ्या फेट्यांचे लोक लाटेप्रमाणें एकामागून एक सभापीठावर चढले. ते काठ्या परजीत होते, रागाचे फूत्कार टाकीत होते, दिसेल त्या नेमस्तावर काठ्या उगारीत होते. झालें, राष्ट्रीय सभा एका क्षणांत समाप्त झाली. एका नव्या मन्वंतराचा उदय झाला.

त्याच दिवशीं संध्याकाळीं राष्ट्रीय पक्षाची सभा झाली. योगी अरविंद घोष यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. अरविंद घोष सभेकडे न पाहातां दूर कोठेंतरी भविष्यकाळाच्या दारांतून कशाचें तरी संशोधन करीत होते. यावेळीं पत्रपंडित नेव्हिनसन् उपस्थित राहून टिपणें घेत होते. लो. टिळक बोलावयास उभे

राहिले. त्याचें निर्भय वर्तन पाहून हजारों श्रोत्यांना वाटलें कीं, भारताचें भविष्य या कर्तृत्वशाली नेत्याच्या हातांत आहे. त्या वेळीं टिळकांनीं जें भाषण केलें ते ग्लॅडस्टन किंवा बिस्मार्क यांना शोभण्यासारखें होतें. डॉ. मुंजे म्हणतात, "टिळकांनीं १॥ तासपर्यंत इंग्रजींत भाषण केलें. भाषेची शैली व आवेश यांत त्यादिवशीं कांहीं विशेष होता. परिस्थितीची मीमांसा मुद्देसूद, खोल व स्पष्ट होती. सर्व समाज एकतानतेनें तें गंभीर भाषण ऐकत होता. तें भाषण म्हणजे एक प्रकारची आकाशवाणीच होय, असें सर्वांस वाटूं लागलें. पत्रपंडित नेव्हिनसन् भाषण संपल्यावर उठून जातांना म्हणाले, "That is the man!" "पुरुषोत्तम म्हणतात तो हाच !"

याप्रमाणें काँग्रेस दुभंग झाली. ती पुन्हां जोडली जावी, असें राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें होतें. पण उदारमतवादी नेमस्तांनीं स्वता सुभा स्थापन करण्याचा प्रयत्न केला. टिळकपक्षानें असें सांगितलें कीं, आम्हीं डॉ. घोष यांना अध्यक्षपद देतों; पण स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ही चतुःसूत्री तुम्ही मान्य केली पाहिजे. नेमस्तानीं टिळकांचें म्हणणें मान्य केलें नाहीं. त्यांनीं कन्व्हेन्शन या नांवाची स्वतंत्र सभा स्थापन केली. नेमस्त पक्ष राष्ट्रीय सभेतून फुटून निघाला. तेव्हांपासून लखनौला १९१६ सालीं संयुक्त काँग्रेस भरेपर्यंत नेमस्तांचें फुटीर प्रवृत्ति दाखविणारें कन्व्हेन्शन भरत असें.

### ( ५७ ) मद्यपान-निषेध —

पुण्यांत जिल्हासभेची बैठक झाली त्या वेळीं मद्यपानाचा निषेध करणारें एक भाषण टिळकांनीं केलें. त्यांतूनच मद्यपान-निषेधाची चळवळ सुरू झाली. टिळक म्हणाले, "मद्यपान-

निषेध हें हिंदु लोकांचें एक विशेष नीतितत्त्व आहे आणि तें अमलांत आणण्याच्या कामीं सरकारकडून होणारा अडथळा आपण मोडून काढला पाहिजे. मद्यपानाची चीड ही तुरुंग-वासाच्या दुःखापेक्षां अधिक दुःसह वाटली पाहिजे. एक दारूचें दुकान मी बंद केलें तर मला स्वर्ग मिळेल असें हिंदी तरुणाला वाटून त्यानें या चळवळींत जरूर तर मरण्यालाहि तयार झालें पाहिजे." लोकहितवादी म्हणाले होते कीं, "इंग्रज गेले तरी त्यांचे पाय हिंदुस्थानाला एकदां लागले होते याची जबर साक्ष ही एकटी दारू देईल." हिंदुस्थानांतील हिंदु आणि मुसलमान या दोन्ही धर्मांनीं निंद्य ठरविलेली ही सुरापानाची चटक इंग्रजी राज्य होतांच बेसुमार फैलावली.

मद्यपान–निषेधाची किंवा पिकेटिंगची चळवळ टिळकांच्या प्रेरणेनें पुण्यांत सुरू झाली. नंतर ती महाराष्ट्रांत फैलावली. सरकारनें ही चळवळ मोडून टाकण्याकरितां निरोधन करणाऱ्या स्वयंसेवकांवर खटले भरले. पुणें जिल्ह्याचे त्या वेळचे अबकारी कमिशनर वरिष्ठ अधिकाऱ्यास केलेल्या आपल्या खाजगी रिपोर्टांत म्हणतात कीं, "Mr. Tilak ruled over Poona for the two weeks." गेले दोन आठवडे श्रीयुत टिळकांचें पुण्यावर राज्य चाललें होतें.

मद्यपान-निषेधाची चळवळ शांतपणानें करण्यांत आली. या चळवळीमध्यें सर्व पक्ष आणि सर्व जाती सामील झाल्या होत्या. उदाहरणार्थ, दारूबंदीच्या ठरावावर भाषण करतांना रेव्हरंड मॅकनिकल म्हणाले, "मी इतर कामांत सरकारपक्षाचा मनुष्य आहें; पण या चळवळीला विरोध करण्यानें सरकारची बेअब्रू होते असें सांगण्याकरितांच मी सभेला आलों आहें."

सर्व पक्ष या चळवळीबद्दल सहमत असले तरी सरकारला असें वाटत होतें कीं, "दारूबंदीचा उपदेश हें बाहेरचें सोंग आहे. स्वयंसेवकांना शिस्त शिकवण्याची ही शाळा आहे. नवी संघशक्ति निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. तात्पर्य, ही लोकहिताची परोपकारी चळवळ नसून प्रच्छन्न राजकारणाची चळवळ आहे. ही पिंपळाची मुळी असून उद्यां तिचा वृक्ष वाढला म्हणजे सरकारचा चिरेबंदी वाडा खिळखिळा होऊन जाईल."

## ( ५८ ) दरवडेखोर टिळकांना भेटेल—

वंगभंगामुळें वणवा पेटला, बाँबचा प्रादुर्भाव जोरानें दिसूं लागला. केसरीनें लिहिलें कीं, "काळ येत चालला, सावध रहा. स्वातंत्र्याकरितां एकदां तंटा सुरू झाला म्हणजे मग यशप्राप्ति झाल्याखेरीज तो विझत नसतो." सुशिक्षितांप्रमाणें अशिक्षितांमध्येहि, दरवडेखोरांमध्येंहि सशस्त्र क्रांतीच्या कल्पना असतात. एका आठवणींत **न. चिं. केळकर** सांगतात कीं, "प्रांतिक परिषद संपल्यावर आम्ही मोटारींतून संगमनेरकडे जात होतों. सूर्यास्त झाला. टिळक मोटारींतून उतरून पायीं चालूं लागले. आम्ही घाटांतून चाललों होतों. इतक्यांत दोन बेरड वर चढून आले. ते मला म्हणाले, 'कांहो दादा ! टिळक महाराज म्हणतात ते यांतच आहेत का ?' मी टिळकांकडे बोट दाखवलें. ते पुढें गेले व त्यांनीं टिळकांचे पाय धरले. ते म्हणाले, 'आम्ही मोठ्या भाग्याचे ! आम्ही तुमच्याच भेटीला संगमनेरला चाललों होतों.' याप्रमाणें बोलतचालत मंडळी चाललीं असतांना अंधार पडला म्हणून टिळक मोटारींत बसूं लागले. तेव्हां एकजण जिवाचा धडा करून, प्रथम गुळमळत पण नंतर स्पष्ट

शब्दांनीं टिळकांना म्हणाला, 'महाराज! आपली सेवा आमच्या हातून कसली होणार म्हणा, पण आम्हींहि इमानी बेरड आहोंत. आपण एखादें मोठें काम हातीं घेतलें तर आमची आठवण ठेवा. आम्हीहि पण आम्हांला होईल ती कामगिरी करून तुम्हांला दाखवूं.' असें बोलून, टिळकांना पुन्हां नमस्कार करून ते निघून गेले टिळकांनीं सुस्कारा टाकला. ते म्हणाले, 'गरीब बिचारे! त्यांच्या मनांतले मोठें काम काय तें मी समजलों. आज कोणी पुढारी या राज्याविरुद्ध बंड करावयास निघाला तर त्याला विश्वासू अनुयायी मिळणार नाहींतच असें नाहीं. या बिचाऱ्यांची आठवण मला जन्मभर राहील; पण यांना सांगण्यासारखें काम आजच मजजवळ नाहीं, याचें मात्र वाईट वाटतें."

## (५९) क्रांतिकारकांचा संप्रदाय—

३० एप्रिल १९०० रोजीं कलकत्त्यांत बॉंबचा स्फोट झाला. मुझफरपूरचे जि. जज्ज यांच्यावर हल्ला करण्याचा खुदीराम बोस या तरुणाचा विचार होता, पण तो बॉंब चुकून एका इंग्रज बाईला लागला. माणिकतोळा बागेंत एक गुप्त संघटना स्थापन झाली होती. तिचा पुढारी बीरेन्द्रकुमार घोष याला पकडण्यांत आलें. खुदीराम आपण होऊन पोलिसाच्या स्वाधीन झाला. नरेन्द्रनाथ गोस्वामी, सत्येन्द्रनाथ बोस, अशोक, नंदी, उल्हासकर दत्त, अरविंद घोष इत्यादि क्रांतिकारक राष्ट्रभक्त या कटांत सांपडले. त्यांना फांशी किंवा जन्मठेप अशा शिक्षा झाल्या. खटला चालू असतांना आरोपी बेफिकीर दिसत होते. खुदीराम बोस आपल्या कोठडींत गाणीं गात होता. उल्हासकर दत्ताचा पोषाख संन्याशासारखा होता. तो नांवाप्रमाणेंच उल्हसित होता. पहिल्या

दिवशीं खटला संपण्यापूर्वीं अरविंदबाबू पिंजऱ्यांत डुकल्या घेत होते.

या अत्याचारांची चिकित्सा करतांना टिळक म्हणाले कीं, "बंगाल्यांतील तरुण पिढीचा गुप्त कट स्वार्थाकरितां नसून अनियंत्रित आणि बलाढ्य अशा गोऱ्या अधिकारीवर्गाच्या सत्तेनें उत्पन्न झालेल्या संतापामुळें उत्पन्न झालेला आहे, हें क्रांति-कारकांनीं दिलेल्या जबान्यांवरून स्पष्ट होतें." या अत्याचारास किंवा पापास समंजस मनुष्य संमति देणार नाहीं. बॉबगोळा हें स्वराज्याचे हक्क संपादन करण्याचें साधन आहे असें रशियांत किंवा आयर्लंडांत ठरलें नाहीं; पण प्रजासंक्षोभाचा पारा वर किती चढला आहे हें बॉबवरून मापण्यास हरकत नाहीं."

लंडनमध्यें मदनलाल धिंग्रा या हिंदु विद्यार्थ्यानें कर्झन वायली याचा खून केला, आणि हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांच्या चळवळींचें लोण लंडनपर्यंत पोंचविलें. धिंग्रानें हौतात्म्य गाजविण्यापूर्वीं बॅ. सावरकर यांची अनुज्ञा घेतली होती. लंडन-मधील खुनानंतर २१-१२-१९०९ रोजीं नाशिक येथें कान्हेरे या तरुणानें जॅक्सनचा खून केला. जॅक्सन्-खुनाच्या खटल्यांतूनच 'नाशिक कटाच्या' खटल्याची उत्पत्ति झाली. त्यांत बॅ. विनायकराव सावरकर यांना आरोपी म्हणून विलायतेंतून पकडून आणलें. सावरकरांना दोन जन्मठेपींची शिक्षा झाली. क्रांतिकारकां-च्या गुप्तपंथाचा मार्ग पाहात पाहात आपल्याला नेताजी सुभाषचंद्र यांच्यापर्यंत जावें लागेल. नेताजींनीं भारताबाहेर सैन्य उभें केलें आणि इंग्रजांशीं लढा दिला. क्रांतिकारकांच्या चळवळीचें हिंदु-स्थानाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत खरें स्थान काय आहे हें ठरविणें भावि इतिहासकाराचें काम आहे.

## ( ६० ) देशाचें दुर्दैव—

१९०८ साल उजाडलें. लो. टिळकांना बावन्नावें वर्ष लागलें. त्यांच्या शरिराचा मधुमेहाशीं झगडा चालला होता. त्यांचें मन इंग्रजांच्या जुलमाविरुद्ध झगडत होतें. सहनशक्तीला परमावधीच ताण पडल्यामुळें वयाच्या मानानें ते अधिक वृद्ध दिसूं लागले. त्यांच्या उग्र मुद्रेवर वार्धक्याच्या रेषा राज्य करूं लागल्या. कांहीं केंस पांढरे दिसूं लागले. टिळक इच्छाशक्तीवर जगत होते. श्री. त्र्यं. र. देवगिरीकर म्हणतात कीं, "लोकमान्यांचें सरें जीवन संघर्षांत गेलें. आगरकर व टिळक, गोखले व टिळक, कोल्हापूरचे राजे व टिळक, ताईमहाराज व टिळक, चिरोल व टिळक आणि शेवटीं गांधी व टिळक, असे झगडे त्यांच्या आयुष्यांत झाले. वादांच्या दृष्टीनें विचार केला तर, सामाजिक कां राजकीय, पुनर्विवाह का निषेध, नेमस्त राष्ट्रीयवाद, पंचांगवाद, संन्यास व कर्मयोगवाद, असहकारिता कां प्रतियोगी असहकारिता, असे अनेक वाद ते लढले."

१८९७ सालीं चाफेकरांनीं प्लेग चालू असतांना सोजिरांनीं केलेला जुलुम असह्य झाल्यामुळें रॅन्डचा खून केला. वंगभंग झाल्यानंतर बंगालमध्यें १९०८ सालीं बॉंबगोळे उडूं लागले. खुदीराम बोस या तरुणानें पहिला बॉंब उडविला. या प्रकरणाची मीमांसा करतांना केसरीनें लिहिलें कीं, 'दडपशाही हीच राजकीय खुनांची जननी आहे. या जुलुमामुळेंच तेजस्वी तरुण, क्रांतिकारक-मार्गाला लागतात. हें देशाचें दुर्दैव होय. 'देशाचें दुर्दैव' हें शीर्षक असलेल्या अग्रलेखाबद्दल टिळकांवर खटला करण्याचें सरकारनें ठरविलें. लोकांची समजूत अशी होती कीं, कोल्हापूरचे छत्रपति यांचें अंग हा खटला भरण्यांत आहे. कित्येकांच्या मतें

नेमस्तांनीं सरकारला चिथावलें. कांहींच्या मतें निर्णायक कारण विलायतेंत होतें. मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनीं टिळकांवर खटला भरण्याची परवानगी मागितली आणि स्टेट सेक्रेटरी लॉर्ड मोर्ले यांनीं ती दिली. मोर्ले हे मोठे तत्त्वज्ञानी होते; पण तत्त्वज्ञानी हा सत्तेच्या आसनावर बसला, कीं व्यवहारवादी मुत्सद्दी बनतो. मोर्ले-मिंटो सुधारणा देतांना याच मोर्ले साहेबांनीं मुसलमानांना निराळा मतदारसंघ देऊन पाकिस्तानच्या विषवृक्षाचें बीज पेरलें. स्वराज्य मागणें म्हणजे रामाचा चंद्राकरितां हट्ट होय, असें या अहंकारी अधिकाऱ्यांना वाटत होतें.

खटला झाल्यास आपली बाजू स्वतःच कोर्टांत मांडावयाची असें टिळकांनीं ठरविलें. टिळकांनीं वकिली केली असती तर हजारों रुपये मिळविले असते. कोर्टांत केस चालू असतांना टिळकांची विनोदी वृत्तीहि जागृत असे. श्री. ल. ज. आपटे वकील लिहितात कीं, "लोकमान्यांची केस हायकोर्टांत चालू असतां त्यांचे बॅरिस्टर यांस येण्यास जरा उशीर झाला. तेव्हां तेथील एक तरुण बॅरिस्टर आपल्या एका बॅरिस्टर मित्रास बरोबर घेऊन लोकमान्यांकडे गेले आणि म्हणाले, 'आपले बॅरिस्टर येण्यास उशीर झाला असला तर आम्ही मदत करण्यास तयार आहोंत.' त्यांचें बोलणें ऐकल्यानंतर लोकमान्य हास्यमुद्रेनें म्हणाले, 'सतरा वर्षांचे उपवर वधूस, बावीस वर्षांचे वराऐवजीं अकरा अकरा वर्षांचे दोन वर चालतील काय?' हें बोलणें ऐकून तेथें मोठा हंशा पिकला आणि बॅरिस्टरद्वय तेथून मुकाट्यानें दूर गेले."

अनेक संकटग्रस्त टिळकांकडे वकिली सल्ला विचारण्याकरितां येत आणि मोफत सल्ला घेऊन जात. विजापूर जिल्ह्यांतील

एका वतनदार गृहस्थाचें उत्पन्न सरकारनें केवळ आकसानें जप्त केलें. त्यानें वकिलाकडून कलेक्टरकडे अर्ज केले, कमिशनर आणि गव्हर्नर याकडे अपिलें पाठविलीं. कौन्सिलमध्येंहि प्रश्न विचारला; पण कोठेंहि दाद लागेना, वैतागून प्राणत्याग करण्या-पर्यंत त्याची मजल पोंचली. अखेर त्या वतनदारास वाटलें कीं, लोकमान्यांकडे जावें व त्यांचा सल्ला घ्यावा. तो पुण्यास आला. त्यानें आपलें कागदपत्र दाखविले. तो म्हणाला, "महाराज ! केवळ माझ्या हयातीपर्यंतच माझें उत्पन्न सरकारनें जप्त केलें आहे. माझ्या पाठीमागें तें उत्पन्न सुरू होईल. मी जगणें याचा अर्थ पोरा-बाळांनीं उपाशी मरणें हा होय. आतां आत्महत्त्येखेरीज दुसरा उपाय नाहीं." त्याचें बोलणें शांतपणें ऐकून घेऊन लोकमान्य म्हणाले, "हिंदुधर्मशास्त्र व हिंदु-लॉ असें प्रतिपादन करतात कीं, संन्यास घेतल्यावर त्या संन्यस्ताचें पूर्वाश्रमांतील स्थावर, जंगम वगैरे सर्व ऐहिक वस्तुजातावरील स्वामित्व नष्ट होतें. तेव्हां तुम्ही आतां संन्यास घ्या. म्हणजे कायदेशीर रीतीनें तुम्ही आपल्या इस्टेटीस मृत झाल्यासारखेच होणार आहांत. तुम्ही जिवंत असूनहि तुम्हांस मृत मानून, सरकारी कायदा तुमच्या वारसास उत्पन्न देण्यास तयार होईल. वाटल्यास त्रिदंडी संन्यास घेतलात तरी हरकत नाहीं." हा सल्ला ऐकून तो गृहस्थ गहिंवरून गेला. टिळकांचा आशीर्वाद घेऊन तो आपल्या गांवीं गेला. त्यानें संन्यास घेतला. कलेक्टरनें सरकारजमा केलेलें त्याचें उत्पन्न परत दिलें. कलेक्टरसाहेब म्हणाले, "ही युक्ति पुण्याच्या त्या चित्पावन टिळक ब्राह्मणानें त्या वतनदारास सांगितली असली पाहिजे."

'काळ' पत्राचे संपादक प्रो. परांजपे यांस ११–६–

१९०८ रोजीं सरकारनें अटक केली. ते मुंबईंत होते; त्यांना मदत करण्यासाठीं लो. टिळक मुंबईला निघाले. आठवणीकार स. वि. बापट लिहितात कीं, " टिळक स्टेशनवर पोंचले. लोकमान्यांचे एक भक्त बापूसाहेब गांधी त्याचेबरोबर होते. एक सी. आय. डी. ऑफीसर बापूसाहेबांच्या ओळखीचे होते. ते बापूसाहेबांना हळूंच म्हणाले, ' टिळकांवर शस्त्र उगारण्याचा सरकारचा विचार कायम झाला आहे. बहुतेक मुंबईची त्यांची ही खेप शेवटचीच होईल. तरी हें टिळकांना कळवा ' हें ऐकून बापूसाहेब घाबरत घाबरत टिळकांच्या डब्याजवळ गेले आणि म्हणाले, " आपण आज न जातां उद्यांचे गाडीनें जावें, म्हणजे घरीं जाऊन सर्व व्यवस्था करण्यास ठीक पडेल. " टिळक म्हणाले, " घरीं जाऊन काय फौजफाटा तयार करायचा आहे, का सैन्य जमवायचें आहे, कां हत्ती-घोडे श्रृंगारायचे आहेत ? अगर किल्ल्यावर हल्ला होणार म्हणून तेथें चर खणायचे आहेत ? जेथें सबंध देश सरकारनें एक अफाट तुरुंग करून ठेवला आहे तेथें मोठ्या दालनांतून ते मला एका लहान दालनांत कोंबणार, येवढेंच कीं नाहीं ? यांत तयारी करण्यासारखें कांहींच नाहीं. "

टिळक मुंबईला पोंचले. त्यांना पकडण्याच्या वॉरंटवर मॅजिस्ट्रेटची सही झाली. अर्ध्या तासांत सरकारी नोकरींतील कोणी एक चित्रगुप्त, एक टिळकभक्त, सरदारगृहांत आला आणि त्यानें पकडवॉरंट निघालें, अशी बातमी सांगितली. टिळक उद्गारले, " ज्या राष्ट्राला प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नाहीं, त्या दुर्बल राष्ट्राच्या पुढाऱ्यास असली बातमी अगोदर कळून तरी काय उपयोग ? " पुढें टिळकांनीं स्वस्थपणें झोंप घेतली. जागे झाल्यावर

ते कांहीं बोलत आहेत इतक्यांत इन्स्पेक्टर पेटिगार वॉरंट घेऊन त्यांचे खोलींत शिरले. त्यांस पाहातांच, हंसत लोकमान्य म्हणाले, "पकड-वॉरंटावर मॅजिस्ट्रेटची सही होऊन चार तास होऊन गेले, तरी तुम्हांला वॉरंट बजावण्याला चार तास लागतात! लवकर आलां असतां तर आज जामिनकीचा अर्ज गुदरण्यास तरी सांपडलें असतें!"

कांहीं पोलीस अधिकारी मुंबईहून पुण्याला केसरी ऑफिसची झडती घेण्याकरितां निघाले, त्या वेळीं कोणी अज्ञात, अपरिचित अशा हितचिंतकानें केसरी ऑफिसला अशी तार केली कीं, "टोळधाड येत आहे. सावध राहा." वाड्याच्या झडतीला सकाळीं प्रारंभ झाला. सुमारें अडीच तास तपासणी झाल्यावर टिळकांच्या टेबलाच्या उघड्या खणांत एक कार्ड सांपडलें. त्या कार्डावर स्फोटक द्रव्याची माहिती असलेल्या दोन पुस्तकांचीं नांवें लिहिलेलीं होतीं. तें कार्ड हातांत पडतांच इन्स्पेक्टर आनंदानें नाचूं लागला. हा लेख हस्तगत झाल्यावर मुख्य शिकार साधली असें समजून पोलिसांनीं झडतीचें काम आवरतें घेतलें आणि पंचनामा करून ते निघून गेले.

पूर्वींच्या खटल्यांत टिळकांची केस चालविणारे बॅ. दावर आतां न्यायमूर्ति झाले होते. त्यांच्यापुढें टिळकांना जामिनावर सोडण्याचा अर्ज ठेवला. न्या. दावर यांनीं तो अर्ज नामंजूर केला. टिळकांवर दोन लेखांकरितां दोन खटले भरण्यांत आले. टिळकांना स्पेशल ज्यूरी नको होती; पण ती त्यांच्यावर लादण्यांत आली. सरकारतर्फे ब्रॅनसन हे काम चालवीत होते. डिफेन्सतर्फे टिळक हेच काम चालवीत होते. ज्यूरीमध्यें ६

युरोपियन, १ ज्यू आणि २ पारशी असे ९ सभ्य गृहस्थ होते. त्यामध्यें कोणालाहि मराठीचें ज्ञान नव्हतें.

हा खटला आठ दिवस चालला. टिळकांनीं एकंदर २१ तास भाषण केलें. टिळकांनीं आपल्या भाषणाची तयारी परिश्रमानें केली होती. आठवणींच्या तिसऱ्या भागांत असें सांगितलें आहे कीं, " डिफेन्स सुरू होण्याचे आदले रात्रीं लोकमान्य आपल्या भाषणाची तयारी करीत होते. खोलीमध्यें एका टेबलावर भाराभर पुस्तकें होतीं व जवळच कांहीं कागदांच्या चिठ्या होत्या. खोलीच्या बाहेर युरोपियन् सार्जंटचा पाहारा होता. रात्रीं ९ वाजतां टिळकांनीं भाषणाच्या तयारीस सुरुवात केली. ते मंद पावलानें विचार करीत करीत इकडून तिकडे खेपा घालूं लागले. ढिगांतून एक पुस्तक उचलून, त्याचें एक पान काढून त्या ठिकाणीं कागदाची एक चिठ्ठी खूण म्हणून ठेवली. ते पुस्तक मिटीत व दुसऱ्या टेबलावर ठेवून देत. ते पुन्हां विचार करीत, खेपा घालीत, पुस्तक उचलीत, आणि खूण घालून ठेवीत. याप्रमाणें भाषणाची तयारी करतां करतां दीड वाजला. सार्जंटला झोंप येऊं लागली. तो टिळकांना म्हणाला, " पुष्कळ उशीर झाला आहे. आपल्याला कांहीं विश्रांति पाहिजे असें तुम्हांला वाटत नाहीं कां!" टिळक म्हणाले, " तुम्हांला झोंप येत आहे. तुम्ही खुशाल झोंपीं जा. मी कांहीं पळून जाणार नाहीं. " सार्जंट झोंपीं गेला. दोन वाजले, तीन वाजले. तोच कार्यक्रम. पांच वाजतां त्या ढिगांतील शेवटचें पुस्तक खूण घालून टिळकांनीं खालीं ठेवलें. नंतर झोंपीं गेलेल्या सार्जंटला हांक मारून टिळक म्हणाले, ' माझें वाचन संपलें आहे. आतां मी थोडी विश्रांति घेतों. तुम्हांला जरूर ती विश्रांति मिळाली ना ?'

सार्जंट डोळे चोळीत व आपला युनिफॉर्म सावरीत म्हणाला, ' महाराज, मी आपले आभार मागतों. ' सार्जंट उठून पाहारा करूं लागला आणि सव्वापांच वाजतां टिळक झोपीं जाऊन घोरूं लागले."

एक आठवडाभर केलेल्या आपल्या भाषणांत टिळकांनीं राजकीय चळवळीचा आढावा घेतला. पुढें टिळक म्हणाले, " लोकांत असंतोष आहे तो अमुक कारणामुळें असें सांगणें हें असंतोषाचें विवेचन होय; असें म्हणण्यांत सरकारचा द्वेष घडत नाहीं. असले लोकसत्ताविषयक वाद विलायतेंत चालतात. अशा वादांतील मत सरकारला चुकीचें वाटलें म्हणून तें व्यक्त करणाराला कोणीहि तुरुंगांत पाठवीत नाहीं. असे इषारे गोखले, रास बिहारी, सर फेरोजशहा मेथा वगैरे अनेकांनीं दिले आहेत. यांचा संशय सरकारला येत नाहीं. मग माझाच कां यावा ? आम्ही लिहितोंबोलतों, हें विषादकारक असेल, तें कानाला झोंबेल, मनाला कटू लागेल म्हणून तें कांहीं राजद्रोही या सदराखालीं कोणी ओढणार नाहीं. अत्याचाराच्या वृक्षाला मी विषवृक्ष म्हटलें आहे. या उपमेचा हेतु हाच कीं, विषानें जसें कोणाचेंच कल्याण होत नाहीं, म्हणजे मरणाराचें तर नाहींच, पण विष घालणाराचेंहि नाहीं, तीच गोष्ट अत्याचाराची आहे."

ता. २२ जुलई १९०८ रोजीं आपलें भाषण संपवितांना टिळक म्हणाले, ' ज्यूरींतील सभ्य गृहस्थहो ! इतके दिवस माझें भाषण तुम्ही शांतपणें ऐकून घेतलें, याबद्दल मी तुमचा आभारी आहे. उदार विचारांची सवलत मी मागतों ती स्वतः माझ्याकरितां नव्हे, तर माझ्या देशाकरितां. हा देश सध्यां आणीबाणीच्या प्रसंगांत सांपडला आहे. आणि भावी पिढया या दृष्टीनेंच तुमच्या आजच्या

निकालाकडे पाहातील. व्यक्तिशः माझें वय लक्षांत घेतलें तर मी आणखी किती दिवस जगणार ? माझे विचार बरोबर आहेत असें म्हणणारा निदान एक गृहस्थ या ज्यूरींत मला मिळाला तरी मला समाधान वाटेल. मी बोललों तें स्पष्ट बोललों. माझी भाषा ढोबळ व सडेतोड होती; सराईत वकिलाच्या भाषेप्रमाणें सफाईदार नव्हती. माझ्या भाषेला महत्त्व न देतां मुद्दे लक्षांत घेऊन योग्य तो निकाल द्याल अशी मला आशा आहे. एखादी गोष्ट मनाला पटली तरी ती बोलून दाखविण्याला एक प्रकारचें धैर्य लागतें. आणि हें धैर्य ईश्वरानें तुम्हांला द्यावें अशी माझी प्रार्थना आहे.'

यानंतर ॲडव्होकेट जनरल व न्या. दावर यांचीं भाषणें झालीं. न्या. दावर यांचें भाषण आठ वाजतां संपलें. नंतर ज्यूरींतील सदस्य एकत्र विचार करण्याकरितां आपल्या खोलींत गेले. ९ वाजून २० मिनिटांनीं ते बाहेर आले. न्या. दावर यांनीं विचारलें, 'तुमचें मत काय झालें ?' फोरमन म्हणाले कीं, 'आमच्यापैकीं सातांचें मत असें आहे कीं, टिळक गुन्हेगार आहेत, आणि दोघांचें मत असें आहे कीं ते निर्दोषी आहे.'

या वेळीं दिवे अंधुक दिसत होते. न्यायालयांत अन्यायाचा अंधार पसरला होता. टिळक पिंजऱ्यांत उभे होते. त्यांच्या उग्रगंभीर मुद्रेवर भारतीय संस्कृतीचें तेज प्रतिबिंबित झालें होतें. न्यायालयाच्या बाहेर हजारों मजूर टिळकांची मार्गप्रतीक्षा करीत होते. अनेक भाबडे अनुयायी नयनांचीं नीरांजनें पाजळून हृदयाच्या गाभाऱ्यांत टिळकांच्या सांवळ्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करीत होते. लाठी घेतलेले पोलीस जमावाला पांगविण्याकरितां उभे राहिले.

या वेळीं शिक्षा सांगण्यापूर्वी न्या. दावर टिळकांना म्हणाले,

" तुम्हांला जर कांहीं सांगावयाचें असेल तर सांगा. " लो. टिळक उद्गारले, " ज्यूरीनें कसाहि निकाल दिला तरी माझी मनोदेवता मला सांगत आहे कीं, मी पूर्ण निर्दोषी आहें. या न्यायालयाची सत्ता श्रेष्ठ आहे; पण वस्तुजाताच्या नियतीचें नियमन करणारी सत्ता याहूनहि श्रेष्ठ आहे आणि मी ज्या कार्याचा प्रतिनिधि आहे त्या कार्याचा माझ्या हालअपेष्टांनींच अधिक उत्कर्ष व्हावा अशी भगवंताची इच्छा असेल. ........" दादासाहेब खापर्डे म्हणतात कीं, " टिळकांनीं दिलेलें उत्तर पहिल्यानें हायकोर्टाच्या इमारतींत गरजलें आणि मग बाहेर पडून अखिल भारताच्या वातावरणांत नादावत गेलें. हें उत्तर आतां ऐतिहासिक महत्त्वाचें झालें आहे. "

शेवटीं न्या. दावर टिळकांना उद्देशून म्हणाले, " तुम्हांला शिक्षा सांगणें हें माझें कर्तव्य आहे. तें करतांना मला फार दुःख होतें. तुमचें मन रोगट झालें आहे. तुमच्या लेखांत राजद्रोह भरून उतूं येत आहे. भित्र्या लोकांनीं केलेल्या अघोर कृत्यांना तुम्ही संमति देतां. इतकेंच नव्हे, तर बॉंबगोळे हे हिंदुस्थानांत लोककल्याणाकरितांच जणूं कांहीं अवतरले आहेत अशा भावनेनें तुम्ही त्यांचें स्वागत करतां. यापरतें एखादें कुजकट मन काय बोलेल ? तुमच्यासारखे वर्तमानपत्रकर्ते, हा ईश्वरानें या भूमीला दिलेला शापच होय ! तुम्हांला मी इतकी थोडी शिक्षा देत आहे कीं, ती ऐकून लोक म्हणतील, न्यायमूर्तींनीं काय ही भलत्या ठिकाणीं दया दाखविली ! तुमचें वय लक्षांत घेऊन दोन गुन्ह्यांबद्दल सहा वर्षें काळे पाण्याची शिक्षा मी तुम्हांला देतों. आणि तिसऱ्या आरोपाबद्दल फक्त १००० रुपये दंड करतों. "

१९०८ सालच्या खटल्याचा उल्लेख करून एक ऑफिसर म्हणाला, " लो. टिळकांनीं आपला डिफेन्स देतांना ज्यूरीला उद्देशून जें भाषण केलें तें मी कधींहि विसरणार नाहीं. त्यांचें भाषण प्रत्येक ज्यूररनें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ज्यूररांचा दर्जा काय, त्यांचीं कर्तव्यें काय, याबद्दलचा तो एक वस्तुपाठच आहे. मला आश्चर्य असें वाटतें कीं, स्वतः वकिलीचा धंदा करीत नसतां टिळकांना या सर्व गोष्टी सांगतां आल्या कशा? ही गोष्ट आश्चर्य करण्यासारखीच नव्हे काय?" हें ऐकून दुसरा ऑफिसर म्हणाला, " मला यांत मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. अहो, प्रत्यक्ष हायकोर्ट आणि ज्यूरी यांची पद्धत निर्माण करण्याची ज्याची शक्ति आहे, त्यानें ज्यूरीचीं कर्तव्यें समजावून सांगितलीं यांत काय मोठें नवल झालें?"

दादासाहेब खापर्डे म्हणतात, " आपण इंग्रजी इतिहासांत मोठमोठाल्या देशभक्तांच्या खटल्यांचीं वर्णनें आणि त्यांचीं भाषणें वाचतों. लोकमान्यांचा खटला चालू असतां तीं वर्णनें आम्हांस कःपदार्थ वाटूं लागलीं. कायद्याचीं बारीकसारीक किचकटें हीं एवढया गंभीर प्रसंगाचा निकाल करण्यास पुरेशीं साधनें नसून मनुष्यसमाजाचे मनोव्यापार व त्याचीं सनातन नियमनें यांच्या परीक्षणानें अशा प्रकारचे खटले परीक्षावयास हवेत, असें आम्हांस तेव्हां वाटूं लागलें. जज्ज व ज्यूरी हीं माणसें या पुरुषावतंसापुढें गौरीपुढील बालकांप्रमाणें दिसूं लागलीं. एक सबंध राष्ट्र दुसऱ्या एका राष्ट्रावर मनसोक्त राज्यकारभार चालवीत आहे आणि स्वबांधवांच्या दुःखाच्या आरोळ्यांनीं ज्याच्या चित्तांत काहूर उठलें आहे असा त्यांचा कैवारी या अनियंत्रित सरकारास तापटपणानें बोलत आहे, अशा प्रकारचा हा प्रसंग

२०४८० मराठी
ग्रंथांक ...८३९... ता. दि: १५-१-१९५

होता; प्रश्नाचें हें विशाल स्वरूप इतिहासांत शोभून जातें; पण आपल्या राज्यावर अंगार ठेवण्यास हा निघाला आहे अशी ज्या इंग्रज सरकारच्या अधिकाऱ्यांची खात्री, त्यांना त्या प्रसंगाचें हें विशालत्व समजलें नाहीं. त्यांनीं त्यास कायद्याच्या कैचींत धरलें, त्यांच्याच एका बांधवाकडून त्यांनीं निर्भत्सना करविली आणि ज्या देशासाठीं ते अहोरात्र झगडत होते, त्यांतून त्यांना सहा वर्षें दूर ढकलले."

कोर्टाच्या बाहेर तुफान गर्दी झाली होती; पण सरकारनें मागच्या बाजूच्या जिन्यानें टिळकांना बाहेर नेलें, खास गाडींत बसविलें आणि अहमदाबादेच्या तुरुंगांत पाठविलें. तेथून दोन महिन्यांनीं ब्रह्मदेशांतील मंडाले या ठिकाणीं त्यांना कारागृहांत ठेवले. लवकरच सरकारनें प्रसिद्ध केलें कीं, "टिळकांची शिक्षा सहा वर्षें काळेपाण्याची होती, ती तितक्याच मुदतीची पण साध्या कैदेची केली आहे."

अखिल भरतखंडांत या शिक्षेचा निषेध करण्यांत आला. मुंबईला बाजार बंद झाले. लोकांनीं दंगे केले. पोलिसांनीं गोळीबार करून ७५ माणसांचे बळी घेतले. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली, म्हणून मजुरांनीं सहा दिवस संप करून गिरण्यांचें काम बंद पाडलें. हा संप पगारवाढीकरितां नव्हता. टिळकांनीं मजुरांच्या चाळींत व्याख्यानें देऊन जी जनशक्ति जागृत केली होती, त्या जागृतीचा हा दृश्य परिणाम होता. या संपाची माहिती रशियांतील कामगार–चळवळीचा नेता लेनिन याला समजली, त्यावेळीं लेनिन म्हणाला कीं, "हिंदुस्थानांतील कामगारांचा हा पहिलाच राजकीय संग्राम असून तो उज्ज्वल

भविष्यकाळाचा निदर्शक आहे. म्हणून मी त्याचें स्वागत करतों. ''

## ( ६१ ) मंडालेच्या कारागृहांत—

वा. रा. कुलकर्णी या नांवाचे एक कैदी येरवडा तुरुंगांत होते. त्यांना टिळकांना स्वयंपाक करून घालण्याकरितां मंडाले येथें सरकारनें पाठविलें. त्यांचें भाग्य थोर, म्हणून टिळकांचा सहवास त्यांना मिळाला. त्यांनीं लो. टिळकांच्या स्मृतिसमाधीस आठवणींचीं जीं भावपुष्पें वाहिलीं आहेत, त्यांच्या आधारानें टिळकांचा कारागृहांतील जीवनक्रम पाहूं :

श्री. कुळकर्णी लिहितात कीं ' टिळकांना दुसऱ्या मजल्यावर दोन खणांच्या कोठडींत ठेवलें होतें. आठ खणांच्या मोठ्या बराकींतून हे दोन खण मध्यें लांकडी भिंत घालून निराळे काढले होते. सभोवार विटांच्या उंच भिंती घालून ही जागा वेगळी करून टाकलेली होती. खोलीभोंवतालचें आवार दीडशें फूट लांब व साठ फूट रुंद होतें. तेथें लिंबोणी व आंबे हीं झाडें होतीं. एवढ्या जागेंत फिरण्याची टिळकांना परवानगी होती. आमचे आवारांत जेलर बरोबर असल्याखेरीज दुसऱ्या कोणास येण्याची परवानगी नसे. आवाराचे दारास मोठालीं कुलपें लावीत. रात्रीं जेलर स्वतः खोलीसहि कुलूप लावी. टिळकांच्या खोलींत एक टेबल, दोन खुर्च्या, एक कापडी आरामखुर्ची, एक लोखंडी पलंग आणि दोन कपाटें इतकें सामान होतें. टिळकांना नेहमींचा पोषाख घालण्याची परवानगी होती. माडीखालील दोन खण जागेंत स्वयंपाक, स्नान वगैरेंची व्यवस्था करण्यांत आली होती.

तपस्वी टिळक पहांटे लवकर उठत, पाण्यानें चूळ भरून टाकून कांहीं संस्कृत श्लोक म्हणत. नंतर सुमारें दीड तास

ध्यानस्थ बसत. मी त्यांच्याकरितां पाट मांडून ऊन पाणी ठेवी; पण यामुळें त्यांना संकोच वाटे. एकदां ते म्हणाले, "अरे, तूं कैदी, मी कैदी; माझी अशी बडदास्त ठेवूं नकोस." मुखमार्जन झाल्यावर ते चहा घेत. मग नऊ वाजेपर्यंत लिहिण्या-वाचण्यांत गुंग होत. नऊ वाजतां ते स्नान करीत. मी एकदां, "तुमची पाठ चोळूं का" असें विचारलें, तेव्हां ते मजवर रागावले. ते आपल्या शरीरास दुसऱ्याचा स्पर्श करून घेत नसत त्यांचीं धोतरें व सदरा एका ब्रह्मी कैद्याकडून धुवून आणण्यांत येई. तो कैदी टिळकांचे कपडे मनापासून धूत असे. एक दिवस तो मला म्हणाला, 'या अवलियाचे कपडे मी धुवूं लागल्यापासून माझ्या पायाची व्याधी नाहींशी होत चालली आहे!' असो. आंघोळ केल्यावर ते गंध लावीत, सूर्याला अर्घ्य देत आणि मुबलक वेळ असल्यामुळें गायत्रीमंत्राचा जप करीत. टिळकमहाराज ११ वाजतां जेवत; पण जेवतांना त्यांचें अन्नावर लक्ष नसे. त्यांनीं ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली. एक दिवस मी जेवीत असतां माझ्या लक्षांत आलें कीं, फोडणीच्या वरणांत मीठ घालावयाचें राहिलें आहे. मी मनाशीं चरकलों. माझें काम आटोपल्यावर त्यांचे पुढें हात जोडून चोरट्यासारखा उभा राहिलों. त्यास हें कांहींच कळेना. मी म्हणालों, 'आमटींत मीठ घालण्याचें विसरलों. माझ्या चुकीची क्षमा करा.' ते म्हणाले, 'आमटींत मीठ नव्हतें हें माझ्या लक्षांतच आलें नाहीं.'

"जेवण झाल्यावर त्यांचें लिहिणें-वाचणें सुरू होई. त्यांनीं एक पळहि आळसांत वायां घालविला नाहीं. दीड वाजतां ते सरबत घेत किंवा दूध घेत. रोज मला एखादी गोष्ट सांगत. नंतर

पुन्हां उद्योगाला लागत. सायंकाळीं पांच वाजतां जेवण उरकावें लागे. बरोबर सहा वाजतां तुरुंगाच्या नियमाप्रमाणें आमच्या खोल्यांस बाहेरून कुलुपें लावण्यांत येत. सहा वाजल्यापासून दुसरे दिवशीं सकाळीं सहा वाजेपर्यंत १२ तास त्या दोन खणांच्या खोलींत आम्हीं काढीत होतों. रात्रीं ते मला तुकाराम, ज्ञानोबा, एकनाथ, रामदास, श्रीकृष्ण, श्रीराम, शिवाजी, कौरवपांडव यांच्या गोष्टी सांगत. मी अडाणी कुलकर्णीभाई पडल्यामुळें माझ्या मठ्ठ डोक्यांत तें कांहीं शिरत नसे. मग ते दिव्याशीं बसून थोडा वेळ लिहीत. नंतर तासभर डोळे मिटून ध्यानस्थ बसत. या समाधीनंतर ते गाढ झोंपी जात."

"दोन वर्षांनीं मधुमेहाचा विकार वाढत चालला. त्यांनीं इतर धान्यें वर्ज्य करून यव म्हणजे सत्तू याचा उपयोग करण्यास प्रारंभ केला. या पथ्यामुळें रोग हटत चालला. असें जिव्हालौल्य जिंकण्याचें व्रत मोठें कठीण; पण रसना ही महाराजांची बटीक होती. त्यांनीं अनेक ग्रंथ पुण्याहून आणवले. मंडालेस अतिशय उष्णता असल्यामुळें टिळकांना फार त्रास होत असे. कित्येक वेळीं तर जीव घाबरा होई; म्हणून त्यांनीं सरकारास असा अर्ज केला कीं, " मला अंदमान बेटांत जातमुचलका घेऊन खुलें राहाण्यास परवानगी द्यावी"; पण तो अर्ज मान्य करण्यांत आला नाहीं. सरकारचें उत्तर वाचल्यावर ते म्हणाले, 'ठीक आहे, मी कैदेंतच मरावें अशी भगवंताची इच्छा दिसते!'

"पथ्य सुरू होण्यापूर्वीं टिळकांना उत्कृष्ट तांदूळ मिळत. मला भिकार तांदूळ मिळत. महाराज जो भात खात, तोच मी खावा अशी त्यांची ताकीद असे. माझ्या वांट्याचा सर्व शिधा ते चिमण्यांना घालीत. त्या चिमण्या धीट झाल्या. त्या खोलींत येत,

टेबलावर बसत, टिळक जेवण्यास बसले म्हणजे ताटाभोंवतीं जमत; चिव चिव करीत. त्यांच्या अंगावरहि बसत. मांसभक्षक अधिकारी चिमण्यांचे पंख उपटून त्या हिरव्याच खाऊन टाकीत. एकदां चिमण्यांचा थवा टिळकांच्या खोलींत जमला होता. इतक्यांत सुपरिन्टेन्डेन्ट तेथें आले. त्यांनीं टिळकांस विचारलें, 'हा हो काय चमत्कार?' अधिकाऱ्यांस पाहून त्या चिमण्या भर्रदिशीं उडून गेल्या. टिळक अधिकाऱ्यांना म्हणाले, 'आम्ही या चिमण्यांस खात नाहीं, भीति दाखवित नाहीं, आम्ही त्यास खावयास घालतों. म्हणून त्या निर्भय असतात. फार काय, विषारी प्राण्यांबद्दलहि आमचें निर्वैर असल्यामुळें तेहि आम्हांस भीत नाहींत.'

"कापडी खुर्चीवर पडून सुपारीचें खांड चघळीत डोळे लहानमोठे करीत विचार करण्यांत टिळकांचा वेळ जात असे. मी त्यांस एकदां म्हणालों, 'आपण नेहमीं इतका विचार कसला करतां?' ते हंसत म्हणाले, 'अरे, माणसाच्या डोक्यांत ब्रह्मदेवाची सारी सृष्टि मावते," पुढें एकदां ते सहज म्हणाले, 'मी शाळेंतला विद्यार्थी आहे. ही माडी माझी शाळा, पुस्तकें माझे मास्तर, जेलर हा शिपाई व तूं खेळगडी! येथें मी जर्मन फ्रेंच, पाली इत्यादि भाषांचा अभ्यास करतों. येथून सुटून घरीं गेल्यावर पुढें जर्मनींत जाऊन यावें असें म्हणतों.'

"टिळकांना दर तीन महिन्यांतून एकदा बाहेरच्या माणसांची भेट घेण्याची मोकळीक होती. त्यांचे जिवलग मित्र दादासाहेब खापर्डे त्यांना भेटून गेले. त्यांचे भाचे बाबा विद्वांस हे मात्र वरचेवर भेटण्यास येत. जेल ऑफिसमध्यें अधिकाऱ्यासमक्ष त्या दोघांचें बोलणें होई. बाबासाहेब भेटून जात, तेव्हां तो दिवस

टिळकांना फारच आनंदाचा जाई. महिन्यांतून एकदां पुण्यास पत्र पाठविण्याची परवानगी असे. पुण्याहूनहि महिन्यानें एकदां पत्र येई. या पत्रांत घरच्या बातमीशिवाय दुसरी कांहीं बातमी असल्यास ती कापून काढीत असत. एकदां एक लांबलचक पत्र घरीं पाठविण्याकरितां टिळकांनीं लिहून काढलें; पण अधिकाऱ्यास त्यांतील एका शब्दाचा संशय आला. त्यांनीं तें पत्र रद्द करून पुन्हां दुसरें नवीन लिहावयास लावलें. तेव्हां टिळक म्हणाले, ' परवशता शतगुणें करी जाच. '

''मंडाले जेलमध्यें कॉलरा सुरू झाल्यामुळें टिळकांना व मला ' मिकटिल्ला ' तुरुंगांत नेण्यांत आलें. मंडालेच्या तुरुंगापासून स्टेशनपर्यंत दुतर्फा सशस्त्र गोरे सार्जंट उभे होते. अगदीं गुपचूपपणें हें कार्य चालू होतें; तरी स्टेशनावर मोटार जातांच तेथें जमलेल्या असंख्य लोकांनीं घोषणा केली कीं, ' लोकमान्य टिळक महाराऽऽज कीं जय ! ' तुरुंगांत पोंचल्यावर तेथील जेलरनें विचारलें, ' आपण कोणत्या देशाचे राजे ? ' टिळकांनीं उत्तर दिलें कीं, ' मी या साडेतीन हात देहाचाहि राजा नाहीं, मग माझें राज्य कोठून असणार ! '

''टिळकांची मूळची प्रकृति खंबीर यांत शंका नाहीं. मी तेथें सुमारें तीन वर्षें होतों. तेवढया काळांत टिळकांची प्रकृति दोनदांच बिघडली. मी मात्र बऱ्याच वेळां आजारी पडलों. त्या वेळीं प्रत्यक्ष माझ्या वडिलांप्रमाणें टिळकांनीं मला संभाळलें. त्यांनीं माझी शुश्रूषा केली, स्वतः स्वयंपाक केला आणि मला जेवूं घातलें. तीन वर्षें त्यांनीं मला आपल्या मुलासारखें वागविलें. वास्तविक मी सक्तमजुरीचा कैदी म्हणून मला सर्व बंदी असे; पण टिळकमहाराजांनीं मला नेहमीं आपल्याबरोबर चहा

द्यावा, बरोबरीच्या माणसाप्रमाणें माझ्याशीं गप्पागोष्टी कराव्यात, आपल्या स्पेशल न्हाव्याकडून माझी श्मश्रू करविली जाईल असा प्रयत्न करावा, मी लवकर सुटावें म्हणून कायदेशीर प्रयत्न करावा, वगैरे शेकडों गोष्टी आठवून ऊर भरून येतो आणि कांहीं सुचेनासें होतें.

"लो. टिळकांच्या प्रयत्नानें माझी शिक्षेची मुदत कमी झाली. तीन वर्षें संपतांच मला हालविणार असें दिसूं लागलें. मी म्हणालों, 'तुम्हांला सोडून मला जावेंसें वाटत नाहीं.' यावर त्यांनीं माझ्या मनाची समजूत घातली आणि ठराविक दिवशीं आशीर्वादपूर्वक निरोप दिला. निघतांना मी म्हणालों, 'आपल्या घरांतील मंडळी माझ्यावर विश्वास कसा ठेवतील?' तेव्हां त्यांनीं आपला एक पडलेला दांत खूण म्हणून माझेजवळ दिला. सीताशोधास गेलेल्या मारुतीरायानें खुणेकरितां श्रीरामचंद्राकडून घेतलेली मुद्रिका जपून ठेवली नसेल इतक्या जिवापलीकडे मी हा खुणेचा दांत जपून आणला. मला सरकारी शिपायांनीं मंडालेहून येरवड्यास आणलें आणि तेथून माझ्या गांवीं पोंचविलें. पुढें लवकरच मी पुण्यास गेलों. बाबासाहेब विद्वांस यांस भेटलों आणि खुणेचा दांत दाखविला. नंतर टिळकांचे कुटुंबास भेटलों, नमस्कार केला आणि सर्व हकीगत सांगितली.

"खरोखर तपश्चर्या करूनहि कोणास घडणार नाहीं, अशी त्यांची सेवा तीन वर्षें मला घडल्यामुळें माझें तात्त्विक व व्यावहारिकदृष्ट्या कल्याण झालें आहे. मला कारागृहवासाचा कलंक लागला. तो कलंक संतसमागमाच्या भागीरथीनें धुवून गेला. मी धन्य झालों. या संतसेवेचा मला एकदां प्रत्यक्ष लाभ झाला. आमच्या गांवास पाण्याचा भयंकर दुष्काळ होता.

अनेकांनीं विहिरी खणल्या, पण त्यांना पाणी लागलें नाहीं. मी टिळकमहाराजांचें स्मरण करून गांवाजवळ विहीर खणली. माझ्या विहिरीस तेवढें भरपूर पाणी लागलें आहे ! एकदां साताऱ्चे सोमण वकील आमच्या गांवीं आले होते. त्यांनीं मला प्रश्न केला, 'विहिरीस पाणी लागावें इतकी पुण्याई तुम्हीं कुठें केली ?' मीं उत्तर दिलें कीं, 'ही टिळकमहाराजांची तीन वर्षें केलेली सेवा फळाला आली !"

## ( ६२ ) प्रिय मित्र दादासाहेब खापर्डे—

टिळकांना शिक्षा झाल्यानंतर ना. खापर्डे विलायतेला गेले. त्यांनीं टिळकांच्या सुटकेकरितां प्रीव्ही कौन्सिलकडे अर्ज केला, पार्लमेंटांतील सभासदांच्या भेटी घेतल्या, लॉर्ड मोर्ले यांची भेट घेतली, पण या सर्व प्रयत्नांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ५–२–१९०९ च्या पत्रांत टिळक लिहितात कीं, "संकटांत जो स्नेही उपयोगी पडतो, तोच खरा. माझ्याकरितां दादासाहेब खापर्डे यांनीं जे श्रम घेतले त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे असें त्यांना कळीव."

२ एप्रिल १९१०

दादासाहेब खापर्डे यांस स. न.

तुम्हांला विलायतेंत जाऊन दोन वर्षें झालीं तरी अजून तेथेंच राहाणार कीं काय ? माझी सुटका होईपर्यंत आप-खुषीनें स्वतःला हद्दपार करून घेण्याची शपथ तर तुम्हीं वाहिलेली नाहीं ना ! हाउस ऑफ लॉर्डसचें काय होतें हें पाहातांच तुम्हीं हिंदुस्थानास परत जावें. काम यशस्वी न होतां परत येणें तुम्हांस सहजच वाईट वाटणार; पण

तुमच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं हें माझ्या दुर्दैवामुळें असें समजावें. कळावें.

आपला

**बाळ गंगाधर टिळक**

२१–१०–१९१० रोजीं ना. खापर्डे मंडालेला जाऊन आपले परमप्रिय स्नेही बळवंतराव टिळक यांना भेटले. एकमेकाकडे पाहातांच दोघांचे डोळे ओलावले. ब्रह्मदेशाचे ॲडव्होकेट विजापूरकर यांनीं खापर्डे व टिळक यांच्या भेटीची आठवण लिहिली आहे. विजापूरकर लिहितात कीं, " टिळकांना ज्या जागेंत ठेवलें आहे ती जागा आम्हांला दाखवा. " अशी दादासाहेब खापर्डे यांनीं साहेबास विनंती केली. "मला तुम्हांला आंत नेतां येत नाहीं." असें त्यांना सांगण्यांत आलें. टिळकांच्या मुलाखती नेहमीं तुरुंगाचे प्रवेशद्वारापाशीं असलेल्या कचेरींत होत असत. दादासाहेबांनीं मित्रप्रेमातिशयामुळें दुसरे दिवशीं अधिकाऱ्यास तीच विनंति केली. साहेबांनींहि त्यावर एक तोड काढली. हा तुरुंग चौकोनी असून सभोंवार उंच भिंतीचा तट होता. प्रवेशद्वारांवरील तिसरे मजल्यावरून सर्व तटावर नजर ठेवण्यासाठीं पोलिसांचा पहारा होता. टिळकांशीं मुलाखत झाल्यावर सुपरिंटेंडेंट यांनीं मी व दादासाहेब यांना तिसऱ्या मजल्यावर नेलें. लोकमान्यहि कचेरींतील मुलाखत झाल्यावर परत झपझप पावलें टाकीत आपले वॉर्डकडे जात असलेले तेथून आम्हीं पाहिलें. यामुळें त्यांचें वॉर्डचें सर्व आवार आम्हांस चांगलें पाहाण्यास मिळालें.

"टिळकांनीं, व्हावयाचें मुलाखतीचे वेळीं कोणत्याहि राजकीय गोष्टीविषयीं बोलावयाचें नाहीं, अशी सरकारनें अट घातली होती,

परंतु दादासाहेबांस टिळकांचे मुक्ततेविषयीं मोर्ले यांचेशीं केलेली वाटाघाट व सरकारनें देऊं केलेल्या सुधारणा यांची हकीगत लोकमान्यांस कळवावयाची इच्छा होती. दादासाहेबांनीं चातुर्यानें तें काम केलें. मुलाखतीचे वेळीं सुपरिंटेंडेंटसाहेबच हजर होते. त्यांच्याकडे वळून दादासाहेबांनीं ती हकीगत रसभरित रीतीनें सांगण्यास सुरुवात केली ! हकीगत नवी होती, मनोरंजक होती. ती सांगणारा बडा जादुगार असल्यामुळें साहेब ती ऐकण्यांत रंगून गेले. तेव्हां सहजच ती सर्व हकीगत लो. टिळकांचे कानीं पडली व इच्छित कार्यभाग साधला." या भेटीनंतर टिळकांनीं पुण्याला पाठविलेल्या पत्रांत खापर्डे यांच्याबद्दल पुढील वाक्यें लिहिलीं.

मंडाले, २ नोव्हेंबर १९१०

अनेक आशीर्वाद

खापर्डे येऊन ता. २१ आक्टोबरला भेटून गेले. दुसरे दिवशीं बराच वेळ आम्ही बोललों. त्यांचे बरोबर वासुदेवराव विजापूरकरहि होते. खापर्ड्यांची ही भेट म्हणजे या कंटाळवाण्या एकांतवासांत एखाद्या गोड स्वप्नाप्रमाणें वाटली. पण स्वप्नाइतकीच ती टिकली. दोन वर्षें राहून निराशेचे धक्क्यावर धक्के सोसल्यामुळें खापर्ड्यांचे करडे केस पांढरे झालेले दिसले. त्यांच्या भाषणांतहि नेहमींचा उल्हास व विनोद थोडा कमीच दिसला. त्यांनीं केली इतकी खटपट दुसऱ्याच्या हातून खचित झाली नसती. कळावें.

आपला

**बाळ गंगाधर टिळक**

## ( ६३ ) सौ. सत्यभामाबाई टिळक—

" भारतीय स्त्रिया म्हणजे त्याग, तपश्चर्या आणि मूकसेवा. भारतीय स्त्रिया म्हणजे अलोट श्रद्धा व अमर आशावाद. सीता, सावित्री, द्रौपदी, गांधारी हे त्यांचे आदर्श आहेत. हीं भारतीय स्त्रियांचीं दैवतें आहेत. भारतीय संस्कृतींत स्त्रीचें जीवन म्हणजे पेटलेलें होमकुंड आहे. लग्न म्हणजे यज्ञ. पतीच्या जीवनाशीं संलग्न झाल्यापासून स्त्रीच्या जीवनयज्ञास आरंभ होतो आणि हा यज्ञ मरणानेंच शांत होतो. " —सानेगुरुजी

टिळकांच्या पत्नी सत्यभामाबाई यांना उच्च दर्जाचें गृहसौख्य मिळालें. टिळकांनीं त्यांना कधीं उणें पडूं दिलें नाहीं, रागाचा एक शब्दहि ते कधीं बोलले नाहींत. टिळकांची साधी राहाणी व उच्च विचारसरणी त्यांच्या डोळ्यांपुढें होती. त्यांना साक्षरतेचें शिक्षण नव्हतें. मुलाबाळांचे कष्ट करण्यांत त्या रमून जात. टिळकांच्या उद्योगाचें मोठेपण समजण्याची मार्मिकता त्यांचें ठिकाणीं होती. प्रपंचांत टिळकांचें लक्ष कां नसतें याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यांच्या घरांत अनेक अतिथींचा सौजन्यपूर्ण सत्कार होत असल्यामुळें लो. टिळकांचा गृहस्थाश्रम धन्य झाला होता. श्रीयुत रा. का. साने लिहितात कीं, " मी त्या वेळीं मधुकरी मागून विद्यार्जन करीत असें. मधुकरीवर्गाचे फार हाल होत. गर्दी फार व वेळ थोडा म्हणून पांचसात विद्यार्थी लगबगीनें घराचे आंतबाहेर जात-येत असतांना एकमेकांस भेटावयाचे. आम्ही जाऊन टिळकांचे घराचे ओसरीवर " ॐ भवति भिक्षां देहि " असें म्हणतांच त्यांचें कुटुंबानें लागलीच बाहेर यावें, आम्ही कितीजण आहोंत हें पाहावें व परत आंत

जाऊन एका मोठ्या ताटांत तितक्या मधुकऱ्या तयार कराव्या व आम्हां सर्वांस माजघरांत बोलावून अति आस्थेनें मधुकरी घालावी व शेवटीं त्या सर्व अतिथींना नमस्कार करावा. अशाप्रकारें हा मधुकरीवर्गाचा सत्कार लोकमान्यांचें घरीं नित्य होत असलेला मीं अनुभविला आहे. त्या माउलीच्या हातची ती पवित्र मधुकरी खाऊन माझा भाग्योत्कर्ष झाला अशी माझी भावना आहे.''

टिळक मंडालेला गेल्यावर सौ. सत्यभामाबाई पतीच्या चिंतेनें दग्ध होत होत्या. त्यांतच मधुमेह त्यांच्या शरिराला पोखरीत होता. औषधें घेण्याची उत्सुकता त्यांनीं दाखविली नाहीं. त्यांच्या प्रकृतीबद्दल एका पत्रांत वरून कठोर भासणाऱ्या टिळकांनीं पुढील भावना व्यक्त केल्या आहेत—

अनेक आशीर्वाद,

मंडाले, २ एप्रिल १९१०

तुमचें २३ मार्चचें पत्र पोंचलें. जर्मन भाषेच्या अभ्यासाला सुरुवात केली आहे. प्रकृति अजून ठीक आहे. पण उन्हाळा डोकावूं लागला आहे. सौभाग्यवतीची प्रकृति उन्हाळ्यांत बिघडण्याचा संभव आहे. तिला म्हणावें, मुलांना घेऊन कांहीं दिवस सिंहगडावर जा. तिला थंड हवेचें सौख्य नको असेल, पण उन्हाळ्यानें तिची प्रकृति बिघडते म्हणून म्हणावें कीं, माझ्याकरितां म्हणून तरी सिंहगडावर जा. माझी ही आज्ञा असें म्हणून ती नाखुषीनें वर गेली तरी मला हवें आहे. मधुमेहाच्या रोग्यांना सिंहगडची हवा बरीच मानवते. कळावें.

आपला

**बाळ गंगाधर टिळक**

टिळक मंडालेस गेल्यावर सौ. टिळक कशा वागत होत्या ? टिळकांचे नातू ग. वि. केतकर आपल्या आजीची आठवण सांगतात कीं, "आजी साध्वी होती. दादा सहा वर्षांनंतर परत येतील अशी तिला आशा नव्हती. आपण लवकरच इहलोक सोडून जाणार असें ती म्हणत असे. १९०८ ते १९१२ या चार वर्षांत ती घराच्या बाहेर पडली नाहीं. काळ्या बांगड्या व काळेंच जाडेंभरडें वस्त्र यांशिवाय दुसरें कांहीं ल्याली नाहीं. मंगलसूत्राशिवाय दुसरा अलंकार तिचे अंगावर दृष्टीस पडला नाहीं. तिनें पक्वान्नें कधीं खाल्लीं नाहींत. ती नेहमीं उपास करी व उपासाचे पदार्थ खाऊन राही. मुली आजीला केसरी वाचून दाखवीत, पण त्याकडे तिचें फारसें लक्ष दिसलें नाहीं. भक्तविजयाची पोथी मात्र ती लक्षपूर्वक ऐके. औषध घेण्याचेंहि आजी बहुधा टाळीत असे. दादाप्रमाणेंच तिलाहि मधुमेह होता व तोच विकोपास जाऊन १९१२ सालीं तिचा अंत झाला." तात्यासाहेब केळकर लिहितात कीं, "टिळकांचा संसार उध्वस्त झाला, पण या हिंदु स्त्रीनें सौभाग्याची शर्यत जिंकली." ही मृत्यूची वार्ता टिळकांना तारेनें कळविण्यांत आली. त्या वेळीं कर्मयोगी टिळकांनीं पुढील हृदयद्रावक पत्र पाठविलें.

मंडाले, ८ जून १९१२

अनेक आशीर्वाद.

तुमची तार पोंचली. मनाला जबर धक्का बसला. संकटें आलीं तर तीं मी शांतपणानें सोशीत असतों हें खरें; पण खरेंच सांगतों कीं, या बातमीनें मी अगदीं हादरून गेलों. आपण हिंदु लोक. तेव्हां नवऱ्याच्या आधीं बायको गेली हें व्हावें तसेंच झालें असेंच कोणीहि म्हणणार. पण तिच्या-

मरणकाळीं मी जवळ नाहीं, इतकेंच नव्हे तर बंदीवासांत असावें याचेंच फार दुःख वाटतें. पण तें होणारच होतें. भवितव्यतेला कोण काय करणार! हीच भीति मला राहून राहून वाटे आणि शेवटीं तसेंच घडलेंही. पण माझे दुःख-कारक उदासपणाचे विचार आणखी सांगून तुम्हाला अधिक कष्टी करूं इच्छित नाहीं. माझ्या जीविताचा एक भाग समाप्त झाला दुसराहि आतां लवकरच समाप्त होईल असें वाटतें. तिची उत्तरक्रिया यथासांग करावी व तिच्या इच्छे-प्रमाणें अस्थी प्रयाग किंवा काशी येथें गंगेंत टाकाव्यात. तिच्या तोंडून अखेरच्या म्हणून ज्या इच्छा प्रगट झाल्या असतील त्या शब्दशः अवश्य पाळाव्या. मी नसल्यामुळें मुलांना तिच्या मरणाचें दुःख अधीकच झालें असेल. माझा म्हणून त्यांना निरोप सांगा कीं, या दुःखामुळें विद्येची हानि होऊं देऊं नका. त्यांच्याहूनही मी लहान होतों तेव्हां माझे वडील व मातुश्री निवर्तली. आपल्यावर आलेलें मातृहानीचें संकट ईश्वरी अवकृपेमुळें आलें असें मुलांनीं मानलें तर ईश्वर त्यांना दूर नाहीं. कळावें,

आपला

**बाळ गंगाधर टिळक**

## (६४) मंडालेपासून पुण्यापर्यंत—

मंडाले तुरुंगांतील अनुभव टिळकांनीं एका मुलाखतींत थोडक्यांत सांगितले. त्यांतील प्रवासाचा भाग वाचूं. शिक्षेची मुदत संपत आलेली होती. लो. टिळक लिहितात कीं, "मला ग्रंथ बाळगण्याची परवानगी मिळाली नसती, तर हे दिवस जाणें अत्यंत दुर्घट होते. कारण बाहेरील जग आम्हांस शून्य झालें होतें. मी जितकीं

पुस्तकें मागितलीं तेवढीं त्यांतील विषय काय आहे तें तपासून माझ्या ताब्यांत दिलीं. पुस्तकांची संख्या मी तेथून निघालों तेव्हां सुमारें चारशेंपर्यंत झालेली होती. ग्रंथ-लेखनासाठीं जे कागद देत, तेहि सुटे न देतां बांधलेलीं बुकें, आंतील पानें मोजून देत असत व लिहिण्याकरितां शाई न देतां फक्त सिसपेन-सिलीच व त्याहि करून देत असत. भगवद्गीतेवर हल्लीं जीं भाष्यें व टीका उपलब्ध आहेत त्यांत गीतेचें रहस्य सांगावें तसें सांगितलेलें नाहीं अशी माझी पुष्कळ वर्षें समजूत झालेली होती. या समजुतीस व्यवस्थित रूप देऊन पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्व-ज्ञानाच्या तुलनेसह गीतेवर माझ्या मताप्रमाणें मी एक ग्रंथ मराठी भाषेंत लिहून तयार केला आहे. हा ग्रंथ सुमारें सहा महिन्यांत लिहून काढला.''

''शिक्षेची मुदत संपत आली. ता. ८ जून १९१४ रोजीं सकाळीं जेल-सुपरिन्टेन्डेन्ट यांनीं माझ्या खोलींत येऊन एकाएकी सामानाची बांधाबांध करण्यास सांगितलें. दुपारीं १ वाजतां पोलीस-पहाऱ्यांत जेलमधून स्टेशनवर माझी रवानगी झाली. तेथून मेल ट्रेन दोन वाजतां निघाली. आमच्यासाठीं एक डबा रिझर्व केला होता. स्टेशन आलें, कीं डब्याचीं दारें लावून घेत. डोक्यास घालण्यास तांबडी पगडी मजजवळ होती; पण त्या वेळीं प्रथम टोपी व रंगूनच्या पुढें रुमाल घालण्याबद्दल हुकूम झालेले होते. पुढें गाडींतून उतरवून मला मोटारींत बसविलें आणि बंदरावर घेऊन गेले. पुढें लष्करी खात्यांतील 'मेयो' नांवाच्या बोटींत आम्हांस चढविलें. आगबोटीवर चढल्यावर पुणेंकर पोलिसांचे चेहेरे पहिल्यानेंच माझे दृष्टीस पडले. मुंबईच्या पोलीस-पंचकांत इन्स्पेक्टर सदावर्ते होते. संध्याकाळीं सहा

वाजतां आम्ही मद्रासच्या बंदरांत येऊन पोचलों. नंतर आम्हांला मद्रासच्या मोठ्या स्टेशनवर नेलें. तेथें मेलगाडीच्या एका रिझर्व डब्यांत मला बसविलें. पुण्याच्या अलीकडे हाडपसर स्टेशनवर गाडी थांबली. पुण्याचे डे. पो. सुपरिन्टेन्डेन्ट आले व त्यांनीं मला व सदावर्ते यांस खालीं उतरविलें. स्टेशनबाहेर पूर्वीच दोन मोटारगाड्या तयार ठेवल्या होत्या. मी स्टेशनबाहेर पडतांना स्टेशनमास्तरनें मजजवळ तिकिट मागितलें. साहेबाकडे बोट दाखविणें येवढेंच माझें त्यांस उत्तर होतें !

"येवढया बंदोबस्तानें व गुप्तपणानें आणून येरवड्याचे जेलांत ठेवतात असें वाटलें. पण पहिल्यानें बिनीची मोटार आणि मागून आमची मोटार याप्रमाणें चालू होऊन येरवड्याची दिशा जेव्हां सुटली तेव्हां संशय दूर झाला. बिनीची मोटार मध्येंच अर्ध्या मार्गावरून परतली आणि मंगळवार ता १६ जून १९१४ रोजीं मध्यरात्रीनंतर आमची मोटार गायकवाडांचे वाड्या-समोर येऊन उभी राहिली. तेथें गायडरसाहेबांनीं शिल्लक राहिलेली सुमारें एक महिन्यांची शिक्षेची मुदत सरकारनें मेहेरबान होऊन बिनशर्तीनें माफ केल्याची गोष्ट मला कळविली व मीहि त्यास या मेहेरबानीबद्दल माझे आभार सरकारास कळविण्यास सांगितलें. पोलिसाबरोबर मध्यरात्रीं घरीं आलेल्या मालकासहि दरवाजा उघडून आंत घ्यावें कीं नाहीं याची दरवानास शंका पडली ! म्हणून त्यानें धोंडोपंतास बोलावून आणलें आणि मग सत्तेच्या घरांत आमचा प्रवेश झाला !"

**( ६५ ) गीतारहस्य प्रसिद्ध झालें—**

टिळक सुटून आल्यावर पुण्यनगरी आनंदानें भरून गेली. अवघा हिंदुस्थान या वार्तेनें आनंदित झाला. टिळकांनीं

तुरुंगांतील काळ कसा कंठिला याबद्दल उत्कंठा निर्माण झाली. तेव्हां त्या अनुयायांना समजलें कीं, टिळकांनीं गीतारहस्य नांवाचा ग्रंथ लिहिला आहे; पण त्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत कारागृहांत आहे. ती प्रत सरकारकडून लवकर परत मिळण्याचें चिन्ह दिसेना. लोक शंकाकुशंका काढूं लागले. तेव्हां आचार्य टिळक म्हणाले, "वह्या सरकारच्या कबज्यांत असल्या तरी ग्रंथ माझे डोक्यांत आहे. फुरसतीचे वेळीं महिना दोन महिने सिंहगडावर बसून मी तो पुन्हां समग्र लिहून काढीन." पुढें दयाळू सरकारकडून वह्या परत मिळाल्या आणि १९१५ सालीं गीतारहस्य' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

हा ग्रंथ अनेक अनुयायांनीं भक्तीनें विकत घेतला आणि आपल्या टेबलावर देवाच्या प्रतिमेसारखा ठेवून दिला. या ग्रंथाचे वाचक थोडे आहेत. हा ग्रंथ ज्ञानेश्वरीप्रमाणें समाजाचे तळापर्यंत पोंचला नाहीं. मी हा ग्रंथ वाचून पाहिला. मला त्यांतील रहस्य समजलें. ह. भ. प. पांगारकर म्हणाले कीं, "गीतारहस्याला माझ्या ग्रंथालयांत पहिलें स्थान आहे; पण हा ग्रंथ मी माझ्या देवघरांत नेणार नाहीं." वे. शा. सं. बापटशास्त्री यांनीं "गीताभाष्यार्थ व रहस्यपरीक्षण" या नांवाचा १ हजार पानांचा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ वाचल्यास गीतारहस्यांतील गुणदोष कळून येतील.

प्रो. ज्ञा. कृ. लद्दू यांनीं टिळकांना प्रश्न विचारला कीं, "आपण गीतार्थ तर अगदीं कर्मपर लावला आहे. श्रीशंकराचार्य व आपण या उभयतांत कांहीं कांहीं ठिकाणीं त्यामुळें फारच विरोध दिसतो." यावर टिळकांनीं उत्तर दिलें कीं, "गीतेचा अर्थ देशकालवर्तमानानुरूप मुळास धक्का न लावतां

केला पाहिजे. श्रीशंकराचार्य, श्रीमध्वाचार्य, श्रीवल्लभाचार्य, श्रीरामानुजाचार्य वगैरे गीतेवरील भाष्यकार यांनीं आपल्या बुद्धीप्रमाणें गीतेवर जीं भाष्यें केलीं आहेत, त्यांत तरी कोठें एकवाक्यता दिसून येते ? गीता हें सर्व उपनिषदांचें सार आहे. म्हणून त्यावर प्रचलित असलेल्या वरील भाष्यांकडे फारसें लक्ष न देतां मूळ उपनिषत्कारांचा हेतु, गीतेचा हेतु व देशकालवर्तमानानुरूप भासत असलेली जरुरी या सर्वांचा विचार करूनच गीतेचा अर्थ करणें अत्यंत आवश्यक आहे." साक्षात्कारी संत प्रो. रा. द. रानडे म्हणतात कीं, "गीतारहस्यांतील मोठा विशेष म्हणजे महाभारतांतील कथांचा आणि नीति व राजकारणोक्तींचा जो उल्लेख ठिकठिकाणीं आला आहे तोच होय. गीतारहस्यासारखा तुलनात्मक तात्त्विक ग्रंथ कदाचित् कोणास लिहितां आला असता; परंतु गीतारहस्यामध्यें महाभारताचा अत्यंत निकट परिचय जो ठिकठिकाणीं दृग्गोचर होतो तो मात्र कोणासहि करतां आला नसता. दुसरा विशेष म्हटला म्हणजे लो. टिळकांनीं महाराष्ट्र भाषेमध्यें तत्त्वज्ञानाची उत्कृष्ट परिभाषा उत्पन्न केली व शुद्ध रीतीनें महाराष्ट्र भाषेतहि तात्त्विक प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह करण्याची पद्धत घालून दिली हा होय."

आचार्य टिळक म्हणतात कीं, "एका सर्वज्ञ, महापराक्रमी, यशस्वी व परमपूज्य क्षत्रियानें दुसऱ्या महान् धनुर्धरास क्षात्रधर्माच्या स्वकार्यास प्रवृत्त करण्यासाठीं गीता उपदेशिली आहे. गीता हें ब्रह्मविद्यामूलक भक्तिसहचारी नीतिशास्त्र होय असें माझें मत आहे. ज्ञानोत्तरहि संन्यासमार्ग पत्करण्यापेक्षां कर्मयोग स्वीकारणें हाच उत्तम पक्ष होय, असा गीतेचा कायम सिद्धान्त आहे. ब्रह्मज्ञान व भक्ति यांची जोड घालून अखेर तद्द्वारा

कर्मयोगाचें समर्थन करणें हाच गीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. पिंडब्रह्मांडज्ञानपूर्वक आत्मविद्येचीं गूढ व पवित्र तत्त्वें असंदिग्ध रीतीनें सांगून त्यांच्या आधारें मनुष्यमात्रास आपल्या आध्यात्मिक पूर्णावस्थेची म्हणजे परम पुरुषार्थाची ओळख करून देणारा आणि त्या बरोबरच भक्तीचा ज्ञानाशीं व या दोहोंचीहि शास्त्रत: प्राप्त होणाऱ्या व्यवहाराशीं सोपपत्तिक व सुंदर जोड घालून संसारांत भांबावून गेलेल्या मनास निष्काम-कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा गीतेसारखा दुसरा बालबोध ग्रंथ संस्कृतांतच काय पण जगांतील इतर वाङ्मयांतही सांपडणें दुर्मिळ होय. ज्ञान, भक्ति व कर्म यांचा उत्तम मेळ घालूनच कृष्णांनीं अर्जुनाला युद्धास प्रवृत्त केलें व हेंच गीतेचें रहस्य होय."

## (६६) संपादक केळकर—

जे लोक मनांतून न. चिं. केळकर यांची अवहेलना करतात व ज्यांना मागील इतिहास पाहाण्याची दगदग नको असते, त्या गृहस्थांना असा एक प्रश्न पडतो कीं, लोकमान्यांनीं आपला वारसा केळकर यांजकडे कां द्यावा? या लोकांनीं असा शेरा देणें म्हणजे खुद्द टिळकांना तारतम्य नव्हतें असें म्हणण्यासारखें आहे. कांहीं प्रतिभावंतांना असें वाटतें कीं, लोकमान्यांनीं लोकनायक अणे यांना संपादक म्हणून निवडलें असतें तर महाराष्ट्राचें माहात्म्य वाढलें असतें. पण हा प्रश्न राजकारणी विचारवंतांचा आहे. टिळकांनीं केळकरांची निवड केली. एकदां या संस्थेंत प्रविष्ट झाल्यावर केळकरांच्या मनाचा व्याप वाढूं लागला. थोरांच्या संगतींत वागणारे अनेक मृत्पिंड आपल्याला माहीत आहेत. थोरांच्या प्रकाशांत वावरत आहेत तोंपर्यंतच ते

प्रकाशमान असतात; पण केळकरांचें बळ टिळकांपासून घेतलेल्या उसनवारींत नव्हतें. एकदां एक दत्तकविचारांवर जगणारे विदग्धवाङ्मयसेवक लो. टिळकांकडे आले आणि म्हणाले, "मला आपल्या हाताखालीं संपादकत्वाचें शिक्षण द्याल काय?" टिळकांनीं उत्तर दिलें कीं, "आमच्या तात्यासाहेब केळकरांना कोणीं शिकविलें आहे? ते आपले आपणच तयार होत गेले आहेत." लो. टिळक १९१४ सालीं सुटून आल्यावर दहा-बारा दिवसांनीं एकदां वर्तमानपत्रांचे खोलींत उभे होते. सातारचे दोन गृहस्थ त्यांच्यापाशीं बोलत होते. बोलतां बोलतां पूर्वीच्या चारपांच वर्षांतील दडपशाहीचा विषय निघाला. तेव्हां लोकमान्य म्हणाले, "नरसोपंतांनीं म्हणूनच 'केसरी' जिवंत राखला. मी बाहेर असतों तरी मलाहि केसरी टिकविणें अशक्यच झालें असतें. नरसोपंतांचा गोडवा स्वभाव अशावेळीं राष्ट्राचे व केसरीचे उपयोगी पडला व म्हणूनच आज आपणांस येथें राहावयास जागा राहिली आहे." हें बोलतांना लोकमान्य गहिंवरून आलेले दिसले. इंग्रजी वृत्तपत्रकार बी. जी. हॉर्निमन म्हणतात कीं, "हिंदुस्थानांतील सर्वांत पहिल्या दर्जाच्या आजच्या वृत्तपत्रकारांत केळकरांची गणना केली पाहिजे."

## ( ६७ ) टिळक सुटले—

ता. १७ जून रोजीं मध्यरात्रीं तपस्वी टिळकांनीं आपल्या गृहिणीशून्य गृहांत प्रवेश केला. ता. २० रोजीं सार्वजनिक सभेमध्यें महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालीं टिळकांच्या सुटकेबद्दल आनंद प्रदर्शित करण्यांत आला. लोकमान्यांनीं सभेंत पाऊल टाकतांच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. "टिळक महाराज कीं जय" असा जयघोष करून

लोकांनीं त्यांचें स्वागत केलें. वऱ्हाड, नागपूर, सातारा, खानदेश, मुंबई इत्यादि ठिकाणच्या पुढाऱ्यांनीं त्यांच्या गळ्यांत हार घातले. लो. टिळक आपल्या भाषणांत म्हणाले, "आज सहा वर्षांनीं मी परत आलों व जेव्हां परिस्थिति पाहूं लागलों, तेव्हां रिप व्हॅन विंकलची गोष्ट मला आठवली. तो कित्येक वर्षें झोंपेंत होता. तो जेव्हां जागा झाला तेव्हां त्याला सर्व सृष्टि नवीन दिसूं लागली. तशी माझी अवस्था झाली आहे. येथें जमलेल्या समाजानें आज माझें जें स्वागत केलें त्यावरून लोक मला विसरले नाहींत असें वाटतें. मीहि लोकांना विसरलों नाहीं. पुढें तुम्ही काय करणार असा पुष्कळांनीं मला प्रश्न केला. प्रस्तावनेदाखल मी आज चार गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांचा ग्रंथ पुढें व्हावयाचा आहे. मार्ग शुद्ध आहे किंवा नाहीं हें पाहून मी पुढील विचार ठरवीन." अखेर लोकांचे आभार मानून टिळकांनीं आपलें भाषण पुरें केलें.

लोकप्रीतीचा ओघ गायकवाडवाड्याकडे वाहूं लागला, हें पाहून सरकारला भीति वाटूं लागली. ता. २५ जून रोजीं सरकारनें वटहुकूम काढून कोणीहि टिळकांची भेट घेणें हा गुन्हा ठरविला. टिळकांच्या घरासमोर पोलिसांचे खडे पहारे बसविले. तसेंच पुढें येणाऱ्या गणपतीच्या उत्सवांत टिळकांच्या नांवाचा जयघोष कोणी करूं नये, त्यांच्या तसबिरीलाच काय पण त्यांच्या मुलांनाहि कोणी हार घालूं नये असेहि हुकूम निघाले. टिळकांनीं या गोष्टींची तक्रार पार्लमेंटपर्यंत पोंचविली.

हें प्रकरण सुरू असतांच ता. ४ ऑगस्ट रोजीं महायुद्ध सुरूं झालें. तो अपूर्व प्रसंग लक्षांत घेऊन त्याचा फायदा घेण्याकरितां सरकारनें टिळकांवरील नजरबंदी उठवून लोकप्रियता मिळवण्याचा डाव टाकला. उलट टिळकांनींहि एक

जाहीरनामा काढून युद्धकालीं सामोपचाराचें धोरण जाहीर केलें. तथापि उदारमतवादी पक्षानें अजून टिळकांवरील बंदी उठविली नव्हती. त्या सालीं मद्रास येथें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें. त्या कॉंग्रेसला टिळकांनीं उपस्थित राहूं नये अशीं कारस्थानें नेमस्त पक्षानें केलीं. टिळक हे बहिष्कारवादी आहेत असा डांगोरा पिटण्यांत आला. " मी परदेशी कापडापुरता बहिष्कार-वादी असलें तरी राज्यकारभारावर व त्यांत भाग घेणारावर मी बहिष्कार घातलेला नाहीं, " असें टिळकांनीं जाहीर केलें. या संबंधांत एक गुप्त पत्र ना. गोखले यांनीं मद्रास कॉंग्रेसचे अध्यक्ष भूपेंद्र बसू यांना पाठविलें. पण तें पत्र गुप्त राहूं शकलें नाहीं. त्याचा गवगवा झालाच.

यावेळीं हळव्या मनाचे ना. गोखले आजारी होते. टिळकांनीं त्यांच्या विरुद्ध नेमस्त पक्षानें जीं कारस्थानें चालविलेलीं होतीं त्यांना उद्देशून " चोराच्या उलट्या बोंबा " असें गांवठी शीर्षक असलेला एक कडकडीत लेख लिहिला. त्या लेखांत टिळक लिहितात कीं, " गोखल्यांच्या गुप्त पत्रानें समेट बिघडला हें निर्विवाद आहे. सरते शेवटीं आमचें एवढें सांगणें आहे कीं, हा वाद चालविण्यांत अर्थ नाहीं. राष्ट्रीय पक्षांतील लोकांस मवाळांच्या कॉंग्रेसमध्यें घ्या अगर घेऊं नका, पण त्यासाठीं गुप्त लेखांचे उपाय योजूं नका. गोखले काय आणि टिळक काय दोघांच्याहि गोंवऱ्या आतां बहुतेक ओमकारेश्वरावर गेल्या आहेत, असें म्हणण्यात हरकत नाहीं. कॉंग्रेस राष्ट्रीय आहे, टिळकांची नव्हे किंवा गोखल्यांचीहि नव्हे. " दुर्दैवानें हा लेख प्रसिद्ध झाल्या-नंतर दहाच दिवसांनीं १९–२–१५ रोजीं ना. गोखले मरण पावले.

## ( ६८ ) ना. गोखले यांचा मृत्यु—

टिळकांनीं केसरींतील अग्रलेखांत ना. गोखले यांचें गुणवर्णन केलें. त्यांत टिळक लिहितात, " एका गरीब ब्राह्मणाच्या मुलानें अभ्यास करून परीक्षा पास झाल्यावर थोड्याच वर्षांत हत्ती, घोडे, संपत्ति, सत्ता किंवा अशीं दुसरीं बाह्य साधनें जवळ नसतां थोड्याच वर्षांत सर्व देशांत आपलें नांव आबालवृद्धांचें तोंडीं ठेवून जावें, हें कांहीं लहानसहान काम नव्हे. गोखल्यांचें अंगीं अनेक गुण होते; त्यांतील श्रेष्ठ गुण म्हटला म्हणजे निर्लोभ अंतःकरणानें वेळींच देशकार्याला वाहून घेणें हा होय. "

## ( ६९ ) बेळगांवची प्रांतिक परिषद्—

टिळक सुटून आल्यानंतर राष्ट्रांतील सर्व जातींचें व पक्षांचें ऐक्य करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. हें ऐक्य झालें तर राष्ट्राची एकमुखी मागणी सरकारपुढें आक्रमक स्वरूपांत मांडतां येईल असें त्यांचें धोरण होतें. आपण मागत असलेले स्वराज्याचे हक्क केवळ कॉंग्रेसमधील ठरावानें मिळणार नाहींत, तर त्यासाठीं देश-व्यापी चळवळ केली पाहिजे असें टिळकांचें मत होतें. कॉंग्रेस वर्षभर चळवळ करणारी संस्था नव्हती; म्हणून टिळकांनीं ' होमरूललीग ' या नांवाची स्वतंत्र संस्था सुरू केली. कॉंग्रेसनें केलेल्या ठरावासाठीं वर्षभर चळवळ चालू ठेवणें हें या सभेचें कार्य होतें. डॉ. ॲनी बेझंट यांनीं असाच एक स्वराज्यसंघ मद्रासमध्यें सुरू केला. डॉ. बेझंट अंतःस्फूर्तिवादी होत्या; टिळक बुद्धिवादी होते. राष्ट्रसभेचें कार्य करणारे हे दोन संघ लवकरच एका ध्वजाखालीं काम करूं लागतील, अशी टिळकांनीं कल्पना केली.

१९१६ सालच्या एप्रिल महिन्यांत बेळगांवला प्रांतिक परिषद् भरली. महात्मा गांधी या परिषदेला उपस्थित होते. राष्ट्रीय पक्षाचा काँग्रेसप्रवेश आणि होमरुललीगची स्थापना हे दोन विषय परिषदेपुढें मांडण्यांत आले आणि पास झाले. लोकमान्यांचें कर्तृत्व, दूरदर्शित्व आणि नेतृत्व यांचें दर्शन घडविणारी एक आठवण डॉ. मुंजे यांनी लिहिली आहे. डॉ. मुंजे लिहितात कीं, "बेळगांव कॉन्फरन्सच्या वेळेस आम्ही सर्व मवाळांशीं तडजोड करण्याचे विरुद्ध होतों. लोकमान्यांनीं माझी समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु मी आपलें मत बदललें नाहीं. शेवटीं ज्या दिवशीं हा समेटाचा ठराव येणार होता, त्या दिवशीं टिळक माझ्याकडे आले आणि म्हणाले कीं, "पाहा, हा समेटाचा ठराव पास केल्यानें आपल्या पक्षाची पुढें सरशी होण्याचा संभव आहे. म्हणून मध्यप्रांतातर्फे तुम्हीं या ठरावाचें समर्थन करा." मी निक्षून म्हणालों कीं, "तें शक्य नाहीं. माझ्या बुद्धीस पटत नाहीं. मला असें वाटूं लागलें आहे कीं, आतां आपलें अवतार-कृत्य संपलें. परशुरामाचा किंवा कृष्णाचा जसा पराभव झाला तसा आपला पराभव होण्याची वेळ आलेली आहे." हें ऐकून टिळक म्हणाले, "तुम्हांला अजून राजकारण समजत नाहीं. मी म्हणतों तेंच करणें श्रेयस्कर होईल." मी मनाचा उद्वेग आवरून म्हणालों, "बळवंतराव, आपण माझे गुरु. आतांपर्यंत आपल्या विचारानें आमचें कल्याणच झालें आहे. आपण माझ्या-पेक्षां अनंत पटीनीं शहाणे आहांत. आपल्या मुत्सद्दीपणावर माझा पूर्ण विश्वास आहे. ही परीक्षेची वेळ आहे. आपण ही चूक करीत आहांत असें जरी मला वाटतें, तरी मी असें वचन देतों कीं, मी आपल्याविरुद्ध जाणार नाहीं." टिळक म्हणाले,

"तुम्हांला लवकरच प्रत्यय येईल कीं, या वेळेस हेंच करणें शहाणपणाचें आहे. या धोरणानें गेल्यास वर्ष दोन वर्षांत आपल्या पक्षाची सरशी झाल्याशिवाय राहात नाहीं."

डॉ. मुंजे म्हणतात कीं, "पुढें कॉन्फरन्स संपली. लोक आपापल्यापरीनें विचार करूं लागले. तिसऱ्या दिवशीं मुंबईच्या 'टाइम्स' पत्रांत अग्रलेख आला. टाइम्सनें टिळकांचा मुत्सद्दे-गिरीचा कावा उघडकीस आणला. टाइम्सकार म्हणाले कीं, "या समेटाच्या ठरावानें टिळकांनीं काँग्रेस काबीज केली." डॉ. मुंजे म्हणतात, "माझे डोळे उघडले. बळवंतरावांकडे जाऊन मी आपल्या थोबाडींत मारून घेतली आणि प्रांजलपणें चूक कबूल करून क्षमा मागितली."

२२ मे १९१६ रोजीं पुण्यांत लो. टिळक यांच्या अध्यक्षते-खालीं डॉ. ॲनी बेझंट यांचें व्याख्यान झालें. त्या व्याख्यानांत बेझंट म्हणाल्या कीं, "लोखंड तापलेलें असतांच तें ठोकून घ्यावें." अध्यक्षीय भाषणांत टिळक म्हणाले कीं, "लहान-सहान मागण्या करण्याचे दिवस गेले. म्हणून आतां होमरूल मागण्यालाच आपण प्रारंभ केला पाहिजे." यानंतर टिळक व बेझंट यांचीं अनेक ठिकाणीं व्याख्यानें झालीं. सरकारनें दडप-शाही सुरू केली. डॉ. बेझंट यांच्या 'न्यू इंडिया' पत्राकडून जामीन मागितला आणि पुढें तो जप्त केला. पुढील काँग्रेस लखनौला भरण्याचें ठरलें. काँग्रेसच्या स्वागत-समितीनें डॉ. बेझंट यांचें नांव काँग्रेसच्या अध्यक्षपदाकरितां सुचविलें. अशा रीतीनें सरकारच्या दडपशाहीला राष्ट्रसभेनें उत्तर दिलें.

## (७०) टिळकांनीं महर्षि पटवर्धनांना नमस्कार केला—

ता. २३-७-१९१६ या दिवशीं लो. टिळकांना ६१ वें वर्ष लागलें. लोकांनीं कृतज्ञताबुद्धीनें एक लक्ष रुपये जमविले आणि महर्षि पटवर्धनांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरवून ते टिळकांना अर्पण करण्याचें ठरविलें. समारंभाचे दिवशीं षष्ट्यब्दि-पूर्तिनिमित्त होमहवन इत्यादि धार्मिक विधि करण्यांत आले. सभेच्या पूर्वीं लो. टिळक ऋषिवर्य अण्णासाहेब पटवर्धन यांच्या दर्शनास गेले. नमस्कार करतांना टिळक अण्णासाहेबांना म्हणाले, " आज मला नमस्कार करण्यास आपल्याशिवाय कोण आहे ?" हे शब्द ऐकून विरागी ऐश्वर्यानें शोभणाऱ्या अण्णासाहेबांच्या डोळ्यांतहि प्रेमाश्रु आले. सभेस येतांना अण्णासाहेब म्हणाले कीं, " कनक आणि कांता या दोन बाबतींत बळवंतराव पूर्ण सोंवळा आहे. असा लोकोत्तर पुरुष मिळणें दुर्मिळ ! त्याच्या तपश्चर्येमुळेंच त्याला आजचा दिवस पहावयास मिळाला आहे."

महर्षि पटवर्धन हे टिळकांचे मोक्षगुरु होते असें कांहीं भक्तांना वाटतें. टिळकांचा गुरु होण्याची त्यांची योग्यता होती यांत शंकाच नाहीं. महर्षि पटवर्धन दत्तभक्त होते. नृसिंहसरस्वती हे त्यांचे गुरु. महर्षि पटवर्धनांचे मंगल आशीर्वाद टिळकांच्या पाठीशीं उभे होते. आध्यात्मिक मार्गांत उंच गेलेल्या पटवर्धनां-सारख्या सिद्धपुरुषांची योग्यता, आधिभौतिक जगांत वावरणाऱ्या जडजीवांना कळणें कठीण आहे. महर्षि अण्णासाहेब यांच्या-बद्दल लिहितांना संदेशकार कोल्हटकर म्हणतात कीं, " आधुनिक काळांत असा कोण मनुष्य झाला तें दाखवा. डॉक्टरीमध्यें एक पैसाहि न घेणारा, शेंकडों जीवांवर रोज उपकार करणारा, कामिनी आणि कांचन हीं विषासारखी मानणारा, एकीकडे एल्—

एल्. बी. व एकीकडे एल्. एम्. एस्. अशा दोन्ही परीक्षा एकाच वेळीं पास होणारा, एक बिल्व कुटुंबरक्षणार्थ ठेवून एक बिल्व जनतेच्या सेवेकडे समग्र अर्पण करणारा, साधुत्वाचे सगळे गुण असून कधींहि साधू म्हणून न मिरवणारा, ज्ञानाचा भोक्ता, राजकारणाचा अध्येता, दीन जनांचा त्राता, वैराग्यानें संसार करणारा, असा पुण्यात्मा पुन्हां कधीं होईल का, बोला. खरोखर जर या पुरुषानें स्वतःला साधु म्हणवून घेतलें असतें, शिष्य गोळा केले असते, मठ स्थापन केला असता, दत्तदत्त असें म्हणून लोकांचें लक्ष वेधलें असतें, डोक्याला भगवें गुंडाळलें असतें, कफनी घातली असती, मंत्रोपदेश दिले असते, हारतुरे घेतले असते, पाद्योपचार स्वीकारले असते, खडावा वाजविल्या असत्या, चिपळ्या झिजविल्या असत्या, फोटो काढविले असते, चरित्रें लिहविलीं असतीं, स्तोत्रें गावविलीं असतीं, मंदिरें बांधविलीं असतीं, तर या पुरुषाचा केवढा जयजयकार झाला असता ! पण आत्मप्रौढीचा त्यांस पूर्ण कंटाळा, आत्मस्तुतीचा पूर्ण तिटकारा; त्यामुळें त्यांच्यावर मोर्चेले उडविलीं गेलीं नाहींत. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचें चरित्र इतकें पवित्र होतें कीं, तें पाहून रामशास्त्र्यांच्या निस्पृहतेची आठवण होई, एकनाथांच्या विरक्त संसाराची स्मृति जागृत होई, तुकारामांच्या कामिनीकनकाविषयींची निर्लोभता डोळ्यापुढें येई, कबीराचा परोपकारीपणा आठवे, नामदेवाची प्रेमप्रवृत्ति दिसावयास लागे; रामकृष्ण परमहंसांची शांतता, विवेकानंदांची बुद्धिमत्ता व स्वामी रामतीर्थांची तेजस्विता, अण्णासाहेबांचें चरित्रांत बघायला सांपडे. भीष्मा-

टि....१०

चार्यप्रमाणें प्रायोपवेशनांत आपली इहलोकची यात्रा संपविणारा महापुरुष अनेक शतकांत हा पहिलाच ! "

## (७१) एक लक्ष रुपयांचा आहेर—

सभेच्या प्रारंभीं टिळकांना दिलेलें मानपत्र वाचून दाखविण्यांत आलें. त्यानंतर एक लक्ष रुपयांचा आहेर स्वीकारण्याची विनंति करण्यांत आली. नंतर कांहीं वक्त्यांचीं भाषणें झालीं.

शेवटीं टिळकांनीं सद्गदित अंतःकरणानें सर्वांचे आभार मानले. टिळक म्हणाले, "आपण दिलेली रक्कम मला स्वतः-साठीं नको आहे. मी या रकमेचा ट्रस्टी या नात्यानें मला योग्य वाटेल त्या राष्ट्रीय कामांकडे खर्च करण्याकरितां आपण ती माझ्या स्वाधीन करीत आहां, अशाच भावनेनें मी ती रक्कम स्वीकारतों. मी आपणांस असें आश्वासन देतों कीं, वरील रकमेंत माझें स्वतःचें कांहींतरी तुळशीपत्र घालून मी तिचा राष्ट्रकार्यार्थ विनियोग करीन. यासंबंधाचे कागदपत्र व नियम पुढें करण्यांत येतील."

पण सुख व दुःख हीं परस्परानुबंधीं असावींत असा ईश्वरी संकेत दिसतो. पावसाच्या सरींतून ऊन पाहावें, उन्हाच्या प्रकाशांत पाऊस पाहावा. कारण कर्मधर्मसंयोगानें सभेच्या आनंदांत अद्भुत रस निर्माण झाला. परगांवचे पाहुणे जमलेले आहेत, चौघडे झडत आहेत, अभिनंदनाच्या तारा व पत्रें येत आहेत, अशावेळीं पोलिसांनीं गायकवाडवाड्यांत प्रवेश केला, वारंट बजावलें आणि टिळकांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दल सरकारी अवकृपेचा आहेर सादर केला. अधिकाऱ्यांनीं टिळकांवर बेळगांव व नगर येथील भाषणांबद्दल खटला भरून जामीन मागितल्याची नोटीस त्यांच्यावर बजावली. होमरूलची चळवळ बंद पाडण्याचे हे सरकारी प्रयत्न होते. त्याच सुमारास डॉ. बेझंट यांना नजरकैदेंत ठेवण्यांत आलें.

टिळकांचा खटला डि. मॅजिस्ट्रेटपुढें चालला. त्यांनीं टिळकांना दोषी ठरवलें आणि त्यांच्याकडून जामीन घेतला. टिळकांनीं हायकोर्टाकडे अपील केलें. त्यांत लो. टिळक दोषारोपांतून मुक्त झाले. स्वराज्याची मागणी सनदशीर ठरली. डॉ. बेझंट याहि मुक्त झाल्या. पुन्हां टिळक आणि बेझंट यांच्या सहकारितेनें होमरूललीगची चळवळ चढत्या-वाढत्या उत्साहानें सुरू झाली.

याच सुमारास महात्मा गांधी यांनीं सत्याग्रहाच्या नव्या चळवळीचें शिंग फुंकलें. त्याचा पहिला प्रयोग त्यांनीं बिहार प्रांतांतील चंपारण्यांत केला. म. गांधींनीं तेथील मजुरांच्या स्थितीची चौकशी करण्यास सरकारला भाग पाडलें.

## ( ७२ ) लखनौ-कॉंग्रेस—

टिळक व त्यांचे अनुयायी यांना नेण्यासाठीं होमरूल स्पेशल ट्रेन २३-१२-१६ रोजीं मुंबईहून निघाली. मार्गावरील सत्काराचा स्वीकार करीत करीत दिनांक २५ रोजीं टिळक लखनौला पोचले. लोकांनीं त्यांची प्रचंड मिरवणूक काढली. दुपारीं २ वाजतां ही मिरवणूक एका धर्मशाळेजवळ थांबली. टिळक धर्मशाळेच्या गच्चीवर उभे राहिले. हजारों लोकांनीं त्यांचें दर्शन घेतलें. लोकांचे आभार मानतांना टिळक म्हणाले, " Luck-now in Luck now" लखनौ शहरांत दैव आपल्या बाजूला आहे. तुमच्या या भाग्यवान शहरीं उद्यां होमरूलचा झेंडा फडकूं लागेल. "

लखनौ येथील कॉंग्रेसचा मंडप प्रशस्त होता, तो कलाकौशल्यानें शृंगारला होता. ' संहतिः कार्यसाधिका ' हें वाक्य मंडपाच्या प्रवेशद्वारापाशीं झळकत होतें. मंडप प्रतिनिधींनीं आणि प्रेक्षकांनीं फुलून गेला. स्वागताध्यक्ष जगत्नारायण म्हणाले,

"इतके दिवस जहाल-पक्ष आणि मुसलमान-पक्ष हे बाहेर राहिले होते. हे दोन्ही पक्ष कॉंग्रेसमध्यें आल्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों." बाबू अंबिकाचरण मुजुमदार आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले, "१९०७ सालीं सुरत येथें फ्रेंचांच्या प्राचीन बागेंत ज्या कॉंग्रेसची दुफळी झाली ती आज नऊ वर्षांनीं लखनौच्या केसरबागेंत पुन्हां जोडली गेली, ही आनंदाची गोष्ट होय. यापुढें वृद्धांनीं तरुणांना झिडकारूं नये आणि तरुणांनीं वृद्धांचा उपमर्द करूं नये. दूरदृष्टि, पोक्त विचार, सावधगिरी, हे गुण खरे, पण त्यांचा अतिरेक झाला म्हणजे त्यांचें पर्यवसान भागूबाईपणांत व नैतिक अधःपातांत होतें. उलटपक्षी, उत्साह व जोम हे गुण प्रशंसनीय आहेत खरे, पण उतावीळपणाच्या भरांत संस्थेचा चुराडा होत असतो, म्हणून एकमेकांचे दोष काढीत न बसतां, ज्या पुढाऱ्यांनीं चिकाटीनें झगडा चालू ठेवला त्यांच्या पाठोपाठ आपण जाऊं या. या दृष्टीनें सुरतेच्या बखेडया-नंतर आज नऊ वर्षांनीं लखनौस आमच्यामध्यें परत आलेले माझे मित्र टिळक यांचें मी अंतःकरणपूर्वक स्वागत करतों. तेहि आपल्यांतलेच आहेत. यास्तव त्यांचा व आमचा कधींहि वियोग न होवो."

या कॉंग्रेसला लो. टिळक, डॉ. बेझंट, बॅ. जिना आणि महात्मा गांधी या व्यक्ति अखंड भरतखंडाचें ऐक्य प्रस्थापित करण्याकरितां उपस्थित झाल्या होत्या. या ठिकाणीं लो. टिळकांनीं राष्ट्रसभा हस्तगत केली. हिंदूमहासभा टिळकांच्या विरुद्ध होती. पंडित मालवीय हेहि रुसले होते. टिळकांच्या सांगण्यावरून महात्मा गांधी हे प्रतिनिधि म्हणून निवडले गेले. या वर्षीं सर्व-संमत अशी एक स्वराज्याची मागणी कॉंग्रेसनें ठरावाच्या रूपानें

मंजूर केली. या मागणीला मुस्लीम लीगचाहि पाठिंबा मिळविण्यासाठीं संघटना-चतुर लोकमान्यांनीं सुप्रसिद्ध लखनौ करार, बॅ. जिना, महमुदाबादचे राजे, डॉ. अन्सारी इत्यादि मुसलमान पुढाऱ्यांच्या सहकार्यानें घडवून आणला. या सभेंत स्वराज्याच्या ठरावावर बोलतांना लो. टिळक म्हणाले, " बंधुभगिनींनों, पूर्वीं ज्या बहिष्काराच्या ठरावासंबंधीं मांडलों त्यापेक्षां हा ठराव अधिक महत्त्वाचा आहे. लखनौला हिंदु, मुसलमान, प्रागतिक आणि राष्ट्रीय हे सर्व एक होऊन स्वराज्याची चळवळ करण्यास बांधले गेले, हें दृश्य पाहून आतां आपलें दैव उजाडलें आणि लखनौनें Luck now हें आपलें नांव यथार्थ केलें. कांहीं लोक असें म्हणतात कीं, या करारांत हिंदूंनीं मुसलमानांना शरणागति दाखविली आहे ; पण मी म्हणतों कीं, केवळ मुसलमानांना स्वराज्याचे हक्क देण्यांत आले तरी आम्हांस त्याचें कांहीं वाटणार नाहीं आणि ही भावना बोलून दाखवितांना हिंदुस्थानांतील सर्व हिंदूंचें अंतःकरण मी बोलून दाखवीत आहें अशी माझी खात्री आहे. हे हक्क रजपुतांना दिले तरीहि मला कांहीं वाटणार नाहीं आणि हे हक्क वापरण्यास सुशिक्षितांपेक्षां हिंदूंतील मागासलेले वर्ग अधिक लायक आहेत, असें म्हणून त्यांना दिले तरीहि मला त्याचें कांहीं वाटणार नाहीं. किंबहुना ते हिंदुस्थानांतील कोणत्याहि एका वर्गाला दिले तरी त्याची मला फिकीर नाहीं. कारण त्यानंतर हा लढा तो वर्ग आणि इतर समाज या दोन पक्षांतच सुरू राहील व आजचें त्यांचें तिरंगी सामन्याचें स्वरूप नष्ट होईल."

या राष्ट्रीय ऐक्याबद्दल केसरीनें असें लिहिलें कीं, " शुक्रवार ता. २९ डिसेंबर १९१६ हा दिवस हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत

सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा उगवला, ह्या विषयीं शंका नाहीं. त्या दिवशीं हिंदी स्वराज्याचें निशाण लखनौ येथें गोमती नदीच्या तीरावर रोवलें गेलें. शुक्रवारचा ठराव म्हणजे हिंदुस्थानच्या राष्ट्रीय आकांक्षेनें केलेला मुकुटधारण-विधीच होय! या समारंभाला सर्व प्रजा आपापला नजराणा घेऊन हजर होती. हिंदुस्थानांतील असा एकहि वर्ग नसेल कीं, ज्याचे प्रतिनिधी या समारंभास आले नव्हते. जातिभेद, मतवैचित्र्य, व्यक्तिद्वेष इत्यादि राष्ट्रीय कार्योच्छेदक पिशाच्चांनींहि गोमतीच्या प्रवाहांत गति घेतली आणि नवीन शुभ देह धारण करून या ऐक्याला मंगल आशीर्वादच दिला. सर्व पक्षभेद उगवत्या राष्ट्रीय बुद्धीच्या तेजामुळें वितळून गेले." लखनौ येथें होऊं घातलेली एकी पाहून लॉर्ड सिडनहॅम यांनीं तिकडील पत्रांतून इषारा दिला कीं, "हिंदुस्थानांत धोका आहे, संभाळा!"

## (७३) भारतमंत्री मॉंटेग्यु—

महायुद्धांत प्रत्येक राष्ट्राला स्वयंनिर्णय असावा अशी घोषणा करण्यांत इंग्लंडनें पुढाकार घेतला होता. हिंदुस्थानांतील लोकहि स्वयंनिर्णय मागूं लागले, तेव्हां भारतमंत्री मॉंटेग्यू यांनीं ता. २० ऑगस्ट १९१७ रोजीं एक जाहीरनामा काढला. मॉंटेग्यू भारतांत आले. त्यांनीं लोकांचीं शिष्टमंडळें बोलावलीं आणि त्यांच्या कैफीयती दाखल करून घेतल्या. याच वेळीं ब्राह्मणेतर पक्ष संघटित होऊन मद्रास व मुंबई येथें त्यांचीं मोठीं केन्द्रें बनलीं.

ता. २६ नोव्हेंबर १९१७ रोजीं मिसेस बेझंट व लो. टिळक हे होमरूल लीगचें शिष्टमंडळ घेऊन मॉंटेग्युसाहेबांच्या मुलाखतीस गेले. या मुलाखतीविषयीं मॉंटेग्यु आपल्या डायरींत

म्हणतात, " मिसेस बेझंट व दि ग्रेट टिळक आपली होमरूल लीग घेऊन आले. अंतिम स्वरूपाचें व कटु लागणारें असें मागणी-पत्र त्यांनीं वाचून दाखविलें. अर्थात् होमरूल लीगच्या मागण्या या कॉंग्रेसच्याच मागण्या होत्या. कारण कॉंग्रेसकरितां चळवळ करावी या हेतूनेंच खरोखर ही लीग काढलेली होती. " ता. २७ रोजीं मॉंटेग्युसाहेबांना टिळक एकटेच भेटावयास गेले. त्या भेटीचें स्फूर्तिदायक वर्णन करतांना मॉंटेग्यु आपल्या डायरींत म्हणतात, " दोन प्रहरच्या चहानंतर आम्ही टिळकांस भेटलों. ते एक अगदीं अंतिमटोकास जाणारे राजकारणी पुरुष आहेत. बहुश: हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि गृहस्थापेक्षां त्यांचें वजन अधिक आहे. दिल्लीस मला भेटण्यास येण्यासाठीं ते निघाले तेव्हां त्यांची जी मिरवणूक निघाली होती ती खरोखरी जशी कांहीं विजयाचीच मिरवणूक होती. कॉंग्रेस-लीग योजनेचे खरे जनक तेच आहेत. वादविवादांत त्यांच्या चातुर्याचा मजवर कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं, तरी पण ते अतिशय विद्वान व सुशिक्षित असे एक शास्त्रीय वृत्तीचे गृहस्थ आहेत असें माझें मत झालें. ते म्हणाले, " सरकार जें देईल तें आम्ही घेणारच, तथापि कॉंग्रेस मागतें तेवढें मिळाल्याशिवाय आमचें समाधान होणार नाहीं."

कांहीं थोर लोक टिळकांच्याबद्दल काय म्हणतात तें पाहूं— ॲनी बेझंट म्हणतात, " टिळकांची स्वदेशभक्ति असीम आणि अनंत होती. त्यापायीं येणाऱ्या आपत्ति सोसतांना त्यांना अभिमानच वाटे. त्याकरितां करावा लागणारा त्याग हा भोगाइतकाच त्यांना प्रिय असे. कितीहि छळ झाला तरी त्यांची निष्ठा मावळली नाहीं. ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी

मिळवीनच.' ही त्यांची घोषणा सर्वत्र निनादत राहील." देशबंधु चित्तरंजन दास म्हणतात, "अलौलिक बुद्धिमत्तेमुळें टिळक एकाद्या पर्वतशिखराप्रमाणें भासत; पण त्यांचे पाय त्या पर्वतशिखराप्रमाणेंच इतर सर्व लोकांसारखे भूमीवर खिळलेले असत. आपण उंच पर्वत असलों तरी भूधरच आहोंत, याची त्यांना जाणीव होती. यामुळें ते सर्व लोकांना आपल्यांतले वाटत. आपल्या बुद्धिमत्तेच्या गरुडदृष्टीनें ते उंचावरून परिस्थितीचें आकलन करीत व त्याचा उपयोग आपल्या देशबांधवांबरोबर काम करीत राहून त्यांना देत." योगी अरविंद घोष म्हणतात, "अमुक एक धोरण स्वीकारणें आवश्यक आहे अशी मनाची एकदां निश्चिती झाल्यानंतर त्याचा पुरस्कार, सारें जग विरुद्ध असलें तरी, करण्यास त्यांनीं कधीं सोडलें नाहीं. असें साध्य ठरल्यावर साधनांच्या बाबतींत त्यांनीं आडमुठेपणा केला नाहीं. त्यांचें धोरण तडजोडीचें व उदार असे. ते मिळेल तेवढें पदरांत पाडून घेत व बाकीचें मिळवण्याच्या मार्गास लागत.

"टिळकांनीं आपल्या देशबांधवांना दोन धडे शिकविले. देशभक्तीनें प्रेरित होऊन कर्मयोग आचरावयाचा हा पहिला धडा होय. नुसती महत्त्वाकांक्षा, भावना किंवा उत्साह हीं दृढ-निश्चयाच्या अभावीं वांझच ठरतात. दुसरा धडा म्हणजे प्राप्त कार्यांत येणाऱ्या आपत्तींना किंवा छळाला तोंड देण्याची अखंड तयारी कशी करावी हा होय. विनाकारण तुरुंगवास ओढवून घ्यावयाचा नाहीं, किंवा तें मोठें शतकृत्य आपण करीत आहों अशा आचरटपणानें त्याला कवटाळावयाचेंहि नाहीं. पण कार्य करीत असतां तो उद्भवला तर तो त्या कार्याचाच एक भाग समजून स्वीकारावयाचा व त्याची वाच्यता किंवा जाहिरात न

करतां पुनरपि आपल्या कार्यास सुरवात करावयाची. हिंदुस्थानांत आजवर एकाहि पुढाऱ्यानें इतका तुरुंगवास इतक्या शांतपणें भोगला नसेल. टिळक हे महाराष्ट्र–देशाचें यथार्थ प्रतीक होते."

## ( ७४ ) भारतीय लोकसत्तेचा आद्यप्रणेता—

महाराष्ट्रांतील एक विचारवंत लेखक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनीं "भारतीय लोकसत्तेचा आद्यप्रणेता" या पदवीनें टिळकांचें राजकारणांतील महत्त्व स्पष्ट केलें आहे.

"हिंदुस्थानसारख्या एका मागासलेल्या देशांत टिळकांनीं 'जनता' याच नेमक्या शक्तिदेवतेस आवाहन करावें यांतच त्यांचें लोकोत्तरत्व, त्यांची कालज्ञता व त्यांची सर्वगामी दिव्य दृष्टि यांचें प्रत्यंतर येतें." "टिळकांनीं आपलें शक्तिसर्वस्व, ही भारतभूमि लोकसत्ताक व्हावी यासाठीं खर्च केलें. त्यांच्या जीविताचें ध्येय केवळ स्वातंत्र्य हें नसून लोकसत्ताक स्वातंत्र्य हें होतें.

टिळकांनीं जें लोकजागृतीचें काम केलें, त्याचे दोन भाग पडतात. १८९२ ते १९०३ आणि १९०३ ते १९२०. पहिल्या कालखंडांत 'कायदेशीर झगडा' हें त्यांचें धोरण होतें; पण १९०४ सालापासून ते हळूहळू कायदेभंगाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करूं लागले. बंगालच्या फाळणीमुळें निर्माण झालेल्या प्रक्षोभाचा फायदा घेऊन कायदेभंग, करबंदी, निःशस्त्र प्रतिकार, बहिष्कार किंवा ज्याला अलीकडे सत्याग्रह म्हणतात त्याच्या प्रचारास त्यांनीं मोठ्या साहसानें प्रारंभ केला. १९०७ सालच्या 'नव्या पक्षाचें तत्त्वज्ञान' या व्याख्यानांत कायदेभंग व करबंदी यांची संपूर्ण कल्पना त्यांनीं मांडलेली आहे.

राष्ट्रसभेची संघशक्ति अभंग राखण्याचा प्रयत्न करणें, हें टिळकांच्या आयुष्याचें ब्रीदवाक्य होतें. त्यासाठीं वाटेल ती किंमत देण्यास, वाटेल ती झीज सोसण्यास, व वाटेल तो अपमान सहन करण्यास ते नेहमीं तयार असत."

## (७५) लोकमान्य आणि महात्मा

"भारतीय राष्ट्रवादाचा विकास" या ग्रंथांत या दोन विभूतींच्या भूमिकांची तुलना प्रो. न. र. फाटक यांनीं केली आहे. त्या चिकित्सेचा सारांश असा आहे कीं, "टिळकांची दार्शनिक विद्वत्ता आणि व्यासंग गांधीजीपाशीं नाहीं. स्वार्थ-त्यागांत टिळक गांधीजींच्या बरोबरीला बसणार नाहींत. टिळक हे इंग्रजी सनदशीरपणाच्या राजकारणांत वाढलेले होते. त्यांना कायदेभंगाचें तत्त्व अंमलांत आणण्याची बुद्धि कधीं झाली नाहीं. कायद्यांनीं हित होण्याऐवजीं अहित घडूं लागलें तर त्या कायद्या-चा भंग करणें अवश्य आहे असें तत्त्वज्ञान गांधींनीं स्वतःच्या आचरणांत उतरविलें आणि लोकांना शिकविलें. अहिंसाहिंसेचा गांधींच्या मतामध्यें विधिनिषेध होता; तसा टिळकांच्या मतांमध्यें नव्हता. तथापि सावरकर-पंथाची ओळख घडतांच टिळकांनीं त्यांतील तरुणांची कानउघाडणी केली. कटाच्या कल्पनेचा निषेध केला, तरी टिळकांना हिंसेचा गांधींसारखा अगदीं हाडांत मुरलेला तिटकारा नव्हता; पण परचक्रासारख्या संकटाच्या शहांत ब्रिटिश राज्यकर्तृत्व सांपडल्यास देशाचा फायदा होईल, ही त्यांची भावना ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

"गांधी आणि टिळक हे दोघेहि चारित्र्यवान पुढारी आहेत. सामान्यतः चारित्र्याची उज्ज्वलता पैशाच्या व स्त्रियांच्या बाबतीं-तील निरपवाद वर्तनाच्या कसोटीवर ठरविण्याची रीत आहे.

टिळकांच्या शीलाची परीक्षा प्रायः या दोन गोष्टींनीच केली जाते; परंतु गांधींनीं चारित्र्यशुद्धीची व्याख्या अतिशय विशाल मानून त्या व्याख्येप्रमाणें आचरण करण्याचा अहर्निश प्रयत्न केला. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह इत्यादि धर्म-तत्त्वांची चालतीबोलती मूर्ति ज्यांना पाहावयाची असेल त्यांनीं गांधींचें दर्शन घ्यावें. गांधी व टिळक हे दोघेहि गीतेचे भक्त होते; परंतु एकानें, 'शठाशीं देखील सत्यानें वागावें,' असें तात्पर्य स्वीकारलें तर दुसऱ्यानें, 'शठाशीं शाठ्यानें वागावें,' असें त्याच ग्रंथाचें रहस्य ग्रहण केलें. राहाणीचा साधेपणा हें दोघांतील साम्याचें आणखी एक लक्षण आहे. पण त्यांतहि उत्कट फरक दिसतो. टिळक ब्राह्मण्याचीं संध्यादि कृत्यें नियमानें करीत होते कीं नव्हते याबद्दल शंका आहे. पण गांधींची सकाळ-संध्या-काळची प्रार्थना कधींहि चुकली नाहीं. गांधींनीं पोषाखाचे प्रयोग केले. टिळकांनीं एकदां जो पेहराव घेतला तोच जन्मभर कायम ठेवला. टिळकांची खाण्यापिण्याची व्यवस्था निराळी नव्हती. गांधी आहाराचेहि प्रयोग करीत असत. टिळक पुणें शहरांत जुन्या वाड्यामध्यें राहात होते; गांधींनीं नदीच्या कांठीं सत्याग्रहाश्रम स्थापन केला. हिंदी गिरण्यांतून निघणाऱ्या मालाला स्वदेशी मानून टिळक स्वस्थ राहिले, तर गांधींनीं हात-विणीच्या खादीची जोड देऊन स्वदेशीच्या कल्पनेला भरीवपणा आणला. कॉंग्रेस व सामाजिक सुधारणा यांना अलग ठेवण्याचा टिळकांचा अट्टाहास होता. गांधींनीं कॉंग्रेसच्या राजकारणांत सामाजिक, औद्योगिक अशा सर्व तऱ्हेच्या सुधारणांच्या कल्पना आणून सोडल्या. ध्येयवादी तरुणांनीं देशाच्या कार्याला वाहून घ्यावें अशी तळमळ टिळकांनीं व्यक्त केली, तर गांधींनीं अशा

बाण्याच्या हजारो तरुणाना देशसेवेला जुंपलें. टिळकांनीं देशांतील असंतोष वाढता ठेवला असला तर गांधींनीं त्याला पाट फोडून वाहाता केला. ”

‘ लो. टिळक व म. गांधी ’ या ग्रंथांत आचार्य जावडेकर म्हणतात, “ हिंदुस्थानसारख्या चाळीस कोटी लोकांच्या खंड-तुल्य देशांत एकत्वाची प्राणप्रतिष्ठा करणें; हिंदू व मुसलमान यांसारख्या हिंदुस्थानावर अनेक शतकें सार्वभौमत्व गाजवून त्यासाठीं परस्परांशीं लढणाऱ्या भिन्नधर्मीय लोकांचें ऐक्य साधणें; आधुनिक भौतिकशास्त्रें आणि अद्ययावत् शस्त्रबल व युद्धकला यांत अत्यंत पुढारलेल्या व राजनीतिनिपुण अशा अभूतपूर्व साम्राज्यसत्तेशीं लढा देण्यास अज्ञान, अशस्त्र, असंघटित व अकर्मप्रवण अशा जित जनतेला प्रवृत्त करणें आणि सर्वस्वीं विषम असा हा स्वातंत्र्यसंग्राम आजन्म चालविल्यानंतर तो अखंडितपणें पुढील पिढीनें कसा चालवावा याचें स्पष्ट दिग्दर्शन करून आपला देह इहलोकीं ठेवून अमरलोकांत प्रवेश करणें— या गोष्टी असामान्य विभूतीविना कोणाच्याहि हातून घडण्या-सारख्या नसतात. अशा लोकोत्तर राष्ट्रपुरुषांत लो. टिळकांची अग्रभागीं गणना होत असते. लो. टिळकांच्या कार्याचें महत्त्व यथार्थतेनें वर्णन करावयाचें झाल्यास त्यांना ‘ भारतीय राष्ट्रवादाचे जनक ’ असेंनांव द्यावे लागेल. “ लो. टिळकांनीं राष्ट्रकार्याचा रथ जेथपर्यंत आणून सोडला, त्याच्यापुढें तो नेण्याचें कार्य, म. गांधी करीत आहेत. ” “ लो. टिळकांनीं जनतेंत जें अस्वाथ्य निर्माण केलें, त्यालाच म. गांधींनीं आत्मबलाचें रूप दिलें. लो. टिळकांची बुद्धि अत्यंत तीक्ष्ण व मीमांसक स्वरूपाची होती, तर म. गांधींची बुद्धि अधिक प्रतिभासंपन्न आहे.

लोकमान्य हे भाष्यकारासारखे महापंडित असले, तर महात्माजी हे तत्त्वद्रष्टे आहेत. राजकीय चळवळ कायद्याच्या निःस्सीम टोकापर्यंत भिडवण्याचें कार्य टिळकांनीं मुख्यतः केलें, तर जुलमी कायदे पद्धतशीर रीतीनें मोडण्याची शिकवण गांधीजींनीं दिली. सारांश, म. गांधी हे लोकमान्यांपुढील राष्ट्रकार्य करीत होते.''

## ( ७६ ) लो. टिळकांचे सामाजिक विचार—

परकीय सत्तेशीं झुंज घेत असतांना, फावल्या वेळांत टिळकांनीं समाजकारणहि केलें. महर्षि कर्वे लिहितात कीं, "सन १८९३ च्या मार्च महिन्यांत माझा पुनर्विवाह झाला. त्या वेळीं लोकमान्यांना निमंत्रण गेलें होतें व ते पानसुपारीला आले होते. पुनर्विवाहाच्या प्रश्नासंबंधानें सुशिक्षित लोकांचीं मतें घेण्याचा मी प्रयत्न केला; त्या वेळीं लोकमान्यांनीं पुनर्विवाहिता-बरोबर पंक्तिव्यवहार करण्यास हरकत नाहीं, असा स्पष्ट लेखी अभिप्राय दिला. अनाथ बालिकाश्रम पाहाण्यास ते आले होते व त्यांनीं शेरे-बुकावर संस्थेविषयीं बरा अभिप्राय लिहून ठेवला. स्त्रियांच्या विद्यापीठासंबंधानें मात्र लोकमान्यांकडून मला मदत झाली नाहीं. त्यांनीं स्पष्ट असें सांगितलें कीं, शिक्षणाच्या हल्लींच्या दिशेनें आम्ही पुरुष जसे संशयवादी बनलों आहों तशाच स्त्रिया बनतील आणि आमच्या गृहसौख्याचा नाश होईल."

महर्षि विठ्ठल रामजी शिंदे हे अस्पृश्यता नाहींशी करण्याचा भगीरथ प्रयत्न करणारे एक निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्यांनीं लिहिलेल्या आठवणी वाचणें उद्बोधक होईल. महर्षि शिंदे लिहितात, "ईश्वरी संकेताप्रमाणें लोकमान्यांशीं आदरपूर्ण विरोधभक्तीशिवाय माझा संबंध आला नाहीं. मी लाघवी स्तुति व मत्सरी निंदा दूर ठेवून

लिहित आहे. या थोर पुरुषावर प्रतिस्पर्ध्यांनीं वेळीं अवेळीं कांहीं दोषांचे आरोप केले आहेत. टिळक हे राजकारणांध, समाजकारणविन्मुख, धर्मसुधारणेचे वैरी, इतर जातींचे द्वेष्टे, आपल्या चुका कधींच दुरुस्त न करण्याइतके हेकट, दुसऱ्याच्या सत्प्रयत्नांकडे नेहमीं मत्सराच्या विषारी दृष्टीनेंच पाहाणारे, इत्यादि दोषारोप ऐकून माझे कान किटले आहेत. यांतील कांहीं दोष सूक्ष्म प्रमाणांत दिसले, कांहीं अंशतः दिसले आणि कांहीं मुळींच दिसले नाहींत. सार्वजनिक दोषांपेक्षां सार्वजनिक गुणच त्यांच्यांत अधिक होते. एरव्हीं त्यांच्या शत्रूंनींहि त्यांची गणना थोर पुरुषांत कशी केली असती !

"ऑक्सफर्ड येथील कॉलेजमध्यें तुलनात्मक धर्माचे अध्ययनासाठीं ब्राह्म समाजातर्फे माझी निवडणूक झाली. जाण्यापूर्वी टिळकांचें दर्शन घेऊन त्यांचे विचार ऐकण्याची मला इच्छा झाली. धर्माध्ययनासाठीं विलायतेस जातों, ही गोष्ट ऐकून ते खात्रीनें नाक मुरडतील अशी खूणगांठ मनाशीं बांधून मी गेलों. ते जमिनीवरच बसले होते. त्यांनीं सलगीनें व मोकळ्या मनानें आपले प्रागतिक विचार बोलून दाखविले. 'आमच्या हिंदु-तत्त्वज्ञानांत द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादि तट पडले आणि उपासनेंत शैव, वैष्णव, शाक्त इत्यादि पंथ माजले, त्यायोगें आपली दृष्टि विकृत होऊं न देतां व त्यांचें ऐतिहासिक महत्त्वहि कमी न करतां, उपनिषद्-काळांत हिंदूंची जी निर्भय व स्वतंत्र दृष्टि होती तीच राखून पौरस्त्य व पाश्चात्य आचारविचारांची तुलना करण्यास शिका.' असा त्यांनीं प्रेमाचा इषारा दिला. मला सानंद आश्चर्य वाटलें.

"१९१६ सालीं लखनौच्या कॉंग्रेसमध्यें हिंदु-मुस्लीम स्कीम पास झाली. त्यांत टिळकांचा पुढाकार होता. ह्या स्कीमला बहुजन-

समाजाचा पुरस्कार नाहीं अशा अर्थाचा आक्षेप इंग्लंडांतील सुधारणाद्वेष्ट्यांकडून घेण्यांत आला. मॉन्टेग्यूसारख्या सुधारणावाद्यांनाहि अशा आक्षेपांस हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाकडून उत्तर जावयास पाहिजे होतें. अशा आणीबाणीच्या वेळीं मागासलेल्या सर्व जातींकडून स्वराज्याच्या योजनेला सहानुभूति मिळविणें आम्हांस जरूर होतें. या वेळीं महाराष्ट्रांत ब्राह्मणेतर पक्षाची नवीन घटना चालू होती. २६-८-१७ रोजीं 'मराठा राष्ट्रीय संघाची' स्थापना झाली. ८-११-१७ रोजीं शनवारवाड्यासमोर सर्व जातींच्या, धर्मांच्या व पंथांच्या लोकांची सभा भरली. १८ जातींच्या वक्त्यांनीं ठरावावर भाषण केलें. केवळ ब्राह्मणांचे प्रतिनिधि या नात्यानें टिळकांनीं बोलावें अशी मी त्या सभेचा अध्यक्ष या नात्यानें विनंति केली. त्यांनीं आपला पक्षाभिमान बाजूस ठेवून ती विनंति मान्य केली. 'आतां आपल्याला पूर्वींचें स्वराज्य नको असून पाश्चात्य धर्तीवरील स्वराज्य पाहिजे आहे,' असें सांगून ते म्हणाले, 'आपल्या जातिभेदामुळेंच येथें ब्रिटिशराज्य स्थापन झालें आहे व जातिभेद असाच पुढें चालू राहाणार असेल तर स्वराज्यांतहि आमची अशीच अधोगति होईल,' असें स्पष्ट बोलून त्यांनीं आपली समयानुकूलता प्रकट केली.

"पुढील वर्षीं अखिलभारतीय अस्पृश्यता-निवारण परिषद् बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. 'कॉंग्रेसनें अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधि घेऊन आपल्या कार्यास त्यांचा पाठिंबा मिळवावा.' अशा अर्थाचा ठराव लोकमान्यांनीं ता. २४ मार्च १९१८ रोजीं सकाळच्या बैठकींत आणला. त्यावेळीं लोकसमुदाय ७००० वर जमला होता. मंडपाच्या बाहेरहि सारखी रेटारेटी चालू होती. लोकमान्यांसहि

आवेश चढून त्यांच्या गर्जना मंडपाबाहेर रस्त्यांतच नव्हे तर पलीकडील चाळींत राहाणाऱ्या लोकांच्या कानांवरहि आदळत होत्या. 'पेशव्यांच्या वेळींहि अस्पृश्यांनीं भरलेल्या पखालींतील पाणी ब्राह्मण प्याले. If God were to tolerate untouchability, I would not recognise Him as God at all. अस्पृश्यता जर देवास मान्य असेल तर मी त्यास देवच मानण्यास तयार नाहीं. (हे उद्गार ऐकून जो टाळ्यांचा गजर झाला त्यांत मंडप कोसळून पडतोसें वाटलें.) मी येथें जरी आज शरिरानें प्रथमच आज आलों आहे, तरी मनानें या चळवळींत नेहमींच आहे. जुन्या काळीं ब्राह्मणांच्या जुलुमानें ही चाल पडली, हें मी नाकारीत नाहीं. पण त्या रोगाचें आतां निर्मूलन झालेंच पाहिजे.' हे त्यांच्या तोंडचे शब्द भावि इतिहासांत दुमदुमत राहातील."

## (७७) मुलांचें शिक्षण—

राष्ट्राचा व्याप संभाळून टिळक आपल्या मुलामुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देत. त्यांची कन्या सौ. पार्वतीबाई या आपल्या शिक्षणाची माहिती देतात कीं, "मी फीमेल हायस्कूलमध्यें जात होतें. तेथें मराठी चवथ्या इयत्तेबरोबर इंग्रजी पहिलीचें शिक्षण देत. १२ वर्षांनंतर मुलींचें लग्न होतें व तोंपर्यंत मराठीहि पुरतें होत नाहीं व इंग्रजीहि अर्धवटच होतें. करितां अगोदर मराठी पूर्ण झाल्याखेरीज इंग्रजी शिकवूं नये असें ती. दादांचें मत होतें. ती. दादांनीं शाळेंत जाऊन इंग्लिश तासाचे वेळीं मी दुसऱ्या एखाद्या वर्गांत गणित अगर संस्कृत तासाला जावें अशी व्यवस्था केली. याबद्दल शाळेंतील मंडळी ती. दादांना विक्षिप्त म्हणत व टीका करीत.

श्रीधरपंत टिळक सांगतात कीं, "घरगुती संभाषणांत ते मुलांना मार्मिक व मनोरंजक गोष्टीहि सांगत. एका गोष्टीचा प्रसंग पुढें दिल्याप्रमाणें झाला असेल. रविवार होता. संध्याकाळचे सहा वाजले. दादांच्या सभोंवतीं मुलें बसलीं होतीं. इतिहासाच्या अभ्यासाची चौकशी करतां–करतां सरदार पटवर्धन यांच्याबद्दल बोलणें निघालें. तेव्हां टिळक सुपारीचीं खांडें तोंडांत टाकतांना म्हणाले असतील, 'मी तुम्हांला पटवर्धनांची एक गोष्ट सांगतों.' 'गोष्ट' हा शब्द ऐकतांच मुलें वर्तुलाकार सावरून बसली, त्यांनीं आपले कान टवकारले. सर्वांचे डोळे गोष्टीकरितां उत्सुक झाले. टिळक गोष्ट सांगूं लागले. ते म्हणाले, "समशेरबहादर परशुराम-भाऊ पटवर्धन एकदां हजामतीस बसले होते. तेव्हां न्हाव्याचा वस्तारा फार लागूं लागला. वांकविलेलें डोकें वर करून ते म्हणाले, 'अरे! वस्तार्‍याला नीट धार लाव आणि जपून हजामत कर.' न्हावीदादांच्या डोक्यावर केस नव्हते, पण त्यांचा मेंदु सुपीक होता. न्हावीदादा खांदे उडवून म्हणाले, 'काय राव! तुम्हांला वस्तरा बी सोसवत नाहीं? मग मोठमोठ्या लढाया कशा मारतां?' अर्थातच परशुरामभाऊंना ही भाषा झोंबली; पण ते त्या वेळीं कांहीं बोलले नाहींत. हजामत संपल्यावर त्यांनीं आपला धारदार भाला मागविला व न्हाव्याचे पावलावर आपलें पाऊल दाबून धरून भाला अशा सफाईनें फेकला कीं त्याचें फाळ दोघांचें पावलांतून घुसून खालीं जमिनींत रुतलें. त्याबरोबर न्हावीदादांनीं बोंबाबोंब सुरू केली. वेदना असह्य झाल्यामुळें त्याला ओरडतांना पाहून, परशुरामभाऊ शांतपणानें म्हणाले, "लेका! आतां का ओरडतोस? भाला जसा तुझ्या पावलांतून तसा माझ्याहि पावलांतून आरपार गेला आहे. समजलें ना तुला,

आम्हीं लढाईंतील जखमा कशा सहन करतों तें? लढाई ती लढाई आणि हजामत ती हजामत. लढाईंतील सहनशीलता हजामतीचे प्रसंगींहि दिसून आली पाहिजे हा तुझा आग्रह कोठला?' यानंतर परशुरामभाऊंनीं तो भाला बाहेर काढला, वैद्याला बोलावलें आणि न्हाव्याचा पाय बरा करण्याची व्यवस्था केली.

"औषधाचे गुणधर्मावरून बोलतां बोलतां सहज गोष्ट निघाली. पूर्वीं औषधांचे गुणधर्म जाणण्याचे कामीं वैद्याकडून किती मेहेनत घेण्यांत येत असे, याचें उदाहरण म्हणून त्यांनीं जीवक नांवाच्या विद्यार्थ्याची गोष्ट सांगितली. गोष्टीला सुरवात झाल्याबरोबर मुलामुलींनीं कुतूहलानें व उत्सुकतेनें ती गोष्ट ऐकली असेल. टिळक म्हणाले, 'जीवक नांवाचा एक बुद्धिमान् व कष्टाळू विद्यार्थी वैद्यविद्येचें अध्ययन करण्याकरितां तक्षशिला नगरींत गेला. तो गुरुगृहीं राहूं लागला. त्यानें लक्ष लावून चिकित्सापूर्वक अनेक वनस्पतींचा अभ्यास केला. वैद्यशास्त्राचें अध्ययन पुरें झाल्यावर जीवकानें गुरुजींजवळ घरीं जाण्यास परवानगी मागितली. गुरुजी म्हणाले, 'जीवका! या नगरीच्या आसपास पांच कोसांच्या आंत, ज्या वनस्पतींचे गुणधर्म तुला माहीत नाहींत अशी एक वनस्पति घेऊन ये.' गुरुजींची आज्ञा घेऊन जीवक निघाला. त्यानें पंचक्रोशींतील पाननूपान तपासून पाहिलें नंतर तो गुरुगृहीं आला आणि म्हणाला, 'गुरुजी! आपण सांगितल्याप्रमाणें मी आसपास चोहोंकडे हिंडून आलों. जिचे गुणधर्म मला माहीत नाहींत अशी एकहि वनस्पति मला आढळली नाहीं.' हें उत्तर ऐकतांच संतुष्ट झालेले गुरुजी

म्हणाले, 'जीवका! तुला घरीं जाण्याला परवानगी आहे. आयुर्वेदाच्या परीक्षेंत तूं उत्तीर्ण झाला आहेस.' "

रामभाऊ टिळक सांगतात कीं, "एकदां सिंहगडावर असतांना ती. दादांनीं आम्हांस पुढील उपदेश केला. ते म्हणाले, 'तुही पाहिजे तो धंदा करा. तुम्ही जोडे तयार केले तरी मला वाईट वाटणार नाहीं. ब्राह्मणाचीं मुलें चांभाराचा धंदा करूं लागलीं म्हणून मला दुःख होणार नाहीं. जें कांहीं कराल तें इतकें उत्कृष्ट झालें पाहिजे कीं त्या धंद्यासंबंधीं कोणी विचार करूं लागला तर तुमचें नांव त्याचे मनामध्यें पहिल्यांदा उभें राहिलें पाहिजे. उदाहरणार्थ, चहाची आठवण झाली कीं लिप्टन्, बिस्किटांची आठवण झाली कीं हंटले–पामर हीं नावें डोळ्यांपुढें उभीं राहातात. शारीरिक शक्ति म्हटली कीं सँडो आणि राममूर्ति यांचीं नांवें आठवतात. याप्रमाणें तुम्ही ज्या व्यवसायांत पडाल, त्याची गोष्ट निघाली असतां तुमचें नांव लोकांच्या मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें पाहिजे. तुम्हांस जो हा मानवजन्म मिळाला आहे त्याचें कांहीं तरी सार्थक करून दाखविलें पाहिजे."

## (७८) मॉंटेग्यु यांनीं स्वराज्याची घोषणा केली—

१९१७ साल उजाडलें; पण स्वातंत्र्याचा सूर्य दिसला नाहीं. एकसष्टाव्या वर्षांत पदार्पण करणारे तपोवृद्ध टिळक राष्ट्राचें पाऊल पुढें कसें पडेल याची चिंता करीत तरुणाच्या उत्साहानें, मुत्सद्यांच्या दूरदृष्टीनें, रणझुंजार नेत्याच्या साहसानें आणि स्थितप्रज्ञाच्या वृत्तीनें सार्वभौम सत्तेशीं झगडा करीत होते. १९१७ सालच्या डिसेंबर महिन्यांत कलकत्त्याला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. २०–८–१९१७ रोजीं मॉंटेग्युसाहेबांनीं

स्वराज्याची घोषणा केली. त्या घोषणेचे तीन भाग पडतात. (१) हिंदुस्थानला स्वराज्य द्यावयाचें. (२) हें स्वराज्य हप्त्यांनीं द्यावयाचें. (३) हप्ते केव्हां व कसे द्यावयाचे तें पार्लमेंटनें ठरवावयाचें. पहिले दोन भाग टिळक आणि इतर पुढारी यांनीं मान्य केले. तिसरा भाग अमान्य केला. या मुद्यावर भाषण करतांना लो. टिळक म्हणाले, "जबाबदारीचें स्वराज्य देण्यांत येईल असें जें मँटेग्यु यांनीं उत्तर दिलें, त्याबद्दल आम्ही कृतज्ञतापूर्वक समाधान मानीत आहोंत. घोषणेच्या तिसऱ्या भागांत म्हटलें आहे कीं, हे हप्ते ब्रिटिश सरकारनें ठरवावेत, हें आम्हांस मान्य नाहीं. हे हप्ते आम्हीं ठरविले पाहिजेत. या बाबतींत आम्हांला कोणतीहि तडजोड नको आहे. हे हप्ते आतांच निश्चित करा आणि त्यांची कालमर्यादा याच कायद्यांत ठरवून टाका. आमच्या आकांक्षा तृप्त करण्यासाठीं कॉंग्रेस-लीग योजना तावडतोब दिली पाहिजे, ही किमान मागणी आहे. म्हणजे हिंदुस्थानांत स्वराज्यसंस्थापनेची मुहूर्तमेढ रोवली गेली असें म्हणतां येईल." लो. टिळकांनीं संपूर्ण स्वराज्याच्या मागणीचा ठराव कॉंग्रेसकडून या अधिवेशनांत मान्य करून घेतला; पण कॉंग्रेसनें कोणताहि निर्णय दिला तरी मँटेग्यू दयावंत होऊन देतील त्या सुधारणा आम्ही नांदविणार, असा प्रागतिक पक्षानें आग्रह धरला. देशबंधु दास म्हणाले, "आम्ही या सुधारणा मोडून टाकणार." सुरेंद्रनाथ बानर्जी उद्गारले, "आम्ही या सुधारणा चालवून दाखविणार." भारतीय राष्ट्रवादाचे जनक टिळक म्हणाले कीं, "मोडून टाकणारे किंवा चालविणारे तुम्ही कोण? हें कार्य एकानें करावयाचें नाहीं. दोघांनीं एकाच राष्ट्रसभेंत राहावें आणि तिच्या शिस्तीखालीं तिची आज्ञा शिरसावंद्य मानून ती सांगेल त्याप्रमाणें सर्वांनीं वागावें."

" घरांत दोन वेळां चहा होत असे. पण आम्हांला सौ. आई चहा देत नसे. आम्हीं दूध घेत असूं. एक दिवस चहाच्या वेळेस आम्हीं ती. दादांना म्हणालों, ' तुम्हीं कसा रोज चहा घेतां ? ' तेव्हां ती. दादा म्हणाले, ' बाप दारूबाज असला तरी मुलांनीं दारू पिऊं नये. आम्हांला आतां संवय लागली. तुम्हीं लावून घेऊं नका.' "

ल. रा. पांगारकर लिहितात कीं, " टिळकांची तिसरी मुलगी १२ वर्षांची असतांना आम्हीं त्याचे घरीं बोलत बसलों होतों. बळवंतराव महाभारतांतील कांहीं गोष्टी सांगत होते. मुलगी शेजारींच होती. त्यांनीं आम्हांस विचारलें, ' या मुलीला आम्हीं किती शिक्षण दिलें आहे हें तुम्हांस माहीत आहे कां ? ' आम्हीं, नाहीं म्हणतांच बळवंतरावांनीं तिला साविर्त्रीगीत म्हणून दाखविण्यास सांगितलें. ते म्हणाले, ' मी हिच्याकडून मोरोपंतांनीं मुलींसाठीं केलेलें सावित्रीगीत व रुक्मिणीगीत पाठ करवून घेतलें आहे. सध्यां सीतागीत चालू आहे. रामायण, भारत यांमधील सर्व कथा हिला ठाऊक आहेत. आमच्याकडे कथाकीर्तन झालें, किंवा व्याख्यान झालें तर तें तिला समजण्यास पंचाईत पडत नाहीं. '

"एकदां मोरोपंत कवीनें कोणकोणत्या पोथ्या लिहून घेतल्या याबद्दल बोलणें निघालें. तेव्हां टिळक म्हणाले. ' लिहिण्याची पद्धत अलीकडेच मोडली आहे. तरुण विद्यार्थी आळशी होत चालले आहेत. आमच्या वेळेपर्यंत ग्रंथ लिहून घेण्याची चाल होती. मी कॉलेजांत असतांना पहिल्या वर्षी सगळा रघुवंश आपल्या हातानें लिहून घेतला आहे.' "

थोड्याच दिवसांनीं मुंबईला खास राष्ट्रसभा झाली. या सभेंत लो. टिळक, डॉ. बेझंट आणि प्रागतिक पुढारी या सर्वांच्या एकमतानें एक ठराव पास झाला. तो घेऊन राष्ट्रसभेचें शिष्टमंडळ विलायतेस गेलें.

## ( ७९ ) इंग्रजांच्या राजधानींत—

सर व्हॅलेंटाइन चिरोल हे साम्राज्यवादी वृत्तीचे एक पत्रपंडित होते. यांनीं भारतांत प्रवास केला आणि विलायतेंत परत गेल्यावर लंडन टाइम्समध्यें टिळकांची बदनामी करणारे लेख लिहिले. टिळक तुरुंगांतून सुटून आल्यावर त्यांनीं हे लेख वाचले आणि विलायतेंत दिवाणी दावा लावला. हिंदुस्थानांतील पूर्वतयारी होऊन विलायतेंतील काम चालविण्याकरितां टिळकांना तेथें जावयाचें होतें. त्यापूर्वीं टिळकांनीं एक मोठा दौरा काढला. त्यांत त्यांना थैलीच्या रूपानें हजारों रुपये विलायतेंतील चळवळीला मदत म्हणून मिळाले. बॅ. बाप्टिस्टा यांना टिळकांनीं यापूर्वींच विलायतेस पाठविलें होतें. टिळक कोलंबोपर्यंत गेले. इतक्यांत युद्धाचें निमित्त करून सरकारनें त्यांचे पासपोर्ट रद्द केले. टिळक हिंदुस्थानांत परत आले.

दिल्ली येथें व्हाइसरॉय साहेबांनीं युद्धपरिषद भरविली. प्रत्येक प्रांतांतील प्रतिनिधी बोलावले होते; पण टिळकांना वगळले. म. गांधींना परिषदेचें निमंत्रण होतें. त्यांनीं सांगितलें कीं, टिळक, डॉ. बेझन्ट व अलीबंधू यांसारखे पुढारी वगळून तुम्हांला मनुष्य-बळ कसें मिळणार ?

दिल्ली वॉर-कॉन्फरन्सचें कार्य पुढें चालविण्याकरितां मुंबईस टाऊन हॉलमध्यें सभा भरली. लॉर्ड वुइलिंगडन यांनीं टिळकांना निमंत्रण दिलें. सभा सुरू झाली. टिळकांना भाषण करण्यास

बोलाविलें. टिळक म्हणाले, “ हिंदुस्थानावर आज ना उद्यां स्वारी झाली तर आम्ही हिंदी लोक प्रतिकारार्थ आपले देहहि खर्ची घालूं; पण स्वराज्य व स्वदेश-संरक्षण यांची सांखळी आम्हांला तोडतां येत नाहीं. ” हें वाक्य उच्चारतांच गव्हर्नर साहेबांनीं टिळकांचें भाषण थांबविलें. गव्हर्नर म्हणाले, “ या सभेंत मी राजकारणाची चर्चा करूं देणार नाहीं. ” त्यावर टिळक म्हणाले, “ अशा परिस्थितींत परिषद् सोडून जाण्या-शिवाय कोणाहि स्वाभिमानी मनुष्याला दुसरा मार्ग नाहीं; म्हणून मी निघून जातों. ” टिळक सभेंतून निघून गेले.

पुढें जून महिन्यांत शांतारामाच्या चाळींत म. गांधींच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली. म. गांधी म्हणाले, “ लॉर्ड वुइलिंग्डन् यांच्या वर्तनाचा मी निषेध करतों. टिळकांचा असा उपमर्द केल्यानें साम्राज्याच्या कार्याला अपायच आहे. ” टिळक म्हणाले, “ देशावरील बंधनें अधिक वाढवून घेण्याकरितां सरकारास कोण मदत करील ? लष्करांत वरिष्ठ जागा देण्याचें सरकार कबूल करील तर मी पांच हजार लोकांची भरती करीन व तसें मजकडून न होईल तर कमी पडतील त्या माणसागणिक मी १०० रुपये दंड देईन आणि त्याची जामीनकी म्हणून मी म. गांधींच्या जवळ ५० हजार रुपये ठेवण्याला तयार आहे. ”

ता. १९ सप्टेंबर रोजीं टिळक विलायतेला गेले. ऑक्टोबर महिन्यांत दिल्ली येथील कॉंग्रेसच्या अध्यक्षाच्या निवडणुकीचें काम सुरू झालें. स्वागतसभेनें त्यांची एकमतानें निवड केली आणि टिळकांना त्याप्रमाणें तार पाठविली. टिळक काम संपल्याशिवाय परत येणें शक्य नव्हतें; पण कॉंग्रेसचे नियोजित अध्यक्ष म्हणून बोलणें करण्यास त्यांना एक प्रातिनिधिक दर्जा प्राप्त झाला.

टिळक विलायतेंत चौदा महिने राहिले. त्या अवधींत त्यांनीं परराष्ट्रीय स्वरूपाचें राजकारण पुष्कळच केलें. नंतर भरलेल्या तह-परिषदेचे अध्यक्ष क्लेमँको यांकडे हिंदुस्थानचा अर्ज दाखल केला. अनेक चौक्या-पाहाऱ्यांतून हिंदुस्थानची कैफीयत प्रेसिडेन्ट वुइल्सन् याजपर्यंत भिडविली. जॉइन्ट सिलेक्ट कमेटीपुढें होमरूल लीगतर्फें साक्ष दिली. विलायतेंतील उदयोन्मुख मजूर पक्षाशीं ऋणानुबंध प्रस्थापित केला.

## ( ८० ) सर एडवर्ड कारसन—

टिळकांच्या फिर्यादीच्या सुनावणीला ता. २९-१-१९१९ रोजीं सुरुवात झाली. डार्लिंग हे न्यायाधीश होते. स्पेशल ज्यूरी नेमण्यांत आली. टिळकांतर्फें सर जॉन सायमन यांनीं व्यवहारी दृष्टीनें काम करण्याचें पत्करलें. टिळकांच्या राजकीय मतांशीं ते सहमत नव्हते. टिळकांचा या खटल्यांतील जय किंवा पराजय याबद्दल त्यांना सोयर-सुतक वाटणार नव्हतें. इतक्या निर्विकार-पणानें सर जॉन सायमन सुवर्णलाभाकडे अधिक लक्ष देऊन टिळकांचे वकील झाले होते. चिरोलच्या बाजूनें केस लढविण्याचे बकासुरी वीरवृत्तीचे सर एडवर्ड कारसन यांनीं आनंदानें मान्य केलें होतें.

शेवटीं सर एडवर्ड कारसन समारोपाच्या भाषणांत म्हणाले, "हा खटला महत्त्वाचा आहे. टिळकांनीं राजद्रोहाच्या दोन मोहिमा केल्या. एका मोहिमेच्या शेवटीं रॅन्डचा खून झाला. दुसऱ्या वेळीं डॉकसनचा खून झाला. टिळकांची नुकसान-भरपाई योग्य रीतीनें ज्यानें होईल इतकें हलकें नाणें जगांत आहे असें वाटत नाहीं. आपण त्यांच्यातर्फें निकाल देऊन जगाला असें जाहीर करणार कीं काय, टिळकांचे मार्ग

बरोबर होते ? ज्यूरींतील सभ्य गृहस्थहो ! या खटल्याला सार्वजनिक स्वरूप आहे आणि तें महत्त्वाचें आहे हें विसरूं नका. कारण तुमच्याकडून अनुकूल न्याय मिळाला म्हणजे तो घेऊन हे हिंदुस्थानांत जाणार आणि लोकांना सांगणार कीं, मी असें लिहिलें तरी विलायतेंतील ज्यूरीनें माझी अब्रू साफ करून दिलीच कीं नाहीं ? १८९३ पासून १९१८ पर्यंतचें टिळकांचें एकंदर चरित्र लक्षांत आणा आणि काय निकाल द्यावयाचा तो द्या."

नंतर सायमन यांचें भाषण झालें. शेवटीं न्या. डार्लिंग यांनीं समारोप केला. त्यांचें भाषण झाल्यावर ज्यूरींतील गृहस्थ ५ वाजून ५० मिनिटांनीं आपल्या खोलींत गेले आणि ६ वाजून १७ मिनिटांनीं बाहेर आले.

**न्या. डार्लिंग**—तुम्ही सर्वांनीं एकमतानें निकाल ठरविला आहे काय ?

**फोरमन**—होय.

**न्या. डार्लिंग**—तुमचा निकाल कोणातर्फे आहे ?

**फोरमन**—चिरोलतर्फे, म्हणजे प्रतिवादीतर्फे.

**कार्सन**— निकाल आमच्यासारखा झाला तेव्हां आमचा खर्चहि देववावा.

**न्या. डार्लिंग**—ठीक आहे.

## ( ८१ ) स्थितप्रज्ञवृत्तीनें पराजयाचा स्वीकार—

खटल्याचा निकाल विरुद्ध लागला. टिळक दरिद्री झाले. त्यांचें घरसुद्धां गहाण पडलें. तीन लक्ष रुपये खर्च झाला. एखादा पुढारी खचून गेला असता; पण टिळक म्हणाले, " मी

माझे अपूर्ण राहिलेले ग्रंथ पुरे करून त्यावर हजारों रुपये मिळवीन आणि ऋणमुक्त होईन." या वेळीं टिळकांनीं धोंडोपंत विद्वांस यांस पुढील पत्र पाठविलें.

लंडन, १० एप्रिल १९१९.

अनेक आशीर्वाद विशेष.

तुमचें पत्र व सुपारीचें पार्सल पोंचलें. केसचा निकाल विरुद्ध लागला तरी त्याचा माझ्या प्रकृतीवर यत्किंचितहि परिणाम झाला नाहीं. यापेक्षां कितीतरी वाईट दिवस आम्हीं पाहिले आहेत, आणि याचा परिणाम जर माझ्यावर झाला असतां तर आज आहे तसा मी राहिलोंच नसतों. कळावें.

आपला

**बाळ गंगाधर टिळक**

याच सुमारास एका संस्थेनें टिळकांना सभेला बोलावलें. तेव्हां एक मौज झाली. बूट, पॅन्ट, लॉंग कोट, नेकटॉय नाहीं, पगडी, हातांत काठी अशा पोशाखांत हिंदुस्थानांतील अस्वस्थतेच्या जनकांनीं सभागृहांत प्रवेश केला. पलीकडे लॉर्ड सिडनहॅम यांची पत्नी सत्तामदाच्या तोऱ्यांत उभी होती. तिनें टिळकांना पाहिलें. तिच्या कपाळावर आठ्या दिसूं लागल्या. सभेच्या एका चालकाला ती असभ्य उग्रतेनें म्हणाली, "टिळक हा राजद्रोही माणूस आहे. माझ्या नवऱ्यानें याला सहा वर्षें काळें पाण्यावर पाठविलें. तुम्ही त्याला सभेला बोलवतां, हा आमचा अपमान आहे." श्रीमती सिडनहॅम याप्रमाणें अकलेचे तारे तोडीत असतांना प्रीव्ही कौन्सिलचे न्यायमूर्ति लॉर्ड शॉ रे हे तेथें आले. बॅ. बॅप्टिस्टा जवळच उभे होते. त्यांनीं टिळक व न्या.

शॉ यांची ओळख करून दिली. तेव्हां न्या. शॉ यांना फार आनंद झाला. टिळकांशीं दोनदोनदां शेकहॅन्ड करून ते म्हणाले, " ओ ! इज धिस मिस्टर टायलक, दि ग्रेट मॅन ऑफ इन्डिया !" हें पाहून श्रीमती सिडनहॅम खजील झाल्या. त्यांनीं तोंड फिरविलें. हे दोन्ही प्रकार जवळ जवळ एकदम घडलेले. बॅ. बॅप्टिस्टा यांना हांसे आवरेना.

खटल्याचा निकाल लागल्यावर ऑब्झर्वर पत्राच्या वार्ताहरानें चिरोल यांची मुलाखत घेतली. त्यावेळीं सर व्हॅलंन्टाइन चिरोल म्हणाले, " खटला जिंकल्याबद्दल मला समाधान वाटत आहे. मी वर्तमानपत्रांत लिहिण्याचा धंदा आज अनेक वर्षें करीत आहे. या अवधींत मला आडवून खडसावून जाब विचारणारे दोनच धीट गृहस्थ आढळले. पैकीं एक टिळक आणि दुसरे जर्मन बादशहा कैसर वुइल्यम. " पुढें चिरोल साहेबांनीं एका पुस्तकांत असें लिहिलें कीं, " टिळक हे पुण्याचे चित्पावन ब्राह्मण. हल्लींच्या काळीं या चित्पावन जातीनें जितके कर्तृत्ववान् व शीलसंपन्न पुढारी निर्माण केले, तितके इतर कोणत्याहि जातीनें केलेले नाहींत. हल्लींच्या काळीं त्यांच्याइतका लोकोत्तर पुरुष कोणीच झाला नाहीं. कदाचित् गांधी त्यांच्या बरोबरीला येतील. गांधींचा सौम्यपणा व विनय टिळकांच्या अंगीं नाहीं. पण बुद्धिमत्ता व राजकारणांतील मार्मिकपणा हे गुण गांधींपेक्षां टिळकांच्या अंगीं अधिक प्रमाणांत आहेत. बॉंबगोळ्याचें रहस्य लोकांना पटविल्याबद्दल टिळकांना शिक्षा झाली. बाहेर येतांच त्यांनीं स्वराज्याची चळवळ केली. लखनौ येथें टिळक व डॉ. बेझंट व्यासपीठावर चढले, तेव्हां ईश्वराचे अवतार प्रगट झाल्या-प्रमाणें लोकांनीं त्यांना उत्थापन दिलें व अभिनंदन केलें. "

### (८२) अमृतसर येथील कत्तल—

टिळक विलायतेंत असतां रौलेट बिलें पास होऊन हिंदुस्थानांत प्रचंड चळवळ झाली. ता. ५ फेब्रुवारी १९१९ रोजीं हीं दोन बिलें कौन्सिलपुढें आलीं. सर नारायण चंदावरकर यांनींहि नापसंती दर्शविली. वाच्छा, पटेल, सप्रू, सुरेन्द्रनाथ, खापर्डे या सर्वांनीं विरोध केला. तरीहि सरकारी बहुमतानें बिलें पास झालीं. म. गांधींनीं या बिलांविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ करण्याचें जाहीर केलें. ३० मार्च रोजीं दिल्ली येथें हिंदु-मुसलमानांनीं हरताळ पाळला. पोलिसांनीं गोळीबार केला. या वेळीं चौकशी करण्याकरितां हुतात्मा स्वामी श्रद्धानंद पुढें आले. दोन सैनिकांनीं त्यांच्यावर बंदुकी रोखल्या. श्रद्धानंद म्हणाले, "मैं खडा हूं, गोली चलाव!" इतक्यांत अधिकाऱ्यानें रायफली खालीं करण्यास सांगितलें.

अमृतसर या ठिकाणीं सरकारनें भयकारी अत्याचार केले. महायुद्धांत जय मिळाल्यामुळें सरकार धुंद झालें होतें. सत्याग्रहाच्या चळवळीबद्दल अमृतसर येथील दिवे व पाणी पांच दिवस बंद करण्यांत आलें. डे. पो. क. मि. मसूर म्हणाले, "युरोपियनांच्या एकेका खुनाला नेटिव्हांचे हजारों मुडदे पाडले पाहिजेत." दुसरा अधिकारी म्हणाला, "अमृतसरवर तोफांचा भडिमार करून शहर उध्वस्त करा." पंजाबचे गव्हर्नर ओडवायर म्हणाले, "म. गांधींच्या आत्मबलापेक्षां माझे मनगटाचें बळ अधिक जबरदस्त आहे." ता. ६ एप्रिल रोजीं लोकांनीं अमृतसर येथें हरताळ पाळला. ५० हजार लोकांची सभा शांततेनें पार पडली. ता. १३ एप्रिल १९१९ रोजीं एका सरकारजमा माणसानें जालियनवाला बागेंत सभा भरणार आहे

असें जाहीर केलें. त्या दिवशीं जत्रा होती. वर्षप्रतिपदेचा दिवस. बागेंत २० हजार लोक जमले. इतक्यांत जनरल डायर २५ गुरखे व २५ शीख असे सशस्त्र सैनिक घेऊन आला. बरोबर दोन चिलखती लष्करी गाड्या होत्या. डायरनें गोळीबाराचा हुकूम केला. एक हजार निरपराधी जीव बळी पडले. दोन हजार जखमी झाले. आकाशांत एक विमान घिरट्या घालीत होतें. संध्याकाळ झाली. गोळ्या संपल्यामुळें कत्तल बंद करून डायर निघून गेला. जालियनवाला बागेंत करुण, रौद्र, बीभत्स व भयानक रसांनीं परिपूर्ण असा देखावा दिसूं लागला. प्रेतांचा व मृतप्राय देहांचा खच पडला होता. रात्रीं ८ नंतर जो बाहेर दिसेल त्याला गोळी घालून ठार करूं असा लष्करी हुकूम असल्यामुळें बागेंतील दुर्दैवी जीवांना पाणीहि मिळालें नाहीं. रतनदेवी नांवाची एक महिला आपल्या पतीला शोधण्यास रात्रीं बागेंत आली. तिनें पतीचें प्रेत धुंडाळून काढलें. प्रेत घरीं नेण्यास कोणी मदत करीना. तेव्हां ती त्या कत्तलखान्यांत पतीच्या शेजारीं जाऊन बसली. लवकरच त्या मसणवटींत कुत्र्यांचा धुमाकूळ सुरू झाला. रतनदेवीनें जवळ पडलेली एक काठी घेतली व आपल्या पतीच्या प्रेताचें कुत्र्यापासून रक्षण करीत ती काळरात्र घालवली.

## (८३) लोकमान्य टिळक देवमान्य झाले—

टिळकांचें कार्य संपत आलें होतें. म. गांधींचा उदय झाला होता. जालियनवाला बागेंतील हत्याकांड पाहिल्यावर म. गांधींचा इंग्रजांच्या न्यायनीतीवरील विश्वास उडाला. ता. २७ नोव्हेंबर १९१९ रोजीं टिळकांचे लटपटणारे पाय मुंबईच्या बंदराला लागले. त्यांच्या कानांची ऐकण्याची शक्ति कमी झाली. बरेच दांत

पडले होते. दूरदृष्टि कायम होती, तरी चर्मचक्षूंनीं कमी दिसूं लागलें. त्यांचा मित्र मधुमेह शरीर झिजवीतच होता. प्रागतिक आणि ब्राह्मणेतर हे दोन पक्ष एक होऊन त्यांना विरोध करीत होते. झगडा करतां-करतां त्यांची तनु भागली, आणि कृतांतकटका-मलध्वजजरा दिसों लागली..... या वेळीं प्राणविहंगम पंजरांतून बाहेर जाण्याला उत्सुक झाला होता. तो प्राणविहंगम असें म्हणत होता कीं, " आम्ही जातों आपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा. "

लो. टिळक पुण्यनगरींत आल्यावर त्यांच्या अनुयायांनीं चिरोल-केसच्या खर्चाकरितां जमविलेले तीन लक्ष रुपये त्यांना अर्पण केले. टिळक म्हणाले, " आज तुम्ही मला विकत घेतलें आहे. " १९१९ च्या डिसेंबर महिन्यांत अमृतसर येथें कॉंग्रेसचें अधि-वेशन झालें. त्या अधिवेशनास टिळक उपस्थित राहिले. " मॉंटेग्यू-प्रणित पार्लमेंटरी कायद्यानें दिलेल्या सुधारणा अपुऱ्या व निराशा-जनक आहेत, तथापि त्या आहेत तशाहि राबवून घ्याव्या " असा ठराव पास झाला. सरकारशीं प्रतियोगी सहकारिता करावी असें तपोवृद्ध टिळकांनीं सांगितलें.

पुण्यशील टिळकांनीं अमृतसर कॉंग्रेसचा निरोप घेतला. परत येतांना ' लोकमान्य टिळक महाराज कीं जय ' या घोषवाक्यानें टिळकांचा यशोदुंदुभी गगनांत निनादत होता. भारतीय अशांतते-च्या जनकानें शांतपणानें पुण्यनगरींत प्रवेश केला. यानंतर टिळक निरनिराळ्या परिषदांना हजर राहिले. त्यांना अनेक मानपत्रें देण्यांत आलीं. १९२० चा एप्रिल सुरू झाला. काळपुरुष टिळकांच्या जीवनग्रंथांतील शेवटचें पान वाचीत होता. टिळकांनीं ६४ व्या वर्षांत पदार्पण केलें होतें. सिंधचा दौरा संपवून टिळक परत

आले. त्या वेळीं सोलापूर येथें प्रांतिक परिषद् भरली होती. तेथें डॉ. बेझंट व नेमस्त पक्ष यांनीं मिळून टिळकांच्या स्वराज्याच्या मागणीला विरोध केला; पण बहुमत टिळकांच्या बाजूलाच पडलें. परिषदेंत दगडफेक होण्यापर्यंत वेळ आली होती. लो. टिळक विलायतेहून आल्यापासून त्यांना विरोध करण्याचें धोरण, नव्या निवडणुकीवर दृष्टि ठेवून, नेमस्त व ब्राह्मणेतर पक्ष यांनीं सहमत होऊन ठरविलें होतें. टिळकांनीं कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना केली. या पक्षाचीं तत्त्वें प्रगट करणारा एक जाहीरनामा काढला, आणि राष्ट्रीय पक्षातर्फे निवडणुकी लढविण्याची तयारी केली. मे महिन्यांत बनारस, जबलपूर इत्यादि शहरांत दौरे काढले. जून महिन्यांत लो. टिळक पुण्यांत आले. त्यांनीं जगन्नाथ महाराज यांच्याकरितां एका अखेरच्या प्रकरणांतील मुकदम्याची तयारी केली. जुलई महिन्यांत हा मुकदमा मुंबई हायकोर्टांत सुनावणीस निघाला. टिळक मुंबईला निघाले. पुण्यपुरीला टिळकांचें सदेह दर्शन पुन्हा घडणार नव्हतें. टिळक मुंबईला पोंचले. ता. २१ जुलई रोजीं टिळकांना मित्रप्रेमाकरितां लढविलेल्या खटल्यांत यश मिळालें. जगन्नाथ महाराज आपल्या दत्तक घराण्यांतील इस्टेटीचे अधिकारी झाले.

ता. २० जुलई १९२० पासून ताप येऊं लागला. आधीं मलेरिया आहे असें वाटलें; पण दोन दिवसांनीं न्यूमोनियाचीं लक्षणें स्पष्ट दिसूं लागलीं. प्रथम उजवीकडील फुफ्फुसाचा भाग सुजला. नंतर कोठा फुगला. यामुळें वरच्यावर उचकी लागून काळजावरहि दडपण पडूं लागलें. ताप १०४° डिग्री होता. पुढें थोडा घाम आल्यानें उतार पडेल असें डॉक्टरांना वाटलें. तथापि ज्वर हें बाह्यलक्षण असून शक्तिपात हाच खरा रोग ठरला.

त्यावर उपाय चालेना. नाडी क्षीण होत चालली. डॉ. भडकमकर, डॉ. देशमुख इत्यादि प्रसिद्ध डॉक्टर रात्रंदिवस टिळकांची सेवा करीत होते; पण लो. टिळकांना वैकुंठाहून निरोप आला होता कीं, " आपल्याला सांगितलेलें कार्य पुरें झालें आहे. या पुढील कार्य करण्याकरितां दुसरा देवदूत भरतभूमीवर पाठविला आहे. आपण लोकांना रामराम करून आपल्या गांवाला निघून यावें. "

सरदारगृहामध्यें समाचाराला येणाऱ्या माणसांची रीघ लागली. नेहमींचे पक्षभेद मावळले होते. अनेकांनीं टिळकांना बरें वाटावें म्हणून प्रार्थना केल्या, होमहवन इत्यादि धर्मकृत्यें केलीं, दानें दिलीं; पण काळपुरुष जीवदान देण्यास तयार नव्हता. तारायंत्रांतून टिळकांच्या प्रकृतीच्या वार्ता भरतखंडांत वाहात होत्या. दैनिकांना तेंच काम होतें. ग. वि. केतकर सांगतात कीं, " अशक्तपणामुळें वाक्याच्या शेवटचे शब्द अस्पष्ट येऊं लागले. सकाळचे वेळीं माणूस ओळखण्याइतकी शुद्धि असे, पण दुपारीं व रात्रीं ती सुद्धां नाहींशी होई. " टिळकांच्या कन्या त्यांना भेटावयास आल्या. तेव्हां टिळक विनोदानें म्हणाले, " पुन्हां सगळ्या जमल्या का तुम्ही ? तुम्हांला उठल्यासुटल्या माहेरीं येण्याची संवयच आहे. " ता. २७ जुलै रोजीं घरच्या व्यवस्थेसंबंधीं कांहीं बोलावें म्हणून श्री. विद्वांस यांनीं सूचक प्रश्न विचारले. तेव्हां टिळक म्हणाले, " अरे ! तूं वेडा आहेस. मी अजून पांच वर्षें खास मरत नाहीं. " ता. २८ रोजीं डॉ. देशमुख औषध देऊं लागले. तेव्हां पुढील संवाद झाला—

**लोकमान्य**— आतां मी तुमचीं औषधें घेणार नाहीं. उगीच त्रास कां देतां ?

**डॉ. देशमुख**—आतां येवढें घ्या. पुन्हां देणार नाहीं.

**लोकमान्य**—आतां यापुढें सर्व औषधांचे डोस डॉ. साठ्ये यांस द्या; ते आमचे सेक्रेटरी आहेत.

शेवटच्या चार दिवसांत खाजगी सांसारिक गोष्टींविषयीं ते एक शब्दहि बोलले नाहींत. अंतकालच्या बेशुद्धींत सुद्धां आपल्या अंगीकृत कार्याशिवाय इतर कोणतीहि गोष्ट मनांत न येणें ही कर्मयोगांतल्या समाधीची पराकाष्ठा होय. ग. वि. केतकर यांनीं टिळकांच्या तोंडचीं जीं वाक्यें ऐकलीं, तीं पुढें दिलीं आहेत: ता. २८ जुलई रात्रीं—

" १८१८ सालीं असें झालें. परवां हें १९१८ साल आलें. A hundred years' history! आम्ही हे असे दीन झालों."

" पंजाब Matter मध्यें तुम्ही काय करणार? पटेल यांस तार केली काय? आम्ही Special Congress भरविणार आहोंत."

ता. २९ जुलई रात्रौ १ वाजतां व्याख्यानाच्या भाषेंत—

" माझी अशी खात्री आहे आणि आपणहि विश्वास बाळगा कीं, हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्याखेरीज तरणोपाय नाहीं."

रात्रीं दोन वाजतां व्याख्यानाच्या भाषेंत—

" आपण व जनता यांनीं जे परिश्रम केले त्याबद्दल मी आपले आभार मानतों."

ता. ३० च्या पुढें त्यांचें बोलणें अस्पष्ट होऊं लागलें. ता. ३१ रोजीं रात्रीं ९ वाजतां लो. टिळकांना श्वास लागला.

मध्यरात्रीनंतर १२ वाजून २० मिनिटांनीं धन्वन्तरी डॉ. भडकमकर उदास मुद्रेनें बाहेर आले आणि म्हणाले, " लो. टिळक ईश्वराधीन झाले आहेत. "

लोकमान्य टिळक देवमान्य झाले. "ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं लो. टिळकांचे मुंबईस देहावसान झालें आणि त्यांनीं आपल्या अंतःकरणांत आजन्म संगोपन करून ठेवलेली आणि स्वार्थाचें हवन करून संवर्धित केलेली क्रांतीची ज्योत त्यांच्या देहाच्या बंधनांतून मुक्त होऊन अखिल भरतखंडांत फैलावली. लोकमान्यांच्या देहावसानाचा दिवस तोच हिंदी राष्ट्राच्या असहकारतेचा दिवस ठरला. लोकमान्यांचा देह पंचत्वांत विलीन झाला आणि त्यांचा क्रांतिकारक आत्मा अखिल भरतखंडास व्यापून राहिला. "

तारायंत्रानें कडकट् आवाजानें " लोकमान्य दिवंगत झाले " ही वार्ता भरतखंडांत पोंचविली. दूरदूरचे लोक मिळेल त्या गाडीनें मुंबईकडे धांव घेऊं लागले. म. गांधी, अलीबंधू, लाला लजपतराय इत्यादि पुढारी सरदारगृहाकडे जाऊं लागले. टिळकांचें शव चौरंगावर बसतें ठेवलें. त्यांच्या अंगावर शालजोडी घातली, कपाळाला भस्म लावलें, पुष्पहार घातला. त्यांना सरदारगृहाच्या वरच्या मजल्याच्या गॅलरींत आणून ठेवलें; त्यामुळें हजारों लोकांना रस्त्यावरून दर्शन घेतां आलें.

आठवणीकार बापट लिहितात, कीं " लोकमान्य समाधिस्त झाल्यावर माझी वृत्ति वेड्यासारखी झाली. मी सरदारगृहाच्या खालीं आलों आणि दूर एका झाडाखालीं बसलों. कांहीं वेळानें दोन शेतकरी तेथें उपस्थित झाले. ते मुंबईस पोट भरण्याकरितां नगर जिल्ह्यांतून आले होते. त्यांपैकीं एक जण दुसऱ्यास

म्हणाला, " कसली रं इथं इतकी गर्दी ! " त्यावर दुसऱ्यानें उत्तर दिलें, ' अर ! पुण्याचा तो आपलं राज्य कमावणारा टिळक होता नव्ह का ? तो इथं मेला म्हणत्यात ! ' हें ऐकतांच पहिला कावराबावरा झाला. तो म्हणाला, " गड्या ! आतां नाहीं आपल्याच्यानं म्होरं जाववत. चला आपण तिथें जाऊन त्याला शेवटचं डोळाभर पाहून घेऊं या. " असें म्हणून ते दोघे तिकडे वळले. ते गर्दीत सांपडले. त्या दोघांचे हात धरून, माझी स्वयंसेवकांशीं ओळख असल्यामुळें, मी त्यांस वर घेऊन गेलों. लोकमान्यांच्या शवाकडे पाहून ते दोघेहि ढसढसां रडूं लागले. मी त्यांस तुम्ही कोठले, काय करतां वगैरे हकीगत विचारली. त्यांपैकीं पहिला म्हणाला, " काय सांगू रावसाब ! आम्ही नगर जिल्ह्यांतले. हे महाराज मागं नगरास आले होते. मी त्यांना चौकर वकिलांचे घरीं गांठून मारवाड्यानें लुबाडलेल्या माझ्या जमिनीचे कागदपत्र त्यांस दाखवलं. त्यांनीं ते सगळे पाहून वाचून माझ्याकडून एक दमडीहि न घेतां रात्रीं मला इंग्रजी अर्ज लिहून दिला व ' कोणाहि वकिलामार्फत कलेक्टराला हा अर्ज देऊन भेट. ' असें सांगितलें. त्याप्रमाणें मी केलं व अखेर माझी जमीन मला परत मिळाली. माझीं बायकापोरं आज त्या जमिनीवर जगत आहेत. या महाराजांनींच आम्हाला अन्न खायला घातलं. असें म्हणून लोकमान्यांच्या शवाकडे पाहात तो ओक्साबोक्सी रडूं लागला."

समुद्रकांठच्या वाळवंटांत दहन करण्याची परवानगी मिळाली. सुमारें दोन वाजतां स्मशानयात्रेला सुरुवात झाली. अनेक पुढाऱ्यांनीं आदरबुद्धीनें एकामागून एक खांदे दिले, त्यांत कोणी जात किंवा धर्म पाहिला नाहीं. मुसलमान पुढाऱ्यांनींहि मधूनमधून

खांदे दिले. लोक ठिकठिकाणीं जागा धरून उभे राहिले होते. दिंड्यांचें अखंड भजन सुरू होतें. मधूनमधून शवासनावर पुष्पवृष्टि चालू होती. संदेशकार कोल्हटकरांच्या शब्दांत असें सांगतां येईल कीं, सर्व अग्नीमध्यें विझविण्यास अत्यंत कठीण म्हणजे शोकाचा अग्नि होय. विरहानें व्याकूळ झालेल्या टिळकांच्या अनुयायांना असें दिसत आहे कीं, सर्व जगतांत वणवा पेटलेला आहे; आप, तेज, वायु या सर्वांनीं पेट घेतलेला आहे, परमेश्वरानें आपलीं सर्व रूपें बंद केलेलीं असून सर्वभक्षक अग्नीच्या रूपानें तो उरला आहे. लोकमान्यांच्या मृत्यूनें खंदे वीर दीन झाले आहेत; अल्पवयी बालकांचीं मुखकमलें कोमेजून गेलीं आहेत; ब्रह्मदेवाचें कडासन मोडून गेलेलें आहे; सह्याद्रीच्या पाठीचा कणा वांकला आहे.

लोकमान्यांचा देह चौपाटीलगतच्या पुलाला वळसा घालूं लागला. पुढें दिंडया चालल्या होत्या, " आम्ही जातों आपुल्या गांवा। आमुचा रामराम घ्यावा।" हें भजन ऐकूं येत होतें. निशाणें फडकत होतीं. भजनी मेळे गात होते. ' लोकमान्य टिळक महाराज कीं जय' अशी ललकारी उंच आकाशांत प्रतिध्वनिरूपानें ऐकूं येत होती. अशा वेळीं असा जोराचा पाऊस पडूं लागला कीं, जणूं कांहीं आकाशाची शिवणच उसवलेली होती. त्या मुसळधार पावसाला पाहून एक तरुण मनुष्य आपल्या वृद्ध मातेला म्हणाला, " आई! हें पहा, टिळकांकरितां देवसुद्धां रडत आहे! "

' टिळक महाराज कीं जय ' या जयजयकारांत, या नादब्रह्मांत तल्लीन झालेली ती यात्रा चौपाटीवर पोंचली. गर्दी जागच्या जागीं उभी राहिली. तिच्या घेरामध्यें लहानशा जागेंत मंत्रांनीं भूमि

शुद्ध करून चंदनकाष्ठांचें सरण रचण्यांत आलें. पुढाऱ्यांचीं समयोचित अशीं भाषणें झालीं. नंतर चितेला अग्निसंस्कार करण्यांत आला. अशांततेचा जनक शांत झाला. लोक विषण्ण चित्तानें घरीं परतले.

न. चिं. केळकर लिहितात कीं, "लो. टिळक ता. १२ जुलई रोजीं मुंबईस जाण्याकरितां गायकवाडवाड्यांतून बाहेर पडले. ते मुंबईहून गायकवाडवाड्यांत ता. ३ ऑगस्ट रोजीं परत आले. जातांना ते आपल्या साडेतीन हात देहानिशीं बाहेर पडले. येतांना ते अंगुष्ठमात्र देहानें आले. जातांना त्यांनीं अंगांत नेहमींचा पोषाख घातला होता. येतांना त्यांनीं चिताभस्माचें रूप धारण केलें होतें. जातांना ते आपल्या पायांनीं गेले. येतांना ते एका वीतभर लांबीच्या चंदनी पेटींत निजून आपल्या परिचरांच्या खांद्यावर बसून आले. जातांना त्यांचा सर्व ऐहिक व्याप त्यांच्या डोक्यांत घोळत होता. येतांना त्या सर्व व्यापांचा त्यांनीं त्याग केला होता. जातांना ते वासनापूर्ण होते. येतांना त्यांनीं सर्व वासना टाकून दिल्या होत्या. जातांना ते लोकांविषयीं बोलत होते. येतांना त्यांनीं स्वतः शाश्वत मौनव्रत स्वीकारलें असून सर्व लोक मात्र त्यांच्याविषयीं बोलत होते." टिळकांच्या अस्थि पुण्यांत आणल्या. पुण्यांतील और्ध्वदेहिक कृत्य संपल्यावर त्यांच्या चिरंजिवांनीं त्या अस्थि श्रीक्षेत्र प्रयाग येथें नेल्या. ता. ८ ऑगस्ट रोजीं त्रिवेणी—संगमांत विधिपूर्वक त्या पवित्र अस्थींचें विसर्जन करण्यांत आलें. "अशा रीतीनें टिळकांचें लौकिक चरित्र संपलें. देह मातीला मिळाला. आत्मा स्वस्थानीं गेला आणि टिळकांच्या स्मरणानें हिंदी जनतेच्या मनोमंदिरांत कायमची वसती केली."

## ( ८४ ) महात्मा गांधी म्हणाले—

'यंग इंडिया' या साप्ताहिकांतील हृदयस्पर्शी उद्गार पाहा. म. गांधी म्हणाले, "ते गेले यावर विश्वास बसणेंहि कठीण आहे. इतके ते राष्ट्रीय जीवनाशीं एकरूप झाले होते. बहुजन समाजावर त्यांच्याइतकें वजन दुसऱ्या कोणत्याहि समकालीन पुढाऱ्याचें बसलेलें नव्हतें. हजारों देशबांधवांची अलौलिक निष्ठा त्यांच्या चरणांवर जडलेली होती. तें त्यांचें दैवत होतें. त्यांचा शब्द समाजाला प्रमाण वाटत असे. राष्ट्रांतील ती थोर विभूति आतां नाहींशी झाली आहे. सिंहाची गर्जना आतां लुप्त झाली आहे. देशभक्तीचें त्यांना वेड होतें. तोच त्यांचा धर्म होता. लोकशाहीवर त्यांचा अपार विश्वास होता. त्यांची इच्छाशक्ति जबर होती. त्यांच्या आयुष्याचा कारभार उघडा असे. त्यांची राहाणी साधी होती. त्यांचें खासगी वर्तन निष्कलंक होतें. त्यांचें धैर्य सदैव अढळ असें, आणि त्यांचा आशावाद केवळ अदम्य होता. त्यांनीं राष्ट्राचें स्वातंत्र्य पुष्कळ वर्षांनीं जवळ आणलें. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' हा मंत्र त्यांनीं खेड्यापाड्यापर्यंत पोंचविला. त्यांच्या इतक्या चिकाटीनें व व अभिनिवेषानें स्वराज्याची आक्रमक मागणी दुसऱ्या कोणींच केली नाहीं. स्वातंत्र्याच्या युद्धांत त्यांनीं कोणावर दयामाया दाखविली नाहीं आणि कोणाकडून अपेक्षिलीहि नाहीं. राष्ट्रजनक या नात्यानेंच भावि पिढ्या त्यांच्याकडे सदैव आदरानें पाहातील. अशा विभूतीला मृत्यु आला असें म्हणणें हें योग्य होणार नाहीं. त्यांचें धैर्य, त्यांचा साधेपणा, त्यांची उद्योगशीलता आणि त्यांची राष्ट्रभक्ति या गुणांनीं आपलें स्वतःचें जीवन गुंफणें हेंच लोकमान्यांचें शाश्वत स्मारक होय."

## (८५) केंद्रमंत्र्यांचें भाषण—

कांहीं महिने हें चरित्र लिहीत असतांना लो. टिळकांचा सहवास मला मिळाला. चरित्र लिहीत असतांना टिळक चालत आहेत, बोलत आहेत, लिहीत आहेत असा मला भास झाला. अनेक ग्रंथांचा साभार उपयोग करून मी हें चरित्र लिहिलें, नव्हें कोणीतरी माझ्याकडून तें लिहवून घेतलें. काय मानूं मी या ग्रंथाचे उपकार। मज निरंतर जागवीती, अशाच तऱ्हेची जागृति मला एक भाषण श्रवण करतांना मिळाली.

२३ जुलई १९५६ हा शुभदिन स्वातंत्र्याच्या दीप्तीनें प्रकाशमान झाला. लो. टिळकांचा जन्म होऊन १०० वर्षें झालीं, म्हणून भरतखंडांत जन्मशताब्दीचा उत्सव साजरा होत आहे. अनेक ठिकाणीं भाषणें चालू आहेत. मी आमच्या घरांतील नवीनच घेतलेला रेडिओ चालू केला. दिल्लीच्या रेडिओ स्टेशन-मधून एका मानधन मंत्र्याचा परिचित आवाज ऐकूं येत आहे असा मला भास झाला. खादीचे जाडेंभरडें धोतर, गळेबंद कोट, विस्कळितपणें घातलेली गांधी टोपी, जरा दर्शविणारे पांढरे शुभ्र केस, मिशा काढल्यामुळें क्षणभर भासणारें तारुण्य, घारे डोळे, जाड भिंगाचा चष्मा, आंगठे बाहेर ठेवून कोटाच्या खिशांत घातलेले हात, मिस्किल हास्य आणि झुंजार महाराष्ट्रीय वृत्ति अशा थाटांत हे एका काळचे केंद्रमंत्री भाषण करीत आहेत, असा मला भास झाला. पुष्कळांना तें भाषण ऐकूं आलें नाहीं. पण मला तें भाषण ऐकूं आलें. घरांतील सर्व बालगोपाल रेडिओजवळ जमा झाले आणि तें स्फूर्तिदायक भाषण आपल्या कर्णसंपुटांत साठवूं लागले. श्रोत्यांना स्नेहपूर्ण आवाहन करून नियोजित वक्ते म्हणाले कीं, " बंधु भगिनींनो !

"भारताच्या आधुनिक स्वातंत्र्याची कथा म्हणजे प्रयत्नांचें एक महाभारत आहे. भारताचें विद्यमान स्वातंत्र्य चुटकीसरसें मिळालेलें नाहीं. अनेक वीर पुरुष व अनेक पिढ्या यांच्या प्रयत्नांचा, स्वार्थत्यागाचा व निष्ठेचा तो परिपाक आहे. १८१८ मध्यें मराठी–साम्राज्य नष्ट झालें. त्याच दिवसापासून आधुनिक स्वातंत्र्याच्या प्रयत्नाला प्रारंभ झाला. त्या काळीं कांहीं लोक दुःखी झाले, विस्मित झाले. कांहीं विवेकी आणि विचारी झाले. लो. टिळक यांच्या पूर्वीच्या पिढींत भावि समाजघटना कशी असावी याची कल्पना स्पष्ट झाली होती, कांहीं आदर्श आकार घेत होते, न्या. रानडे, तेलंग इत्यादि मातबर पुढाऱ्यांनीं सनदशीर मार्गांनीं प्रचार करण्याची आवश्यकता आहे असें प्रतिपादिलें. चळवळ अधिक तीव्रतेनें करावयाची ही त्या वेळची गरज होती. या योग्य कालक्षणाला लोकमान्य टिळक हे उदित झाले. १८८० ते १९२० या ४० वर्षांत लो. टिळकांनीं अशा एका राजकीय जीवनाचा पाया घातला कीं, त्याला देशाच्या इतिहासांत जोड नाहीं. राजकारण हें करमणुकीसाठीं नसून जीवनयज्ञाचा तो एक भाग आहे, ही श्रद्धा लोकमान्यांनीं निर्माण केली. त्यांनीं लोकशिक्षणाचें प्रखर साधन असणारा वृत्तपत्रप्रचार हातीं घेतला. त्याचप्रमाणें निरनिराळ्या आदर्शांनीं प्रेरित होऊन त्यांनीं शिक्षणसंस्था काढल्या. त्यांच्या 'केसरीचा' प्रचार इतक्या परिणामकारकरीतीनें होत गेला कीं, महाराष्ट्रांतील सार्वजनिक जीवनांत त्याला प्राणवायूप्रमाणें महत्त्व मिळालें. त्यांनीं केसरींतून नैमित्तिक प्रश्नांवर चर्चा करून लोकांचीं दैनंदिन गाऱ्हाणीं वेशीवर टांगलीं. राजकीय व सामाजिक बाबतींत सल्ला देऊन त्यांनीं

महाराष्ट्रात राजकीय जीवन निर्माण केले. जमेल तेथें सत्तेला धरून, पटेल तेथें सत्तेच्या इच्छा लक्षांत घेऊन, पण अवश्य असेल तेथें सत्तेला सोडून, किंबहुना धिःकारून निर्भीडपणें व निश्चयानें पुढें जाणारें असें तें जीवन होतें. लोकमान्यांनीं राजकीय क्षेत्रांत केलेलें कार्य अशा दर्जाचें होतें कीं, ' तयाचें गुणमहत्त्वासी तुलना कैसी ? '

" ' राष्ट्रस्वतंत्रताध्येयं साधनानां अनेकता ' हा त्यांचा सिद्धान्त होता. या स्वातंत्र्याकरितां संघर्ष चालू असतांना त्यांच्या चातुर्याची आणि धैर्याची परीक्षा झाली. संकटांत आदर्श तावून सुलाखून सुवर्णरूप होतात. दुष्काळ निवारण्याच्या कामीं, तसेंच प्लेगबाबत होणाऱ्या जुलमाच्या कामीं त्यांनीं बहुमोल कामगिरी केली. राज्यकर्त्यांचा त्यांच्यावर रोष झाला. त्यांच्यावर पहिला राजकीय खटला होऊन त्यांना शिक्षा झाली. त्यांना नेतृत्वाचा राज्याभिषेक झाला. शिक्षा भोगून परत येतांच त्यांचें व्यक्तिमत्व उंचावलें, वाणींत अधिकार आला व कार्यांत अधिक निश्चय दिसूं लागला. काळफलकावर विसावें शतक लागतांच हिंदी राजकारणांत टिळकयुग सुरू झालें. बिंदूबिंदूंनीं उगम पावलेली स्वातंत्र्याची गंगा आतां अधिक खोल, रुंद आणि गतिमान झाली. तिच्या प्रवाहाला आतां निश्चित दिशा आहे हें स्पष्ट झालें. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार व स्वराज्य ही आचार्य टिळकांची चतुःसूत्री दृढमूल झाली. १९०० सालापासून देशांतील राजकीय जीवनांत चढती-वाढती खळबळ सुरू झाली. चळवळीला थोडें हिंसात्मक स्वरूप येऊं लागलें. पारतंत्र्यांत असलेल्या जनतेला सशस्त्र बंड करण्याचा अधिकार आहे, हा इतिहासानें मान्यता दिलेला सिद्धांत राज्यकर्त्यांच्या प्रगतिविमुख

धोरणानें येथेंहि स्वागताई ठरला. सरकारनें दडपशाही सुरू केली. दडपशाहीनें चौकांतील चळवळ तळघरांत गेली. मुकी केलेलीं तोंडें बॉम्बच्या स्फोटानें बोलूं लागलीं. कवि कारागृहांत पडले तर त्यांचीं स्वातंत्र्यगीतें अमर झालीं. कारागृहांतील वनवास व शृंखल यांतूनच दास्यशृंखला तुटणार हें स्पष्ट झालें.

१९०८ मध्यें सरकारनें टिळकांना पकडलें, त्यांच्यावर खटला भरला आणि सहा वर्षांची शिक्षा दिली. तथापि स्वातंत्र्याची चळवळ थंडावली नाहीं. ती भूमिगत झाली. राजकर्त्यांबद्दल वाटणाऱ्या असंतोषानें द्वेषाचें स्वरूप घेतलें. किती हद्दपार झाले, किती कारागृहीं कष्टले, किती फांशी गेले याचा हिशोब कोण करणार ? ते सर्वच धन्य होत. कणाकणांनीं ते झिजले; पण क्षणाक्षणांनीं त्यांनीं स्वातंत्र्य जवळ आणलें.

१९०८ ते १९१४ या सहा वर्षांत टिळकांनीं वाङ्मयाचें कार्य केलें. नेतृत्व विद्वत्तेवर आधारलेलें असलें म्हणजे तें केव्हांहि विफल होत नाहीं. कस्तुरी कपाळाला न लावतां बाजूला फेकली तरी तिचा परिमल कमी होत नाहीं. विदग्ध व्यक्तिमत्त्व परिस्थितीला अनुरूप असें वागतें आणि विकसत जातें. राजकारणाच्या खळबळींतून मुक्त होतांच टिळकांनीं गीतेचा अभ्यास पुन्हा सुरू केला. भगवंतांनीं रणांत गीता सांगून कुरुक्षेत्र गाजविलें. बलवंतानें रण गाजवून एकांतांत गीता सांगून पुन्हां रणाला आव्हान दिलें. टिळकांनीं यापूर्वीं 'आर्यांचें वसतिस्थान' व 'ओरायन' हे ग्रंथ लिहिले. या ग्रंथांत त्यांची गाढ विद्वत्ता व सूक्ष्म दृष्टि हीं दिसून येतात. गीतारहस्यांतहि तेंच दृश्य दिसतें. पहिले ग्रंथ विद्वानांसाठीं, तर हा ग्रंथ बहुजनसमाजासाठीं होता.

२०५३८ ... १८७ ... ८३१ ... नों. दि. ... १९६१

ग्रंथनिर्मिति ही जेव्हां ग्रंथकाराच्या जीवनाची प्रतिकृति असते, तेव्हांच ती श्रेष्ठ वाङ्मय ठरते.

"या सहा वर्षांच्या तपानंतर टिळकांनीं नाममात्र विश्रांति घेऊन, 'पुनश्च हरिः ॐ' असें म्हणून कामाला सुरुवात केली. महायुद्ध सुरू झालेलें पाहून जगांतील नकाशांचे रंग बदलणार हें त्यांनीं दीर्घ दृष्टीनें जाणलें. त्याप्रमाणें चळवळीची योजना आंखली. वसाहतिक स्वायत्तता साम्राज्याच्या कवचाखालीं वाढत जाऊन प्राप्त घडी येतांच कवच फुटेल अगर फोडलें जाईल व त्यांतून आधुनिक भारताचें स्वातंत्र्य स्पष्ट होईल, ही घटना दीर्घदर्शी लोकमान्यांनीं जाणली होती. होमरूलवरील त्यांचीं भाषणें, सैन्य-भरतीबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन, सत्याग्रहाबद्दलची त्यांची भूमिका या सर्व गोष्टींत एकसूत्रता होती. त्यामागें एक राजकीय तत्त्वज्ञान होतें. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,' हें त्या दर्शनाचें महावाक्य होतें 'व तें मी मिळविणारच' ही घोषणा त्यांतील स्फूर्ति होती, श्रद्धा होती.

"अफाट उत्साह आणि जागृति, मौलिक राजकीय शिक्षण आणि राष्ट्रीय ध्येय, कार्यप्रवीण श्रद्धा आणि अनुरूप तात्विक बैठक भारताला देऊन, त्यांनीं प्रयत्नांचा वीणा आपल्या हातांतून पुढील राष्ट्रभक्तांच्या हातांत मृत्यूला साक्षी ठेवून दिला. ते कृतकार्य झाले, कृतार्थ झाले. त्यांच्या मृत्यूनंतर आज ३६ वर्षें झालीं. एक पिढी संपली. भारत स्वतंत्र झाला. कित्येक पिढ्यांचें कार्य पूर्ण झालें. अनेकांचे श्रम, अश्रु व रक्त खर्चीं पडलें. त्याचें सार्थक झालें. आज नव्या युगाच्या प्रवेशद्वारापाशीं हा प्राचीन देश उभा आहे. पुढील प्रवासांत त्याला मार्गदर्शन हवें आहे. ज्यांच्या चारित्र्यापासून मार्गदर्शन होणार, त्यांपैकीं लोकमान्य ही

एक महान् व्यक्ति आहे. निष्कलंक चारित्र्य, असामान्य बुद्धिमत्ता, महान् व्यवहारदक्षता, कुशल समयज्ञता,— किती गुणांची माहिती सांगूं ? त्यांचें बोलणें, त्यांचें चालणें, त्यांचें सलगी देणें, सर्व कांहीं असामान्य होतें. त्या युगकर्त्या पुरुषास सहस्र प्रणाम ! जय हिंद. ''

मंत्र्यांचें भाषण झाल्यावर महाराष्ट्राला वेड लावणारा एक गोड आवाज रेडिओमधून ऐकूं आला. तो आवाज नारायणराव राजहंस यांचा होता. या राजहंसांना 'बालगंधर्व' ही पदवी लो. टिळकांनीं दिली. गोविंद कवींनीं लोकमान्य टिळकांवर लिहिलेली भूपाळी बालगंधर्वांच्या कंठांतून रेडिओवर ऐकूं आली.

जय जय टिळका अपर समर्था, धीरा धीभास्करा ।
शुभकरा । धीरा धीभास्करा ।
मायभूमि ही करित आज तव जन्मोत्सव साजरा ॥ ध्रु.॥
टिळक नव्हे, हें श्रीगीतेचें हृदय प्रगट जाहलें ।
ज्ञानमय । हृदय प्रगट जाहलें ।
कर्मयोग तो शिकवायाला आर्यजनां धांवले ॥ १ ॥
जनभाग्यांतुन, हिमालयांतुन गंगौघच हा पुढें ।
धावला । गंगौघच हा पुढें ।
राष्ट्रिय दुर्गुण धूत चालला मोक्षसागराकडे ॥ २ ॥
सुबोध वीणा करी झणाणा, नाच स्वावलंबना ।
मयूरा । नाच स्वावलंबना ।
टिळकांची वाग्भगवती गाते राष्ट्रगीतगायना ॥ ३ ॥
टिळक नव्हे ही आत्मश्रद्धा शिवरायाची असे ।
खरोखर । शिवरायाची असे ।
निश्चयरूपें भगवा ध्वज हा स्वकरें उभवीतसे ॥ ४ ॥

विद्वत्तेच्या अंकावरती राष्ट्रभक्ति खेळते ।
टिळक ही । राष्ट्रभक्ति खेळते ।
बांधव प्रीति गायन करिते, समता ती डोलते ।। ५ ।।

किती धन्यता, किती मान्यता, किती पूज्यता परा ।
नरवरा । किती पूज्यता परा ।
स्वयं कीर्ति ती चामर ढाळी तुजवर ज्ञानेश्वरा ।। ६ ।।

तव अनुशासन जनसंजीवन, सिंहासन तुज नसे ।
राजसा । सिंहासन तुज नसे ।
अनभिषिक्त भूपाल, स्मरण हें जनहृदयीं दिसतसे ।।७।।

तुझी योग्यता असामान्य, ही जनता ऐसें वदे ।
विचारी । जनता ऐसें वदे ।
असंख्य तरवारींचे मुजरे झडावेच तुजपुढें ।। ८ ।।

निष्कलंक चारित्र्यचंद्र तव, टिळक लोकनायका ।
चंद्र तव । टिळक लोकनायका ।
एका स्तंभावरी उभी ही महाराष्ट्रद्वारका ।। ९ ।।

मुक्या मनानें किती उधळावे शब्दाचे बुडबुडे ।
तुजपुढें । शब्दांचे बुडबुडे ।
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ।। १० ।।

जय जय टिळका, राष्ट्रनायका, धीरा, धीभास्करा ।
शुभकरा । धीरा धीभास्करा ।
मातृभूमि ही करित आज तव जन्मोत्सव साजरा ।।११।।

◆◆◆

प्रवेशांक 20430 वि. ...
क्रमांक 037 नों. दि. 14/8/14

आत्यंतिक लोकप्रिय पटकथेचा
कादंबरीमय आविष्कार

ज्या बोलपटानें अवघा महाराष्ट्र हेलावला, त्यांतल्या
वहिनीनें असंख्य प्रेक्षकांच्या डोळ्यांतून
अश्रू काढले अशा प्रेमळ नि
त्यागमूर्तीचें हृदयस्पर्शी शब्दचित्र.

# वहिनींच्या बांगड्या

या भावपूर्ण कादंबरींत वाचा

लेखक : श्री. य. गो. जोशी

पृष्ठसंख्या १६०, किंमत दोन रुपये, ट.ख. बारा आणे

ज्यांनीं आपलें सारें जीवन भूदान यज्ञासाठीं समर्पण
केलें आहे अशा थोर संताचें वास्तव चरित्र-चित्रण.

# आचार्य विनोबा भावे

लेखक : श्री. म. म. केळकर

किंमत १। रुपया ट. ख. १० आणे

यशवंत प्रकाशन, ६८९/२४ सदाशिव, पुणें २

कै. साने गुरुजींच्या "श्यामची आई" या पुस्तकाप्रमाणेंच मातृहृदयाची विशालता दर्शविणारी आणि वाचकांना निरागस आनंद मिळवून देणारी

श्री. य. गो. जोशी यांची

# दुधाची घागर

ज्या पुस्तकानें असंख्य वाचकांच्या मनांत सहसंवेदना निर्माण केल्या, मातृप्रेमाच्या स्मृतींनीं हृदयें हेलावलीं गेलीं आणि साश्रु नयनांनीं ज्याची मुक्तकंठ प्रशंसा केली असें पुस्तक प्रत्येकाच्या संग्रहीं अवश्य असलें पाहिजे.

पृष्ठसंख्या १६०-किंमत २ रुपये-टपालखर्च १२ आणे

सर्वत्र मिळतें-किंवा मागणी करा.

**यशवंत प्रकाशन,** ६८०/२५ सदाशिव—पुणें २.

लघुकथा, पटकथा आणि आतां

## कादंबरी

# शेवग्याच्या शेंगा

लेखक : श्री य. गो. जोशी

सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी ज्या लघुकथेला स्पर्धेमध्यें पारितोषिक मिळून मराठी साहित्यांत श्री. य. गो. जोशी यांनीं आपलें नांव चिरस्थायी केलें त्या कथेवर आधारलेल्या पटकथेचें कादंबरीमय रूप वाचकांसमोर येत आहे.

- बहीण-भावांची गोष्ट
- कौटुंबिक वातावरण
- जिव्हाळा आणि भावनाविष्कार

सचित्र-पृष्ठसंख्या १६०

किंमत २ रुपये—ट. ख. १२ आणे

यशवंत प्रकाशन,
६८९/२४ सदाशिव, पुणें २.

REFBK-0008896

ग्रं. क्र.



१९५८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय- चरित्र
क्र. नं. ७३१
REFBK-0008896

# लोकमान्य टिळक चरित्र

श्री. त्र्यं. ग. बापट

# लोकमान्य टिळक-चरित्र

★

★ ★

अनुक्रम 20435 दि. ......
क्रमांक ...... नों: दि:

त्र्यं. ग. बापट

संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
REFBK-0008896